१८२२
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र. नं.
REFBK-0002322

भारतीय शासन पद्धती

केळकर न. चि.

कि. ५ रु. सन १९२३

REFBK-0002322

REFBK-0002322

232

# ना. प्रो. काळे यांचा अभिप्राय.

**ना. प्रो. काळे, एम. ए.; इतिहास व अर्थशास्त्राचे प्रोफेसर, फर्ग्युसन कॉलेज पुणें, व कौन्सिल ऑफ स्टेट व टॅरिफ बोर्डाचे सभासद** लिहितातः—

रा. नेने ह्यांनीं ' भारतीय शासनपद्धति ' ह्या नांवाचें लिहिलेलें पुस्तक वरेंचसें वाचून पहातां, त्यांतील विषयाची मांडणी निवळ मराठी भाषा जाणणाऱ्या जिज्ञासूंस सुलभ वाटून, हिंदुस्थानच्या राजकीय कारभाराचें ऐतिहासिक आणि सद्यः स्थिति विवेचक ज्ञान सहज रीतीनें प्राप्त करून घेण्यास त्यांस हें चांगलें साधन उपलब्ध झालें आहे, असें आमचें मत झालें आहे. खेडेगांवापासून तों तहत पार्लमेंटापर्यंत राज्यकारभार कसा चालतो व ह्यापुढें तो कसा चालणें इष्ट आहे, त्याचप्रमाणें सदरहु राज्यकारभाराशीं आपला काय संबंध आहे व त्या बाबतींत आपलें काय कर्तव्य आहे, ह्याविषयींची माहिती जनतेपैकीं प्रत्येक स्त्री पुरुषास होणें आजकाल अत्यावश्यक झालें आहे. आपलें हक्क काय आहेत व आपल्या गाऱ्हाण्यांची कशी दाद लाऊन घ्यावी ह्याची बरोबर कल्पना फार थोड्या लोकांस असते आणि असलें अज्ञान हिंदुस्थान देशाच्या प्रगतीस घातुक आहे. देशी भाषांत पुस्तकें लिहून योग्य ज्ञानाचा प्रसार करणें हा एक सुधारणेचा मार्ग आहे आणि रा. नेने ह्यांचें पुस्तक ह्या कामीं उपयुक्त झाल्याशिवाय राहणार नाहीं असें आम्हांस वाटतें. पुस्तकाच्या विशिष्ट गुणदोषांत न शिरतां असें म्हणण्यास आम्हांस आनंद वाटतो कीं, रा. नेने यांनीं राज्यकारभाराच्या अंगोपांगांचें केलेलें वर्णन मनोरंजक व बोधप्रद झालें आहे. राजकीय संघटणा व राजकीय शिक्षण ह्यांची सध्यां आमच्या देशांत अत्यंत जरूर आहे आणि त्या बाबतींतलीं उणीव भरून काढण्यास प्रस्तुत पुस्तकाचें थोडेंबहुत सहाय्य झाल्यास तें लिहिण्याचा उद्देश सफल होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

+ प्रुफें तपासण्याच्या कामीं रा. म. पां. नेने यांचे मला पुष्कळ सहाय्य झालें, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.—लेखक.

या अवधींत शांतिसौख्य न मिळाल्यानें त्यासाठीं ते भुकेलें होते. ही शांतता प्रस्थापित करण्यांस त्यांना इंग्रजांनीं मदत केली व त्याबद्दल कृतज्ञ होऊन त्यांनीं आपखुशीनें आपलीं मान इंग्रजांच्या ताब्यांत दिली असें कांहीं इतिहासकारांचें म्हणणें आहे. परंतु आमच्या मतें त्यांचा हा कोटिक्रम चुकीचा असून तो अगदीं अशक्यसा दिसतो. कारण **कृतज्ञतेचा मोबदला ह्मणून कोणतेंही राष्ट्र आपल्या स्वातंत्र्याची विभागणी करूं देणार नाहीं; कृतज्ञ रहावें ह्मणून कोणीही मर्द आपल्या सदसद्विचार बुद्धीचा खून करणार नाहीं; कृतज्ञ रहावें ह्मणून कोणीहि स्त्री आपल्या पातिव्रत्याची होळी करणार नाहीं; तसेंच कृतज्ञ रहावें ह्मणून कोणतेंही राष्ट्र आपल्या स्वातंत्र्याची आहुती देणार नाहीं हा** जगाचा सिद्धांत आहे. मग एकट्या हिंदुस्थानच्या बाबतींतच तो कसा खोटा ठरेल! सर जॉन सीली आपल्या ग्रंथांत असें ह्मणतों कीं, हिंदुस्थानांत एक-राष्ट्रीयत्वाचा अभाव असल्यामुळें हा गोष्ट घडून आली. एक धर्म व एकभाषा ही एकराष्ट्रीयत्वाची मुख्य लक्षणें समजली जातात. ही हिंदुस्थानांत नव्हती. हिंदुस्थानांत हिंदूधर्माचें प्राबल्य जरी होतें तरी एकधर्मत्वाची भावना जनतेच्या मनांत फारच अल्प प्रमाणांत होती, व धार्मिक गोष्टींत ब्राह्मण लोकांचें वर्चस्व होतें असें त्याचें ह्मणणें आहे. तें कांहीं अंशीं जरी खरें असलें तरी बव्हंशीं खोटें असल्यामुळें त्याज्य आहे. युरोपियन ग्रंथकार ब्राह्मण्य हा एक धर्म समजतात. परंतु ही त्यांची चूक होय. ब्राह्मण्य हा एक धर्म नसून तें हिंदू धर्मांतील एका जातीचें वैशिष्ट्य आहे. एकराष्ट्रीयत्वाची मूळ कल्पना हिंदुस्थानांतच उगम पावून नंतर ती पश्चिमेकडे गेली आहे असें हर्बर्ट रिस्ले याचें मत आहे. असें असतां हिंदुस्थानांवर एकराष्ट्रीयत्वाभावाचा मिथ्या आरोप करणें ह्मणजे सत्याचा धडधडीत खून होय. खरें कारण एकराष्ट्रीयत्वाभाव नसून दुसरेंच आहे. परकीयांच्या सत्तेमुळें व फार दिवस पारतंत्र्याचें जोखड मानेवर वागविल्यामुळें लोकांच्या मनांतील एकराष्ट्रीयत्वाची भावना थंडावत चालली होती. परंतु अनुकूल स्थिति येतांच ती प्रदीप्त होईल अशी चिन्हें त्यावेळीं दिसत होती व तसें आज घडूनही आलें आहे.

इंग्लंडनें हिंदुस्थान जिंकिलें नाहीं या विधानाचें समर्थन खालील उदाहरणा-वरून चांगलेंच करितां येतें. एकादें राष्ट्र जिंकावयास किती आयास पडतात हें सर्वांस माहीतच आहे. शिवाजीस मुसलमानाकडून प्रदेश जिंकून स्वराज्यसंपादनार्थ काय खटाटोप करावें लागलें हें कोणास नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. स्वामिभक्त शूरवीरांच्या कर्तबगारीस, देशच्या देश पादाक्रांत करण्यासाठीं धनधान्यादिकांची जोड द्यावी लागते हें आपण पहातों. परंतु इंग्लडांस हिंदुस्थान मिळविण्यास या दोहोंचीही जरूरी लागली नाहीं. इंग्लडनें हिंदुस्थानाव्यतिरिक्त कैक ठिकाणीं अपूर्व लढाया जिंकिल्या आहेत. त्या लढायांत इंग्लडास पाण्या-सारखा पैसा खर्च करावा लागला आहे. बड्या बड्या मुत्सद्यांना आपलें बुद्धि-सर्वस्व या कामीं खर्ची घालावें लागलें आहे. देशभक्त वीरांना पराक्रमाची शिकस्त करून स्वप्राणांस मुकावें लागलें आहे. परंतु हिंदुस्थानच्या बाबतींत इंग्लडनें स्वतःजवळील एक कपर्दीकही खर्चिली नसून कोणाही मुत्सद्याचें डोकें हिंदुस्थानांतील परिस्थितीचा विचार करितां करितां भणभणून गेलें नाहीं. या गोष्टीची इतिहास चांगलीच साक्ष देत आहे. इंग्लंडच्या मुत्सद्यांचें लक्ष फक्त एकावेळींच हिंदुस्थानाकडें लागलें होतें व तें ही सन १७८४ सालीं पिट, बर्क व फॉक्स या त्रिकुटाच्या वेळीं. परंतु राज्यविस्ताराच्या सबंध शतकांत ( १७५७–१८५७ ) इंग्लडनें हिंदुस्थानाकरितां माणसांची अगर पैशाची कधींही झीज सोसली नाहीं. राज्यवृद्धीचें काम इंग्लंडकरितां हिंदूलोकांकडून परस्परच होत होतें. व तें पाहून इंग्लंडच्या मनांत, आंतल्याआंत आनंदाच्या गुदगुल्या होत होत्या. आपण हिंदुस्थान जिंकून तेथें पातशाहत स्थापूं असें इंग्रज लोकांच्या मनांत स्वप्नींही आलें नाहीं असें वर सांगितलें आहेच. इंग्लडच्या मनांत करावयाचें होतें एक, पण झालें भलतेंच. व्यापार करण्याच्या हेतूनें इंग्लडनें हिंदुस्थानांत एक पाय ठेवला; परंतु दुसरा पाय व्यापारभूमीवर ठेवावयाचा तो चुकून सम्राटपदावर पडला इतकेंच. सर सीली साहेबांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे इंग्लडनें भ्रांतींत हिंदुस्थान मिळविलें. हा प्रसिद्ध इतिहास-कार म्हणतो, “ इंग्लडनें हिंदुस्थानदेश जिंकिला तो कोणत्याही विशिष्ट

सूचक टीका करून आपले अभिप्राय व्यक्त केले आहेत. ग्रंथांत माहितीहि भरपूर दिली आहे. ऐतिहासिक समालोचनांत मला मतभेदाची स्थळें बरींच आढळलीं. परंतु या विषयांत मतभेद हा सदाच इष्ट व विचारोत्तेजक असतो. रा. नेने यांची भाषापद्धति सरळ, सोपी व चटकदार आहे त्यामुळें अशा सूक्ष्म विषयांवरील पुस्तक, असून तें वाचतांना कंटाळा येत नाहीं. या ग्रंथाचा विद्यार्थ्यांस तसाच सर्व बहुश्रुत गृहस्थांस उपयोग होईल व याचे वाचनांपासून देशस्थितिविषयीं साधार माहिती मिळेल यासाठीं सर्वांनीं यास आश्रय द्यावा.

**P. B. Naik** Esqr. M. A., [retired] Senior Professor of History & Economics, Baroda College and Examiner of Intermediate classes of Bombay University, in Indian Administration writes:"—......From my experience I can safely say that students reading Indian Administration for the Intermediate Arts Examination have only a perfunctory knowledge of this Subject although we have got a fairly good number of books in English on the subject. I am of opinion that Mr. Nene's book will be of considerable help to those who have to read Indian Administration. The book is sure te be popular with the Marathi readers when so much is said on the subject in newspapers and public discussions. Mr. Nene has spared no pains in giving up-to-date information on all important topics. I can very strongly recommend this both to the College students and the Marathi reading Public. The book is well written. I congratulate Mr. None on his most successful attempt and hope that the Second Part will be soon published.

**श्री. दा. ना. आपटे,** बी. ए. एल एल. बी. ( अध्यक्ष वाङ्मय मंडळ बडोदें ) लिहितातः—" स्वराज्याच्या अपेक्षेनें प्रचलीत शासनपद्धतींत उत्तरोत्तर अधिक प्रगति व्हावी एतदर्थ चालू असलेल्या राजपक्षीय व प्रजापक्षीय प्रयत्नांच्या सांप्रतच्या काळांत त्या विषयाची संकलित पण विश्वसनीय माहिती उपलब्ध असण्याची फार अवश्यकता आहे हें सांगणें नकोच. भारतीय राज्य-

शासनाच्या विस्तृत क्षेत्रांतील निरनिराळया प्रदेशांचे आक्रमण करणारे अनेक ग्रंथस्थ माहिती इतरत्र असली तरी मराठी भाषेंत हीं सर्व एकत्र केलेली नव्हती. * * रा. विष्णू पांडुरंग नेने यांनीं आपला **भारतीय शासनपद्धति** या ग्रंथाचा पहिला भाग प्रकाशित केला आहे. यांतील माहिती विश्वसनीय अशा इतर आधारांतून घेतलेली आहे. दरेक भागाचें विवेचन करतांना त्या विषयाचा मागील इतिहास दिल्यानें सुधारणेची परंपरा समजण्यास मदत होते. ........ पुस्तक संग्राह्य आहे. ''

**श्री. वा. वि. जोशी** बी.ए. एलएल. बी. संपादक **सहविचार** लिहितातः— "...राजकारणांत पडणाऱ्या प्रत्येक मनुष्यास शासनपद्धतीची खरीखुरी माहिती असणें अत्यंत जरूर आहे....या साठीं मराठी वाचकांकरितां थोडक्यांत आणि सुसंगतवार माहिती देणारें पुस्तक मराठींत प्रसिद्ध होणें जरूर होतें. रा. वि. पां. नेने यांनीं लिहिलेलें '**भारतीय शासनपद्धति**' हें एक अशा प्रकारचेंच पुस्तक असून त्याचा पहिला भाग मी वाचला. रा. नेने यांनीं ऐतिहासिक भाग जितक्या समतोलपणें लिहिले आहेत तितकेच ते माहितीपूर्ण आहेत. शासनपद्धतीची वाढ, तिचा विस्तार आणि त्याचीं निरनिराळीं अंगें यांचा वृत्तांत थोडक्यांत आणि मुद्देसूदपणें लिहिलेला (आहे) ... व ठिकठिकाणीं साधक बाधक मतांचें दिग्दर्शन केलेलें असल्यामुळें वाचकांच्या विचारशक्तीस चालन मिळतें तर आपल्या लोकांच्या दृष्टीनें प्रत्येक प्रश्नाचें निरीक्षण केलेलें असल्यामुळें त्यांचें विषयांशीं तादात्म्य होतें.......लेखकाची भाषासरणी इतकी मोहक, भावनास्पर्शी, अलंकारिक पण सुलभ आहे कीं पुस्तक वाचतांना आनंद होतो. आजकाल जरूर असलेली माहिती अगदीं थोडक्यांत या पुस्तकांत ग्रथित केलेली असल्यामुळे पुस्तक संग्राह्य आणि उपयुक्त असें झालें आहे.

# प्रस्तावना.

संतांची उच्छिष्टें बोलतों उत्तरें
काय म्यां पामरें जाणावें हें — तुकाराम

राजकारण हें आजकाल सर्वांचें एक तोंडी लावणेंच होऊन बसलें आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. बहुजनसमाज राजकारणांत जितका अधिक भाग घेऊं लागेल तितका राजकीय प्रगतीचा मार्ग सुलभ होईल यांत संशय नाहीं. इंग्लंडांत साध्या मजूरापासून तो बड्या अमीर उमरावापर्यंतच्या सर्व पक्षीय लोकांना तेथील शासनसंस्थेची हकीगत अवगत असल्यानें आपलें हिताहित उत्तम रीतीनें कळतें. व त्यामुळेंच ते राजकीय उलाढालींत प्रामुख्यानें भाग घेऊं शकतात. हिंदुस्तानांत अलीकडे राजकारणावर यथेच्छ लंब्या लंब्या बाता झोडणारे पुष्कळ लोक आढळतात; व दिवसेंदिवस हा वर्ग एक सारखा वाढतच आहे. परंतु यांपैकीं फारच थोड्यांना येथील शासनपद्धतीची खरी माहिती असते या विषयावर इंग्रजींत अधिकारी लेखकांनीं लिहिलेले पुष्कळ ग्रंथ असल्यामुळें इंग्रजी वाचकांची चांगली सोय होते. परंतु देशी भाषांतून या विषयावर प्रायः मुळीच वाङ्मय नसल्यामुळे बहुजनसमाजास वर्तमानपत्रांतील तात्पुरत्या व एक देशीय त्रोटक माहितीवरच विसंबून रहावें लागतें. ही स्थिति राष्ट्रहिताच्या दृष्टीनें केंव्हां हि अनिष्ट आहे, हें कोणीहि कबूल करील. तेव्हां अशा स्थितींत, ज्यांत येथील प्रचलित शासनसंस्थेसंबंधीं मुद्देसूद व विवेचक वर्णन केलें आहे असा ग्रंथ प्रसिद्ध केल्यास इंग्रजी न येणाऱ्या जनसमाजास व हिंदी राजकारणाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस तो मार्गदर्शक होऊन मराठी भाषेंतील एतद्विषयक ग्रंथाची उणीव भरून निघेल, असें वाटल्यावरून हा प्रयत्न केला आहे; तो कितपत साधला आहे हें पहाणें सुज्ञ वाचकांचें आहे.

प्रस्तुत ग्रंथ लिहिण्यांत मूळ हेतु कोणता हें वर सांगितलें आहेच. त्याच्या पूर्ततेकरितां या पुस्तकांत जितकी ज्यास्त माहिती देतां येईल तितकी देणें इष्ट होतें. व प्रस्तुत ग्रंथाचा मूळ खर्डा या धोरणानेंच तयार केला होता. परंतु तो

प्रत्यक्ष छापण्याचें काम सुरूं झाल्यावर एकाच ग्रंथांत सर्व माहिती देणें विशेष खर्चाचें, व श्रमाचें आहे, असें आढळून आल्यावर घटनात्मक इतिहासाचा ( Constitutional History ) भाग वगळणें भाग पडलें. इतर भाग छापण्याचें काम छापखान्याच्या गैर सोईमुळें दिरंगाईनेंच चालू होतें. परंतु सहा महिन्यांत पुस्तकानें अर्धाअधिक मजलही न गाठल्यानें मन खट्टू होऊन साशंक झालें. व त्यामुळें वृत्तपत्रांत प्रसिद्ध केल्याप्रमाणें गेल्या दिवाळींत तर नाहींच, पण संक्रांतीसही पुस्तक प्रसिद्ध करतां आलें नाहीं. याबद्दल मी दिलगीर आहे. असो; याचसुमारास देशाच्या दुर्दैवानें कौन्सिलवाद उपस्थित होऊन पक्ष-विपक्षाच्या अभिनिवेशांत अज्ञ जनतेची बुद्धिपुरस्सर दिशाभूल करण्याचें व्रत कांहीं जणांनी अंगिकारल्यामुळें बहुजनसमाजास नवीन सुधारणांचें खरें स्वरूप कळणें अगत्याचें झालें. त्यांत पुनः कौन्सिल निवडणुकीची वेळ जवळ येऊन ग्रंथ लेखनाचा हेतू सफळ होण्याचा समयहि जवळ आला. त्यामुळें प्रस्तुत पुस्तक दोन भागांत प्रसिद्ध करण्याचें ठरवून आज रोजीं पहिला भाग वाचकाच्या सेवेस सादर करीत आहे. या भागांत प्रस्तुत समयास जरूर ती सर्व माहिती आली आहे. दुसऱ्या भागाची विशेष माहिती इतरत्र दिली असून तो छापण्याचें काम चालूं आहे. वाचकांच्या तो लवकरच हातीं पडेल असी उमेद आहे.

ग्रंथकर्त्यास आत्मनिवेदन व आभारप्रदर्शन ही दोन कामें प्रस्तावनेंत करावयाची असतात. त्यापैकीं पहिलें काम तर वर संपलें. आतां राहतां राहिलें आभारप्रदर्शनाचें. ज्या जगन्नियंत्याच्या कृपाप्रसादानें हें पुस्तक मी लिहूं शकलों त्या सर्वेश्वराचें मी प्रथमतःच आभार मानतों. प्रस्तुत पुस्तक लिहिण्याच्या कामीं ज्या ग्रंथाचा मला विशेष उपयोग झाला त्यांची याद बहुश्रुत वाचकाकरितां दुसरीकडे दिली असून त्यांच्या मदतीबद्दल त्यांचा मी फार आभारी आहे. तसेंच बडोद्यांतील व विशेषतः बडोद्याबाहेरील विद्वान गृहस्थांनीं ओळख नसतांही पुस्तक वाचण्याचें श्रम घेऊन अभिप्राय लिहून दिला, याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहे श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं पुस्तकास प्रस्तावनेवजा विस्तृत अभिप्राय लिहून देण्याचें कबूल केलें होतें, परंतु स्वराज्य-

पक्षाच्या व स्वमतप्रसाराच्या महत्वाच्या कामांत ते सध्यां गर्क असल्यामुळें त्यांना विस्तृत अभिप्राय लिहून देण्यास सवड झाली नाहीं. तरीहि वरील चारशब्द लिहून दिल्याबद्दल मी कृतज्ञ आहे. अडीअडचणींच्या प्रसंगीं धीर देऊन व इतर मार्गांनीं हरतऱ्हेचें सहाय्य करून ज्या माझ्या परमपूज्य मातापितरांनीं मला उपकृत करून ठेविलें आहे, त्यांचे आभार मी ते काय मानणार !

असो; पुस्तक प्रकाशनाच्या घाईमुळें यांत अनेक प्रमाद राहिले असतील, ते कोणी माझ्या नजरेस आणल्यास त्यांचा मी फार आभारी होईन. तसेंच पुस्तका-संबंधीं कोणी कांहीं उपयुक्त सूचना केल्यास पुढील आवृत्तीचें वेळीं त्यांचा अवश्य तो विचार केला जाईल, इतकें सांगून समर्थांच्या प्रासादिक शब्दांत ही अल्प प्रस्तावना संपवितों.

न्यून तें पुरतें, अधिक तें सरतें ।
करुनि घ्यावें हें तुमतें, विनवीत असे ॥

लोकशिक्षण ग्रंथावली कचेरी
बडोदें ता. ४ जून १९२३.

वि. पां नेने.

---

# सूचना.

पुस्तकांत कान्हा, मात्रा, वेलांट्या वगैरे शुद्ध लेखनाच्या बऱ्याच चुका राहिलेल्या आहेत. त्या सहज लक्षांत येण्यासारख्या असल्यामुळें निराळें शुद्धिपत्र जोडलें नाहीं.

'न्यायपद्धति' या प्रकरणांत बऱ्याच चुका राहिल्यामुळें तें पुनः आमूलाग्र नवीन लिहिलें असून दुसऱ्या भागास जोडलें आहे. वर्णभेदाचा निरास करण्याकरितां एक बिल तयार करण्यांत येईल व ते बहुतेक पास होईल. असें १३८ व्या पृष्ठांत लिहिलें आहे. त्याप्रमाणें बील तयार होऊन तें वरिष्ठ कौन्सिलनें पास केलें आहे. हें बील 'थातुर मातुर करून केलेली तडजोड' होय, इतकेंच आम्ही तूर्त म्हणतों.

---

# अनुक्रमणिका.

पृष्ठें.

**प्रकरण १ लें ( उपोद्घातात्मक )** .... .... ....१

**ऐतिहासिक समालोचन** (१) घटनात्मक इतिहासाची अवश्यकता (२) ब्रिटिश साम्राज्यांतील विशेष (३) इंग्रजांनीं राज्य कसें मिळविलें ? (४) ब्रिटिश राज्यापासून झालेले फायदे (५) राष्ट्रीय विनाश (६) युरोपांत नवीन चैतन्याचा संचार (७) युरोपियनांचा हिंदुस्थानांत प्रवेश (८) पोर्तुगीझ, डच व इंग्रज (९) राज्यविस्तारकाळाचे विभाग (१०) कंपनीचा जन्म व प्रथमावस्थेंतील प्रगति (११) कंपनीची घटना (१२) अठराव्या शतकांतील हिंदुस्थान (१३) फ्रेंच व इंग्रज (१४) डुप्लेची कारस्थानें व पराभव (१५) कंपनीची बंगाल्यांतील प्रगति (१६) कंपनीच्या कारभारांतील सावळा गोंधळ (१७) कंपनीच्या कारभारांत पार्लमेंटचा शिरकाव (१८) रेग्युलेटिंग ॲक्ट (१९) ॲक्टांतील दोष व त्यामुळें उद्भवणाऱ्या अडचणी (२०) कंपनीच्या कारभाराची चौकशी व पिटचें इंडियन बिल (२१) कंपनी व पार्लमेंट (२२) पार्लमेंट व हिंदुस्थान (२३) नवायुगास प्रारंभ (२४) मांट-फर्ड रिपोर्ट (२५) मांटेग्यूंची नवीन योजना (२६) स. १९१९ चा सुधारणेचा कायदा (२७) बादशाही जाहीरनामा.

**प्रकरण २ रें.** .... .... .... ....४९

**भारतमंत्री** (२८) कोर्ट ऑफ डायरेक्टर्स व बोर्ड ऑफ कंट्रोल (२९) भारतमंत्री (३०) इंडिया कौन्सिल (३१) काम करण्याची रीत (३२) इंडिया कौन्सिलाची अनुपयुक्तता (३३) भारतमंत्र्यांचे अधिकार (३४) बेफिकीर पार्लमेंट (३५) नवीन सुधारणा.

**प्रकरण ३ रें.** .... .... ... ...६३

**हिंदुस्थान सरकार** (३६) गव्हर्नर जनरल (३७) वरिष्ठ कार्यकारी मंडळ (३८) व्हॉइसरॉय व कार्यकारी मंडळ (३९) कामकाजाची रीत (४०) खालांतील अधिकारी (४१) सत्तेचें केंद्रीकरण (४२) अधिकार विभागणी.

**प्रकरण ४ थ.** .... ... .... ....६८

**प्रांतिक सरकार**--हिंदुस्थानांतील प्रांत ( ४४ ) प्रांत-रचना ( ४५ ) वऱ्हाड व मध्यप्रांत ( ४६ ) बंगाल व आसाम ( ४७ ) वायव्य प्रांत ( ४८ ) कुर्ग व इतर प्रांत ( ४९ ) निरनिराळ्या प्रांतांचा दर्जा ( ५० ) प्रांतिक राज्यकारभार ( ५१ ) नवीन सुधारणा.

**प्रकरण ५ वें.** .... . .... ....७८

**जिल्ह** राजा व प्रजा ( ५३ ) प्रांतांचे पोटविभाग ( ५४ ) जिल्ह्याचें क्षेत्रफळ व लोकसंख्या ( ५५ ) राज्यव्यवस्थेमध्यें जिल्ह्याचें स्थान ( ५६ ) जिल्ह्यांतील अधिकारी वर्ग ( ५७ ) कलेक्टर करावयाचीं कामें ( ५८ ) न्याय व अंमल बजावणी खात्या ची फारकत.

**प्रकरण ६ वें.** .... .... .... ....८७

**कायदे मंडळ** ( ५९ ) विषयाचा उपक्षेप (६०) कायद्याची अवश्यकता व स्वरूप ( ६१ ) स. १८३३ चा चार्टर ॲक्ट ( ६२ ) प्रथम परिवर्तन ( ६३ ) द्वितीय परिवर्तन ( ६४ ) तृतीय परिवर्तन ( ६५ ) मोर्ले-मिंटो सुधारणा ( ६६ ) वर्तमानरूप ( ६७ ) जोडसभेची राज्यपद्धति-कौन्सिल ऑफ स्टेट-लेजिस्लेटिव ॲसेंब्ली ( ६८ ) अध्यक्षाची निवडणूक (६९) वरिष्ठ कायदेसभांची मुदत व बैठका ( ७० ) वरिष्ठ कायदेसभांचे अधिकार ( ७१ ) हिंदुस्थानचे जमाखर्चाचें अंदाजपत्रक ( ७२ ) सर्टिफिकेशनचे अधिकार ( ७३ ) व्हॉइसरॉयची संमति ( ७४ ) प्रांतिक कायदे मंडळांची रचना-मुंबई प्रांतिक कायदेमंडळ ( ७५ ) प्रत्यक्ष निवडणूक ( ७६ ) मतदानाचा अधिकार ( ७७ ) जातवार प्रतिनिधींचें तत्व ( ७८ ) स्त्रियांना मताधिकार ( ७९ ) प्रांतिक कायदेमंडळांची मुदत व बैठका ( ८० ) प्रांतिक कौन्सिलांचा अध्यक्ष ( ८१ ) प्रां. कायदे कौन्सिलांचे अधिकार ( ८२ ) गव्हर्नरास दिलेला सुलतानी अधिकार ( ८३ ) गव्हर्नराची संमति ( ८४ ) कायदे कौन्सिलांतील कामकाज.

**प्रकरण ७ वें.** .... .... ... ...१२९

**न्याय पद्धति** ( ८५ ) पूर्वेतिहास ( ८६ ) हायकोर्टें (८७) हायकोर्टांचे अधिकार ( ८८ ) हायकोर्टांची रचना ( ८९ ) चीफ कोर्टस् व कमिशनर कोर्टस् (९०) दिवाणी दुयम कोर्टें (९१) फौजदारी न्यायपद्धति (९२) मॅजिस्ट्रेटचे अधिकार (९३) अपील पद्धति (९४) युरोपियनांचा मिरासी हक्क.

**प्रकरण ८ वें.** .... .... .... ....१२९

**पोलीस व तुरुंग** (९५) पोलिसांच्या मार्गांतील अडचणी (९६) पोलीस खात्याची व्यवस्था ( ९७ ) मराठ्यांच्या वेळची स्थिति (९८) प्रचलित पद्धति (९९) जनसहाय्याची अवश्यकता (१००) शासनपद्धति (१०१) पूर्वीचे व हल्लींचे तुरुंग (१०२) तुरुंग-व्यवस्था (१०३) सन्मार्गप्रवर्तक गृहें (१०४) काळेपाणी.

**प्रकरण ९ वें.** .... .... .... ...१५०

**जमाखर्च** (१०५) विषयव्याप्ति ( १०६ ) करांची अवश्यकता ( १०७ ) करांसंबंधाचे चार नियम (१०८) करांचे वर्गीकरण ( १०९ ) उधळपट्टीचा कारभार (११०) मेयोनें केलेल्या सुधारणा (१११) लिटनशाहींतील सुधारणा (११२) लॉर्ड रिपन सुधारणा व नंतर (११३) नवीन सुधारणा पूर्वी (११४) नव्या राजवटींतील फेरफार (११५) हिंदुस्थान सरकारचें जमाखर्चाचें अंदाजपत्रक (११६) मीठ (११७) मिठावरील कर व लोकमत (११८) प्राप्तीवरील कर (११९) जकात (१२०) अफू (१२१) अबकारी (१२२) जंगलें (१२३) जमेच्या इतर किरकोळ बाबी ( १२४ ) हिंदुस्थानचें राष्ट्रीय कर्ज (१२५) पार्लमेंटचें नियंत्रण.

**प्रकरण १० वें.** .... ... .... २०१

**जमीन महसूल** (१२६) जमीन महसुलाचा प्राक्कालीन संक्षिप्त इतिहास ( १२७ ) मराठ्यांच्या अमदानींतलि स्थिति ( १२८ ) धारेबंदीच्या विविध तऱ्हा (१२९) भूस्वामित्वाचा लढा (१३०) अधिकारी वर्ग. ( १३१ ) जमीनदारी पद्धति ( १३२ ) रयतवारी ( १३३ ) कायमधारेबंदी.

2322

श्री.

# भारतीय शासन पद्धति.

## उपोद्घात.

### ऐतिहासिक समालोचन.

**१. घटनात्मक इतिहासाची अवश्यकता**—इंग्रजी अमलाचा या देशांत उदय व राज्यविस्तार कसा झाला हा विषय खरोखरच मनोरंजक असून हिंदी राजकारणाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस या विषयासारखा महत्वाचा व आनंददायी दुसरा विषयच असणें शक्य नाहीं. त्यांत सध्यां राजकारणाचा वारा देशांत जोरानें वहात असल्यामुळें, या विषयास दिवसेंदिवस ज्यास्तच महत्व येत चाललें आहे. हिंदुस्थानांतील प्रस्तुत राज्यकर्त्यांविषयीं सर्वांच्या अंतःकरणांत–विशेषतः तरुणपिढीच्या मनांत सध्यां तेढ उत्पन्न झालीं असल्यामुळें, या राज्यक्रांतीच्या इतिहासास विशेष महत्वाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. अंतःकरणांत उत्पन्न झालेल्या या तेढीमुळें, या विषयाचा व्हावा तसा विचार लोकांकडून होत नाहीं. वरवर विचार करून ही तेढीची गांठ ज्यास्त भक्कम करण्याकडेंच सर्वांचा विशेष कल दिसून येत आहे. त्यामुळें तरुणपिढीच्या मनावर घातुक परिणाम होण्याचा संभव असून, तो होत ही आहे. करितां तो तसा न व्हावा व होत असल्यास त्यांस तीव्रतर स्वरूप न यावें म्हणून ब्रिटिश राजसत्तेच्या उदयासंबंधीं साधक बाधक प्रमाणांचा विचार करून घटनात्मक इतिहास लिहिला जाणें अत्यंत जरूरीचें आहे.

**२. ब्रिटिश साम्राज्यांतील विशेष**–हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या इतिहासास जगाच्या इतिहासांत दुसरी जोड नाहीं, असें शेंकडोंवेळां म्हटलें जातें. लश्करी दृष्टया व लुच्चेगिरींत आपणाहून हिणकस असलेल्या व संघटित नसलेल्या

पहिलें कारण असें कीं, मूठभर लोकांनीं प्रचंड वस्तीच्या देशावर मात करणें मुळींच संभवत नाहीं. मूठभर लोक–मग ते राक्षसांच्या कोटींतील कां असेनात– एवढ्या अफाट वस्तीच्या प्रदेशास कधींही जिंकूं शकणार नाहींत. दुसरें कारण ह्मटलें ह्मणजे एकादा देश जिंकिणें ही गोष्ट निराळी; व तो पुढें राखणें ही गोष्ट निराळी. ब्रिटिश लोकांनीं केवळ तरवारीच्या जोरावरच जर भिस्त ठेविली असती तर त्यांना आपलें चंबूगवाळें येथून केव्हांच आटपावें लागलें असतें. इंग्लिश लोकांनीं हिंदुस्थान जिंकिला नाहीं. इतकेंच नव्हे, तर हा देश आपण जिंकणार हें त्यांच्या कल्पनेलासुद्धां शिवलें नव्हतें. उलट हिंदी लोकांनींच हिंदी लोकांस जिंकलें असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. येथील बेबंदशाहीचें वातावरण नाहींसें करण्याकरितां व एकराजाच्या अमलाखालीं राहण्याकरितां, त्यांनीं परकीयांस जवळ करून त्यांच्या मदतीनें आपल्या देशबांधवांस जिंकिलें. ह्या मदतीबद्दल हिंदुस्थानानें त्यांचें स्वामित्व कबूल केलें इतकेंच. "**हिंदुस्थानचा उतरता काळ**" या पुस्तकाच्या कर्त्याचें असेंच मत आहे. तो म्हणतो "हिंदुस्थानातील लोकांनीं आपला अंगिकार केला म्हणूनच आपण हिंदुस्थानांत आहोंत. व आम्ही हिंदुस्थान देश जिंकून येथें अंमल चालविला तो लोकांच्या संमतीनेंच होय. खरें पाहिलें तर येथील लोकांनींच स्वतःला जिंकून आपलें राज्य आमच्या स्वाधीन केले आहे. उत्तर ब्रह्मदेशाखेरीज करून इतर मुलखांत कोणत्याही लोकांशीं लढण्याचा प्रसंगच आला नाहीं."

हिंदुस्थानांतील ब्रिटिशांच्या फौजेंची तात्कालिन स्थिति लक्षांत घेतां ह्या विधानास ज्यास्तच बळकटी येतें. कंपनीच्या फौजेंत त्याकाळीं शेंकडा ८० टक्के नेटिव शिपाई होते. ( सध्यां हें प्रमाण ६६ टक्यावर आलें आहे. ) या लोकांनीं परकीयांच्या निशाणाखालीं एक होऊन आपल्या जातभाईंचे गळ कांपले. त्यावेळीं त्यांनीं सत्यासत्यतेचीहि विशेष पर्वा केली नाही. कोणीही आपल्या स्वातंत्र्याचा आपखुषीनें सौदा करणार नाहीं परंतु या लोकांनीं बेदिक्कतपणें त्याचाही सौदा करण्यास कमी केलें नाहीं यांचें कारण काय असावें बरें ? येथील लोक शतकानुशतकें चाललेल्या लढायांस व रक्तपातास कंटाळले होते; व त्यांना

# केसरीकारांचा अभिप्राय.

**श्री. न. चिं. केळकर,** बी. ए. एलएल बी.

संपादक **'केसरी'** लिहितातः—

हिंदुस्थानच्या राज्यपद्धतीचें धोरण व स्वरूप काय या संबंधानें बहुजनसमाजास फारच थोडी माहिती आहे. स्वराज्याचा पाया हिंदुस्थानांत बळकट भरावयाचा असल्यास या अत्यंत निकडीच्या विषयाची सर्वांस जितकी माहिती होईल तितकी थोडीच होय असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं. सध्या कौंसिलप्रवेशा संबंधानें जो वाद माजून राहिला आहे त्यांतील बराच भाग अज्ञानजन्य आहे हें कोणीहि कबूल करील. केवळ अज्ञानानें अशा गंभीर विषयाची हेटाळणी करणें राष्ट्रहित विघातक होय. अशा प्रकारच्या विषयांवर मराठी भाषेंत जीं फार थोडीं पुस्तकें अलीकडे प्रसिद्ध झालीं आहेत त्यांत विष्णु पांडुरंग नेने यांनीं लिहिलेल्या या पुस्तकास बरेंच वरचें स्थान द्यावें लागेल. त्यांनीं सदर विषयाची फोड करतांना या विषयावरील बहुतेक सर्व पुस्तकांची व मराठींतील लो. टिळकांसारख्यांच्या भारदस्त लेखांची मदत घेतली आहे आणि त्याबरोबरच कायदे मंडळ, जमाखर्च इत्यादी पोटविषयांचे त्यांनीं ऐतिहासिक दृष्ट्या साद्यंत विवेचन केलें असल्यामुळें पुस्तक मनोरम व वाचनीय झालें आहे. अशा रीतीनें अत्यंत परिश्रमानें व काळजीनें लिहिलेलें हें पुस्तक मराठी वाचकांची गरज पूर्णपणें भागवील अशी मला आशा वाटते.

**महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध इतिहासकार श्री. गो. स. सरदेसाई**, बी. ए. लिहितात–"...हिंदुस्थानांत चालू असलेली ब्रिटिशराज्यपद्धति कशा प्रकारची आहे व पाश्चात्यांच्या आगमनापासून आजपावेतों ती कसकशी बनत गेली याचें सुसंगत व विवेचक वर्णन या पुस्तकांत ऐतिहासिक रीत्या केलेलें मनोरंजक झालें आहे. या विषयावर अनेक अधिकारी लेखकांनीं जे ग्रंथ लिहिले आहेत त्यांतील उपयुक्त भाग मार्मिकपणें या पुस्तकांत गोवले असल्यामुळें प्रस्तुतकाळीं विद्यार्थ्यांस व सामान्य जनतेस हें पुस्तक विशेष उपयोगी होईल यांत संशय नाहीं. अलीकडे हिंदी लोकांस कांहीं विशिष्ट राजकीय हक्क मिळाले असून तदनुसार कौन्सिलांच्या नवीन निवडणुकी लवकरच व्हावयाच्या असल्यामुळें निव्वळ मराठी वाचकांस आपलें मत ठरविण्यास अशा पुस्तकाची मोठी जरूर होती ती नेने यांनीं भरून काढली या बद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. पुस्तकाची भाषा सहज समजणारी ......... आहे.

**प्रो. दत्तो वामन पोतदार**, बी. ए.; इतिहास व मराठीचे प्रोफेसर, न्यू पूना कॉलेज, पुणें लिहितातः—

रा. विष्णु पांडुरंग नेने ( बडोदा ) यांनीं लिहिलेला भारतीय शासनपद्धति भाग १ ला वाचून पाहिला. प्रस्तुत अशा ग्रंथाची आवश्यकता मराठी वाचकांना विशेष होती; ती रा. नेने यांनीं भरून काढण्याचा प्रयत्न केला हें त्यांस भूषणावह आहे. राजकीय विषयासंबंधानें आरडाओरडा पुष्कळ होतो पण खोल व विवेचक विचार व चर्चा कमीच होते वर्तमानपत्रें व मासिकें या पलीकडें मराठांत प्रचलित राजकीय विषयांवर गंभीर व विचारी वाङ्मय प्रायःनाहींच म्हटलें तरी चालेल.

इंग्रज सरकारनें निर्माण केलेली काउन्सिलें व एकंदर राज्ययंत्र याची जितकी माहिती आमच्या देशांत सर्वत्र पसरेल तितकी ती हवीच आहे. या दृष्टीनें रा. नेने यां या पुस्तकाचा फार उपयोग होईल. रा. नेने यांचें **पुस्तक भाषांतरात्मक नाहीं** ही संतोषाची गोष्ट आहे. यांनीं ग्रंथांत ठिकठिकाणीं

देशानें जिंकिला नाहीं. आतांपर्यंत इंग्लीश लोकांनीं निर्हेतुपूर्वक कोणतेंही मोठें कार्य केलें नाहीं. पण हिंदुस्थान मात्र अकस्मात त्यांच्या हातीं आला." परंतु सर आल्फ्रेड लायल साहेबांस हें मत पंसत नसून त्यांनें डिव्हेनंट, लीबनिटझ् व कर्नल जेम्स मिल यांचीं उदाहरणें देऊन या मतांचें खंडन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचें असें ह्मणणें आहे कीं, पौर्वात्य राजांचा कमकूवतपणा पाश्चात्यांच्या पूर्वींच ध्यानांत आला होता व लवकरच युरोपियन लोक हिंदुस्थानचे मालक होतील अशीं त्यांना आशा वाटत होती. परंतु आल्फ्रेड साहेब या बाबतींत सपशेल घसरलें असून वाहवत गेलें आहेत. एकादी गोष्ट घडून आल्यानंतर तत्कारणविपर्यास करणें फारच सोपें ाते असा जगाचा अनुभव आहे. साहेब मजकुरांनीं या बाबतींत असाच प्रकार केला आहे. परंतु त्यामुळें कोणीही सूज्ञ मनुष्य फसला जाणार नाहीं असें आह्मास वाटतें. भावी साम्राज्याची सुखस्वप्नें कंपनीस कधींही पडलीं नाहींत; उलट होतांहोईतों लढाई टाळण्याचाच प्रयत्न तिचेकडून होत असे. प्लासीच्या लढाई नंतर इंग्रजांच्या धोरणावरून व क्लाइव्हच्या सूचनेवरून, वरील ह्मणण्याची सत्यता पटते. प्रो. मुरे साहेबांनीं या विचार सरणीचाच अनुवाद केला असून त्यांच्याही मतें इंग्लडनें हिंदुस्थानचें राज्य फुकटाफुकटींच मिळविलें आहे.

४ **ब्रिटिश राज्यापासून झालेले फायदे.**–इंग्रजांनीं जरी अश्या रीतीनें हिंदी साम्राज्य अकल्पक रीतीनें मिळविलें असलें तरी इंग्रजी अमलाखालीं हिंदुस्थानास बरेंच फायदे झालें आहेत व ते नाकबूल करण्यांत कांहीं अर्थ आहे असें आह्मांस तरी वाटत नाहीं (१) या फायद्यांतील सर्वांत विशेष महत्वाचा फायदा ह्मणजे पाश्चात्य तत्वज्ञान व निरनिराळ्या शास्त्रांचा आस्वाद घेण्यास हिंदुस्थानांस संधी मिळाली. पाश्चात्य सुधारणेनें आपला प्रताप येथें बराच गाजवला असून तिनें हिंदी लोकांच्या आचारविचारांस व चारित्र्यांस निरालेंच वळण दिलें आहे. ह्या सुधारणा अगदीं अलीकडील असून, इंग्रजी अमलाच्या सुरवातीस त्यांचा मागमूसही नव्हता. आमच्या राज्यकर्त्यांनीं आंखलेल्या एका धोरणाचा हा प्रताप असून, हें धोरण सन १८१३ सालीं लॉर्ड हेस्टिंगच्या कारकीर्दींत

आंखण्यांत आलें आहे. यावेळेपर्यंत इं-जांनीं फक्त राजकीय क्षेत्रांत वर्चस्व मिळविलें होतें. सामाजिक बाबतींत यावेळपर्यंत ब्राह्मणांचेंच वर्चस्व होतें व यापुढेंही तें कायम राहिलें असतें. इंग्रज लोकांनीं या वेळपर्यंत सामाजिक बाबतींत पूर्ण सहिष्णुताच दाखविली होती. सामाजिक बाबतींत त्यांनीं एकदांही आजतागाई ढवळाढवळ केली नव्हती. इतकेंच नव्हें पण, आपला एक स्वतंत्र धर्म असून निराळें तत्वज्ञान आपणांस आहे ही गोष्ट त्यांनीं लोकांपासून चोरून ठेविली होती. परंतु लॉर्ड हेस्टिंग्जनें पाश्चात्य सुधारणांचा व ख्रिस्ती धर्माचा देशांत फैलाव करण्याचें ठरवून त्या दिशेनें उपक्रमही केला. ब्राह्मणांच्या वर्णश्रेष्ठत्वास पहिला धक्का येथें बसला. १८३५ सालीं पाश्चात्य शिक्षणाचा फैलाव येथें करावा अश्या आशयाचें मेकालेचें बिल कडाक्याचा वादविवाद होऊन पास झाल्यानंतर या दिशेन दुसरा प्रयत्न करण्यांत आला. बिलान्वयें शिक्षणाचें इंग्लिश हें माध्यम ठरलें. यावेळेपासून पाश्चात्यमतांचा आमच्यावर पगडा बसावयास सुरवात झाली. राजाविषयींची आपली कल्पना ( ना विष्णुः पृथिवीपतिः ) बदलून, स्वातंत्र्य, समता व स्वयंनिर्णयासारख्या नव्या कल्पना तिच्याजागीं उद्भूत झाल्या. वर्णप्रामाण्य जाऊन त्याच्या जागीं बुद्धिप्रामाण्य आलें. धार्मिक बाबतींतील गतानुगतिकत्वाची वृत्ति जाऊन धर्माकडे आपण चिकित्सक दृष्टीनें पाहूं लागलों. वर्णश्रेष्ठत्व जाऊन त्याच्या जागीं बुद्धिश्रेष्ठत्व व गुणश्रेष्ठत्व आलें. असें अनेक तऱ्हेचे फायदे पाश्चात्य शिक्षणामुळे झालें आहेत. मरहूम दादाभाई नवरोजी यांनीं पाश्चिमात्य शिक्षणापासून आपणास कोणते फायदे झाले आहेत त्याचें फार सुंदर विवेचन दुसऱ्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं आपल्या भाषणांत केलें आहे. ते म्हणतात कीं, " आपण पूर्ण राजनिष्ठ असून राजनिष्ठा अगदीं आपल्या हाडींमासीं खिळली आहे इंग्रजी राज्यापासून झालेले फायदे आपण जाणून आहोंत. आपणाला दिलेल्या शिक्षणाचें महत्व आपणाला पूर्णपणें कळत आहे. या नवप्रकाशामुळें आपण अंधकारांतून उजेडांत आलों असून याच ज्ञानरवीनें आपणास **'राजा हा प्रजेकरितां असून, प्रजा ही राजाकरतां नव्हे '** या उच्च तत्वाचा धडा शिकविला आहे. आशिया खंडांतील

बेलगामी जुलमी राजसत्तेच्या ऐनभरांत केवळ उदार आंग्ल संस्कृतीमुळेंच आपणाला ज्ञान प्राप्त झालें आहे. हें स्वमुखानें आज आपण मर्दासारखें सर्व जगाला कळवूं या. ''

( २ ) दुसरा महत्त्वाचा फायदा हा कीं, ब्रिटिश राज्यापाठोपाठ शांतता व स्वास्थ्य आली. " आपण खरोखरच जुलुमाच्या व अत्याचाराच्या काळजींतून आणि दररोजच्या दगदगींतून आज मुक्त झालों आहोंत. अगदीं परवां परवांपर्यंत जरी रशियाची वायव्य सरहद्दीवरील प्रगति दुर्लक्ष करण्यासारखी नव्हती, तरी गेल्या सबंध दीडशें वर्षांत हिंदुस्थानास परचक्र कसें तें माहीत नाहीं. शांततेच्या कालांत उदय पावणाऱ्या कलादिकांचें पाऊल आस्ते आस्ते पुढें पडत आहे व समाजांतील अत्यंत हीन स्थितींतून वरच्या दर्जापर्यंत आणि वरच्या दर्जापासून उच्च स्थितीपर्यंत जाण्याला, अगदीं निकृष्ट जातीनाही सारखी संधि मिळाली आहे. राजाश्रित धर्मपंथाचा खर्च सार्वजनीक पैशांतून चालत असला तरी सरकारनें बुद्धि पुरस्सर धार्मिक बाबतींत पूर्ण सहिष्णुताच दाखविली आहे. लोकसंख्या, दळणवळणाची साधनें, टपाल तारायंत्रासारख्या सोयी, पाटबंधारे परदेशचा व्यापार, राष्ट्रीयपत वगैरे गोष्टी बदललेल्या मनूप्रमाणें उत्तरोत्तर वाढत आहेत; पण या सर्वांहूनही अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे हिंदी बुद्धिमत्तेला मिळालेली उत्तेजन व चैतन्य यांची जोड आणि हिंदी विचारशक्तीला आपल्याद्वारें अखिल पाश्चात्य ज्ञानभांडार खुले करणाऱ्या इंग्रजी भाषेची झालेली अनुपम मदत ही होय. कै. ना. गोखले यांनीं म्हटल्याप्रमाणें ज्यापासून खरोखर हिंदी लोकांना आनंद व्हावा, किंबहुना अभिमान वाटावा असेंहि ब्रिटिश-राज्यापासून नैतिक दृष्टया पुष्कळच फायदे झालेले आहेत. " शांततेच्या काळांतील फायदे, सुयंत्रता व सुव्यवस्था, पाश्चिमात्य शिक्षणाचा उपक्रम, भाषणस्वातंत्र्य व तदनुषंगिक उदारमतवादी संस्थांची आवड या सर्वांचें श्रेय ब्रिटिश राज्यासच दिलें पाहिजे. " याहूनही आपणास दुसरे अनेक फायदे झालें आहेत व त्यांचे दिग्दर्शन **श्री. तात्यासाहेब केळकर** यांनीं आपल्या **भारतीय स्वराज्याची कैफियत** या पुस्तकांत फारच उत्तम रीतीनें केलें आहे.

वरील उतारा त्यांतीलच असून ते यापुढें म्हणतात "विशेष बारकाईनें पहावयाचें म्हटलें तर ब्रिटिश राज्यापासून आपला एकंदर राष्ट्रीय दर्जा थोडासा वाढला आहे ही एक गोष्ट अत्यंत कृतज्ञतेनें नमुद केल्याशिवाय राहवत नाहीं. पूर्वीच्या जुन्या हिंदु अथवा मुसलमान राजाशीं तुलनात्मक दृष्टीनें पाहिलें असतां ब्रिटिश राज्याचा हा विशेष सहज लक्षांत येईल. राष्ट्रीय दर्जा म्हणजे वित्त व जीवित याविषयींची खात्री, धार्मिक व राजकीय बाबतींत मतस्वातंत्र्य, न्यायासनापुढें सर्वांना समान हक्क व सभास्वातंत्र्य, चळवळींची मोकळीक वगैरे गोष्टी. सरकारी कौन्सिलांत प्रतिनिधी पाठविण्याचा आपणाला हक्क आहे व अशा रीतीनें प्रत्यक्ष राज्यकारभारांतही आपलें अंग असतें. ब्रिटिश राज्यापूर्वी येथील राजसत्ता अल्पमर्यादित व बहुतेक एकमुखींच* असल्यामुळें राज्यकारभारांत जनतेचा प्रत्यक्ष असा हात बिलकुल नसे. आपल्या आतांच्या सर्व सार्वजनीक संस्था व राजकीय सभा जुन्या अमदानींत शक्य नव्हत्या व हल्लीं आपणाला जें थोडें-बहुत लेखनस्वातंत्र्य मिळत आहे, तेही त्याकाळीं मिळालें नसतें. पाश्चात्य राजनीतिविषयक वाङ्मयापासून जें नवीन नवीन विचार आपण घेतले आहेत व त्यांचें

*आपल्याकडें प्रजासत्ताक राज्यपद्धति फार प्राचीन काळांपासून अस्तित्वांत होती. परंतु पुढें पौराणिक काळांत तिचा लोप झाला असावा. वेदांतील **गणानां त्वा गणपति** ह्या सूक्तावरून वरील विधानाची सत्यता चांगलींच पटतें. रामायणांत रामास युवराजपदीं नेमावें कीं नाहीं, याचा विचार करतानां दशरथानें प्रजेची संमत्ति विचारली होती. म्हणजे त्याकाळीं प्रजानुवर्ति राज्यपद्धति होती असें मानावयास कांहीं हरकत नाहीं. महाभारतकाळीं व पुढें देखील येथें कोणत्या ना कोणत्या रूपानें लोकतंत्री संस्था अस्तित्वांत होत्या याबद्दल खात्री लायक पुरावा प्रसिद्ध झाला आहे. पण पुढें रामायणांत रामास देवाचा अवतार, प्रत्यक्ष देवच समजून वर्णन केलें असून आमच्या रामविजयादी ग्रंथ लिहिणारांनीं त्याच्यापुढें जाऊन देवाची अद्‌भुत वर्णनें लिहिली आहेत. त्यामुळें मूळ इतिहास जाऊन ती भक्तिरसप्रधान काव्यें बनली आहेत व यामुळें प्राक्कालिन इतिहासाची फार हानी झाली आहे.

प्रतिपादन करण्यासही आपणांस पूर्ण मोकळीक आहे, त्याचें सर्व श्रेय ब्रिटिश राज्यालाच दिले पाहिजे. नुसत्या सनदशीर मार्गानें सरकारच्या कृत्यांना विरोध करणें व राजकीय बाबतींत चळवळ करून किंवा शिक्षण देऊन लोकमत बनविणें हें पूर्वीच्या काळीं शक्य नव्हतें. भारतीय एकराष्ट्रीयत्वाची कल्पना जरी जुनीच असली तरी तत्वतः आजच तिचा विकास होऊन दूरदूरचे सर्व प्रांत त्यायोगें राष्ट्रहिताच्या एकाच बंधनानें पूर्वीपेक्षां अधिक निगडित झाले आहेत. नोकरशाहीच्या खरमरीत टीकाकारांपैकीं एक मि. बर्नार्ड हौटन यांनीं याच विषयावर लिहिलेल्या आपल्या पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, "अप्रत्यक्षपणें कां होईना पण इंग्लंडपासून हिंदुस्थानांस सर्वांत मोठा कोणता लाभ किंवा फायदा झाला असेल तर हिंदी जनतेच्या अंतःकरणांत स्वदेशाभिमानाचा उदय हाच होय. स्वदेशाभिमान ह्मणजे तरवार गाजविणें नव्हे किंवा राजाला विष्णूचा अवतार समजणें नव्हे तर स्वदेशबांधवांची उन्नति करण्यास मनःपूर्वक झटणें ह्मणजेच स्वदेशाभिमान. या भावनेनें प्रेरित होऊन व ब्रिटीश राज्यापासून झालेल्या भौतिक उन्नतीनें बलिष्ट होऊन अखिल हिंदुस्थान आज प्रजासत्ताक राज्याची मागणी करीत आहे." जगांतील राष्ट्रामध्यें एक राष्ट्र या नात्यानें हिंदुस्थानच्या धवल यशांत पडलेली ही भर कांहीं लहानसहान नव्हे व भविष्यत्काल जरी सर्वस्वीं ईश्वराधीन असला तरी हिंदुस्थानचा भावी इतिहासकार हिंदुस्थानाविषयीं लिहितानां इंग्रज सरकारची योग्य ती प्रशंसा केल्याशिवाय राहणार नाहीं."

**५ राष्ट्रीय विनाश.**—अश्या तऱ्हेनें ब्रिटिश राज्यापासून आपणास अनेकविध फायदे झाले आहेत. "या इतक्या फायद्याच्या बाबी पाहिल्या ह्मणजे याच्यापुढें नुकसानीच्या गोष्टी कितीहि असल्या तरी त्या तुच्छच असें वाटण्याचा संभव आहे. परंतु ज्याप्रमाणें पदार्थमात्र शुद्धावस्थेंत क्वचित् सांपडावयाचे त्याचप्रमाणें या फायद्याच्या गोष्टी विषयींहि झालें आहे." *राज्यकरणाऱ्या जातीचें हित व फायदे अगदीं अबाधित राहून तिचें प्रभुत्व ज्या योगें कायम टिकेल अश्या पद्धतीनें या देशाचा राज्यकारभार चालला आहे व त्यांत

* लोकमान्यांचे केसरींतील लेख पृ. ७३.

आमची राजकीय, शारीरिक व आर्थिक दृष्ट्या खच्ची करण्याचें धोरण ब्रिटिशांनीं अंगिकारिलें असल्यामुळें आमचें अपरिमित नुकसान होत आहे. आर्थिक दृष्ट्या तर हिंदुस्थानचें कल्पनातीत नुकसान होत असून ब्रिटिशांची सत्ता जर यापुढें आमच्या दुर्दैवानें अशीच अबाधित राहिली तर राज्यकारभारनौका कोणच्या खडकावर आपटेल याचा नेम सांगवत नाहीं. ह्या विषयाच्या विवेचनास प्रारंभ करण्यापूर्वी आपण इंग्रज लोक येथें केंव्हा आले, कां आले? व येथ आल्यावर त्यांनीं हिंदुस्थानांतील प्रांत कसकसे हस्तगत केले व त्यांचा अमल येथ कोणत्या प्रकारानें व दिशेनें बसत गेला याचें थोडक्यांत निरीक्षण करूं.

**६ युरोपांत नवीन चैतन्याचा संचार**—इसवी सनाच्या पंधराव्या शतकांत युरोपांत नवीन चैतन्याचें वारें वहावयास सुरवात झाली. या चैतन्यामुळें युरोपखंडांत सर्वत्र जागृति उत्पन्न होऊन बुद्धिप्रामाण्याचें प्रस्थ वाढलें. एका आंग्ल कवीनें एकें ठिकाणीं इंग्लंड विषयीं जे उद्गार काढिले आहेत ते सर्व युरोपखंडासही त्याकाळीं लागू पडले असते. तो ह्मणतो कीं, ' एकादा निद्रित मनुष्य जसा सुप्तावस्थेतून एकदम जागा व्हावा त्या प्रमाणें आपल्या राष्ट्राची स्थिति झाली असून, तें उदयोन्मुख होऊन बसलें आहे. ' एक हजार वर्षांच्या गाढ निद्रेंतून युरोपियन लोकांची या सुमारास मुक्तता होत होती व त्यामुळें जागृतीची प्रवृत्ती सर्वत्र दिसून येत होती. क्रूसेडसारखीं शतकानुशतकें चाललेलीं धर्मयुद्धें समाप्त झाली होती धार्मिक बाबतींत होत असलेल्या अन्याय जुलमादी विरुद्ध मार्टिन लूथर लोकमत तयार करीत होता. गतानुगतिकत्वांस चाट देऊन त्यानें प्राटेस्टंट या नांवाचा एक नवीन पंथ काढिला व आपल्या मतांचा त्यानें जारीनें प्रसार करण्यास सुरवात केली. या चळवळीचा युरोपियन समाजावर इष्ट तो परिणाम होऊन, त्यांच्या आचारविचारांस त्यामुळें एक नवीनच वळण लागलें. तेथील जुनी वतन व्यवस्था मोडकळीस येऊन राजाच्या अनियंत्रित सत्तेविरुद्ध कांहीं ठिकाणीं उघड उघड चर्चा व्हावयास सुरवात झाली. ग्रीस व रोम येथील जुन्या पुस्तकालयांतील पुस्तकें या वेळेंपर्यंत कपाटांत धूळ खात पडलीं होतीं. परंतु पंधराव्या शतकांत ह्या पुस्तकालयांची

बंद असलेलीं द्वारें उघडण्यांत येऊन त्यांना बाहेरचें वारें लागलें. अशी स्थिति होताक्षणींच विद्वान लोकांत त्यांच्या विषयीं चर्चा सुरूं झाली व **'वादे वादे जायते तत्त्वबोधः'** या न्यायानें खरेंखरच सर्वांस तत्वबोध झाला. हल्लींची आपली व निरनिराळ्या शास्त्रांची स्थिति हें त्या तत्त्वबोधाचेंच परिणत स्वरूप होय. बायबलाव्यतिरिक्त धर्म व सत्य जाणण्याचा दुसरीं कांहीं साधनें आहेत, व त्यांचा उपयोग करून मानवी जीविताचें महात्म्य वाढवावें असें उद्गार त्याकाळीं निघूं लागले होते. हार्वीनें रुधिराभिसरणाचा शोध लावला व गिलबर्टनें लोहचुंबकाचें यथार्थ स्वरूप जनतेपुढें मांडलें तेही याचकाळीं होय. ग्यालीलिओनें पृथ्वी गोल आहे या सिद्धांताचें प्रतिपादनही याचकाळीं केलें. सारांश पंधराव्या शतकांत युरोपांत अननुभूत जागृति उत्पन्न होऊन हल्लींच्या सुधारणेचा पाया घातला गेला.

**७ युरोपियनांचा हिंदुस्थानांत प्रवेश.**—युरोप व आशिया या दोन खंडांत फार प्राचीन काळापासून दळण वळण चालू आहे. आशिया खंडाची विशेषतः हिन्दुस्थानची सुवर्णभूमि म्हणून त्याकाळीं ख्याति होती. त्याच्या वैभवाची किर्ति सर्वत्र पसरली होती. त्यामुळें या देशाशीं व्यापार करून आपल्या देशास सुसंपन्नतेप्रत न्यावें असें ज्यांस त्यांस वाटे. शिकंदर बादशहाच्या वेळेपासून ही कल्पना वृद्धिंगत होऊन पूर्वीपासून चालत असलेला व्यापार जास्तच वाढला. हें व्यापारी दळण वळण त्याकाळीं दोन मार्गानें होत असे. एक मध्य आशियांतून कास्पियन समुद्रावरून व दुसरा आशिया मायनर मधून भूमध्यसमुद्राच्या मार्गें. अकराव्या व बाराव्या शतकांत मुसलमान आणि ख्रिस्ति ह्या दोन धर्माच्या लोकांत जरूसलेम शहराबद्दल तंटा उपस्थित होऊन पुढील दोनशें वर्षें प्रचंड धर्मयुद्धें झालीं. त्यामुळें या दोन खंडांतील व्यापार फार वाढत गेला. आशिया खंडांतील हिंदुस्थान, चीन, जाव्हा वगैरे देशांतून नानातऱ्हेचा माल युरोपांत जाई व तो विकणारास फायदाही होई; त्यामुळें हा व्यापार आपल्या ताब्यांत असावा असें प्रत्येकांस वाटूं लागलें. सन १४५३ सालापर्यंत पौर्वात्य व्यापाराची वरील दोन महाद्वारें सर्वांस पूर्ण उघडीं होतीं.

त्यांचा उपयोग करण्यांस कोणासही मज्जाव नव्हता. परंतु यावर्षीं तुर्क लोकांनीं कॉन्स्टँटिनोपल शहर काबीज करून महंमदी राज्याचें रोपटें तेथें लावल्यामुळें जमीनीवरून व्यापार करण्याचे उपरिनिर्दिष्ट दोन मार्ग सर्वांस बंद झाले. त्यामुळें हिंदुस्थानास जाण्यास जलमार्ग शोधून काढण्याकडें युरोपियन लोकांचें लक्ष लागलें. युरोपांत याकाळीं नवीन चैतन्य संभूत झालें होतें हें वर सांगितलेंच आहे. या चैतन्यास मुद्रणकलेची जोड मिळाल्यानें युरोपियन लोकांचे ज्ञानांत भर पडून तें वाढूं लागलें. याचसुमारास होकायंत्राची कल्पना निघाल्यामुळें जलप्रवास करणें पूर्वीपेक्षां फार सोपें झालें. बंदूकीच्या दारूचा उपयोग त्यांस माहीत होऊन त्यांच्यांत साहसवृत्ति वाढली व ते गलबतांत बसून निर्भयपणें समुद्रांतून संचार करूं लागलें. त्यांत स्पेन व पोर्तुगाल या राष्ट्रांनीं सर्वांच्यापुढें अघाडी मारली. स्पेन देशाची गलबतें घेऊन कोलंबस हिंदुस्थानांत येण्याकरतां निघाला असतां त्यांस १४९२ सालीं अमेरिकाखंड सांपडलें पुढें युरोपियन लोकांकडून उत्तरेकडून हिंदुस्थानचा मार्ग शोधून काढण्याचे निरनिराळे प्रयत्न झाले. परंतु त्यांत त्यांना मुळींच यश आलें नाहीं. परंतु पुढें त्याचवेळीं बार्थालोमु डायस आफ्रिका खंडाच्या किनाऱ्यानें जात असतां त्यांस केप ऑफ गुडहोप् लागलें, व या शोधाचा फायदा घेऊन इ. स. १४९७ त वास्कोडि गामा लिस्बन शहराहून जलपर्यटणास निघाला. त्यानें बरोबर अकरा महिनें प्रवास करून पाण्यांत काढले व इ. स. १४९८ च्या मे महिन्याच्या विसाव्या तारखेस तो कालिकत येथें उतरला. ही तारीख युरोपियन इतिहासांत संस्मरणीय होऊन राहिली आहे, कारण या तारखेपासून युरोपियन लोकांचा हिंदुस्थानाशीं संबंध आला व पुढें तो उत्तरोत्तर वाढत जाऊन आज इंग्रज सरकार सार्वभौम होऊन येथें मजा मारीत बसलें आहे.

८ **पोर्तुगीझ, डच व इंग्रज**—इ. स. १४९८ त वास्को ड गामा केप ऑफ गुडहोपच्या मार्गें हिंदुस्थानांत आला, त्यावेळेंपासून पूर्वेकडील मुलुखांत पोर्तुगीझ लोकांचें बस्तान बसावयास सुरवात झाली. सोळाव्या शतकाच्या सुरवातीस आलफोन्सो डी आलबुकर्क नांवाच्या पोर्तुगीझ

सरदारानें पश्चिम किनाऱ्यावर गोंवा शहर बांधून पश्चिमेकडे आपला जम बंसविला. पुढील पन्नास वर्षांत त्यांनीं दीव, दमण, वसई, कोचीन वगैरे ठिकाणीं आपल्या वखारी स्थापल्या. यामुळें पोर्तुगीझ फारच प्रबळ झाले. जसजसे ते प्रबळ होत चालले, तसतसे ते तेथील लोकांवर जुलुम जबरस्ती करूं लागले. पुढें तर धार्मिक बाबतींतील या जुलुम जबरदस्तीची कमान फारच वाढली. कितीक लोकांस जुलुमानें त्यांनीं ख्रिस्तीधर्माची दीक्षा दिली. विहीरींत गोमांस अगर त्याच तऱ्हेचा अशुभ पदार्थ पाण्यांत टाकून आपल्या मालकीची सर्व गांवें बाटविली. जोपर्यंत ह्या जुलमाची हद्द स्वतःच्या हद्दीबाहेर गेली नव्हती, तोपर्यंत सर्व ठीक होतें परंतु मर्यादातिक्रम झाल्याबरोबर त्यांना अशी एक जोराची थप्पड बसली कीं पुसूं नये! इ. स. १५८० त स्पॅनिश लोकांनीं पोर्तुगाल काबीज केलें. त्यामुळें पोर्तुगिझांचा विलायतेचा आधार तुटला व ते १६०० सालच्या सुमारास निर्बल झालें. स्पॅनिश लोकास अमेरिका खंडांत सोन्यारुप्याचा यथेच्छ चाव्हा मिळत असल्यानें, त्यांनीं पूर्वेकडील व्यापाराकडे विशेषसें लक्ष दिलें नाहीं. सतराव्या शतकाच्या सुरवातीस डच व इंग्रज लोकांनीं पूर्वेकडील व्यापार आपल्या हातांत घेण्यास सुरवात केली. डच लोक पूर्वी स्पेनचे अंकित होते. स्पॅनिश लोक धार्मिक बाबतींत त्यांना फारच छळीत असत. कारण ते स्वतः रोमन-क्याथोलिक पंथाचे असून, डच लोक प्रॉटेस्टंटपंथाभिमानी होते. डच लोकांनीं आपला स्वतःचा पंथ सोडून, परपंथांत म्हणजे रोमन क्याथोलिक पंथांत येऊन पडावें, अशी त्यांची इच्छा होती. हें कालत्रयींही होणें शक्य नव्हतें. त्यामुळें त्यांचा विशेष छळ होत जाऊन त्यांच्यांत तीव्र स्वरूपांत असंतोष पसरला. असंतोषाचा वणवा यासुमारास विशेष भडकून डच लोकांनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. यामुळें युरोपांतच नव्हे तर ज्या ज्या ठिकाणीं हे लोक होते, त्या त्या ठिकाणीं हे परस्परांशीं भांडूं लागले. इ. स. १६०७ मध्यें स्पॅनिश लोकांनीं एका अटीवर त्यांचें स्वातंत्र्य कबूल करण्याचें ठरविलें. डचलोकांनीं पूर्वेकडील देशाशीं व्यापार करण्याचें अजिबाद बंद करावें, अशा आशयाची ती अट होती. परंतु पूर्वेकडील व्यापार म्हणजे समृद्धीचें माहेरघर आहे, हे त्यांना ठाऊक असल्यानें डचलोकांनीं ही अट कबूल केली नाहीं.

याचवेळीं इंग्रजानांही पूर्वेकडे व्यापार करण्याची इच्छा झाली. एलिझबेथ राणीच्या कारकीर्दीत इंग्रजांनीं स्पनियार्डांचा पराभव केला. स्पॅनियार्डस् त्याकाळीं फारच प्रबळ होते. समुद्रावर ते आपला हक्क सांगत. परंतु इंग्लंडनें त्यांचा पराभव करून त्यांचें आरमरी वर्चस्व संपुष्टांत आणलें. स्पॅनियार्ड लोकांचा पराभव झाल्यावेळेपासून इंग्रजांचा उत्साह वाढून ते निरनिराळीं साहसकर्में करण्यास उद्युक्त झाले. समुद्र सार्वजनीक आहे; तेव्हां त्यावर वाटेल त्यानें फिरावें असें परवानें एलिझबेथ राणीनें सर्वांस दिले. त्यामुळें इंग्रजांचा उत्साह व्दिगुणित झाला. प्रथम चाचेगिरी करण्याचा त्यांनीं उपक्रम केला. दुसऱ्याची गलबतें धरावी व त्यावरील माल लुटून गिळंकृत करावा असा क्रम कांहीं दिवस त्यांनीं ठेविला. स्पानयार्ड लोक रोमन क्योथोलिकपंथी होते. व इंग्लड स्वतः प्राटेस्टंटपंथाभिमानी होते. त्यामुळें या दोन देशांत धार्मिक बाबतींत व्देष पसरला. स्पॅनियार्डांशीं लढणें म्हणजे धर्मोन्नति होय असें इंग्रजांस वाटूं लागलें व जेथें जेथें त्यांना स्पेनची गलबतें लागलीं तेथें तेथें त्यांनीं तीं बेशकपणें लुटली. या चाचेगिरींत त्यांना मनस्वी फायदा झाला. इंग्रजांची अशयारीतीनें समुद्रावर सत्ता वाढूं लागला, व स्पॅनिशलोक निर्बल झाले. इ.स. १६०० च्या सुमारास डच लोकांनीं स्पनियार्डांचा पूर्वेकडाल व्यापार अपल्याकडें घेतल्यापासून हे लोक नामोहरम झाले. इंग्रज व स्पॅनयार्ड यांच्या आंपसांतील भांडणामुळें मधल्यामध्येंच हॉलंडचा फायदा झाला. हॉलंडच्या हातीं पूर्वेकडील सर्व व्यापार गेल्यामळें त्यांच्यात व इंग्रजांत वैषम्य उत्पन्न झालें हालंडनें मसाल्याची बेटें काबीज करून व्यापाराचा मक्ता स्वतःकडें घेतल्यापासून मसाल्याच्या सामानाचे भाव वाढवावयास डचलोकांनीं सुरुवात केली. एक रतलभार मिऱ्यास पूर्वीं जे ३ शिलिंग पडत तें आतां ८ शिलिंग पडूं लागले यामुळे पूर्वीच्या वैषम्यांत विशष भर पडून इंग्रजास विशेषच राग आला. या रागाचें पर्यवसान ईस्ट इंडिया कंपनीची प्राणप्रतिष्ठा होण्यांत झाले. हालंडशी व्यापारा टक्कर देण्याच्या इरायानें इ. स. १५९९ च्या सप्टेंबर महिन्यांत लॉर्ड मयरच्या अध्यक्षतेखालीं इंग्रजी व्यापाऱ्यांनी एक सभा भरविली व पूर्वेकडील देशाशीं व्यापार करण्याचा ठराव पास करून त्यांनीं इलिझबेथ राणी-

कडे परवाना मागितला. स. १६०० सालच्या शेवटच्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस ( ३१ डिसेंबर ) राणीनें कांहीं अटीवर त्यांना परवाना दिला. राणीपासून परवाना मिळतांच त्या व्यापाऱ्यांनीं समाईक भांडवलाची एक कंपनी काढली. तीच ईस्ट इंडिया कंपनी होय. पुढें कंपनी स्थापन झाल्यापासून अवघ्या दोन शतकांत तिचें हल्लींच्या अवाढव्य साम्राज्यांत रूपांतर झालें. यःकश्चित् मिरे ते काय ! ते महाग झाल्यामुळें ही कंपनी निघतें काय ! व पुढें आपलें व्यापारी धोरण बदलून, येथील लोकांच्या डोक्यांवर हात फिरवून ती सत्ताधीश बनते काय ! सर्वच कांहीं और आहे ! अशा या और गोष्टी या काळाच्या पोटांतून आणखी किती निघणार आहेत हे कोणी सांगावें !

९ राज्यविस्तारकाळाचे विभाग—इ. स. १६०० सालीं ईस्ट इंडिया कंपनीची प्राणप्रतिष्ठा झाल्यापासून आजपर्यंतच्या ब्रिटिशांच्या येथील हालचालींच्या इतिहासाचें साधारणतः चार भाग पडतात. (१) सतराव्या शतकाच्या सुरवातीपासून तो अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत, म्हणजे बरोबर दीडशें वर्षें ही कंपनी केवळ व्यापारी वर्चस्व मिळविण्याकरितां हॉलंड व फ्रान्स या दोघां युरोपियन राष्ट्रांशीं झगडणारी व्यापारी मंडळी होती. याकाळीं हिचें सर्व अस्तित्व नेटिव राजांच्या कृपेवर व लहरीवर अवलंबून होतें. पुढील वीस वर्षांत आपल्या आरमारी वर्चस्वामुळें तिनें इतर युरोपियन राष्ट्रांस मागें टाकलें व त्यामुळें हिन्दुस्थानचा सर्व व्यापार तिच्या एकटीच्याच हातीं गेला. ( २ ) या पुढील शतकांत तिनें परिस्थितीचा फायदा घेऊन आपल्या मूळ धोरणास सोडचिठ्ठी दिली व ती जवळ जवळ कायमची दिली. आपलें व्यापारी धोरण सोडून ती या देशाच्या राजकारणांत लक्ष घालूं लागल्याबरोबर तिचा अमल हळूं हळूं बसण्यास सुरवात झाली. कधीं नेटिव राजाशीं लढून तर कधीं निंद्य मार्गांनीं तिनें मुलूख मिळविला; व सरते शेवटीं इंग्लंडच्या राजानें स्वतःस दिलेल्या सर्व व्यापारी सवलती खर्ची घालून आपलें सर्वाधिकारित्व कबूल करण्यास तिनें येथील लोकांस भाग पाडलें. (३) पुढें १८५७ सालीं कंपनीच्या शासन पद्धतीविरुद्ध हिंदी लोकानीं बंड केल्यामुळें तिच्या सर्वाधिकारित्वास फार मोठा धक्का बसला. उत्तर हिन्दुस्थानांत

अशा तऱ्हेनें जरी प्लासी येथील लढाईच्या वाढदिवशीं जिकडे तिकडे रक्तपाताचें भयंकर प्रसंग सर्वांच्या नजरेस पडले, तरी त्यामुळें पुढें दोन महत्वाचे परिणाम घडून आले. "खालसा पद्धति एकदम बंद होऊन हिन्दुस्थानांतील अवशिष्ट देशी संस्थानांस त्यांच्या शाश्वतीबद्दल खात्री मिळाली; आणि दुसऱ्यानें कंपनीच्या हातांतून ब्रिटिश हिन्दुस्थानचा राज्यकारभार जाऊन ब्रिटिश नृपतीनें तो आपल्या हातीं घेतला." अश्या रीतीनें अधिकारक्रांति झाल्यावर नूतन सत्ताधाऱ्यांनीं येथें शांतता व सुव्यवस्था राखण्याचें काम हातीं घेतलें व उपोद्घातारंभींच निर्दिष्ट केलेले शिक्षणस्वास्थ्यादी फायदे आम्हास मिळण्यास यावेळेपासून सुरवात झाली. (४) गेल्या महायुद्धांत जर्मनीच्या राक्षसी महत्वाकांक्षेमुळें इंग्लंडवर एक महत्संकट ओढवलें. त्यांतून इंग्लंडास पार पडण्यास हिन्दुस्थाननें निर्हेतुपूर्वक सहाय्य केलें. त्याबद्दल कृतज्ञ होऊन ता. २० आगस्ट १९१७ रोजीं बादशहांच्यावतीनें भारतमंत्र्यानें असें जाहीर केलें कीं, हिन्दुस्थानास स्वराज्य देण्याचा आमचा अंतिम हेतू असून स्वराज्यदानाचा पहिला हप्ता त्यांस लवकरच मिळेल. या धोरणास अनुसरून मि. मॉंटेग्यु व माजी व्हॉइसराय लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं हिन्दुस्थानांतील अधिकाऱ्यांच्या व कांहीं पुढाऱ्यांच्या सल्यानुसार सुधारणांचा एक कच्चा खर्डा तयार केला व तो १९१८ सालीं येथें सरकारी आज्ञापत्रिकेंत प्रसिद्ध करून त्यावर हिंदी पुढाऱ्यांकडून टीका मागवल्या. त्याची एक प्रत त्यांनीं पार्लमेंटनें नेमिलेल्या सिलेक्ट कमेटीस सादर केली, व कमेटीनें त्यांत अवश्य ते फेरफार सुचविल्यावर पार्लमेंटपुढें सुधारणा कायद्याचें बील मांडण्यात आलें. व त्याची तिन्हीहि वाचनें पास झाल्यावर त्यास कायद्याचें स्वरूप आलें. बादशहांनीं मोठ्या आनंदानें त्यावर आपली मुद्रा केली व त्यास पुष्टीप्रद असा एक जाहीरनामाहि २३ डिसेम्बर स. १९१९ रोजीं प्रसिद्ध केला. त्यांत त्यांनीं हिन्दुस्थानच्या प्रगतीकडे पूर्वीसारख्याच सहानुभूतीनें आपण पहात राहूं असें अभिवचन दिलें आहे. या ॲक्टानें लोकनियुक्त प्रतिनिधीस राज्यकारभारांत एक निश्चित भाग मिळाला असून पूर्ण जबाबदार राज्यपद्धति हिन्दुस्थानास भविष्यत्काळीं लवकरच प्राप्त होईल असें तो सुचवीत

आहे. अशा तऱ्हेचा आजपर्यंतचा इतिहास आहे. ब्रिटिश राज्यव्यवस्थेचें यथार्थ स्वरूप कळण्यासाठीं या इतिहासाची संपूर्ण माहिती असणें अत्यावश्यक आहे. हा सर्व इतिहास लिहावयाचा ह्मणजे जवळ जवळ दुसरा ग्रंथच होईल. परंतु प्रस्तुत पुस्तकाचा तो विषय नसल्यामुळें त्याचा संक्षेपतःच विचार करून येथें भागवावें लागत आहे. व त्यांतहि निवडानिवड केली असून घटनात्मक भागासच विशेष प्राधान्य दिलेलें वाचकांस आढळून येईल. क्वचित् ठिकाणीं इतिहास संगतीसाठीं मूळ इतिहासाचा उल्लेख केला असून पुढें तर त्याशिवायच काम भागविलें आहे.

१० **कंपनीचा जन्म व प्रथमावस्थेतील प्रगति**--हिंदुस्थानांतील ब्रिटिश अंमलाचें मूळ समाईक भांडवलवाल्या इंग्लिश व्यापारी मंडळास मिळालेल्या सरकारी सनदेंत आढळून येतें हें वर सांगितलें आहेच. सन १५९९ सालीं लंडनच्या व्यापाऱ्यांनीं एकत्र जमून पूर्वेकडील देशाशीं व्यापार करण्याच्या हेतूनें एक कंपनी काढली व सन १६०० च्या शेंवटच्या महिन्याच्या शेंवटच्या तारखेस एलिझबेथ राणीकडून व्यापार करण्याकरितां कुलमुखत्यारीचें मक्तेपत्रहि त्यांनीं मिळविलें. वरील शासन पत्रांत जॉर्ज कंबरलॅन्ड प्रभृति २०० नागरिकांची नांवें घातलीं होतीं. "त्यांत कित्येक सुखवस्तु नागरीक, पाटला सारखे लहान वतनदार अधिकारी व बडेबडे इनामदार असे लोक होते; आणि त्यांना एक गव्हर्नर व २४ छोटीं छोटीं पोटमंडळें निवडण्याचा अधिकार या शासनपत्रानें मिळाला होता; त्यांच्या हातीं आपल्या राजाच्या अंमलाखालील प्रदेशांत न्यायकचेरी स्थापणें, दर्यावरील मार्ग आंखून सुरक्षित ठेवणें, उद्योगधंदे, व्यापार आणि तत्संबंधीं गोष्टीं यांच्यावर लक्ष ठेवणें हेहि अधिकार मिळाले होते. इतक्या गोष्टी करण्याची जबाबदारी आल्यानें त्यांच्याकडें सहजच इंग्लिश चालीरितीला पोषक व कायद्याला संमत असे कायदेकानू करण्याचा अधिकार सोंपविण्यात आला" एलिझबेथराणी नंतर पहिल्या जेम्स राजानें कंपनीस व्यापार करण्यास कायमचा हक्क दिला. त्यानंतर स्टूअर्ट राजांनीं व क्रॉमवेलनें वेळोवेळीं कंपनीस नव्या सनदा करून देऊन व्यापारवृद्धीसाठीं लागेल ती मदत हि केली. पहिलीं दीडशें वर्षें कंपनीचें व्यापार वृद्धीकडेंच लक्ष होतें. १६१२ सालापासून

ते १६२२ सालापर्यंत कंपनीस पोर्तुगिझांशीं झुंजावें लागलें. या दहा वर्षांत पोर्तुगिझांचें वर्चस्व जाऊन कंपनीनें आपला अंमल बसविला. पुढें कित्येक वर्षें कंपनीस हालंडशीं झगडावें लागलें. परंतु अंबोयना येथें नऊ इंग्रज असामींची कत्तल झाल्यापासून कंपनीनें जावा बेटाचा नाद सोडला व त्यावरोबर डचांचा संबधच तुटला. सन १६१२ त पूर्वेकडें मच्छलिपट्टणास व पश्चिमेकडे सुरतेस कंपनीनें आपल्या वखारी काढल्या. सर टामसरोच्या मध्यस्थीनें १६१५ त जहांगीर बादशाकडून कंपनीस कांहीं व्यापारी सवलती मिळाल्या. १६३६ त बक्टन नांवाच्या एका डॉक्टरानें शहाजनाच्या मुलीस रामबाण औषध देऊन बरी केली. यामुळें बादशहा इतका खूष झाला कीं त्यानें डॉक्टरास वाटेल तें देऊं केलें. त्या स्वाभिमानी आंग्लवैद्यानें स्वतःकरितां कांहीं एक मागून न घेतां आपल्या बांधवांकरितां बंगाल्यांत व्यापार करण्याची परवानगी बादशहा जवळ मागितली व त्या उदार बादशहानें तीस चटकन होकार दिला. परवानगी मिळतांच हुगळी येथें एक व बालिसार येथें एक, अशा दोन वखारी इंग्रजांनीं काढल्या. याच सुमारास कारोमंडळ किनाऱ्यास लागून दाक्षिणेस एक नवीन वखार कंपनीनें घातली व चंद्रगिरीच्या हिंदूराजाकडून १६३८ सालीं कंपनीनें मद्रासपट्टण विकत घेतलें. हिंदुस्तानांत इंग्रजांच्या मालकीची अशी ही पहिलीच जमीन होय. मद्रासपट्टण येथें इंग्रजांनीं एक किल्ला बांधला व त्याची तंटबंदीहि चांगली केली. या किल्ल्याचें नांव त्यांनीं सेंट जार्ज असें ठेविलें. या किल्ल्याच्याच दक्षिणेस शंभर मैलावर सेंट डेव्हिड या नांवाचा दुसरा एक किल्ला त्यांनीं बांधला.

सतराव्या शतकाच्या मध्यापर्यंत पश्चिमकिनाऱ्यावरील सुरतेच्या वखारीची एक सारखी भरभराट होत गेली. परंतु १६६४ व १६७० सालीं शिवाजीनें सुरतेवर हल्ला करून तें शहर लुटलें. कंपनीच्या कैसास जरी या दोन स्वाऱ्यांत मराठ्यांकडून हात लावला गेला नाहीं, तरी मराठ्यांची चांगलीच जरब कंपनीस बसली; व त्यामुळें सुरतेहून अधिक सुरक्षित ठिकाणीं आपली वखार हालविण्याची इंग्रजांना अवश्यकता भासूं लागली. याच सुमारास दुसऱ्या चार्लस राजानें पोर्तुगालच्या राजापासून स्वतःस हुंड्यादाखल मिळालेलें मुंबई बेट कंपनीस विकलें (१६६८) व त्यामुळें मुंबईस आपला बाडबिछाना पसरण्यास इंग्रजास फावलें.

बंगाल्यांत कंपनीनें दोन वखारी काढल्याचें वर सांगितलें आहेच. वर सांगितल्या प्रमाणें तेथें कंपनीचें जरी बस्तान बसलें तरी मोंगल बादशहाच्या तेथील सुभेदारांत व कंपनींत वारंवार तंटे उपस्थित होत. कंपनीनें सुभेदाराविरुद्ध बादशहाकडे नानापरीनें तक्रारी करून पाहिल्या; त्याच्या जाचांतून सोडवणूक व्हावी म्हणून बादशहास पदोपदीं विनवलें; परंतु कंपनीचें एकहि गाऱ्हाणें बादशहानें कधीं ऐकिलें नाहीं अगर सुभेदाराविरुद्ध कधीं ब्र हि काढला नाहीं. यामुळें कंपनीस फारच त्रास झाला व वैतागून जाऊन तिनें १६८५ सालीं पतंग जसा दीपावर झडप घालतो त्या प्रमाणें पुढचा मागचा विचार न करितां अवरंगजेब बादशहा विरुद्ध शस्त्र उपसलें. प्रथम प्रथम तीस यश येत गेल्यानें ती नबाबासही भुमानीनाशी झाली. कंपनी शिरजोर झाल्याचें पाहतांच अवरंगजेबानें आपली वक्र दृष्टी तिच्याकडे फिरविली; त्याबरोबर कंपनीची गाळण उडून तीस दांतीं तृण धरून पादशहास शरण यावें लागलें. बादशहानें रागाच्या सपाट्यांत कंपनीच्या वखारी धुळींस मिळविल्या. परंतु पुढें लवकरच त्यानें हुगळीवर कंपनीस वखार काढण्याची परवागी दिली. त्याप्रमाणें कंपनीनें हुगळीच्या मुखाशीं एक वखार घालून आपलें बस्तान पुनः बसविलें. अश्या तऱ्हेनें हिंदुस्थानच्या भावी राजधानीचा कलकत्ता येथें पाया घातला गेला. झालेल्या प्रकारावरून बोध घेण्याइतकी कंपनी शहाणी होती. तिनें या उपर १७४६ पावेतों कधींहि देशी-राजाविरुद्ध वर मान केली नाहीं. स. १६९५ त बंगालच्या नबाबाकडून कंपनीस तेथें किल्ला बांधण्याची परवानगी मिळाली. परवानगी मिळताच कंपनीनें तेथें फोर्ट विल्यम या नांवाचा किल्ला बांधून त्याच्या आसपास तटबंदी केली.

याच सुमारास इंग्लडांत एक नवीन कंपनी निघाली. तिसऱ्या विल्यमास आपणास कायमची सनद मिळावी म्हणून या नव्या ईस्ट इंडिया कंपनीनें एक मोठी रकम देऊं केली. जुन्या कंपनीस त्या रकमेहून मोठी रकम देण्याचें सामर्थ्य नव्हतें. पैशाच्या लोभानें राजानें सदर कंपनीस परवानगी दिली व तिनें आपला कारभार सुरू केला. व्यापाराच्या बाबतींत यामुळें या दोन्ही कंपन्यांत मोठी चुरस लागून प्रत्येकीचें बरेंच नुकसान झालें. देशांत व्यापार सुरळीत

चालावा म्हणून सुभेदारांना लांच द्यावा लागे. सुभेदार लोकहि लांचाच्या बाबतींत पक्षपात न करितां या दोन्ही कंपन्याकडून पैसे उकळीत असत. यामुळें या कंपन्या चांगल्याच डबघाईस आल्या. पुढें लवकरच दोघींची डोकीं ठिकाणावर येऊन एक जुटीनेंच व्यापार करण्यांत फायदा आहे असें त्यांनीं ओळखलें व त्यामुळें ह्या कंपन्या एकत्र झाल्या. अश्यातऱ्हेनें १७०२ सालीं संयुक्त ईस्ट इंडिया कंपनीची प्राणप्रतिष्ठा झाली.

यापुढें चाळीस वर्षांपावेंतों कंपनीच्या कारभारांत महत्वाचें असें एकहि स्थित्यंतर झालें नाहीं. राजकारणाचें नांवहि या काळांत कंपनीस माहीत नव्हतें. इ. स. १७१५ सालीं हॅमिल्टन नांवाच्या कंपनीच्या पदरील एका डॉक्टरानें फरुकशेअर बादशहास एका अजब रोगापासून बरें केलें. बादशहानें त्यास वाटेल तें बक्षिस माग म्हणून सांगितलें असतां त्या देशाभिमानी इंग्रजानें बंगाल्यांत ३८ गांवें विकत घेण्याची परवानगी कंपनीस मिळावी अशी बादशहाजवळ मागणी केली. बादशहानेंही आनंदाच्या भरांत ती कंपनीस देऊन टाकिली. परंतु कंपनीची ही इच्छा सफल होणें सर्वस्वी बंगालच्या नबाबावर अवलंबून होतें. यावेळीं मुर्शिदकुलीखान या नांवाचा इसम बंगालचा नबाब होता. तो इंग्रजांचा द्वेष करीत असे. कंपनीस जमिनी विकण्यास त्यानें लोकास मज्जाव केला व बादशहाच्या आज्ञेचा भंग केला. इंग्रजांचें त्याच्यापुढें चालणें शक्य नव्हतें. ते निमुटपणें हा अपमान गिळून स्वस्थ बसले. पुढें याच सुमारास रघोजी भोसल्यानें बंगालवर स्वाऱ्या करून सर्वांस त्राही त्राही करून सोडलें. यामुळें मराठ्यांपासून आपलें संरक्षण करण्याकरितां इंग्रजांना उपाय योजणें अवश्यक भासूं लागलें. त्यांनीं वखारी भोंवतीं खंदक खणण्याची नबाबाकडून मोठ्या काकुळतीनें परवानगी मिळविली. हा खंदक खणल्यामुळें रघूजींच्या शूर लढवय्यास्वारांची दौड यापुढें जाऊं शकली नाहीं. हा खंदक मराठ्यांचा खंदक म्हणून इतिहासांत प्रसिद्ध आहे ( १७४२ ). अशा रीतीनें कंपनीचा कारभार सुरळीत चालत असतां दक्षिणेकडें एकदम फट्ट झालें व त्यामुळें इंग्रजांना राजकारणाच्या पटांवर फांसे फेकावे लागले. दक्षिणेकडे फ्रेंच व इंग्रजांत राजकीय व व्यापारी वर्चस्वाकरितां चढाओढ चालली

होती. हिचें रूपांतर दोघांच्या झगड्यांत होणार हे त्यावेळीं स्पष्ट दिसून येत होतें. इतक्यांत फ्रेंचाच्या वर्चस्वाची कमान वर चढली व त्याबरोबर आजपर्यंत आंतल्याआंत धुमसणाऱ्या यांच्या वैमनस्यरूपीं अग्नीनें पेट घेतला व त्याचें रूपांतर कर्नाटकच्या लढायांत झालें.

**११ कंपनीची घटना**–कंपनीच्या जन्मापासून पहिल्या बारा वर्षांपावेतों कंपनी समाईक भांडवलाची नव्हती. ज्या शंभर व्यापाऱ्यांना पूर्वेकडील देशाशीं व्यापार करण्याची परवानगी देण्यांत आली होती, त्यांनीं थोडेसें भांडवल गोळ केलें ह . व्यापारानिमित्त ज्या सफरी होत त्यांचा खर्च या भांडवलांतून होत असे. यामुळें होणाऱ्या नफा नुकसानीचें मालक तेंच होते. डायरेक्टरांचा या भांडवलावर कोणत्याहि प्रकारचा ताबा नव्हता. कंपनीचें सर्व समाईक भांडवल आपल्या ताब्यांत घेण्याच्या इरादानें स. १६१२ त कंपनीस त्यांनीं समाईक भांडवलाच्या कंपनीचें रूप दिलें. अशा रीतीनें कंपनीचें सर्व भांडवल त्यांच्या ताब्यांत आलें. यापुढें व्यापारी सफरींना जो खर्च येत असे व त्यामुळें जे नफा-नुकसान होई, त्याची हिश्शेरशीनें वाटणी होऊन भागीदारास त्याचा वाटा मिळत असे डच कंपनीशीं झालेल्या चढाओढींत कंपनीस बरीच मोठी ठोकर बसली व तिचा व्यापार मंदावला. व्यापाराची अशा रीतीनें विस्कटलेली घडी नीट बसाविण्याकरितां चार पांचदा निरनिराळयावेळीं नवीन भांडवल उभारण्यांत येऊन अधिकृत भांडवल वाढविण्यांत आलें. परंतु ह्या नवीन भांडवलाचा पूर्वीच्या भांडवलांत समावेश करण्यांत आला नाहीं. त्याचा विनियोग स्वतंत्र रीतीनें करण्यांत येई व ज्या त्या भांडवलावरील नफा त्या त्या भांडवलाच्या भागीदारामध्यें वाटून दिला जाई. ह्यामुळें प्रत्येक भांडवलाचें वेगवेगळालें हिशोब ठेवावें लागत. असें स्वतंत्र हिशोब ठेवणें फारच खर्चाचें व त्रासाचें काम होतें. त्यांत कंपनीचे हिशोब हिंदुस्थानांत व इंग्लडांत असें निरनिराळें ठेवावें लागत असल्यामुळें हिशोबांत एकच गोंधळ उडे व सर्वांचा घोटाळा होई. ही स्थिति टाळण्याकरितां १६५८ त कंपनीचें हें सर्व भांडवल एकत्रित करण्यांत येऊन कंपनीस समाईक भांडवलवाल्या कंपनीचें रूप प्राप्त झालें. अशा तऱ्हेनें कंपनी हल्लीं सारखी एक लिमिटेड कंपनी बनली.

कंपनीचा विलायतेंतील कारभार दोन मंडळामार्फत होत असे. त्यांस अनुक्रमें Court of Proprietors व Court of Directors असें म्हणत. ५०० पौंड अगर त्याहून मोठ्या किंमतीचा भाग घेणाऱ्या भागीदारांचे मिळून Court of Proprietors बनलें होतें. Court of Directors मध्यें भागीदार लोकांनीं निवडलेले २४ सभासद असत. ह्या मंडळाकडे कंपनीच्या अंतर्व्यवस्थेचें काम सोंपण्यांत आलें होतें व कंपनीच्या कारभाराबद्दल हें कोर्ट, प्रोप्रायटरांच्या कोर्टास जबाबदार असे. प्रोप्रायटर लोकांची जेव्हां सभा भरे, तेव्हां १००० पौंड भरणारास एक मत, ३००० पौंड देणारास २ मतें, ६००० पौंड देणारास ३ व १०००० किंवा त्याहून ज्यास्त देणारास ४ मतें देण्याचा अधिकार होता. कोर्ट आफ डायरेक्टरांची निवडणूक ह्या मोठ्या मंडळामार्फत होई. ह्या सभेंतील प्रत्येक सभासदास सालिना ३०० पौंड व त्याच्या उपाध्यक्षास ५०० पौंड तनखा मिळत असें. ह्या मंडळाच्या कामाच्या सोयीसाठीं आणखी चार पोटमंडळें निरनिराळ्या कामासाठीं नेमीत. त्यांच्यांत कामाची वांटणी फार बारकाईनें केली होती. हिशेब ठेवणें, गुप्त पत्रव्यवहार करणें, कायदेकानू ठरविणें वगैरे अनेक कामें पृथक् असामीस वांटून दिली होती.

कंपनीचा हिंदुस्थानांतील कारभार अशाच सुव्यवस्थित रीतीनें चालत होता. व्यापाराच्या सोयीसाठीं हिंदुस्थानांतील आपल्या वखारी त्यांनीं तीन ठिकाणीं वाटून दिल्या होत्या. प्रत्येक भागावर एक प्रेसिडेंट व त्यास मदतनीस म्हणून एक कौन्सिल नेमण्यात आलें होतें. प्रेसिडेन्टच्या हाताखालीं हा मुलुख होता म्हणून पुढें त्यास प्रेसिडेन्सी असें नांव मिळालें. मुंबई, मद्रास व कलकत्ता हीं तीन ठिकाणें अनुक्रमें प्रत्येक भागाचीं मुख्य ठाणीं होतीं व येथूनच हे प्रेसिडेंट लोक कंपनीचें काम पहात. या तिघाजणांचा परस्पर कांहींच संबंध नव्हता. ते विलायतेस परस्पर व्यवहार करीत असत. कंपनीच्या दुय्यम कामगार वर्गांत रायटर्स, फॅक्टर्स, नवे व जुने व्यापारी असें चार प्रकार होते. या लोंकांना पगार फारच कमी मिळत असें. रायटरास सालिना अवघा पांचच पौंड पगार मिळे; परंतु त्यांस खाजगी व्यापार करण्याची परवानगी असें. त्यामुळें व कित्येक अयोग्य मार्गांनीं जनतेकडून हे

जबरीनें पैसे घेत असत व आपला पगार अल्पसा असतांनाहि विलायतेस जाते-वेळीं ते लक्षाधीश बनून जात. विलायतेंत तर ह्या लोकांस Indian Nabobs असें म्हणत असत. कंपनीच्या अंतर्व्यवस्थेंत १७७३ च्या रेग्युलेटिंग ॲक्टा-न्वयें पुढें महत्वाचे फेरफार करण्यांत आले.

**१२ अठराव्या शतकांतील हिन्दुस्थान**–अठराव्या शतकाच्या सुरवाती-पासून हिन्दुस्थानच्या राजकीय वातावरणांत अशांततेच्या ज्वाळा उठूं लागल्या होत्या अवरंगजेबाच्या धर्मवेडेपणामुळें मोगलसाम्राज्याच्या वैभवसूर्यास ऐन दुपारीं ग्रहण लागलें व त्यामुळें अवरंगजेब अगदीं टेकीस आला. त्याच्या धर्म-वेडेपणामुळें त्यांस तिघें अंत:स्थ शत्रू निर्माण झालें व त्यांनीं त्याच्या हयातीं-तच साम्राज्यरूपी डोलारा पोखरून टाकला. हे शत्रू म्हटलें म्हणजे उत्तरेस शीख, दक्षिणेस मराठे, व शेजारीं रजपूत हे होत. त्यांत मराठ्यांनीं त्याच्या हयातींतच त्याच्या काळजावर वार करून त्यांस घायाळ केलें होतें. व या घावाच्या वेदना सहन करीत असतानांच या धर्मवेड्याचा प्राण त्याच्या ‘ प्याऱ्या ’ देवतेच्या चरणीं मिलिंदायमान झाला. अवरंगजेबाच्या अशा भयंकर शेंवटामुळें त्याच्या शत्रूंस त्याच्या साम्राज्यास कडकडून चावे घेण्यास चांगलेंच फावलें. अवरंगजे-बाच्या मृत्यूनंतर मोंगल पातशाहीच्या सिंहासनावर जे विराजमान झाले ते निवळ नामर्द होते. त्यांना ऐषआरामापलिकडें कांहीं सुचत नव्हतें. निरनिराळें इष्क करावें असें त्यांस वाटत असे व त्यामुळें त्यांत उडालेल्या रंगांत यथेच्छ विहार करण्यापलिकडे त्यांची मजल गेली नाहीं; व ती जाणेंही शक्य नव्हतें. एका हातांत कुराण व दुसऱ्या हातांत तलवार घेऊन धर्मप्रसारार्थ दीन दीन करीत स्वप्राणां-ची कुरवंडी करून टाकणारे कडवे मुसलमान लढवय्येहि या काळीं नव्हते. यथा राजा तथा प्रजा हा न्याय त्या काळीं पूर्णांशानें सत्य होता. तख्ताधिपतींच्या हातांतील पैलदार समशेर जाऊन, समशेरीची ती प्रिय जागा ‘ शराबाच्या नाजुक एकच प्याल्यानें’ आपलीशीं केली होती. अशा स्थितीमुळें मोंगल साम्राज्य फार वेळ न टिकून अवरंगजेबाच्या मृत्यूनंतर अवघ्या पन्नास वर्षांत धुळीस मिळालें. त्याबरोबर पूर्वी तख्तास वचकून वागणारे नबाबादी सुभेदार आपआपल्यापरी

स्वतंत्र झालें व त्यांनीं आपल्या मानेवरील मोंगलांचें जोखड पार झुगारून दिलें ज्याच्या तेजापुढें नबावादी ही ' लुंगी सुंगी ' पोरें चळचळ कांपत असत, तीच या तेजोराशीस खग्रास ग्रहण लागल्यावर त्यांस टिचल्या भावल्या करूं लागावीना! केवढी ही काळाची विचित्र करणीं! बा काळा, तुला नमन असो!!

एकीकडे अशा रीतीनें मोंगलांच्या वैभवरवीस ग्रहण लागत असतानां, मराठ्यांच्या वैभवाचा बालरवि हळूं हळूं उदयाचलावर येत होता. शिवाजीमहाराजापूर्वी दक्षिणेंत पसरलेला घनदाट अंधःकार, त्यांचें आगमन होतांच पार विलयाला गेला व मराठापातशाहीच्या वैभवसूर्याचें बालकिरण सह्याद्रीच्या उत्तुंग शृंगावर चमकूं लागण्यास सुरवात झाली. शिवाजीमहाराजानंतर संभाजीच्या कारकीर्दीत या बालरवीवर एक विरल घनपटल आलें होतें. परंतु तें निमिषार्धांत दूर होऊन ह्या बालरवीनें शाहूच्या कारकीर्दीत भूमंडळाचा ऐन मध्य गांठला. बाजीराव पेशव्याच्या शौर्यानें व नानासाहेबाच्या कर्तृत्वानें मराठ्यांचा भगवा झेंडा अटकेपलिकडे याच सुमारास फडकूं लागला. यामुळें आनंदाच्या भरांत मराठे नाचूं लागले. परंतु त्यांचा हा नक्षा १७५२ मध्यें अहमदशहा अबदालीनें पंजाबावर स्वारी करून उतरविला. मराठे चटकन् शुद्धीवर आले. आपणास **निर्वीर्यमुर्वीतलम्** नाहीं असें त्यांच्या त्यावेळीं लक्षांत आलें व भावी संकटास तोंड देण्याकरितां त्यांनीं कंबर कसली. परंतु स. १७६१ च्या पानपतच्या घनघोर संग्रामांत त्यांना हार खावी लागून मराठा पातशाहीचें सिंहासन डळमळीत झालें. मराठा पातशाहीस अबदालीनें शह दिल्यापासून रोहिल्यांनीं चुळबुळ करावयास सुरवात केली व थोड्याच अवधींत गंगेच्या उत्तर तटाकावरील मुलूख त्यांनीं पादाक्रांत केला. अयोध्येचा वझीर व बंगालचा सुभेदार हीनबल होऊन नामधारी बनल्यामुळें रोहिल्यावर दाब राहिला नाहीं. ही उत्तरेकडची स्थिति. दक्षिणेंत निरनिराळे हिन्दु राजे कलहमग्न होते. सारांश, हिंदुस्थानांत यावेळीं जिकडे तिकडे मधून मधून अशांततेच्या ज्वाळा निघत होत्या व त्यांत कितीक राजगृहें विलयाला जाऊन त्यांच्या जागीं नवीन राजघराणीं अस्तित्वांत येत होती. अश्या स्थितींत एकाद्या बलाढ्य सत्तेस या देशांत राज्य स्थापणें कांहीं अशक्य नव्हतें.

इंग्रजांनीं हें पूर्ण ओळखलें होतें व राज्यस्थापनेच्या तयारीस त्यांनीं सुरवातहि केली होती. इतक्यांत त्यांच्या सुदैवेंकरून, ईस्ट इंडिया कंपनीच्या पिंपळाची मुळी बंगाल्यांत रुजली व " तिनें कालांतरानें सर्व हिन्दुस्थानभर देशी राजेरजवाड्यांच्या सत्तेच्या प्रचंड इमारती भराभर उलथून पाडून जमीन दोस्त केल्या."

**१३ फ्रेंच व इंग्रज**—अशा परिस्थितींत कंपनीचा कारभार सुरळीत चालणें शक्य नव्हतें. ज्यांनीं तिला संरक्षावें ते हतबल झाले होते. यामुळें स्वसंरक्षणार्थ कंपनीस स्वतःची फौज ठेवावी लागली व आपल्या संरक्षणाची सर्व भिस्त तिला या उभारलेल्या फौजेवर टाकावी लागली. सन १७४५ त युरोपांत फ्रान्स व इंग्लंड यांच्यात बेबनाव होऊन या दोन राष्ट्रांत युद्ध सुरू झालें. त्याचा परिणाम इकडेंहि व्हावयाचा तोंच झाला. हे लोक येथेंहि परस्पराशीं लढूं लागले. कारोमांडलच्या किनाऱ्यावरील फ्रेंच वखारीवर इंग्रजांनीं हल्ला केला. परंतु फ्रेंच गव्हरनर डुप्ले हा मोठा कारस्थानी व धूर्त असल्यामुळें इंग्रजांचा मोठ्या शिताफीनें त्यानें पाडाव केला. त्यानें अर्काटच्या नबाबाचे खिसे गरम करून त्यास वश करून घेतलें, व त्याच्या मनांत असें भरविलें कीं, फ्रेंचांनीं व इंग्रजांनीं त्याच्या राज्यांत लढणें हें श्रेयस्कर नसून त्यामुळें राज्यास पुढें मागें धोका येण्याचा संभव आहे. नबाबानें यावरून इंग्रजांची हकालपट्टी केली व साहजीकपणेंच फ्रेंच वखारीस पडलेला वेढा उठला. इ. स. १७४६ त फ्रेंच काफिल्यानें मद्रासवर हल्ला करून सेंट डेव्हिड किल्याशिवाय सर्व ठाणीं आपल्या ताब्यांत घेतलीं. इंग्रजांना जसें अटकाव करून त्यांस लढण्यांपासून परावृत्त केलें तसें फ्रेंचासहि लढूं न देण्याचा प्रयत्न नबाबानें केला. परंतु त्याच्या व फ्रेंचांच्या घडलेल्या चकमकींत त्याचा मोड झाला. पुढें १७४८ त युरोपांत या दोन राष्ट्रांत एक्सलाचॅपेल येथें तह होऊन मद्रास इंग्रजांना परत मिळालें.

**१४ डुप्लेची कारस्थानें व पराभव**—फ्रेंच गव्हर्नर डुप्ले हा फार दूरदृष्टी व राजकारणकुशल असा पुरुष होता. त्यानें या लढाईपासून एक महत्वाचा निष्कर्ष काढला. तो म्हणजे, देशी फौजेस कवायत शिकविली असतां तिच्याशीं दुसरी बिनकवायती फौज तोंड देऊं शकत नाहीं हा होय. डुप्ले स्वतः

फार महत्वाकांक्षी असल्यामुळें त्यानें या निष्कर्षाचा फायदा घेण्याचें ठरवून त्या दिशेनें तो खटपट करूं लागला. थोड्याच अवकाशांत अर्काटचा नबाब व हैद्राबादच्या निजामाच्या अशा दोन जागा रिकाम्या पडल्या व वारसासंबंधानें वारसदारांत भांडणें सुरू झाली. डुप्लेनें तेथें स्वतःजाऊन आपले दोन उमेदवार त्या गादीवर बसविले. त्यामुळें त्याचें दक्षिणेंत वजन वाढलें. या संधीचा फायदा घेऊन दक्षिणेंतून इंग्रजांस अर्धचंद्र देण्याचा त्यानें निश्चय करून चंग बांधला. यामुळें स्वसंरक्षणार्थ राजकारणाच्या आखाड्यांत कंपनीस उतरावें लागलें. रॉबर्ट क्लाइव्ह, आयरकूटसारखें उत्साही तरूण त्याकाळीं कंपनीस लाभलें होतें. त्यांनींहि डुप्लेसारखीच महत्वाकांक्षा धरली व विरुद्ध पक्षास मिळून फ्रेंचावर मात करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें त्यांनीं विरुद्ध पक्षास हाताशीं धरून फ्रेंचाचा मोड केला. अशारितीनें फ्रेंचाना इंग्रज सव्वाशेर झाले व इंग्रजांचीं सरशी झाली. अर्काटच्या वेळ्यापासून पुढें दहावर्षांपावेतों या दोघां युरोपियन लोकांत कडाक्याची भांडणें चालू होती. शेवटीं १७६१ सालीं फ्रेंचाना हार खावी लागून इंग्रजी सत्तेस चरावयास दक्षिणभर मोकळें रान सांपडलें.

**१५ कंपनीची बंगाल्यातील प्रगति**–बंगाल्यांतहि याप्रमाणेंच दोघांच्या भांडणाचा निकाल लागला. युरोपांत या दोन राष्ट्रांत युद्ध चालू होतें. हिंदुस्थानांत आपणास सर्वांकडून–विशेषतः फ्रेंचांकडून उपसर्ग न पोंचावा म्हणून इंग्रजांनीं कलकत्त्यास तटबंदी केली.बंगालच्या नबाबानें तटबंदी मोडण्याविषयीं कंपनीस फर्माविलें. परंतु कंपनीनें त्यांस दाद न देतां तटबंदीचें काम पूर्ण केलें. आज्ञाभंग करून आपला अपमान केल्यामुळें नबाब फारच चिडला. त्यानें कंपनीवर हल्ला चढवून इंग्रजांस हांकून दिलें. याचा सूड उगविण्याचा हेतूनें मद्रासेहून वॉटसन व रॉबर्ट क्लाइव्ह हे दोघें आंगलवार नबाबावर चालून आले. सूडाच्या बुद्धीनें शत्रूवर चालून आलेला मनुष्य कोणची कृत्यें करण्यास मागें घेईल ? शत्रूवर सूड उगविण्याकरितां तो हातीं लागेल तें शस्त्र हातीं धरितो असा जगाचा अनुभव आहे. क्लाइव्हनें याच निंद्य गणलेल्या मार्गांचें अवलंबन करून १७५७ मध्यें प्लासीच्या लढाईंत सिराजचा पराभव केला व त्यामुळें बंगाल कंपनीच्या हातीं येऊन नबाबाच्या

गादीचें भवितव्यही तिच्या हातीं आलें. कंपनीनें पाटणा येथील गादीवर आपल्यातर्फेचा एक मनुष्य बसविला व त्यावर स्वतः देखरेख करण्याचें तिनें ठरविलें. परंतु ही गोष्ट नूतन नबाबास जाचक झाली व त्याचे इंग्रजाशीं पैशाच्या बाबतींत जमेना. इंग्रजांना यामुळें गादीवरील मनुष्यास पदच्युत करावें लागलें. यानंतरचा कांहीं काळ अंदाधुंदींत गेला. त्याचा फायदा घेऊन अयोध्येच्या नबाबवझिरानें मोगलपादशहास पाठीशीं घालून बंगालप्रांतावर स्वारी केली. परंतु बक्सारच्या लढाईंत त्याचा मोड झाला. दिल्लीश्वराधिपति या नबाबाच्या जवळ जवळ नजर कैदेंत होता. त्याच्याकडून कंपनीस बंगाल, बिहार व ओरिसा या तीन प्रातांची दिवाणी सनद म्हणजे वसूल गोळा करण्याचा हक्क मिळाला. दिवाणी अधिकार कंपनीस देण्यांत आले व फौजदारी अधिकार नबाबाकडेंच राहिले. यावेळेपासून ( Double Government ) दुहेरी राज्यपद्धति सुरू झाली. कंपनी आजपावेतों नुसत्या व्यापारी उलाढाली करी. आतां ती राजकीय चळवळींत भाग घेऊन मध्यें लुडबुड करूं लागली. याच सुमारास हैद्राबादच्या दुर्बळ नबाबानें गंतुर, विजगापट्टण, मच्छलीपट्टण वगैरे समुद्र काठांवरील मुलूख कंपनीस दिला. यावेळेपासून मद्रास इलाख्यास सुरवात झाली.

**१६ कंपनीच्या कारभारांतील सावळागोंधळ**—कंपनीनें राजकीय उलाढाळींत प्रत्यक्षपणें भाग घेण्यास सुरवात केल्यापासून कंपनीच्या कारभारांत घोटाळें माजण्यास सुरवात झाली. त्यांत मोंगल बादशहाकडून कंपनीस १७६५ त बंगाल, बिहार व ओरीसा या तीन प्रांताची दिवाणी सनद मिळून त्यायोगें प्रस्थापित झालेल्या दुहेरी राज्यव्यवस्थेचे दुष्परिणामांची भर पडली. त्यामुळें कंपनीच्या कारभारांत विशेषच बजबजपुरी माजली. बादशहानें बंगाल, बिहार व ओरिसा या प्रांतातील वसूल गोळा करण्याचें काम कंपनीकडें सोपून तिला सर्व दिवाणी अधिकारही दिले होते. याचा मोबदला म्हणून कंपनीनें दरवर्षी बादशहास २६ लक्ष रुपये द्यावे असें ठरलें. या योजनेस अनुसरून कंपनीनें या प्रांतांचे परचक्रापासून रक्षण करण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली व अंतर्व्यवस्थेचें काम नबाबाकडें सोंपविलें. नबाब यावेळीं अज्ञान असल्यामुळें कंपनीनें

महंमद रेझाखान या नांवाच्या एका मुसलमानाची अज्ञानाचा पालक या नात्यानें नेमणूक केली. प्रांतात सुव्यवस्था राखण्याचें व न्याय मनसुब्याचें काम त्याच्याकडें देण्यांत आलें. कंपनीस वसूल गोळा करण्याचा आधिकार जरी मिळाला होता तरी तिनें या कामाची प्रत्यक्ष जबाबदारी आपल्या शिरावर न घेतां ती दोघां एतद्देशीय अमलदारावर टांकली.

या दोहातीं राज्यकारभारामुळें राज्याची प्रत्यक्ष अशी जबाबदारी कंपनी व नबाब या दुकलीपैकीं कोणावरच राहिली नाहीं यामुळें दोघांच्या कामगाराकडून प्रजेवर जुलुम होऊं लागला. एक हातीं सत्तेच्या अभावीं असेंच व्हावयाचें! त्याच-प्रमाणें बंगाल्यांत घडून आलें.

इंग्रजांनीं ज्या नेटिव्ह कामगाराकडें वसुलाचें काम सोंपलें होतें त्यांनीं दरवर्षीं इंग्रजास एक ठरीव रकम वसूल म्हणून द्यावी असें ठरलें होतें. त्यामुळें वसूल कोणच्या रीतीनें गोळा केला जातो याकडें इंग्रजांनीं मूळापासूनच दुर्लक्ष्य केलें. रकम पदरांत पडण्याशीं त्यांनीं गांठ ठेविली. प्रथम यापासून कांहींच त्रास झाला नाहीं. परंतु पुढें वसूल गोळा करणारे अमलदार तत्प्रीत्यर्थ फाजील पैसा खर्चूं लागल्यामुळें कंपनीच्या उत्पन्नास चट्टा बसूं लागला. म्हणून कंपनीनें वसुलाची रकम कसोशीनें घेण्यास सुरुवात केली. त्यामुळें गराब लोकांच्या हालाची कमान फारच ऊंच चढली. हें कामगार लोक वसुलाच्या रकमेची भरपाई करण्या-करितां अधिक पैसा मिळावा म्हणून गरीब रयतेवर जुलूम करूं लागल्यामुळें रयते-च्या हालांची परमावधी झाली. त्यांत १७६९-७२ या सालांत बंगाल्यात मोठा दुष्काळ पडला व त्यांत प्लेगाची भर पडल्यामुळें प्रजेच्या हालास पारावारच राहिला नाहीं. लोक अन्नान्न करून मेले. कित्येक प्लेगास बळी पडले. यामुळें कंपनीच्या उत्पन्नास चांगलीच चाट बसली व १७७० च्या सुमारास कंपनीचें दिवाळें वाजण्या-पर्यंत पाळी आली. १७६९ त नेटिव कामगार वसूल कोणच्या रीतीनें गोळा करितात हें पाहण्याकरितां इंग्रज सुपरवायझर्स नेमण्यांत आले. त्यांना नेमण्याचा उद्देश हा कीं जर कोठें जुलूम होत आहे असें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें तर त्यांनीं तो थांबवावा. परंतु सुपरवायझर्स नेमूनही कांहीं फायदा झाला नाहीं.

वसुलाचें काम बिनबोभाट होणें कंपनीच्या फायद्याच्या दृष्टीनें अवश्य होतें. पण अनेक प्रयत्न करूनहि वसूल नीट तऱ्हेनें गोळा होईना. ह्या स्थितीचें सूक्ष्म अवलोकन करून तिचें निवारण करण्याकरितां डायरेक्टरांनीं वारन हेस्टिंग नांवाच्या एका हुशार इंग्रजास वसुलाच्या कामावर नेमून सर्व जबाबदारी त्याच्या अंगावर टांकली. यामुळें प्रजाजनावर होणारा जुलूम अल्पांशानें टळला परंतु न्यायदानाचा जो उघड उघड सौदा होत असे त्यांस कांहींच आळा बसला नाहीं. कारण अंतर्व्यवस्थेचें सर्व काम अजूनपर्यंत मुर्शिदाबाद येथें जीव धरून राहिलेल्या नबाबाकडेंच राहिलें होतें. वसुलाच्या कामावर स्वतंत्र माणूस नेमल्यानें राज्यपद्धतीस अगाऊ धोक्याची इशारत मिळाली व पुढें रेग्युलेटिंग अक्ट पास झाल्यावर तिची समाप्ती झाली.

१७ **कंपनीच्या कारभारांत पार्लमेंटचा शिरकाव**--दुहेरी राज्य पद्धतीनें उत्पन्न झालेल्या परिस्थितीमुळें कंपनीवर अनर्थ ओढवला. कंपनीच्या नोकरांना त्यावेळीं फारच तुटपुंजा पगार मिळत असे. परंतु त्यांना खाजगी व्यापार करून पैसा मिळविण्याची मुभा होती. त्यांनीं या सुटीचा बेकायदेशीर-पणें फायदा घेतला व ते गबर झाले. हे नोकर जेव्हां विलायतेस सधन होऊन परत जात तेव्हां स्वगृहीं मोठ्या डामडौलानें रहात. ते तेथील बड्या नबाबां-च्याही वरताण करीत एवढें सांगितलें असतां त्यांच्या दिमाखाची वाचकांस सहज कल्पना येईल. ह्मणूनच इंग्लंडातील लोक ' हिंदी नबाब ' या उपाधीनं त्यांना संबोधित. व्यापारांत कंपनीस हि असाच फायदा मिळत असावा असा इंग्लंडांतील लोकांनीं तर्क बांधला व कंपनीनें या तर्कास बळकटी येईल असेंच धोरण शेवटपर्यंत ठेवल्यामुळें ह्या तर्क दुणावला. बंगाल, बिहार व ओरिसा या तीन प्रांतांची दिवाणी सनद मिळतांच कंपनीच्या तोंडास पाणी सुटलें. दर-म्यान क्लाइव्हनें हि " सर्व खर्च भागून कंपनीस दीड पासून पावणेदोन कोट रुपयेपर्यंत सालाचा फायदा होईल " असा आपला अभिप्राय विलायतेस कळ-विल्यामुळें डायरेक्टरांचा लोभ अनिवार झाला व त्यांच्या शेअरचा भाव चढून तो शेंकडा दोनशेंसदुसष्ट झाला. कंपनी आपल्या भागीदारांस पूर्वी दरसाल

शेंकडा सहा टक्के पावेतों फायदा देत असे, तो शेंकडा पंध्रा करावा असा डायरेक्टरांनीं ठराव पास केला. यावेळीं इंग्रजी खाजिन्याची स्थिति फार हलाकीची झाली होती. सरकारास कर्ज पुष्कळ झालें होतें. अशा स्थितींत कंपनीची भरभराट लोकांच्या डोळ्यांत येऊन त्यांनीं सरकारी कर्जाचा कंपनीवर बोजा टाकावा अशी हांकाटी चालविली. पार्लमेंटलाहि त्यांचें मत पसंत पडून हिंदुस्थानच्या संपत्तीनें इंग्लंडचें दुर्भिक्ष्य नाहींसें करण्याचा त्यानें निश्चय केला. आजवर पार्लमेंटनें कंपनीकडून कमीतकमी बेचाळीस लक्ष पौंड कर्ज काढलें होतें. व यापुढेंहि पार्लमेंटनें तोच क्रम सुरू ठेविला असता. परंतु या सुमारास लोकांनीं वरील हाकाटी केल्यामुळें पार्लमेंटनेंहि वाहत्या गंगेंत हात धुवून घ्यावयास कमी केलें नाहीं. कंपनीस हिंदुस्थानांत व्यापार करूं देणाच्या नुसत्या परवानगीबद्दल कंपनीकडून दरसाल चारलाख पौंड घेण्याचें पार्लमेंटनें ठरविलें. त्याशिवाय फायद्याबद्दल इतर रकमा लाटल्या त्या निराळ्याच. रयतेवर अन्याजुलुमादिकांचा वरवंटा फिरवून कंपनी या पैशाची भरपाई करी. तेव्हां अप्रत्यक्षपणें पापाच्या प्राप्तीचा वाटा सहजच पार्लमेंटकडे जातो. १७०० सालापर्यंत कंपनीनें या रकमेची कशी तरी भरपाई केली. परंतु यापुढील दोन वर्षांत बंगाल्यांत लागोपाठ दुष्काळ पडत गेल्यामुळें वसूल कांहींच आला नाहीं. त्यांत कंपनीचा खर्चहि यासुमारास कल्पनातींत वाढल्यामुळें व व्यापारांतहि ठोकर बसल्यामुळें जमाखर्चाची तोंडमिळवणी कंपनीस करतां येईना. त्यामुळें कंपनी डबघाईस येऊन तिनें पार्लमेंटकडे वार्षिक खंडणीची आपणास सूट मिळावी व उलट पार्लमेंटनें आपणास कर्ज द्यावें असा अर्ज केला. कंपनीचा असा अर्ज पाहून पार्लमेंटचें डोळें उघडले. कंपनीचे असें दिवाळें निघालेलें पाहून त्यांस अचंबा वाटला व कांहीं तरी उपाय योजना केल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें वाटून पार्लमेंटनें कंपनीच्या कारभाराची छाननी करण्याकरितां दोन कमेट्या नेमल्या. या चौकशी कमेट्यांनीं कंपनीच्या विरुद्ध रिपोर्ट केल्यामुळें लोकांस एक विलक्षण कोडें पडलें. यावेळीं मुख्यप्रधानाच्या जागेवर लॉर्ड नॉर्थ होता व तो कंपनीला सर्वस्वी प्रतिकूल होता. त्यानें असा ठराव पास केला कीं, कंपनीनें हिंदुस्थानांत जी कमाई केली आहे व करील, तिजवर इंग्रज-

सरकारची मालकी आहे. अशातऱ्हेनें पार्लमेंटनें कंपनीवर आपला अमल बसविला. पार्लमेंटचा व हिंदुस्थानचा संबंध येथून येत गेला आहे. राज्यघटनेच्या दृष्टीनें याचें महत्व फार आहे. करितां इतर गोष्टींचा विचार न करितां हिंदुस्थान व पार्लमेंट यांचा संबंध कसा येत गेला याचाच विचार करूं.

१८ **रेग्युलेटिंग ॲक्ट**-वरील आशयाचा ठराव करूनच पार्लमेंट स्वस्थ बसलें नाहीं. कंपनीस कर्जबाजारीपणांतून मुक्त करण्याकरितांहि तिनें उपाय योजना केली. भागीदारांना जास्त नफा देण्याची मनाई करून व कंपनीच्या हिंदुस्थानांतील कारभाराची चौकशी करून तिच्या कारभाराचें नियमन करण्याकरितां पार्लमेंटनें स. १७७३ त रेग्युलेटिंग ॲक्ट पास केला. या ॲक्टानें कंपनीच्या घटनेंत बरेंच फेरफार झालें. नवीन ॲक्टान्वयें कलकत्त्यास एक प्रेसिडेंट व बारा सभासदांचें पूर्वी जें एक मंडळ होतें तें जाऊन त्याच्या जागीं एक गव्हर्नर व चार सभासदांचें सल्लागार मंडळ नेमण्यांत आलें. ह्या पांच जणांची नेमणूक प्रथम पार्लमेंटनें केलीं व ती पांच वर्षें चालावी असें ठरविण्यांत आलें. पुढील नेमणुकी करण्याचा हक्क डायरेक्टरांस देण्यात येऊन त्यांनीं प्रधान मंडळाच्या संमतीनें या नेमणुका कराव्या. ह्या पांची जणांनीं " बहुमतानें बंगाल इलाख्याचा दिवाणी, मुलकी, लष्करी वगैरे सर्व कारभार पहावा. युद्ध व तह करण्यासंबंधानें मद्रास व मुंबई या दोन इलाख्यावर कलकत्याची हुकमत चालावी, आणि त्याबद्दल कलकत्त्याच्या गव्हर्नरास 'गव्हर्नर जनरल' असा किताब असावा. गव्हर्नर जनरलास स्वतंत्र मत नसून, समान मतें झाल्यास त्यास विशेष मत देण्याचा अधिकार होता. त्या सर्वांनीं कोर्ट ऑफ डायरेक्टर्सचे हुकम पाळावे. चोवीस डायरेक्टर्स पूर्वी दरसाल निवडत असत, ती व्यवस्था बदलून, दरसाल सहा असामी नवीन निवडावें आणि त्यांची मुदत चार वर्षें चालावी. पूर्वी कंपनीच्या जनरल सभेंत ५०० पाउंड भांडवलाच्या इसमास एक मत असे, एकाहून ज्यास्त मतें कोणास नसत, त्या ऐवजीं एक हजार पाउंडाच्या भांडवलास एक मत, तीन हजारांस दोन मतें, सहा हजारांस तीन मतें आणि दहा हजारांस चार मतें असावीं. चार पेक्षां ज्यास्त मतें कोणासही असूं नयेत. हिशेबी व राज्यकारभारासंबंधी हरएक

बाबतींचे पत्रव्यवहार हिंदुस्थानांतून विलायतेंत येऊन पोंचल्यानंतर चौदा दिवसांच्या आंत प्रधानमंडळांस दाखवावे. पूर्वी कंपनीच्या ताब्यांत कलकत्त्यास एक मेयरचें कोर्ट असें, त्याऐवजीं न्यायाचें एक सुप्रीम कोर्ट स्थापून त्यांत एक मुख्य न्यायाधीश आणि तीन मदत न्यायाधीश विलायतेंतून नेमलेलें असावें; आणि त्यांचा अखत्यार, दिवाणी फौजदारी वगैरे हरएक बाबतींत, सर्व लोकांवर चालावा, मात्र गवर्नर-जनरल व काउन्सिलचे सभासद यांजवर चालूं नये कंपनीच्या राज्यांतील लष्कराच्या व इतर कोणत्याही नोकरांनीं एतद्देशीयांपासून कोणत्याही प्रकारचें बक्षीस घेऊं नये, किंवा खासगी व्यापार करूं नये. अशीं रेग्युलेटिंग ॲक्टाची मुख्य कलमें होतीं." ( ब्रि. रि. पृ. ७७० प्र. आ. )

**१९ ॲक्टांतील दोष व त्यामुळें उद्भवणाऱ्या अडचणी**-या कायद्याप्रमाणें बंगालचा गव्हर्नर वॉरन हेस्टिंग याची गव्हर्नर जनरलच्या जागीं नेमणूक करण्यांत आली. जनरल क्लेव्हरिंग, जॉन्सन व फिलिप फ्रॅन्सिस हे तीन सभासद विलायतेंतून पाठविण्यांत आले; व कंपनीच्या नोकरींतील मि. बार्वेल यास चवथा सभासद ह्मणून नेमण्यांत येऊन सरन्यायाधिशाची जागा सर एलिझा इम्पे यांस देण्यांत आली.

वॉरन हेस्टिंगनें गव्हर्नर जनरलच्या पदाचा उपभोग दहा वर्षांहून अधिक घेतला. पांच वर्षांकरितांच त्यांस प्रथम या जागेवर नेमण्यांत आलें होतें; परंतु पार्लमेंटनें त्याच्या नोकरीची मुदत वाढविल्यानें १७८५ सालापर्यंत त्यानें ग. जनरलचें काम केलें. या अवधींत राज्यकारभारव्यवस्थेंत त्यानें बरेंच उपयुक्त फेरफार केले. परंतु रेग्युलेटिंग ॲक्टाच्या सदोषतेनें तो जास्त कांहीं करूं शकला नाहीं. त्यास जें सल्लागार मंडळ देण्यांत आलें होतें, तें त्याच्या मार्गांत एक सारखें आडवें येई व त्यामुळें कौन्सिलाशीं त्याचा खटका उडे. राज्यकारभाराचें काम कौन्सिलच्या बहुमतानें चालावयाचें होतें. पण कौन्सिलांतील चार सभासदांपैकीं तीन सभासद नेहमींच वॉरनच्या विरुद्ध जात व ते त्याची बिलकुल डाळ शिजूं देत नसत. या चार सभासदांपैकीं बारवेल कंपनीचा जुना नोकर होता व त्यांस हिंदुस्थानच्या परिस्थितीचें चांगलें ज्ञान होतें. परंतु बाकीचे तिघे येथें नवीन आल्या-

मुळें त्यांना हिंदुस्थानाविषयीं जी काय ऐकीव माहिती होती तेवढीच. यामुळें हरएकप्रसंगीं ते वॉरनच्या विरुद्ध जात. आपली डाळ या तिघापुढें शिजत नाहीं असें पाहून वॉरननें कांहीं शर्तीवर आपल्या एजंटामार्फत राजीनामा दिला. व तो डायरेक्टरांनीं मंजूरहि केला. डायरेक्टर या जागेसाठीं नव्या इसमाच्या शोधांत असताना १७७६ क्लेव्हरिंग वारला. तो वारल्यानंतर आतां आपणास स्वतःच्या मर्जीनुरूप वागता येईल असें पाहून वॉरननें आपला राजीनमा परत घेऊन कंपनीच्या कारभाराचें गाडें पुढें दामटण्यास सुरुवात केली.

जी गोष्ट वरील कौन्सिलाची तीच सुप्रीम कोर्टाची होती असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. कारण या कोर्टांत व कौन्सिलांत वरील प्रकारचेंच भांडण होतें. कौन्सिल श्रेष्ठ कीं सुप्रीम कोर्ट श्रेष्ठ हाच कायतो वादाचा मुद्दा. परंतु या मुद्यावर खूप रणें माजून पार्लमेंटकडे हें प्रकरण निकालार्थ गेलें. १७८१ सालीं पार्लमेंटनें एक कायदा पास करून वादाचें मूळच काढून टाकिलें.

**२० कंपनीच्या कारभाराची चौकशी व पिटचें इंडिया बिल–** रेग्युलेटिंग अॅक्टाचा जन्म होण्यास काय कारणें घडलीं हें वर सांगितलें आहेच. राज्यकारभाराची विस्कटलेली घडी या अॅक्टानें नीट बसेल अशी प्रधान मंडळाची अपेक्षा होती. परंतु ती फोल ठरून थोड्या वर्षांतच वेताळ पूर्वस्थळावर आल्यामुळें पार्लमेंटास कंपनीच्या कारभारांत पुनः लक्ष घालावें लागलें. हेस्टिंगच्या दहावर्षांच्या कारकीर्दीत सर्वत्र अंदाधुंदी पसरल्यामुळें व विशेषतः नंदकुमार, चेतासिंग व अयोध्येच्या बेगमाशीं हेस्टिंगनें अन्यायाचें वर्तन केल्यामुळें त्याच्याविरुद्ध सर्वत्र गवगवा झाला. तसेंच हैदर व मराठ्याशीं झालेल्या युद्धांत कंपनीनें बराच पैसा खर्च केल्यामुळें तिची सांपत्तिक स्थितीहि असमाधान कारक होती. ती सुधारण्याकरितां कंपनीनें पार्लमेंटकडे पुनश्च कर्जाची मागणी केली. कंपनीस मागणीप्रमाणें कर्ज मिळालें पण त्यायोगे लोकांच्या गैरसमजांत विशेष भर पडून कंपनी विरुद्ध जास्तच कागाळ्या येऊं लागल्या. या कागाळ्यामुळें कंपनीच्या कारभारांतील काळें बेरें उजेडांत आणण्याकरितां पार्लमेंटनें दोन कमेट्या नेमल्या. यापैकीं एका कमेटीचा बर्क हा सभासद होता. त्यानें व इत-

रांनीं कंपनींच्या कारभारावर आपल्या रिपोर्टांत खूप ताशेरा झाडला व त्याचें पर्यवसान हेस्टिंग व इम्पे या दुकलीस परत बोलावण्यांत झालें. परंतु कोर्ट ऑफ प्रोप्रायटर्सनें हा ठराव धाब्यावर बसवून त्यांना तसेंच कामावर ठेवलें. यावेळीं याविरुद्ध कोणीच बोललें नाहीं. परंतु पुढें लॉर्ड नॉर्थ व फॉक्सचें संयुक्त मंत्रिमंडळ अधिकारारूड झाल्याबरोबर हा प्रश्न त्यांनीं हातीं घेतला. फॉक्सनें कंपनीच्या कारभाराचें नियंत्रण करण्याकरितां १७८३ सालीं पार्लमेंटपुढें एक बिल मांडलें. तें इतिहासांत **फॉक्सचें ईस्ट इंडिया बिल** म्हणून प्रसिद्ध आहे. या बिलानें कंपनीचे राजकीय बाबतींतील अधिकारच समूळ काढून घेण्याची फॉक्सची ईच्छा होती. कंपनीनें फक्त व्यापार करावा; व आक्रडेमोडूं शेटजींच्या ऐवजीं चांगल्या कर्त्या सवरत्या मंडळींनीं राज्यकारभार पहावा, असें त्याचें म्हणणें होतें. परंतु कॉमन्स सभेंत जरी त्याचें बिल प्रचंड बहुमतानें पास झालें तरी लॉर्डांनीं तें फेटाळून लावलें. यामुळें तिसऱ्या जॉर्ज राजेसाहेबांनीं या संयुक्त मंत्रिमंडळास अर्धचंद्र देऊन धाकट्या पिटला प्रधान नेमलें.

पिटला प्रधानकीचीं वस्त्रें मिळालीं तेव्हां तो अवघा २४ वर्षांचा होता व पार्लमेंटांत त्याचें बहुमत नव्हतें. परंतु यामुळें न डगमगतां त्यानें सर्व प्रसंगांस धैर्यानें व शांतपणानें तोंड दिलें. थोड्याच अवधींत पार्लमेंटची नवी निवडणुक झाली व तींत पिटचा पक्ष प्रबळ झाला. आपल्या बाजूचें मताधिक्य होतांच पिटनें आपलें बिल पार्लमेंटपुढें मंजुरीकरतां मांडलें व ते पास झालें. त्यांत खालील कलमें होतीं:—

(१) पार्लमेंटनें ६ सभासदांचें एक मंडळ नेमावें व त्याच्यामार्फत लढाया व तह व्हावेत. त्यांत इंग्लंडचा मुख्य खजानजी ( Chancellor of the Exchequer ), एक उपमंत्री व चार प्रीव्ही कौन्सिलर्स असावेत. बोर्डानें कंपनीच्या कारभारावर सक्त नजर ठेवून डायरेक्टरांच्या हुकुमांत त्यांस कांहीं वैगुण्य दिसून आल्यास, तें काढून टाकावें व विशेष जरुरीच्या प्रसंगीं डायरेक्टरांना न कळवितां परस्पर हुकूम हिंदुस्थानांत पाठवावेत. (२) बोर्ड ऑफ कंट्रोलचे ( नियामक मंडळ ) गुप्त खलितें हिंदुस्थानांत पाठविण्याकरितां डायरेक्टरांपैकीं

तिघांची एक सीक्रेट कमेटी नेमावी; व या कमेटीनें इतर डायरेक्टरांना न कळवितां तें हिंदुस्थानांत पाठवावेत. (३) गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलांत चाराऐवजीं तीनच सभासद असावेत व त्यांपैकीं मुख्य सेनापति हा एक असावा. तसेंच मुंबई व मद्रास येथील गव्हर्नरासहि प्रत्येकी तीन सभासदांचे एक सल्लागार मंडळ देण्यांत यावें. गव्हर्नर जनरल व गव्हर्नर्स यास एक जादा मत देण्याचा अधिकार असावा. मुंबई व मद्रास येथील गव्हर्नरावर ग० जनरलनें देखरेख करावी. (५) मुलूख जिंकणें व राज्यविस्तार करणें, या बद्दलच्या योजना इंग्लंडच्या अब्रूस, राजधोरणास व इच्छेस प्रतिकूल असल्यामुळें पार्लमेंट त्यांचा पूर्ण निषेध करते आणि हिंदुस्थानांत यापुढें ज्यास्त मुलूख जिंकू नये अशी सक्त ताकीद सर्वांस देत आहे.

या कायद्यानें कंपनी सरकारच्या कारभारांत महत्वाचे फेरफार करण्यांत आले. विलायत सरकारनें नेमलेल्या एका मंडळाची ती कायमची अंकित झाली. आणि तिच्या हातांत फक्त हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याची मालकी राहिली. या बिलांत व फॉक्सच्या बिलांत विशेषसें अंतर नाहीं. परंतु त्यावेळीं त्याचें बिल जें नापास झालें तें केवळ पक्षद्वेषामुळेंच होय. राजकीय बाबतींतील कंपनीचे सर्वच अधिकार फॉक्सला काढून घ्यावयाचे होते. कंपनीस व्यापार क्षेत्रांत स्वैरसंचार करूं देण्यास पिट्प्रमाणेंच त्याचीहि तयारी होती. परंतु त्याचें मत पार्लमेंटला त्यावेळीं न पटल्यामुळें त्याच्या बिलाची विपरीत संभावना झाली. त्यावेळीं ज्यांनीं त्यांस विरोध केला, त्यांत पिट हा अग्रेसर होता. परंतु स्वतःच्या हातीं अधिकारसूत्रें येतांच पिटनें पगडी फिरवून आपल्या बिलानें तितक्याच जोरानें कंपनीवर कोरडा ओढला. मात्र त्यानें कंपनीची सत्ता अजिबाद संपुष्टांत न आणतां तिलाहि थोडेसें अधिकार दिले. यावेळेपासून द्विदल राज्यपद्धतीस सुरवात झाली व तिचा शेवट स. १८५८ त कंपनीबरोबर झाला. " हिंदुस्थानचा राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालावा म्हणून अशा रीतीनें नवीन उपक्रम करण्यांत आला, आणि न्यायी व मजबूत सुराज्यस्थापनेसाठीं योग्य व त्याच बेताचे एका राज्यकारभारवाहक यंत्राची उभारणीहि झाली. "*

* न. चिं. केळकर कृत हिं. स्व. कै.

**२१ कंपनी व पार्लमेंट**—या वेळेपासून तों हिंदुस्थानच्या राज्याची सूत्रें इंग्लंडच्या हातीं जाई पर्यंत ब्रिटिश पार्लमेंटनें पुष्कळच कायदे पास केले व त्या योगें हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत बरेंच महत्वाचें फरक घडून आले. यापैकीं १८३३ व १८५८ सालच्या दोन कायद्यांचेच राज्यघटनेच्या दृष्टीनें महत्व फार असून बाकीचें फरक अगदीं हलक्या प्रकारचें आहेत.

सन १७८६ च्या कायद्यानें गव्हर्नर जनरलास आणीबाणीच्या वेळीं त्याच्या सल्लागार मंडळाच्या बहुमताविरुद्ध वागण्याची परवानगी देण्यांत येऊन मुख्य सेनापतीची कामें गव्हर्नर जनरलास पहाण्याची व दोन्हीं जागा एकाचे हातीं ठेवण्याची मुभा मिळाली. हा फरक लॉर्ड कॉर्नवालीसचे सांगण्यावरून करण्यांत आला. या परवानगीचें अभावीं हेस्टिंगचा पदोपदीं कसा हिरमोड होत असे हें त्यास पूर्णपणें माहीत होतें, व त्यामुळें असा फरक करीत असल्यासच मीं ग० जनरलचें पद स्वीकारतो असा त्यानें हट्ट धरिला व तो पुरविण्यांतहि आला.

दर वीसवर्षांनीं कंपनीच्या सनदेची मुदत वाढवावयाची असें रेग्युलेटिंग ॲक्टानें ठरलें होतें. सदर ॲक्ट पास होऊन वीस वर्षांनीं कंपनीस जेंव्हा नवीन सनद करून देण्याची वेळ आली तेव्हां पार्लमेंटांत मोठा कडाक्याचा वादविवाद झाला. यावेळीं विल्यम पिट हा मुख्य मंत्री होता व त्याचा परमप्रिय मित्र डंडास हा बोर्ड ऑफ कंट्रोलचा अध्यक्ष होता. त्यानें १७९३ सालीं कंपनीस आणखी वीस वर्षांपुरती नवीन सनद करून द्यावी असा पार्लमेंटपुढें ठराव मांडला व तो विशेष विरोध न होतां पास झाला. या ॲक्टानें राज्ययंत्रांत विशेषसे फेरफार न होतां पूर्वीच्या सर्व ॲक्टांची उजळणी करण्यांत येऊन ते पुनः पास करण्यांत आले. गव्हर्नर जनरलच्या सल्लागार मंडळांतील तीन सभासदांपैकीं सेनापति हा एक असावा असें पूर्वी ठरविण्यात आलें होतें. परंतु तें कलम या ॲक्टानें काढून टाकण्यांत आलें व बोर्ड ऑफ कंट्रोलचा सर्व खर्च हिंदुस्थानांतील खजिन्यांतून करावा असें ठरलें. याशिवाय महत्वाचें फेरफार या कायद्यानें झालें नाहींत.

स. १८०७ च्या ॲक्टान्वयें मद्रास व मुंबई येथील कौन्सिलांना कायदे करण्याचा अधिकार देण्यांत आला. या कौंसिलांनीं पास केलेल्या कायद्यास सुप्रीम कोर्टाची मंजुरी मिळाल्यासच त्यांना कायद्याचें स्वरुप यावें असें ठरलें.

स. १७९३ त कंपनीस दिलेल्या सनदेची मुदत १८१३ सालीं भरल्यामुळें कंपनीस नवीन सनद करून देण्याची वेळ आली. या सुमारास कंपनीनें अर्धा अधिक हिंदुस्थान पादाक्रांत केला होता. त्यामुळें इंग्लंडांतील राज्यकर्त्यांच्या मनांत तिच्या हिंदुस्थानांतील मुलुखाच्या मालकीबद्दल हेवा उत्पन्न झाला व कसेंहि करून हा मुलूख आपण हस्तगत करावा असें त्यांना वाटूं लागलें. कंपनीच्या कारभारांत नेहमीं गोंधळ उडत असल्यामुळें पार्लमेंटला एवढेंच निमित्त कंपनीच्या कारभारांत हात घालण्यास पुरत असें. या वेळींहि अशीच स्थिति झाली होती. वेलस्लीच्या चढाईच्या धोरणामुळें कंपनीचा खजिना अगदीं रिता झाला होता. यामुळें हॉऊस ऑफ कॉमन्सला कंपनीच्या कारभाराची व देण्याघेण्याची एक कमेटी नेमून चौकशी करावी लागली. या कमेटीनें आपल्या रिपोर्टांत अशी शिफारस केली कीं सर्व व्यापाऱ्यांना हिंदुस्थानशीं व्यापार करण्याची मोकळीक ठेवावी. युरोपांतील या वेळच्या राजकीय परिस्थितीचा विचार करतां कमेटीची ही शिफारस योग्यच होती. अमेरिकेचें व इंग्लंडचें पूर्वींच बिनसलें होतें. त्यामुळें ब्रिटिश मालास तेथें गिऱ्हाईक मिळणें शक्य नव्हतें. युरोपांत तर नेपोलियननें ब्रिटिश मालावर पूर्ण बहिष्कार घालण्यास सर्व राष्ट्रांस फर्माविलें होतें. त्यावेळीं सर्व युरोपभर त्याचा दरारा असल्यामुळें ब्रिटिश मालास आश्रय देण्यास सर्व लोक कचरत असत. तेव्हां तेथेंहि गिऱ्हाईक मिळण्याची पंचाईतच होती. राहता राहिला हिंदुस्थान. इंग्रजी मालाचें स्वागत करण्यास हिंदुस्थानचे ऐदी लोक एका पायावर तयार होते. परंतु हिंदुस्थानचा सर्व व्यापार एकट्या कंपनीच्याच हातीं असल्यामुळें इतर व्यापाऱ्यांचा माल जागच्या जागींच पडून राहिला. त्यामुळें त्यांनीं कंपनीच्या या हक्काविरुद्ध ओरड करून पार्लमेंटला कंपनीचा हा हक्क काढून घेण्यास भाग पाडलें. कंपनीनें आपल्या कडून असें न होऊं देण्याची शिकस्त केली. परंतु दुर्दैवानें तिचे सर्व श्रम व्यर्थ होऊन हिंदुस्थानचे सर्व दरवाजे युरोपियन व्यापाऱ्याकरितां उघडण्यांत आले व हिंदुस्थानांतील संपत्तीस ओहटी लागण्यास सुरवात झाली. अशा रीतीनें जरी कंपनीचा येथें व्यापार करण्याचा हक्क बुडविण्यांत आला तरी चीनचा चहा व अफूचा व्यापार तिच्या हातींच राहिला. हिंदु-

स्थानच्या फायद्याच्या दृष्टीनें या ॲक्टानें कांहींच केलें नाहीं. नाहीं म्हणावयास हिंदुस्थानांतील लोकांस शिक्षण देण्यास सुरवात करावी असें एक कलम या कायद्यांत होतें.

या पुढील वीस वर्षांत पार्लमेंटनें जे कायदे पास केले त्यांचें राज्यघटनेच्या दृष्टीनें मुळींच महत्व नाहीं. १८३३ सालांत कंपनीची मुदत संपत होती. व तिला या सालीं पुढील वीस वर्षांकरितां नवीन सनद करून देणें इष्ट होतें. या सालीं इंग्लंडांतील उदार मतवादी पक्ष अधिकारारूढ होता. त्यामुळें या सालीं पास झालेल्या चार्टर ॲक्टांत उदार मतवादित्वाची बरीचशी झांक मारत असलेली दृष्टीस पडते. या कायद्यानें कंपनीस आणखी वीस वर्षें हिन्दुस्थानचा उपभोग घेण्याची परवानगी मिळाली. परंतु हिन्दुस्थानावर असलेला तिचा मालकी हक्क नष्ट होऊन हिन्दुस्थानरूपी नारळ इंग्लंडच्या राजाची ठेव म्हणून तिच्या हातीं देण्यांत आला. या अक्टानें जे फेरफार झाले ते असे—( १ ) 'कंपनीच्या व्यापारिकामाची समाप्ति झाली; परंतु अजून हिच्या हातीं राज्यकारभार व राजकीय सत्ता शिल्लक असून हिन्दुस्थानांतील नोकर नेमण्याचा तिचा आवडता हक्क कायमच राहिला.'–( २ ) ग० जनरलची पदवी बदलण्यांत येऊन ती ग० जनरल ऑफ इंडिया अशी करण्यांत आली. कंपनीच्या ताब्यांतील सर्व मुलकी व फौजखातीं त्याच्या हवालीं करण्यांत येऊन, त्याच्या कौन्सिलांत चवथ्या सभासदाची न्यायमंत्री म्हणून नेमणूक करण्यांत आली. कायदे पास करण्याच्या वेळेपुरताच त्यानें कौन्सिलच्या कामांत भाग घ्यावा असा निर्बंध घालण्यांत आला.–( ३ ) गव्हर्नरांची कौन्सिलें मोडून व त्यांचे कायदा करण्याचे अधिकार काढून ते ग० ज० ह्यास देण्यांत आले. व ( ४ ) धर्म, जन्मस्थान, कुल, वर्ण या अगर ह्यापैकीं एकाद्या कारणानें हिंदुस्थानांतील इसमास अथवा बादशहाच्या कायदेशीर प्रजाजनास कंपनीच्या राज्यांत नोकरी मिळण्यास बाध येऊं नये असें या कायद्याच्या ८७ व्या कलमानें जाहीर करण्यांत आलें. आजपर्यंतचा अनुभव पहातां यासद्धेतूच्या उलट वर्तन करण्याची अधिकारी वर्गाची प्रवृत्ति दिसून येते.

" स. १८५३ सालीं कंपनीच्या सनदेची वीसवर्षें भरलीं. त्यावेळीं ती फिरून

चालू करण्याच्या वेळीं नवीन ज्यास्त सुधारणा करण्यासाठीं त्या संधीचा फायदा घेण्यांत आला. स. १८५३ च्या सनदेनें बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांच्या हातीं असलेला नोकर नेमणुकीचा अधिकार काढून घेण्यांत आला. व सिव्हिल सर्विसहि खुल्या व चढा ओढीच्या परीक्षेनें सर्वांस मोकळी झाली. ह्या नवीन कायद्यानें कंपनीच्या हातीं सत्ता किती दिवस राहणार हें कांहीं ठरलें नाहीं; परंतु हिंदुस्थानांतील मुलुखाचें राज्य राजाची ठेव म्हणून चालवावें आणि या बाबतींत पार्लमेंटचा दुसरा हुकूम होईपर्यंत हें असेंच चालू राहावें अशी या कायद्याची योजना होती. डायरेक्टर्सची संख्या २४ होती तो १८ करण्यांत आली व त्यापैकीं सहा राजानें नेमावेत असें ठरलें. राज्यघटनेच्या दृष्टीनें महत्वाचा असा एकच फरक या कायद्यानें झाला. पूर्वी न्यायमंत्र्यास कौन्सिलच्या हरएक कामांत भाग घेतां येत नसे. या कायद्यानें त्यास ग. ज. च्या कौन्सिलाचा एक साधारण सभासद गणण्यांत येऊन त्यांस इतर सभासदांस असलेलें सर्व अधिकार मिळाले. यावेळेपर्यंत एकच कौन्सिल कायदे करण्याचें व राज्यकारभाराचे काम पहात असे. परंतु यावेळेपासून या कौन्सिलाची कायदे करण्याकरितां वाढ करण्यांत येऊन त्यांत खालील प्रमाणें सभासद असावेंत असें ठरलें. ( अ ) गव्हर्नर जनरल. ( आ ) मुख्य सेनापति. ( इ ) ग. ज. च्या कार्यकारी मंडळाचे चार सभासद. ( ई ) बंगालचे सरन्यायाधीश. ( उ ) साधारण न्यायाधीश ( ऊ ) चारी प्रांताचे चार पगारी प्रतिनिधी. अशा रीतीनें हे नवें कायदे मंडळ अस्तित्वांत आलें व त्यांतील सर्व कारभार पडद्याआड न चालवितां उघड चालवावा व सभेचें कामकाजाचा रिपोर्ट सरकारनें छापून काढावा असें ठरलें."

**२२ पार्लमेंट व हिंदुस्थान**—स. १८५३ च्या सनदेंत कंपनीची मुदत अनिश्चित ठेवण्यांत आली होती. त्यामुळें कंपनीचे दिवस आतां भरत आले आहेत अशींच सर्वांनीं अटकळ केली व ती खरीहि ठरली. १८५७ सालच्या बंडाचा उपशम झाल्यावर १८५८ सालीं इंग्लंडच्या राजानें म्हणजे पार्लमेंटनें हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची धुरा आपल्या शिरावर घेतली. बोर्ड ऑफ डायरेक्टर्स व बोर्ड आफ कंट्रोल ही दोन्ही मंडळें जाऊन त्यांचें सर्व अधिकार नवीन नेमलेल्या स्टेट

सेक्रेटरीस देण्यांत येऊन त्यांस मदतीकरितां एक कौन्सिल देण्यांत आलें. अशा रीतीनें कंपनीच्या कारभाराचा शेंवट झाला. यापुढें पार्लमेंटनें हिंदुस्थानविषयक बरेंच कायदे पास केलें आहेत. स. १८६१ सालीं पास झालेल्या कौन्सिल ॲक्टान्वयें, १८३३ च्या कायद्यानें प्रांतिक कायदेमंडळाचें काढून घेतलेले हक्क त्यांस परत देण्यांत आले व यामुळें त्यांस आपल्यापुरते कायदे पास करण्याची परवानगी मिळाली. या शिवाय गव्हर्नर जनरलास नवीन प्रांतांची रचना करणें व त्यास कायदे कौन्सिल देणें हे अधिकार मिळून मुंबई मद्रास व कलकत्ता येथें हायकोर्टांची स्थापना करण्यांत आली. १८९२ च्या इंडियन कौन्सिल ॲक्टानें कायदे मंडळाचा विस्तार करण्यांत येऊन निवडणुकीचें तत्व स्पष्ट रीतीनें मान्य करण्यांत आलें व कायदे मंडळाचा अधिकारहि थोडासा वाढविण्यांत आला. १९११ सालीं बादशहांनीं हिंदुस्थानास भेट दिली. व दिल्ली येथें मोठा दरबार झाला. त्यावेळीं हिंदुस्थानची राजधानी दिल्ली येथें आणण्यांत आली. १९१२ सालीं एक कायदा पास झाला त्यायोगें चीफ कमिशनरच्या ताब्यांत असलेल्या प्रांतांत कायदेमंडळें देण्याचा अधिकार गव्हर्नर जनरल यास मिळाला. यापुढें राज्य-घटनेच्या दृष्टीनें क्वचित् किरकोळ फेरफार झालें आहेत. विशेष महत्वाचे फेरफार पुढें १९१९ च्या सुधारणा कायद्यानें घडून आले.

**२३ नवयुगास प्रारंभ**–गेल्या सप्तवार्षिक महायुद्धांत हिन्दुस्थाननें इंग्लंडास पैशाची व माणसांची कल्पनेबाहेर मदत केली. फ्रान्स, फ्लॅन्डर्स, इजिप्त, मेसापोटेमिया व पूर्व आफ्रिका येथील रणांगणावर हिन्दी सैन्यानें आपल्या रक्ताचे सडे घातले व त्याबद्दल त्यांनीं बहुमानाची **सुवर्ण–रौप्य पदकेंहि** मिळविली. आजवर England's difficulty is India's opportunity असें प्रतिपादिलें जाई. परंतु या खेपेस नामी संधी आली असतांना देखील हिन्दुस्थाननें इंग्लंडच्या उदारबुद्धीवर विश्वास टाकून त्यांस कल्पनातीत सहाय्य केलें. आजवर हिन्दी लोकांस सैन्यांत बहुमानाच्या जागा मिळत नसत. परंतु यावेळें-पासून या जागा हिन्दी लोकांस देण्यास सुरवात झाली. आजवरील धोरणांत अशा रीतीनें फरक होण्यास हिन्दुस्थानचें वरील औदार्यच विशेष कारणी-

भूत झालें. इंग्लंडच्या रक्षणाकरितां हिन्दी वीरांनीं आपलें पवित्र व निर-पराधी रक्त सांडलें हें वर सांगितलें आहेच. या रक्ताची भरपाई इंग्लंड कशी काय करणार याकडे सर्व जगाचें व विशेषतः हिन्दुस्थानचें लक्ष लागलें असल्यास नवल नाहीं. हिन्दी लोकांची फारादिवसांची स्वराज्याची मागणी पुरवून या रक्ताचा मोबदला द्यावयाचा कीं, कृतघ्न होऊन नुसत्या सुवर्ण—रौप्यपदकावर व व्हिक्टोरिया क्रासेसवरच भागवावयाचें असा प्रश्न ब्रिटिश प्रधानमंडळास पडला. इंग्लंडची ही परीक्षेची वेळ होती. कारण इंग्लंडच्या हिन्दुस्थानविषयक भावी धोरणावरच हिन्दी साम्राज्याचा डोलारा अवलंबून होता आजवर जशी गोड आश्वासनें देऊन हिन्दी लोकांस इंग्लंडला झुलत ठेवतां आलें तसें आतांहि आलें असतें. परंतु एकीकडे जननिंदेची भीति व दुसरीकडून हिन्दी लोक नायकांची टोंचणी अशा दुहेरी कैचींत इंग्लंडचें मंत्रीमंडळ सांपडल्यामुळें नुसत्या शाब्दिक आश्वासनांनीं यावेळीं भागण्यासारखें नव्हतें. विचार, उच्चार व आचार यांत एक रूपताच ठेवणें यावेळीं श्रेयस्कर होतें. इंग्लंडला याची पूर्ण जाणीव असल्यामुळें आपण पेचांत अडकलों आहोंत असें त्यास वाटत होतें. महायुद्धाचा जर यावेळीं शेंवट झाला असता तर इंग्लंडास या पेचांतून सहज सुटतां आलें असतें. पण लढाईचा शेंवट होण्याची अजून चिन्हेंहि दिसत नव्हतीं. त्यामुळें इंग्लंडचा नाइलाज होऊन त्यास आपलें चढाईचें धोरण टाकावें लागलें. स. १९१६ च्या लखनौस भरलेल्या कांग्रेसनें एकमतानें स्वराज्याचा ठराव पास करून त्यासाठीं इंग्लंडच्या मागें निकड लावली. यामुळें ब्रिटिश पार्लमेंटास आपलें आजपर्यंत धरलेलें मौनव्रत सोडावें लागून भारतमंत्र्याच्या तोंडांतून त्यानें आपलें पुढील धोरण वदविलें. तें असें:—

"हिंदुस्थानच्या राज्यकारभाराच्या प्रत्येक शाखेंत, हिंदी लोकांची सहकारिता वाढविणें व हिंदुस्थानला ब्रिटिश साम्राज्याचा एक परिपूर्ण घटक बनविण्याच्या दृष्टीनें क्रमाक्रमानें त्या देशाला जी जबाबदार राज्यपद्धति द्यावयाची, तिची पूर्व तयारी म्हणून स्वयंशासन पद्धतीची पायरी पायरीनें वाढ करणें हें ब्रिटिश साम्राज्यसरकारचें धोरण असून तें हिंदुस्थान सरकारास पूर्णपणें मान्य आहे व

या बाबतींत शक्य तितका लवकर कांहीं तरी खराखुरा उपक्रम करण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. हा उपक्रम सुरू करण्यापूर्वी, येथील व हिंदुस्थानांतील अधिकारी वर्गाचा परस्पर खुला विचारविनिमय होणें अत्यंत महत्वाचें आहे. म्हणून मी, व्हॉइसरॉयसाहेबांचें आमंत्रण स्वीकारून हिंदुस्थानांत जावें, तेथें व्हॉइसरॉय व हिंदुस्थानसरकार यांच्याशीं या गोष्टींबद्दल खल करावा, स्थानिक सरकारांचीं मतें व प्रातिनिधिक मंडळाच्या सूचनांचा विचार व्हॉइसरॉयसाहेबांसमवेत करावा असें साम्राज्य सरकारनें सम्राटांच्या अनुज्ञेनें ठरविलें आहे. या ठिकाणीं मला हा खुलासा करणें जरूर वाटतें कीं, हीं सुधारणा पायरीपायरीनेंच घडून येणारी आहे. ब्रिटिश सरकार व हिंदुस्थान सरकार यांच्यावर हिंदी लोकांच्या कल्याणाची व उन्नतीची जबाबदारी असल्यामुळें, हे सुधारणेचे हप्ते कसे ठरवावयाचे व ते केव्हां द्यावयाचे याचा निर्णय त्यांच्यावर सोपविणें इष्ट आहे. स्वराज्याचा हक्क दिल्यास कारभाराची जबाबदारी ज्यांच्यावर पडेल त्यांची सरकाराशीं सहकारिता आणि त्यांच्या जबाबदारीच्या जाणीवेवरील सरकारचा विश्वास या दोहोंवर ही हप्तेबंदी अवलंबून राहील या सूचना यथाकाल पार्लमेंटपुढें मांडल्या जाऊन त्यांजवर हिंदी लोकांना जाहीरपणें चर्चा करण्यास मुबलक संधी दिली जाईल.”

**२४. मांट-फर्ड रिपोर्टः**—कॉमन्स सभेंत जाहीर केल्याप्रमाणें वर्ष अखेरीस भारतमंत्री मि. मॉंटेग्यु येथील परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठीं व अधिकारीवर्गाशीं विचार विनिमय करण्यासाठीं येथें आले. सुमारें सहा महिन्याच्या अवकाशांत येथील परिस्थितीचें सूक्ष्मपणें अवलोकन करून माजी व्हाइसरॉय लॉर्ड चेल्म्सफर्ड यांच्या सहायानें त्यांनीं एक रिपोर्ट प्रसिद्ध केला. या रिपोर्टांत संपादकद्वयानें काढलेलीं अनुमानें अगदीं बिनचूक असून लोकपक्षाच्या म्हणण्याशीं तीं बऱ्याच अंशांनीं जुळत आहेत. हिंदी राज्यव्यवस्थेचें निर्भीडपणानें आणि मार्मिकतेनें त्यांनीं पर्यालोचन केलें असून हिंदी लोकांच्या आकांक्षाबद्दल उदात्त भावनेनें व थोर मनानें विचार केला आहे. रिपोर्टाच्या आरंभींच त्यांनीं पार्लमेंटच्या धोरणाचें उत्तम स्वरूपाविष्करण केलें असून, पुढें हिंदुस्थानचें राज्य पार्लमेंटच्या संपूर्णपणें हुकमतीखालीं आल्यानंतर लोकांच्या

हक्कांची वाढ कसकशीं होत गेलीं याचें विवेचन मुद्देसूदपणें केलें आहे. राणी सरकारच्या अमलापासून ज्या शिक्षणादी सुधारणा अस्तित्वांत आल्या, त्यांचा फायदा घेऊन देशांत सुशिक्षित वर्ग कसा उत्पन्न झाला व त्यानें देशांतील पुढारीपणा स्वीकारून आपल्या देशबांधवांची उन्नति करण्याचें व्रत कसें अंगिकारलें, याचेंहि विवेचन त्यांत आहे. लोकांची हुकमत राज्यकारभारावर न चालल्यामुळें असंतोष वाढत आहे व दिवसेंदिवस त्यांस तीव्रतर स्वरूप येत असून त्याचें निरसन करण्यास स्वराज्य देणें हाच एक उपाय आहे असा स्पष्ट इशारा पार्लमेंटला देण्यास त्यांनीं कमीं केलें नाहीं. सारांश हिंदी राजकारणाची या रिपोर्टांतील मीमांसा निर्विकार मनानें, समतोल बुद्धीनें व विशेषतः शुद्ध भावनेनें केली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या रिपोर्टांतील अत्यंत महत्वाचा भाग म्हटला म्हणजे त्यांत सुचविलेल्या सुधारणा होत. या सुधारणांचे विषयाच्या दृष्टीनें तीन भाग करता येतील:— **[ १ ] ब्रिटिश हिंदुस्थानांतील शासनसंस्थांच्या सुधारणेबद्दल.** यांत चार संस्थांचा अंतर्भाव होतो. (अ) सेक्रेटरी ऑफ स्टेट व त्याचे कौन्सिल ( आ ) हिंदुस्थान सरकार. ( इ ) प्रांतिक सरकार, (ई) स्थानिक स्वराज्याच्या सर्व संस्था. [ २ ] **नेटिव संस्थानांच्या सुधारणेबद्दल.** [ ३ ] **हिंदी नोकरांस जबाबदारीच्या जागा अधिक देण्याबद्दल.** रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यावर त्यांत सुचविलेल्या सुधारणा पाहून विचारी पुरुषामध्यें मोठी खळबळ उडाली व त्यांच्या विचारांस एक निराळेंच वळण लागलें. आजवर प्रचलित राज्यपद्धतींत अवश्य ते फेरफार घडवून आणण्याकडेच सर्वांचा कल होता. राष्ट्रीय सभा व मॉस्लेम लीग यांनीं जी एक संयुक्त योजना तयार केली होती, तिची उभारणी देखील वरील कलानुसारच झाली होती. या संयुक्त योजनेबद्दल मॉंटफर्ड रिपोर्टांत पुष्कळ ऊहापोह केला आहे. परंतु ती योजना मांट-फर्ड साहेबांना मुळींच पसंत पडली नाहीं. राष्ट्रीय योजनेंमध्यें लोकनियुक्त कायदेकौन्सिलाचा तावा कार्यकारी मंडळावर ( Executive Council ) असावा अशी मागणी केली आहे. कार्यकारी मंडळांत निम्मे सरकारनें निवडलेले व निमे लोकांनीं निवडलेले सभासद

असावेत अशीं दुसरी मागणी राष्ट्रीय धुरिणांनीं केली आहे. कौंसिलच्या इच्छे-प्रमाणें सरकारी मंत्री वागले नाहींत तर त्यांस काढून टाकण्याचा अधिकार कौन्सिलाकडे नाहीं. निवडलेले मंत्री कौन्सिलच्या इच्छेप्रमाणें न वागतील तर त्यांस फार झालें तर कौन्सिल फिरून निवडून देणार नाहीं. अशा स्थितींत कौन्सिलची हुकमत कार्यकारी मंडळावर चालणार नाहीं, राज्यकारभारांत यामुळें बखेडा मात्र उत्पन्न होईल. राज्यकारभारांत होणाऱ्या या घोटाळ्याचें निरसन करण्याची कोणतीहि उपाय योजना राष्ट्रीय सभेच्या योजनेंत नमूद करण्यांत आलेली नाहीं, हा त्या योजनेंत मोठा दोष आहे, असें संपादकांनीं आपल्या अभि-प्रायांत म्हटलें आहे. या शिवाय राष्ट्रीय सभेच्या योजनेवर दुसरा असा एक आक्षेप घेण्यांत आला कीं, जबाबदार राज्यपद्धतीची कल्पना राष्ट्रीय योजनेंमध्यें, बिलकूल नाहीं. सुधारलेल्या राष्ट्रांतील लोकसत्तात्मक सर्व राज्यव्यवस्थेंत हीच पद्धत आजकाल सर्वमान्य झाली आहे व हिंदुस्थानास हीच पद्धत लागूं करण्याचा साम्राज्यसरकारचा हेतू आहे, असें ता. २० आगस्टच्या जाहीरनाम्यांत म्हटलें आहे. त्यामुळें "जबाबदार राज्यपद्धति" या शब्दसमुच्चयावर संपादकांनीं विशेष भर दिला असून तिच्याशीं विसंगत न होईल अशी एक योजना त्यांनीं तयार केली आहे. 'जबाबदार राज्यपद्धति' या शब्दसमुच्चयावरच त्यांची योजना उभारण्यांत आली असल्यामुळें, या शब्दसमुच्चयाचा प्रथम खरा अर्थ कळणें अत्यावश्यक आहे. याचा अर्थ, लोकप्रतिनिधींच्या हुकमतीखालीं असणारें प्रधानमंडळ, असा आहे. लोकांच्या इच्छेप्रमाणें न वागणाऱ्या प्रधानमंडळास काढून टाकण्याचा अधिकार ज्या लोकनियुक्त संस्थास असतो, त्यांच्या कारभारासच जबाबदारराज्यपद्धति ( Responsible Government ) असें नांव पाश्चिमात्य देशांत देण्यांत आलें आहे. या व्याख्येनुसार आपणास स्वराज्य मिळणार आहे. व त्याचा पहिला हप्ता म्हणून मॉंटेग्यु व चेल्म्सफर्ड यांनीं आपली योजना तयार केली आहे.

**२५ मांटेग्युंची नवीन योजना:**—आगस्ट २० च्या जाहीरनाम्यांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, येथें स्वयंशासनपद्धतीची वाढ पायरी पायरीनेंच करण्यांत येईल. यावरून इंग्लंडच्या दृष्टीनें हिंदुस्थान संपूर्ण स्वराज्यास अजून लायक

झाला नाहीं असें उघडच दिसतें. ह्या ध्वन्यर्थाची मांट-फर्ड साहेबांनीं वाच्यता केली आहे. ते ह्मणतात कीं, हिंदुस्थानास संपूर्ण स्वराज्य देण्याची अजून जरी वेळ आली नसली, तरी त्या स्वराज्याचा अल्पस्वल्प भाग आतांच दिला पाहिजे. आजपर्यंत चालत आलेलें राज्यशकट नुसतें पुढें ढकललें ह्मणजे सुधारणा झाली असें नाहीं; तर लोकांच्या वाढत्या आकांक्षा तृप्त करण्याकरितां हल्लींची अरेरावी राज्यकारभारपद्धति साफ बदलली पाहिजे. प्रथम प्रांतिक सरकारच्या कारभारांत जबाबदार राज्यपद्धतीचें तत्व लावून प्रयोगादाखल सुरवात करावी, प्रांतिक सरकारच्या हातांतील खात्यांचे दोन भाग करून त्यास राखीव (Reserved) व सोपीव (Transferred) खातीं अशीं नांवें द्यावींत. राखीव अगर सरकारी खातीं गव्हर्नर व एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर यांच्या ताब्यांत द्यावींत व सोपीव अगर संप्रदत्त खातीं कायदेकौन्सिलांतील सभासदांपैकीं प्रमुख अशा पुढाऱ्यांच्या हवाली करावीत, व त्यांस प्रधान ( Minister ) ही संज्ञा द्यावी. ह्या प्रधानांची नेमणूक करण्याचा अधिकार गव्हर्नराकडेंच ठेवण्यांत आला आहे. कोणची खातीं लोकप्रतिनिधींच्या हातीं सोपवावींत ह्या विषयींचा खुलासाहि संपादकद्वयानें केला आहे. ज्या गोष्टींत हिंदी लोकांनीं प्रगति केली आहे व आनुवांशिक संस्कारामुळें ज्याबद्दल त्यांच्या मनांत आदर वसत आहे, अशी लोककल्याणाची कामेंच त्यांच्या हातांत सोंपवावीत असें त्यांनीं ह्मटलें आहे. खात्यांची वाटणी करतांना प्रत्येक प्रांताची परिस्थिति, शिक्षणाची वाढ उद्योगधंद्यांतील पुढारीपणा, कर्तबगारीचा अनुभव, राज्यकारभाराचा परिचय, महत्वाकांक्षा व दर्जा इत्यादि गोष्टींचा विचार करून, फाळणीच्यावेळीं सर्व प्रांतास एकच माप न लावितां राजकीय उन्नतीच्या मार्गांत पुढारीपणा मिळविलेल्या प्रांतांना जास्त हक्क देण्यांत येतील असें त्यांनीं त्यांत ह्मटलें आहे. प्रांतिक सरकारवरील वरिष्ठसरकारचा ताबा जरा ढिला करण्यांत यावा व सोपीव खात्यापुरता पार्लमेंटनें आपला हक्क सोडावा अशी त्यांनीं शिफारस केली आहे. वरिष्ठसरकार पार्लमेंटांस जबाबदार असल्यामुळें हिंदुस्थान सरकारची सत्ता पूर्वींप्रमाणेंच अनियंत्रित व अबाधित ठेवण्यांत आली आहे. याचा अर्थ ब्रिटिश राज्यसत्ता हिंदु-

स्थानांत अबाधितपणें चालावयाची आहे व या हेतूकरितांच हिंदुस्थानसरकारास इतकी अमर्याद सत्ता पाहिजे, असा केल्यास त्यांत वावगें होईल काय ?

**२६ स. १९१९ चा सुधारणेचा कायदा**—सन १९१८–१९ त लॉर्ड साउथबरो यांच्या अध्यक्षतेखालीं दोन कमेट्यांनीं हिंदुस्थानांत तपासाचें काम करण्यास सुरवात केली. कोणची खातीं लोकप्रतिनिधीस द्यावीत व कोणतीं सरकारनें राखून ठेवावींत या प्रश्नाचें विचार करण्याचें काम एका कमेटीस देण्यांत आलें व मतदानाचा हक्क कोणास द्यावा व कोंठवर त्याचा विस्तार करावा या प्रश्नाचा हल करण्याचें काम दुसरीस देण्यांत आलें. या कमेट्यांचीं कामें आटोपल्यावर त्यावेळचे हिंदी स्टेट सेक्रेटरी मि. मॉंटेग्यु यांनीं हाऊस ऑफ कॉमन्सपुढें आपलें सुधारणा कायद्याचें बिल मांडलें. हिंदुस्थानास स्वराज्य दिलें पाहिजे, असें त्यावेळीं कांहीं नतद्रष्ट अँग्लोइंडियनाखेरीज सर्वत्रांस वाटत असल्यामुळें कोणच्याच पक्षानें बिलास विरोध केला नाहीं. त्यामुळें तें एका सिलेक्ट कमेटीकडे विचाराकरितां सोपविण्यांत आलें. या कमेटींत हॉउस ऑफ कॉमन्स व हॉउस ऑफ लॉर्डस् या दोन्ही सभांतील सभासद नेमण्यांत येऊन लार्ड सेलबोर्न यांस कमेटीचे अध्यक्ष नेमण्यांत आलें. कमेटीपुढें साक्षी देण्याकरतां हिंदुस्थानांतून कांग्रेस व इतर संस्थातर्फे पुढाऱ्यांची शिष्टमंडळें गेलीं होतीं. कमेटीनें या सर्वांच्या व त्यांच्याबरोबर अधिकाऱ्यांच्या साक्षी घेतल्या. त्यानंतर कमेटीनें सर्व साक्षींची छाननी करून आपला रिपोर्ट पार्लमेंटास सादर केला. ता. २० आगस्ट रोजीं जाहीर केलेल्या धोरणाचा बिलांत अर्थ केला होता, तो बरोबर असल्याबद्दल कमेटीनें त्यांस सर्टिफिकिट दिलें. व कांहीं बाबतींत बिलांत सुधारणा कराव्या अशी तिनें शिफारस केली. त्यानंतर रिपोर्टावर वादविवाद होऊन स. १९१९ च्या शेंवटीं शेंवटीं, हॉउस ऑफ कामन्समध्यें बिलाचें तिसरें वाचन पास होऊन कांहीं दिवसांनीं हॉउस ऑफ लॉर्डसूनेंहि त्यास आपली संमति दिली.

**२७ बादशाही जाहीरनामा**—या बिलास आपली संमति देतांना बादशहांनीं त्यांस पुष्टीप्रद असा एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यावरून येथील लोकाविषयीं त्यांना किती कळकळ व सहानुभूती वाटत आहे हें दिसून येतें.

# प्रकरण दुसरें.

## भारतमंत्री.

"The Cabinet through a Secretary of State have an unexpungable right, subjeet to law, to dictate policy, to initiate instructions, to reject proposals, to have the last word on every question that arises, and the first word on every question that in their view ought to arise." *Lord Morley.*

**२८ कोर्ट ऑफ डायरेक्टर्स व बोर्ड ऑफ कंट्रोल.**-स. १७८४ सालच्या पिट्च्या ॲक्टान्वयें कंपनी सरकारच्या हिंदुस्थानांतील मिळकतींवर देखरेख करण्याचें काम कंपनीच्या वतीनें कोर्ट ऑफ डायरेक्टर्स व इंग्लंडच्या राजाच्या वतीनें बोर्ड ऑफ कंट्रोल यांच्या हातीं कसें गेलें हें आपण बघितलें आहेच. या डायरेक्टरांची निवडणूक कंपनीचे भागीदारलोक करीत; परंतु बोर्डाच्या सभासदांची निवडणूक न होतां त्यांस राजेसाहेब नेमीत. सुरवातीस या बोर्डांत सहा सभासद असावेत असें ठरविण्यांत आले होतें. परंतु पुढें परिस्थित्यनुरूप ही संख्या कमी कमी होत गेली व पुढें १८४१ सालच्या सुमारांस तर बोर्डाचा अध्यक्ष एकटाच उरून कंपनीच्या हिंदुस्थानांतील राज्यकारभाराचें नियमन करण्याचें काम त्याच्या एकट्याच्याचकडें राहिलें. कंपनीच्या हातीं जरी हिंदुस्थानविषयक सर्व सत्ता होती तरी हिंदुस्थानच्या चित्रपटावर बाहुली खेळविण्याचें खरें काम या प्रेसिडेंटाच्याच हातीं होतें. पुढें तर कंपनीची बहुतेक सत्ता जाऊन तीस जोहुकुमी माणसाचा पार्ट करण्याची वेळ आली. कंपनीच्या डायरेक्टरांना हिंदुस्थानांत स्वतंत्र रीतीनें खलिता पाठवितां येत नसे, परंतु या बोर्डाच्या हातांत मात्र तशी सत्ता देण्यांत आली होती व त्यांस जरूर भासतील ते खलिते डायरेक्टरामार्फत हिंदुस्थानांत पाठविण्याचा अधिकार होता.

**२९. भारतमंत्री**---इ. स. १८५९ सालच्या बंडामुळें कंपनी सरकारचें राज्य संपुष्टांत येऊन पुढील वर्षात तिची आयुर्मर्यादाच संपली. १८५८ सालीं ब्रिटिश पार्लमेंटनें एक कायदा पास करून हिंदुस्थानचें राज्य राणीसरकारास बहाल केलें. त्या कायद्यानें पूर्वीचें बोर्ड ऑफ कंट्रोल जाऊन बोर्डाच्या अध्यक्षाच्या जागीं एक सेक्रेटरी नेमण्यांत येऊन बोर्डाचे व डायरेक्टरांचे सर्व अधिकार त्यांस देण्यांत आले. यासच भारतमंत्री ( Indian State Secretary ) असें म्हणतात. भारतमंत्री हा इंग्लंडांतील कॅबिनेटचा ( मंत्रीमंडळ ) सभासद असतो. निरनिराळ्या वसाहतीसाठीं जसा कलोनियल सेक्रेटरी नेमण्यांत येतो, त्याप्रमाणें हिंदुस्थानाकरतां याची नेमणूक झाली असून वसाहतमंत्र्यास जे हक्क आहेत ते सर्व त्यास देण्यांत आले आहेत. एकाप्रकारें यांस त्यांच्यापेक्षां थोडेसें जास्त अधिकार आहेत; पण कांहीं बाबतींत वसाहतमंत्र्यांना जें स्वातंत्र्य आहे तें यांस नाहीं. "कलोनियल सेक्रेटरी हा वसाहतीवर हुकमत चालविणारा अधिकारी नसून ब्रिटिशसरकार व वसाहतसरकार या मधील व्यवहार चालविण्यासाठीं ब्रिटिशसरकारनें पगार देऊन ठेविलेला एजंट असतो. परंतु भारतमंत्री हा कलोनियल सेक्रेटरीप्रमाणें निवळ एजंट नसून हिंदुस्थानच्या कारभाराचीं सर्व सूत्रें त्याच्या हातांत असतात" ( स्ब० कै० ) भारतमंत्री कॅबिनेटचा मेंबर आहे हें सांगितल्यावर त्याची नेमणूक इंग्लंडच्या मुख्य प्रधानामार्फत होते, हें सांगावयास नकोच. हिंदुस्थानविषयक एक स्वतंत्र खातें भारतमंत्र्याच्या हवालीं करण्यांत आलें असून या खात्याची सर्व जबाबदारी त्याच्या अंगावर टाकण्यांत आली आहे. या खात्यास ( इंडिया ऑफिस ) असें म्हणतात. मदतीकरतां यास दोन दुय्यम सेक्रेटरी देण्यांत आले आहेत. या दोघांपैकीं एक कायम असतो. इंग्लंडांत कान्सरव्हेटिव व लिबरल असें जे दोन पक्ष आहेत, त्यापैकीं ज्यापक्षाचें पार्लमेंटांत बहुमत असून मंत्रीमंडळ बनलें असेल, त्यापक्षांकडून दुसऱ्या अंडर सेक्रेटरीची नेमणूक केली जाते. अर्थात् हाहि पण त्याच पक्षांतील असतो. या जागेची ठराविक अशी मुदत नाहीं. मंत्रीमंडळाचें अस्तित्व संपल्या बरोबर यासहि त्या जागेस मुकावें लागतें. भारतमंत्री हा जर लोकसभेचा

सभासद असेल तर पार्लमेंटरी अंडर सेक्रेटरी हा उमरावी सभेचा सभासद असतो. असे दोन सेक्रेटरी नेमण्याचें कारण इतकेंच कीं, दोन्ही सभांच्या (Houses) बैठकी जर एकाच दिवशीं असल्या व त्यावेळीं हिंदुस्थान विषयक माहिती अगर प्रश्न कोणी विचारले तर त्यांची उत्तरें देण्यास अडचण पडूं नये.

३० इंडिया कौन्सिल.—या दोन सेक्रेटरींच्या शिवाय भारत मंत्र्यास एक सल्लागार मंडळ देण्यांत आलें आहे. त्यांत ८ ते १२ सभासद असतात. सभासदांची मुदत पांच वर्षे ठरविण्यांत आली असून त्यांची नेमणूक भारत-मंत्रीच करतो. एकाद्या सभासदाची मुदत संपून त्यांस पुनः नेमावयाचें असल्यास भारतमंत्र्यास पार्लमेंटपुढें त्यास पुनः नेमण्याची कारणें सादर करावी लागतात व तिची संमति मिळाल्यास त्या सभासदास पुनः नेमण्यांत येतें. कौन्सिलांतील अर्धे सभासद हिंदुस्थानसरकारच्या पदरचें नोकर असले पाहिजेत; त्यांची नोकरी निदान १० वर्षेपर्यंत झाली असली पाहिजे व याजागीं नेमणूक होण्याच्या वेळीं हिंदुस्थान सोडून त्यांस पांच वर्षांहून अधिक वर्षे न झालीं पाहिजेत; सभासदांच्या लायकी विषयीं अशा प्रकारचें नियम करण्यात आले आहेत. या शिवाय हिंदुस्थानांतील घडामोडींचें सूक्ष्म ज्ञान त्यांना असावें लागतें. कोणाहि पार्लमेंटच्या सभासदास या मंडळाचें सभासद होता येत नाहीं व म्हणूनच लॉर्ड मोर्ले साहेबांना लॉर्ड क्रोमर यास या कौन्सिलचा सभासद नेमतां आलें नाहीं. इतके दिवस या कौन्सिलांत इंडियन सीव्हिल सर्विस मधील गोऱ्या अधिकाऱ्यांसच नेमण्यांत येत असें. परंतु १९०८ सालीं लॉर्ड मोर्ले या उदारमतवादी पुरुषाच्या हातीं राज्यसूत्रें येतांच या जागीं हिंदी मनुष्यास नेमण्यास त्यांनीं सुरवात केली. तेव्हां पासून ही संख्या हळूं हळूं वाढत असून सध्यां ती ३ वर आली आहे.

३१ काम करण्याची रीत—स्टेट सेक्रेटरीच्या नेतृत्वाखालीं इंडिया कौन्सिल हिंदुस्थानचा राज्यकारभार अप्रत्यक्षपणें चालवितें. राज्यकारभाराच्या सोयींसाठीं व एकट्या भारतमंत्र्यावर कामांचा सर्व बोजा पडूं नये म्हणून, कौन्सिलच्या सभासदांच्या निरनिराळ्या पोटकमेट्या नेमण्यांत येतात व दरेक कमेटीस खालील खात्यांपैकीं एक एक स्वतंत्र खातें तोडून देण्यांत येते. ती म्हणजे नगदी

हिशेबी, लष्कर, राजकीय, मुलकी, पब्लिकवर्क्स, न्यायखातें, भांडार वगैरें होत. या प्रत्येक खात्याचा मुख्य त्या त्या खात्यापुरता स्वतंत्र असतो. खात्यांत एकादी भानगड उपस्थित झाल्यास भानगडीच्या प्रश्नावर तो आपला अभिप्राय नमूद करितो व ते कागद स्टेटसेक्रेटरीकडें विचाराकरितां पाठविलें जातात. स्टेट-सेक्रेटरीस जर त्याचें म्हणणें पटलें तर प्रश्नच आटोपला. मग कागदावर सेक्रेटरीची फायनल सही होऊन प्रकरण निकालावर निघतें. स्टेटसेक्रेटरीस जर त्याचा अभिप्राय पटला नाहीं व विशेष महत्वाचा तो प्रश्न नसल्यास, त्यावर स्वतः हुकूम देऊन तो तें प्रकरण निकालांत काढतो. पण प्रश्न तसाच भानगडीचा असल्यास व कौन्सि-लचें मत त्याकामीं घेणें अत्यावश्यक वाटल्यास तो कौन्सिलची बैठक बोलावतो व सर्व सभासदापुढें तो प्रश्न मग मांडला जातो. कौन्सिलच्या बैठकी महिन्यां-तून चारदां होत असत. आतां महिन्यांतून ती एकवेळच होते. या कौन्सिलचा भारतमंत्रीच अध्यक्ष असतो. व तो सभासदांतून एक उपाध्यक्ष नेमितो. ( उपाध्यक्षांस वाटेल त्यावेळीं स्टेट सेक्रेटरीस कमी करतां येते. ) बैठकीच्या-वेळीं स्टेट सेक्रेटरी जर गैरहजर असेल तर हा अध्यक्षाचें काम करितो. हाही जर गैरहजर असेल तर हजर असलेल्या सभासदांतून बहुमतानें नेमिला जाईल तो सभासद अध्यक्ष होतो व कौन्सिलचें काम सुरूं होतें. कौन्सिलच्या सभास-पैकीं बैठकीस निदान पांच सभासद हजर असले पाहिजेत, पांचापेक्षा कमी अस-ल्यास कोरमच्या अभावीं कौन्सिलाची बैठक तहकूब ठेवावी लागते. स्टेट सेक्रेटरी-च्या गैरहजेरींत कौन्सिलांत जे ठराव पास होतील त्यास स्टेट सेक्रेटरीची अनु-मती मिळणें अत्यावश्यक आहे. स्टेट सेक्रेटरी जर लंडनच्या बाहेर गेला असेल व त्याच्या गैर हजेरींत एकादें महत्वाचें प्रकरण उपस्थित झाल्यास, प्रकरण विषयक कागदावर एकाद्या दुसऱ्या स्टेट सेक्रेटरीस सही करतां येते. कौन्सिलपुढें जे प्रश्न अगर ठराव चर्चेस घ्यावयाचे, ते कौन्सिलच्या बैठकीच्या आठ दिवस आधीं टेवलावर ठेवलें पाहिजेत. हा नियम पोट कमेट्यांनीं पास केलेल्या ठरा-वास लागूं नाहीं.

**३२ इंडिया कौन्सिलाची अनुपयुक्तता**—स्टेट सेक्रेटरी मंत्रीमंडळाचा एक सभासद असतो. इंग्लंडांतील मंत्री मंडळ तेथील पक्षांच्या उत्कर्षापकर्षावरो-

वर हेलकावें खात असल्यामुळें भारतमंत्र्यासहि स्वपक्षानुयायांबरोबर हेलकावें खावे लागतात. त्यामुळें व मंत्रिमंडळाच्या सभासदांचा सर्व जन्म तेथेंच जात असल्यामुळें हिंदुस्थानाची प्रत्यक्ष अशी माहिती त्यांना नसते. ह्मणूनच स्टेट सेक्रेटरी साहेबांना योग्य सल्ला देण्याकरितां एक सल्लागार मंडळ देण्यांत आले आहे. प्रथम प्रथम या कौन्सिलाकडे भारतमंत्र्यास सल्ला देण्याचेंच काम होतें. परंतु अलीकडे या कौन्सिलच्या हातांत बरीच सत्ता देण्यांत आली आहे. पैशाच्या बाबतींतच फक्त कौन्सिलांतील बहुमतापुढें भारतमंत्र्यास आपली मान वाकवावी लागते हे खरें; परंतु प्रत्येक कारभारांत पैशाचा संबंध येत असल्यामुळें हरवेळीं भारतमंत्र्याला त्यांच्यापुढें नांगी टाकावी लागते. यामुळें हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत बराच घोंटाळा उडून जातो. पैशाचें बाबतींत भारतमंत्र्यास या कौन्सिलनें अडविलें नाहीं असें जरी गृहीत धरलें, तरी हिंदुस्थानाची कांहीं माहिती भारतमंत्र्यास नसते व त्यामुळें तो या कौन्सिलच्या सल्याशिवाय स्वतःहोऊन कोणतीहि गोष्ट करूं शकत नाहीं. हिंदुस्थान विषयक जी खोडसाळ माहिती या कौन्सिलच्या सभासदांकडून त्याच्या कानावर घातली जाते. तिचा प्रत्यक्ष नाहीं तर अप्रत्यक्ष परिणाम त्याच्या मनावर होऊन तो कितीहि उदारमतवादी असला तरीहि त्याचे उदारमतवादीत्व या जागीं येतांच गळून पडते. या सल्लागारमंडळांतील सभासद निदान दहा वर्षें तरी हिंदुस्थानांत राहिला पाहिजे असा नियम आहे. या नियमास अनुसरून १९०८ सालापावेतों फक्त ॲंग्लो इंडियन लोकांसच या कौन्सिलचे सभासद नेमीत असत. त्यांच्या हातून हिंदी राजकारणाची सूत्रें अर्थातच विपरीत दिशेनें हालत व त्यामुळें हिंदुस्थानचें अपरंपार नुकसान होत असें. या प्रकाराविरुद्ध हिंदी लोकांनीं राष्ट्रीयसभेच्या जन्मापासून ओरड सुरू करून सरकारावर टिकास्त्र उपसलें होतें. एकावेळीं तर सरकारच्या दृष्टीनें या टीकेची परमावधी होऊन, ती करणारास सरकारनें राजद्रोही ठरविण्यापर्यंत पाळी आणली होती. स. १८९४ त मद्रास कांग्रेसमध्यें या कौन्सिलचें उच्चाटन झालें पाहिजे असें प्रतिपादन करतांना अर्डले नॉर्टन साहेबांनीं पुढील विनोदप्रचुर, परंतु बरेंच जहाल पणाचे भासणारे उद्गार काढल्याचें प्रसिद्ध आहे: "Let it be decapitated

and its head decently buried in another continent to that in which lies interred its trunk, lest the two baneful things reunite and the monster be resuscitated" ( त्याचें–इंडियाकौन्सिलचें–डोकें उडविलें पाहिजे; आणि त्याचें शिर व धड हीं निरनिराळ्या खंडांत व्यवस्थित पुरलीं पाहिजेत;नाहीं तर धड शिर एकत्र होऊन हा राक्षस पुनः जिवंत व्हावयाचा ). हे कौन्सिल ह्मणजे एक गुप्त मंडळ आहे; या कौन्सिलांत कसल्या प्रकारची चर्चा होते हें कधीं जनतेला कळविण्यांत येत नाहीं; वादविवादानंतर जे ठराव करण्यांत येतात ते दिवसाच्या प्रकाशांत कधींच येत नाहींत; बाहेर होणाऱ्या टीकेचा परिणाम त्यावर होत नाहीं; ते पार्लमेंटलाहि जबाबदार नाहीं; लोकमताचा त्यास कधींच विटाळ होऊं शकत नाहीं, वगैरे अनेक मुद्दे नॉर्टनसाहेबांनीं आपल्या भाषणांत पुढें आणलें होतें. याचाच अनुवाद हिंदी पुढाऱ्यांनीं अनेकवार केला आहे. राष्ट्रीय सभा व मॉस्लेम लीग या दोन प्रातिनिधिक सभांनीं ( १ ) हें कौन्सिल मोडून टांकावें ( २ ) भारतमंत्र्याचें हिंदुस्थानाशीं नातें कलोनियल सेक्रेटरीच्या नात्या बर हुकूम असावें व (३) भारतमंत्र्याला दोन मदतनीस असावें व त्यापैकीं एक नेहमीं हिंदी असावा, अशा मागण्या केल्या होत्या. सुधारणांच्या कायद्यापूर्वी वरिष्ठ कायदे कौन्सिलच्या १९ सभासदांनीं लॉर्ड चेम्सफर्ड यांस धाडलेल्या आपल्या अर्जांत या मागण्यांचाच अनुवाद केला होता. व खुद्द भारतमंत्री मि. मॉंटेग्यूनींच "एकाद्या फाजील उदार मतवाद्याची भारतमंत्र्याच्या जागीं नेमणूक होऊं नये अशा प्रकारची घटना तयार केली आहे" असें उद्गार काढून या मागण्यास अप्रत्यक्षपणें दुजोरा दिला होता. परंतु त्या मान्य करण्यांत आल्या नाहींत.

**३३. भारतमंत्र्याचे अधिकार.**—हिंदुस्थानविषयक बाबतींत बादशहांना सल्ला देण्याकरितां भारतमंत्र्याची नेमणूक करण्यांत आली आहे असें कागदोपत्रीं म्हणतात. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. बादशहांच्या हातांत काडीचीहि सत्ता नसून खरीखुरी राज्यसूत्रें पार्लमेंटच्या हातीं असतात. यामुळें हिंदुस्थानचें भवितव्य सर्वस्वी पार्लमेंटच्याच हातीं आहे. भारतमंत्र्याची नेमणूक इंग्लंडच्या

मुख्यप्रधानाकडून म्हणजे पर्यायानें पार्लमेंटकडून होतें. पार्लमेंट भारतमंत्र्या-मार्फत हिंदुस्थानच्या राज्यकारभारावर देखरेख ठेवितें व त्यामुळें स्टेटसेक्रेटरी पार्लमेंटला जबाबदार असतो. ही जबाबदारी त्यांस नीट रीतीनें पार पाडतां यावी म्हणून बोर्ड ऑफ कंट्रोलच्या हातीं जी सत्ता पूर्वी होती, तीच सत्ता या सेक्रेटरीस देण्यांत आली आहे. हिंदुस्थानची गंगाजळी याच्याच ताब्यांत असते व तींतील पैसा याच्या परवानगी शिवाय कोणासही खर्च करतां येत नाहीं. हिंदुस्थानांतील गव्हर्नर जनरला पासून तहत लहानसान सर्व अधिकारी याच्या हुकमती खालीं चालत असतात. इंडिया ऑफिसचा व हिंदुस्थानसरकारचा एक सारखा पत्रव्यवहार चालू असतो. स्टेट सेक्रेटरीनें एकादा हुकूम सोडल्यास त्याची अंमलबजावणी हिंदुस्थानसरकारनें केलीच पाहिजे असा निर्बंध घालण्यांत आला आहे. हिंदुस्थानांतून जो पत्रव्यवहार होतो तो याच्या नांवानें होतो. आजवर हिंदी वसुला शिवाय सर्व गोष्टींवर यांस अनियंत्रित अधिकार गाजवितां येत असे व ह्या जे करील ते कारण व बांधील तें तोरण अशी स्थिती होती. हिंदी वसुलाच्या बाबतींत मात्र यांस कौन्सिलचा सल्ला घ्यावा लागत असें. इतर बाब-तींत कौन्सिलचा सल्ला घेण्याचा प्रसंग त्यांस आल्यास तो घेई. परंतु एकमत ज्यास्त देण्याचा अधिकार यास असल्यामुळें कोणचीही गोष्ट स्वतःच्या मनाप्रमाणें त्यांस करता येत असें. १९१९ सुधारणांच्या कायद्यानें याची अनि-यंत्रित सत्ता बरीच कमी करण्यांत आली आहे. हिंदुस्थानास जबाबदार राज्य-पद्धतीचें तत्व लागूं करण्याचें आपलें धोरण असल्याचें इंग्लडनें जाहीर केल्या मुळें व जबाबदार राज्यपद्धतींत लोकमतापुढें अधिकाऱ्यांस मान वाकवावी लागत-असल्यामुळें, पार्लमेंटास स्टेटसेक्रेटरीच्या या अनियंत्रित अधिकारांत छाटाछाट करावी लागली. आजपर्यंत या अनियंत्रित सत्तेच्या जोरावर स्टेटसेक्रेटरींनीं लोक मत, फारकाय हिंदुस्थान सरकारचें मतहि धाब्यावर बसवून कित्येक अहितकारक गोष्टी केल्या आहेत. कापसाच्या जकाती संबंधांत आर्थिक स्वातंत्र्याच्या प्रश्नाचे वेळीं, कांहीं लढायांचे खर्च अन्यायानें हिंदुस्थानावर टाकण्याचे कामीं स्टेट सेक्रेटरी, हिंदुस्थानच्या लोकांच्या इच्छे विरुद्ध व हिंदुस्थानसरकारनें वरचेवर अनेक तक्रारी

केल्या असतां त्यांस न जुमानतां वागलेलें आहेत. परंतु या पुढें असलें अन्याय सहसा होणार नाहींत. सुधारणा कायद्यांत असें स्पष्ट नमूद केलें आहे कीं, हिंदुस्थानशींच संबंध असलेल्या एकाद्या बाबीसंबंधाचे कायदेमंडळाचे व हिंदुस्थानसरकाचे एकमत असेल तर त्या बाबतींत, स्टेट सेक्रेटरीनें ढवळाढवळ करूं नये. कौन्सिलें व सरकार ह्यांच्यांत जेव्हां मतभेद होईल तेंव्हाच त्यानें मध्यें पडून हिंदुस्थानांतील लोकांच्या कल्याणाकडे लक्ष देऊन कायते करावें. या सुधारणेचें महत्व फार मोठें आहे. १९२२ सालीं हिंदुस्थानसरकारनें कायदे कौन्सिलच्या संमतीनें विलायती मालावरील जकातपट्टी वाढविली. त्यावेळीं विलायती व्यापाऱ्यांनीं याविरुद्ध पुष्कळ तक्रारी केल्या व सर्वत्र डेप्युटेशनें पाठविली; परंतु सुधारणा कायद्यांतील वरील कलमामुळें त्यांचें सर्व प्रयत्न निष्फळ होऊन त्यांस स्वस्थ चुरमुरे खात बसावें लागलें. जर हें कलम सुधारणा कायद्यांत नसते तर स्टेट सेक्रेटरीनें एक तर जकात कमी केली असती, अगर हिंदीकापडावरही तितकींच लादली असती. परंतु या कलमामुळें सर्वांचेंच हात दगडाखालीं आंपडल्यामुळें कोणासच कांहीं करतां आलें नाहीं.

**३४ बेफिकीर पार्लमेंट**—हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेवर, पार्लमेंटचें वतीनें व पार्लमेंटशीं जबाबदार राहून, स्टेट सेक्रेटरीचा ताबा असतो, हें वर सांगितलेंच आहे. त्यावरून हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेवर मुख्य ताबा ठेवणारें सर्वांत वरचें अंग म्हणजे ब्रिटिश पार्लमेंट होय, हें वाचकांनीं जाणलें असेलच. ब्रिटिश पार्लमेंटकडें जरी हिंदुस्थानच्या राज्यकारभारासंबंधीं सर्वांत वरची मुख्य सत्ता आहे, तरीं हिंदुस्थानाकडें त्याचें बहुशः दुर्लक्षच असतें व हिंदुस्थानांत झालेले अन्याय दूर करण्याचें कामीं ते आपल्या अधिकाराचा क्वचितच उपयोग करतें. हिंदुस्थानावर देखरेख ठेवण्याचें काम पार्लमेंटनें सर्वस्वी भारतमंत्र्यावर टाकलें आहे व त्याबद्दल त्यांस जबाबदार धरिलें जातें. पार्लमेंटांत एकाद्या सभासदानें हिंदुस्थानविषयक माहिती विचारल्यास पार्लमेंटच्यावतीनें भारतमंत्र्यास सर्वगोष्टींचा खुलासा करावा लागतो व सभासदांच्या सर्व शंकाकुशंकाचें निरसन करावें लागतें. याशिवाय दरवर्षी त्यास हिंदुस्थानच्या प्रगतीचा आढावा पार्लमेंट-

पुढें वाचावा लागतो व पुढें काय केलें असतां हिंदुस्थानची स्थिति सुधरेल हेंहि त्यांत ध्वनित करावें लागतें. दरवर्षी मे महिन्यांत त्यांस हिंदी सरकारच्या जमा-खर्चाचें पक्के पत्रक पार्लमेंटास सादर करावें लागतें. हें पत्रक आगामी वर्षाचें नसून त्यांतील रकम दोन वर्षांपूर्वीच खर्ची पडलेली असते. पार्लमेंटपुढें हें बजेट ठेवणें म्हणजे एक नुसता फार्स आहे. ज्यादिवशीं हे बजेट पार्लमेंटास सादर करण्यांत येतें त्यादिवशीं बहुतेक सर्व खुर्च्या रिकाम्याच असतात. भारतमंत्री त्या अचेतन व जड वस्तुसमोर मारे हातवारे करून पुराण सांगत असतात. पार्लमेंट त्यादिवशीं बघण्यासारखें असतें असें एकानें विनोदानें म्हटलें आहे. हिंदुस्थान विषयक प्रश्नांचा ज्यांनीं अभ्यास केला आहे व ज्यांस हिंदी लोकांविषयीं सहानुभुती वाटत असते; असें लोकच फक्त त्यादिवशीं हजर असतात. परंतु असें फार विरळा !

**३५ नवीन सुधारणा**-पार्लमेंट हिंदुस्थानाविषयीं किती बेफिकिर असते, हे यावरून दिसून येईल. याची कारणें अनेक असून त्यांतील दोन फार महत्वाची आहेत. एक तर पार्लमेंटवर गृहकामाचा बोजा इतका पडलेला असतो कीं, हिंदुस्थानकडे लक्ष द्यावयास तिला बिलकुल फुरसद मिळत नाहीं. व दुसरें म्हणजे येथील गोऱ्या अधिकाऱ्यांनीं पार्लमेंटचा करून दिलेला गैर समज हें होय. आपल्या रिपोर्टांत हिंदुस्थानांत पूर्ण आलबेल आहे असें दरवर्षी हे अधिकारी भासवीत असल्यानें पार्लमेंटचे साहजीकपणेंच हिंदुस्थानाकडें दुर्लक्ष होत असे. त्यांत पार्लमेंटनें आपल्या वतीनें हिंदुस्थानच्या कारभारावर देखरेख करण्याकरितां नेमलेल्या स्टेट सेक्रेटरीचा व त्याच्या ऑफिसचा सर्व खर्च हिंदुस्थानच्या तिजोरींतून होत असल्यामुळें पार्लमेंट ज्यास्तच बेफिकीर बनलें. जॉन बुलच्या खिशास चट्टा बसल्याशिवाय त्याचें कोठेंच लक्ष जात नाहीं असा आजपर्यंतचा अनुभव आहे. या करितांच १८८५ सालापासून, म्हणजे राष्ट्रीय सभेच्या जन्मापासून हिंदी पुढाऱ्यांनीं हा सर्व खर्च इंग्लंडनें सोसावा अशी वारंवार मागणी केली होती. त्यांच्यामतें हा धडधडीत अन्याय व पक्षपात होता. कारण हिंदुस्थानाप्रमाणेंच जरी वसाहती करितां एक सेक्रेटरी पार्लमेंट नेमते, तरी त्याचा पगार व ऑफिसचा खर्च वसाहतीवर

न पडतां पार्लमेंटच सोसते. मग फक्त हिंदी लोकांनींच हा भूर्दंड निमुटपणें कां सोसावा? राष्ट्रीय सभेच्या योजनेंत ह्या मागणीचा समावेश करण्यांत आला होता. मि. मॉंटेग्यु व लॉर्ड चेम्सफर्ड यांनींहि हिचाच अनुवाद केला होता. पार्लमेंटरी कमेटीपुढें ज्या साक्षी झाल्या, त्या सर्व साक्षींत याचा एकमतानें इनकार करण्यांत आला. पार्लमेंटरी कमेटीस हें म्हणणें पटून तिनें या बाबतींत हिंदुस्थानास समान दर्जा द्यावा अशी शिफारस केली होती. स. १९१९ च्या कायद्यान्वयें हा अन्याय दूर झाला असून या पुढें भारतमंत्र्याचा पगार, त्याच्या हाताखालच्या दुय्यम चिटणिसाचा पगार व ऑफिसचा खर्च हिंदुस्थानाच्या तिजोरीवर न पडतां तो सर्व ब्रिटिश तिजोरी वर पडेल. ह्या सुधारणेमुळें हिंदुस्थानचा बराच फायदा होणार आहे. कारण या पुढें पार्लमेंटला हिंदुस्थानकडें दुर्लक्ष करून चालणार नाहीं. भारतमंत्र्याचा पगार ब्रिटिश तिजोरीवर पडणार असल्यामुळें, दरवर्षी त्यांस मंजूरी देतांना पार्लमेंटच्या सभासदांकडून त्याच्या धोरणावर कडक टीका होण्याचा संभव आहे व यामुळें भारतमंत्र्यास आजवर जसें बेजबाबदार रीतीनें वागतां आलें तसें यापुढें वागतां यावयाचें नाहीं.

नवीन ॲक्टानें झालेली दुसरी महत्वाची सुधारणा म्हटली ह्मणजे हिंदुस्थानासाठीं यांत्रिक माल खरेदी करण्यांकरितां एका हाय कमिशनराची झालेली नेमणूक ही होय. लॉर्ड क्रू यांच्या अध्यक्षतेखालीं जी कमेटी नेमण्यांत आली होती, तिनें ह्या कमिशनरास नेमण्याची सूचना केली होती व पार्लमेंटरी कमेटीनेंहि तीस दुजोरा दिला होता. स्वायत्त वसातींनींहि असें विलायतेंत हायकमिशनर्स नेमलें आहेत. ते आपल्या सरकारची बाजू तेथें उचलून धरितात व वसाहतींतून विलायतेंत गेलेल्या इसमांना हवी ती मदत करितात. हिंदुस्थानाकरितां नेमण्यांत आलेल्या या कमिशनरासहि हें काम करावें लागणार आहे.

# प्रकरण तिसरें.

## हिंदुस्थान सरकार.

" The Viceroy performs three great functions. He persnoifies the Crown, he represents the Home Government, he is the head of the administration."

" In performing this function he is limited by the India office and the Secretary of State, and by his council, but an enlightened Viceroy like Lord Hardinge will also take into account what he conceives to be Indian public opinion and will act upon it and take the risks." —*J. Ramsay Macdonald.*

**३६ गव्हर्नर जनरल**-कंपनीच्या सुरवातीस हिंदुस्थानांतील तिचा कारभार कोणच्या रीतीनें चाले व त्या रीतींत केव्हां केव्हां बदल करण्यांत आला हें मागेंच सांगितलें आहे ( पृ. २४ ). इ. स. १७७३ त लॉर्ड नॉर्थच्या रेग्युलेटिंग अॅक्टान्वयें बंगालच्या गव्हर्नरास ग० जनरल करण्यांत येऊन त्याच्या हाताखालीं मुंबई व मद्रास येथील गव्हर्नरांनीं काम करावें असें ठरलें. स. १७८४ च्या पिट्च्या अॅक्टानें व स. १७९३ तील चार्टर अॅक्टानें ग० जनरलचें अधिकार वाढविण्यांत आले. स. १८३३ च्या चार्टर अॅक्टानें गव्हर्नर जनरलची पदवी ग० ज० ऑफ बेंगाल अशी होती ती, बदलण्यांत येऊन ग० जनरल ऑफ इंडिया अशी करण्यांत आली. यावेळीं कंपनी सरकारच्या हातीं जवळ जवळ सर्व हिंदुस्थान आल्यामुळें पदवींत हा फरक करण्यांत आला. अशा रीतीनें जरी त्याची पदवी बदलण्यांत आली, तरी स. १८५४ सालापर्यंत त्यास बंगाल इलाख्याच्या कारभारांतून मुक्त करण्यांत आलें नाहीं. बंगालचा कारभार पहाण्याचें काम यावेळें-

पर्यंत त्याच्याकडेंच होतें. या शिवाय त्यांस इतर प्रांताधिकाऱ्यांवर देखरेख करावी लागे ती निराळीच. ही दोन्ही कामें त्याच्या एकट्याच्याचकडे असल्यामुळें त्याच्यावर कामाचा फाजिल बोजा पडत असे व त्यामुळें त्यास फार त्रास होई. याचा परिणाम वाईट होऊन सरसकट सर्व काम तुंबून राहिलें हा प्रसंग टाळण्याकरितां स. १८५४ त ग०जनरलास बंगालच्या कारभारांतून मुक्त करण्यांत येऊन, तें काम करण्याकरितां एका ले० गव्हर्नराची नेमणूक करण्यांत आली. यावेळेपासून ग० जनरलाकडे ब्रिटिश हिंदुस्थानच्या राज्यकारभारांवर देखरेख करण्याचें काम राहिलें. आजवर ग० जनरलास बंगाल इलाख्याचें काम पहावें लागत असल्यामुळें तो कलकत्यास राही. सन १९१२ सालपर्यंत त्याचें राहण्याचें मुख्य ठिकाण कलकत्ता शहरच होतें. परंतु या सालीं राजधानी दिल्लीस नेण्यांत आल्यामुळें याची मुख्य कचेरीहि तेथेंच गेली. स. १८५८ त कंपनीच्या हातांतून ब्रिटिश हिंदुस्थानचा राज्यकारभार जाऊन इंग्लंडच्या राजानें तो आपल्या हातीं घेतला. येथून तीन हजार कोसांवर असलेल्या आपल्या नगरींतून ब्रिटिश नृपतीस येथील कारभार पहातां येणें शक्य नसल्यामुळें राणीसाहेबांनीं हिंदुस्थानचा राज्यकारभार आपल्या वतीनें पहाण्याकरितां आपला एक प्रतिनिधी इकडे पाठविण्याचे ठरवून त्यांस व्हॉइसरॉय या नांवानें संबोधिलें जावें असें स. १८५८ सालच्या जाहीरनाम्यानें फर्माविलें. हा व्हाइसराय ( राजप्रतिनिधि ) म्हणजे दुसरा कोणी नसून पूर्वीचा ग. जनरलच होय. हल्लीं जरी त्यांस व्हॉइसरॉय असें म्हणतात तरी कागदोपत्रीं अजूनहि त्याचा ग. जनरल म्हणूनच उल्लेख करण्यांत येतो. या जाहिरनाम्याप्रमाणें लॉर्ड कॅनिंग पहिले व्हॉइसराय झाले.

रेग्युलेटिंग ॲक्ट पास झाल्यापासून तो स. १८१३ सालापर्यंत कंपनीच्या डायरेक्टरांकडून ग. जनरलची नेमणूक होत असे. परंतु त्याच सालीं पास झालेल्या चार्टर ॲक्टान्वयें डायरेक्टरांनीं केलेल्या नेमणुकीस ब्रिटिश नृपतीची संमति मिळणें अत्यावश्यक ठरलें. हल्लीं इंग्लंडच्या मुख्य प्रधानाच्या सल्यानें बादशाहा या जागेवर त्यांच्या पसंतीच्या मनुष्याची नेमणूक करतात. इंग्लंडचा कारभार बहुसंख्यांक अशा समानविचाराच्या एका पक्षाकडून चालविला जातो.

त्यामुळें अधिकारारूढ असलेल्या पक्षांतीलच एकाद्या हुशार माणसाची या जागे-करितां निवड होते. या पदाचा उपभोग त्यास पांच वर्षें घेतां येतो; परंतु या अवधींत त्यास हिंदुस्थान सोडून जातां येत नाहीं; जावयाचें असल्यास आपल्या जागेचा राजीनामा देऊन जाता येतें. हा राजप्रतिनिधी असल्यामुळें याच्या हातीं बरीच सत्ता देण्यांत आली असून एकाद्यास माफी देणें, त्याची शिक्षा कमी करणें वगैरें राज-हक्कहि त्यास देण्यांत आले आहेत. राज्यकारभाराची सर्व जबाबदारी याच्या एकट्याच्याच अंगावर टाकण्यांत आली असल्यामुळें हिंदुस्थानांतील सर्व कारभारावर यास सक्त नजर ठेवावी लागते. येथील कारभाराबद्दल व्हॉइसराय पार्लमेंटला जबाबदार असल्यामुळें, स्टेट सेक्रेटरीच्या हाताखालीं यास काम करावें लागतें व स्टेट सेक्रेटरी विलायतेंतून इकडे जे जे हुकूम धाडतात त्यांची अमल-बजावणी करावी लागते.

व्हाइसरॉयची जागा सर्व ब्रिटिश साम्राज्यांत मोठ्या मानाची व जबाबदा-रीची असल्यामुळें, तीवर विराजमान होण्याचें भाग्य अगदीं थोड्या लोकांच्याच नशिबीं असते. ज्यांच्या गळ्यांत राज्यप्रतिनिधीची माळ पडते ते इंग्लंड मधील स्वतंत्र व नाणावलेले मुत्सद्दी असतात; हे स्वतंत्र मुत्सद्दी हिंदुस्थानांत येतांना त्यांचें मन शुद्ध असतें. पुष्कळांच्या मनांवर पार्लमेंटच्या स्वतंत्र वातावरणाचा संस्कार झालेला असतो व इंग्रजांची नैसर्गिक स्वातंत्र्य प्रीति त्यांच्या हाडींमासीं खिळलेली असते. कांहींनीं इंग्लंडांत असतांनाच हिंदुस्तानच्या उच्च संस्कृतीची महती ऐकिलेली असते व हिंदुस्थानांत आल्यावर प्रत्यक्ष परिस्थितीच्या अवलोकनानें त्यांचें मत दृढ बनतें (स्व. कै. पृ. १०९).यामुळें यांच्या पासून हिंदुस्थानास फायदा होण्याचा संभव असतो, ह्मणूनच अशा जबाबदारीच्या जागेवर पूर्वग्रह दूषित मनाचे गृहस्थ न नेमतां स्वतंत्र बाण्याचे मुत्सद्दीच नेमणें योग्य आहे. या बाबतींतील सरकारचें धोरण लोकांस पूर्ण पसंत आहे. कांहीं दिवसांपूर्वी ही जागा राजघ-राण्यांतिल एकाद्या कर्तृत्ववान् इसमास द्यावी अशा आशयाची एक सूचना पुढें आली होती. परंतु तिजकडे कोणीही लक्ष न दिल्यानें ती आपोआपच मागें पडली. सध्यांच्या लोकशाहीच्या युगांत ही सूचना लोकांस रुचली नसल्यास नवल नाहीं!

**३७. वरिष्ठ कार्यकारी मंडळ.**---रेग्युलेटिंग ॲक्टानें ग. जनरलास मदतनीस म्हणून जें कौन्सिल देण्यांत आले, त्यांत चार सभासद असावेत असें ठरलें होतें. या सभासदांची नेमणूक पूर्वी कंपनीचे डायरेक्टर लोक करीत असत, परंतु आतां भारतमंत्र्याच्या सल्यानें बादशहांच्या कडून यांच्या नेमणुका होतात व पांच वर्षेपर्यंत त्यांना या जागेवर काम करतां येते. या कौन्सिलच्या सभासदांच्या संख्येंत वेळोवेळीं बदल झाल्याचें मागेंच सांगितलें आहे. पिटच्या बिलाप्रमाणें मुख्यसेनापतीसह या कौन्सिलांत तीनच सभासद असावेत असें ठरलें होतें. १८३३ सालीं या कौन्सिलांत चवथा आणखी एक सभासद नेमण्यांत येऊन त्यानें कायदे करण्याच्यावेळींच फक्त कौन्सिलच्या बैठकींत भाग घ्यावा असें ठरलें. परंतु पुढें त्यांस इतर सभासदाप्रमाणेंच लेखण्यांत येऊं लागलें. यापुढें कामाचा व्याप वाढत गेल्यानें या सभासदांच्या संख्येतहि वाढ झाली. स. १९१९ त या कौन्सिलांत व्हाइसराय व मुख्य सेनापति मिळून एकंदर आठ सभासद होते. त्यापैकीं सेनाध्यक्ष हा Extra-ordinary Member होता. आजवर या सभासदांपैकीं एकच सभासद हिंदी असे. परंतु स. १९१९ च्या रिफार्म ॲक्टान्वयें हिंदी सभासदांची संख्या वाढविण्यांत आली असून निदान तीन तरी सभासद हिंदी असावेत असें ठरलें आहे. सभासदांच्या वर्णामध्यें हा जसा फरक घडून आला, तसाच, किंबहुना त्याहून महत्वाचा असा फरक सभासदांच्या संख्येमध्यें घडून आला आहे. या कायद्यानें अमूक एक सभासद या कौंसिलांत असावेत असें जें पूर्वी एक बंधन होतें, तें काढून टाकलें असून त्यामुळें पूर्वीची स्थिति फार चांगली असें म्हणण्याची पाळी आली आहे. संख्येचा निर्बंध काढून हिंदी सभासदांचे प्रमाण वाढवूं नये अशी सर्वांनीं मागणी केली होती. राष्ट्रीय सभेनें तर या मंडळांत फक्त चारच सभासद असावेत व त्यांतील दोन जागा हिंदी लोकांस द्याव्या अशी मागणी केली होती. परंतु ती पुरविण्यांत आली नाहीं. या कौंसिलच्या सभासदांपैकीं तीन सभासद दहा वर्षे हिंदुस्थानांत नोकरी केलेले व एक पांच वर्षे बॅरिस्टरीचा धंदा केलेला असावा असे आजपर्यंत नियम होते; हल्लींच्या योजनेनें हा निर्बंध तसाच ठेवण्यांत आला आहे.

न्यायमंत्र्याच्या जागीं (Law Member) पूर्वी हिंदुस्थानांतील हायकोर्टाच्या वकिलास नेमण्यास जो मज्जाव होता, तो नव्या योजनेनें काढून टाकण्यांत आला आहे.

**३८. व्हॉइसरॉय व कार्यकारी मंडळ.**–स. १७७३ च्या रेग्युलेटिंग ॲक्टानें ग. जनरलास चार सभासदांचे कार्यकारी मंडळ देण्यांत आलें. त्यावेळीं ग. जनरलनें कौन्सिलच्या बहुमतानुसार वागावें असा नियम करण्यांत आला होता. यामुळें त्यावेळचा ग. जनरल वॉरन हेस्टिंग याची कशी त्रेधा उडत असे, व पुढें लॉर्ड कार्नवालिसनें हा नियम कसा सुधारून घेतला हें मागें सांगितलें आहेच. ग. जनरलास विशेष जरूरीच्या प्रसंगीं आपल्या तंत्रानें वागण्याचा अधिकार कार्नवालिसच्या आग्रहामुळें देण्यांत आला व आज सुद्धां तो ग. जनरलच्या हातीं कायम ठेवण्यांत आला आहे. साधारण बाबतींत ग. जनरल ऊर्फ व्हॉइसरॉयनें कौन्सिलच्या बहुमतापुढें अपली मान वाकवली पाहिजे; परंतु विशेष महत्वाच्या बाबतींत, कीं ज्यावर हिंदुस्थानांतील शांतता, सुव्यवस्था व सुराज्य अवलंबून आहे, त्यांस कौन्सिलचें मत बाजूस ठेवून आपल्या मनाप्रमाणें वागण्याचा अनियंत्रित अधिकार आहे. परंतु अशी वेळ क्वचितच येते. अलीकडे अशी वेळ आल्याचें ऐकिव त नाहीं; स. १८७९ सालीं लिटनसाहेबांनीं कौन्सिलमधील बहुमत विरुद्ध असतांहि आपल्या असाधारण सत्तेच्या जोरावर, इंग्रजी व्यापाऱ्यांच्या सोयीसाठीं; विलायती कापडावरील आयात जकात कशी रद्द केली हें प्रसिद्ध आहे. अशा वेळीं कौन्सिलच्या सभासदांना भिन्नमतपत्रिका (Dissenting Minutes) लिहिण्यास मोकळीक ठेवण्यांत आली असून ते कागद मग स्टेट सेक्रेटरीस सादर केले जातात व ग० जनरलास आपल्या कृत्याचें कसें बसें समर्थन करावें लागतें.

**३९ कामकाजाची रीत**–पूर्वी गव्हर्नर जनरलास हे कौन्सिल असतांनाही प्रयेक बाबतींत लक्ष घालावें लागे. मग ती बाबत कितीहि लहान असो तरी ती त्याच्या नजरेखालून गेल्याशिवाय राहत नसे. बारिक सारिक गोष्टींत अशा तऱ्हेनें त्यास लक्ष घालावें लागत असल्यामुळें त्याचा बहुतेक वेळ क्षुल्लक बाबतींतच जाई; महत्वाच्या बाबतींत लक्ष घालण्यास त्यांस फुरसद मिळत नसे. यामुळें कामाचा लवकर निकाल होत नसे. हल्लीं जें काम अंडर सेक्रेटरी करतो, तें काम

वीस वर्षांपूर्वी गव्हर्नर जनरल-इन्-कौन्सिलास करावें लागे. कारभाराचा बोजा जसजसा वाढत गेला. तसतसे या पद्धतीचे दुष्परिणाम जाणवूं लागले. लॉर्ड डल हौसीच्या कारकीर्दीत या पद्धतीतील दोष पार्लमेंटच्या घ्यानांत येऊन स. १८६१त राज्यकारभार सुलभ व व्यवस्थित रीतिनें चालण्यासाठीं कामाची वाटणी करण्याकरितां नवीन नियम करण्यास ग० जनरलास अधिकार देण्यांत आला. ह्या संधीचा फायदा घेऊन लॉर्ड कॅनिंगनें राज्यकारभाराचें काम सुरळित व्हावें म्हणून हल्लींची पद्धति अमलांत आणली. त्यानें दरेक मेंबरास, प्रत्येकीं कांहीं खातीं तोडून देऊन त्या खात्यापुरती जबाबदारीहि त्यांच्या अंगावरच टाकली.

कोणत्या मंत्र्याकडे कोणती खातीं दिलीं आहेत त्याचा तपशीलः ( अ ) गव्हर्नर जनरल ऊर्फ व्हॉइसरॉय--परदेशखातें. (१) गृहमंत्री–स्वदेश खातें. (२) मुलकी व शेतकी मंत्री–जमीन महसूल, शेतकी, जंगल व बांधखातें. (३) व्यापारमंत्रि–व्यापार व उद्योग खाते. (४) फडणीस–नगदी हिशोबी खातें. (५) न्यायमंत्री–न्यायखातें. (६) शिक्षणमंत्री–शिक्षण व स्थानिक–स्वराज्य खातें. (इ) सेनापति–फौज व आरमार खातें.

हल्लीं ज्या त्या खात्याच्या प्रमुख आपल्या खात्यांतील क्षुल्लक व बिनमहत्वाची साधारण कामें आपल्या अखत्यारीतच करतो. महत्वाच्या कागदावर आपला अभिप्राय लिहून व्हाइसरास ते सादर करतो. व्हाइसराय वाटल्यास त्यांत थोडेसे फेरफार करतो व्हाइसरास जर मेंबरनें दिलेला अभिप्राय पसंत पडला तर तें प्रकरण निकालांत निघतें. मग गव्हरनर जनरल इन कौन्सिलास तें मान्य आहे असें धरून खात्याचा सेक्रेटरी त्यास कायद्याचें स्वरूद देऊन प्रसिद्ध करतो. परंतु अतीशय महत्वाच्या बाबतींत व्हाइसराय यास जरीं खात्याच्या वरिष्ठाचा अभिप्राय पसंत पडला तरी ती बाब कौन्सिलांत चर्चेस निघते अगर कांहीं मेंबरांच्या संमतीकरितां ती त्यांच्याकडे पाठविण्यांत येते. जरुरीची कामें दरेक खात्याच्या सेक्रेटरी मार्फतच व्हाइसरायास सादर केलीं जातात, त्यावर मर्जीस आल्यास व्हाइसराय स्वतःच हुकूम करतो अगर खात्याच्या वरिष्ठाकडे त्याकरितां पाठवितो.

**४० खात्यांतील अधिकारी**—प्रत्येक खात्याच्या वरिष्ठाच्या जागीं त्या खात्याच्या मेंबराची नेमणूक होतें, त्याच्या हाताखालीं त्याच्या खात्यापुरतें एक निराळें ऑफिस देण्यांत येते. त्यांत सेक्रेटरी, अंडर सेक्रेटरी, असिस्टंट सेक्रेटरी व इतर कारकून वगैरे अधिकारी असतात. इंग्लंडमधील परमनंट अंडर सेक्रेटरी प्रमाणेंच हे सेक्रेटरी असतात. पब्लिकवर्क्स खात्याशिवायचें सर्व सेक्रेटरी इंडियन सिव्हील सर्वीस मधील असतात. साधारणतः या सेक्रेटरीची मुदत तीन वर्षे पर्यंतची आहे.

**४१ सत्तेचें केंद्रीकरण**—मागील प्रकरणांत पार्लमेंटच्या वतीनें स्टेट सेक्रेटरी व हिंदुस्थानसरकार यांच्यांत काय संबंध आहे, याचा उल्लेख करण्यांत आला आहे. आतां प्रांतिक सरकार व मध्यवर्ति सरकार यांचें परस्पराशीं कोणचें नातें आहे हें पाहूं. मि. मॉंटेग्यू व लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं हिंदुस्थानांत संयुक्त-राष्ट्रीय शासनपद्धति अस्तित्वांत आणावयास अजून जरूर ती परिस्थिति उत्पन्न झाली नाहीं, असें स्पष्ट म्हटलें आहे व त्यांच्या म्हणण्याचीच री सर्वांनीं ओढली आहे. त्यामुळें संयुक्त-राष्ट्रीय शासनपद्धति म्हणजे काय, हें कळणें जरूर आहे. ज्या ठिकाणीं ही राज्यपद्धति अस्तित्वांत असते, तेथें दोन किंवा अधिक स्वतंत्र संस्थानांनीं आपला संघ निर्माण करून सर्व साधारण हिताकरतां आपल्या स्वतंत्र अधिकारांतील कांहीं अधिकार त्या मध्यवर्ति संघास अर्पण केलेले असतात व बाकी स्वतःकडे राखून ठेवलेले असतात. राखून ठेवलेल्या सत्तेच्या जोरावर, इतर संस्थानांनीं ज्या गोष्टी केल्या असतात त्या या संघास म्हणजे मध्यवर्ति सरकारास फिरवितां येत नाहींत. अमेरिकेनें ह्याच पद्धतीचें अवलंबन केलें आहे. स. १७८३ सालीं जेंव्हां अमेरिकनांनीं आपल्या मानेवरील इंग्रजी सत्तेचें जूं झुगारून आपलें स्वातंत्र्य जाहिर केलें, त्यावेळीं आपलें संयुक्त काम चालविण्यासाठीं त्यांनीं सर्व संस्थानांच्या प्रतिनिधींची एक मध्यवर्ति ( Central ) सभा निर्माण केली व तिजकडे परराष्ट्रीय राजकारण, युद्ध खातें, व इतर सार्वजनीक हितासंबंधाची कामें या संबंधाचे अधिकार सोंपविण्यांत आले; आणि या सभेनें सदरील अधिकार कसे वापरावयाचें या संबंधी नियम ठरवून ते लेखनिबद्ध कर-

ण्यांत आलें. त्यामुळें मध्यवर्ति सभेसही आपल्या अधिकारांत त्या नियमांत यत्किंचितहि फेरफार करितां येत नाहीं. ' या सभेपुढें प्रत्येक संस्थानास आपआपल्या प्रतिनिधीद्वारा आपलें विचार पुढें ठेवतां येतात. या सभेंत थोडेसें मताधिक्य करून तिच्या कांहीं घटकावयवांना इतरांवर जुल्म करितां येऊ नयें ह्मणून कांहीं निर्बंध घालण्यांत आले आहेत. या मध्यवर्ति सभेंकडे ( कॉंग्रेस ) सोंपविलेल्या कांहीं अधिकारांखेरीज करून बाकीचे जे अधिकार प्रत्येक संस्थानास आपआपल्या पुरतें राहिले, त्यांत त्यांनां आपआपल्या पुरतें कांहीं कायदे करवून घेतां येतात व कांहीं स्थानिक बाबतींत राज्याचा कारभारही चालवितां येतो. याप्रमाणें मध्यवर्ति सरकार व स्थानिक सरकार यांचे अधिकार वरील राष्ट्रांत पृथक् पृथक् आहेत. यापैकीं कोणत्याहीं सरकारनें आपल्या अधिकाराच्या क्षेत्राचें अतिक्रमण करणें बेकायदेशीर व बेसनदशीर समजलें जातें.'[१]

इंग्रजी साम्राज्यांतील वसाहतींपैकीं कानडा, आस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका वगैरे ठिकाणीं हीच पद्धति अस्तित्वांत आहे. हिंदुस्थानांतील राज्यपद्धति या पद्धतीहून अगदीं भिन्न स्वरूपाची आहे. तिला एकतंत्री राज्यपद्धति(Unitary Government) असें नांव देतां येईल. कारण अमेरिकेंत ज्याप्रमाणें अधिकाराची विभागणी होऊन छोट्या संस्थानांना कांहीं बाबतीशिवाय पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे, त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील प्रांतांना प्रांतिक स्वातंत्र्य देण्यांत आलेलें नाहीं. सर्व सत्ता हिंदुस्थान सरकारच्याच हातीं एकत्रित करण्यांत आली आहे. हिंदुस्थानसरकारचे एजंट या नात्यानें आपआपल्या प्रांतांतील वसूल गोळा करून तो मध्यवर्ति सरकारच्या तिजोरींत भरण्याचेंच काम पूर्वी प्रांतिक सरकारास देण्यांत आलें होतें. याशिवाय दिवाणी व फौजदारी न्याय, पोलीस, स्थानिक स्वराज्य, शिक्षण, दवा, बांधकाम, जंगल इ. खातींहि त्यांच्या हवालीं करण्यांत आलीं होती. परंतु या खात्यापुरतेंहि त्यांना स्वातंत्र्य दिलें नव्हतें. हिंदुस्थान सरकारनें ठरविलेल्या धोरणानुरूपच या खात्यांची त्यांना व्यवस्था पहावयाची होती. बाकीची सर्व खातीं हिंदुस्थान सरकारनें आपल्या स्वतःच्याच देखरेखी खालीं

१( वि. ब्रा. वि. पु. ५१ वें पृ. ८२ )

ठेविलीं होतीं. त्यामुळें वरिष्ट सरकारवर कामाचा बोजा फार पडून 'हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यांत असणाऱ्या एखाद्या खेड्यांतील क्षुल्लक बाबींचा निकाल करून घेणें झाल्यास सिमला येथील हिमालयस्थ देवाधिदेवांना आळविण्याची पाळी येई.' या अधिकारकेंद्रीकरणास केव्हां सुरवात झाली, ह्याचा इतिहास फार जुना आहे. स. १७७३ च्या रेग्युलेटिंग ॲक्टानें मुंबई व मद्रास येथील प्रांतिक सरकारास पूर्वी जें स्वातंत्र्य होतें, तें नाहींसें झालें. यानंतर कंपनीस ज्यास्त मुलुख मिळाल्यावर जे नवीन प्रांत रचण्यांत आले, त्यांनाहि या दोघांबरोबरच परावलंबनाच्या एकाच दावणींत गोंवण्यांत आलें. पुढें १८५७ सालच्या बंडानंतर बादशाही अमल सुरू झाला. त्यावेळेपासून सर्व सत्ता एका केंद्रांत आणण्याची पद्धति सुरू झाली व लॉर्ड कर्झनच्या अमदानींत तर ती कळसास पोचली. अशा प्रकारच्या फाजिल अधिकारकेंद्रीकरणपद्धतीचें जे परिणाम व्हावयाचें तें होऊन प्रांतिक सरकार हातांत सत्ता नसल्यामुळें निर्बल व हताश झाले.

**४२ अधिकार विभागणी**–अधिकार केंद्रीकरणामुळें उपस्थित झालेल्या स्थितींत प्रांतिक सरकारांचें परावलंबविमोचन एवढाच एक उपाय होता. व याकरितां १९०७ सालीं मि. हॉबहौस यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिशन नेमण्यांत येऊन अधिकारदानाची व्यापक योजना करण्याचें काम त्याच्याकडें देण्यांत आलें. या कमिशननें पुष्कळांच्या साक्षी घेऊन एक रिपोर्ट प्रसिद्ध केला. ही स्थिति सुधारण्याकरितां आपल्या रिपोर्टांत त्यानें कांहीं सूचना केल्या व त्यापैकीं सध्यां कांहीं अमलांत आल्या आहेत. परंतु हें कमिशन नेमूनहि कांहीं फायदा झाला नाहीं. उलट परिस्थिति दिवसेंदिवस ज्यास्त बिकट होत चालली. हिंदुस्थानांत राजकीय जागृति या सुमारास पूर्ण झाल्यामुळें लोकांनीहि ज्यास्त अधिकार आपल्यास मिळावा म्हणून चळवळ सुरू केली होती. पुढें जबाबदार राज्यपद्धतीचें तत्व हिंदुस्थानास लागूं करावयाचें, असें आपलें धोरण असल्याचें जेंव्हा इंग्लंडनें जाहीर केलें, त्यावेळीं राष्ट्रीय सभेनें मास्लेम लीगच्या सल्यानें जी संयुक्त योजना तयार केली होती, तींत प्रांतीक स्वायत्तता देण्यासंबंधानें एक मागणी केली होती. परंतु तिला वर सांगितलेलें नकारार्थी उत्तर मिळालें. पार्लमेंटरी कमेटीनें अशा रीतीनें

जरी पूर्ण अधिकार संक्रमणास आपला रुकार दिला नाहीं, तरी तिनें या बाबतींत एक महत्वाची सुचना केली होती व तिचा रिफॉर्म अॅक्टांत समावेशहि करण्यांत आला आहे. सुधारणा कायद्यानें प्रांतिकसरकारच्या कमरेभोंवतालील हिंदुस्थानसरकारचा विळखा जरासा सैल करण्यांत आला आहे. एकंदर खात्यांचे मध्यवर्ति व प्रांतिक खातीं ( Central and Provincial Subjects ) असें दोन भाग करण्यांत आले आहेत. त्यापैकीं मध्यवर्ति खात्यांचे काम हिंदुस्थान सरकारनें स्वतः करावें असें ठरलें असून प्रांतिक खातीं प्रांतिक सरकारच्या ताब्यांत देण्यांत आलीं आहेत व त्यावर हिंदुस्थान सरकारची पूर्वी प्रमाणेंच देखरेख राहणार आहे. परंतु या प्रांतिक खात्यांचे राखीव व सोपींव खातीं असें दोन पोट भाग करण्यांत आले असून त्यापैकीं सोपींव खात्यांत वरिष्ठ सरकारनें उगीच ढवळाढवळ करूं नये असें ठरविण्यांत आलें आहे.

---

# प्रकरण चवथें.

## प्रांतिक सरकार.

What you want is to decentralise your Government. You will not make a single step towards the improvement of India unless you change your whole system of Government–unless you give to each Prosidency a Government with more independent powers than are now possessed.–*John Bright*

**४३ हिंदुस्थानांतील प्रांत**–राज्यव्यवस्थेच्या सोयींसाठीं ब्रिटिश हिंदुस्थानचे लहान लहान भाग करण्यांत आले आहेत. स. १९१९ सालीं सुधारणा कायदा पास होण्यापूर्वी येथें एकूण १५ प्रांत होते. ते म्हणजे ( १ ) मुंबई ( २ ) मद्रास ( ३ ) बंगाल ( ४ ) संयुक्त प्रांत ( ५ ) पंजाब ( ६ ) ब्रह्मदेश ( ७ )

बिहार व ओरिसा ( ८ ) मध्यप्रांत ( ९ ) आसाम ( १० ) वायव्य सरहद्दी-वरील प्रांत ( ११ ) दिल्ली ( १२ ) ब्रिटिश बलुचिस्थान ( १३ ) आजमेर मारवाड ( १४ ) कुर्ग व ( १५ ) अंदमान बेटें. या प्रांतापैकीं सर्व प्रांताचा दर्जा सारखा नसल्यामुळें, प्रत्येकांतील राज्यव्यवस्थाहि त्या मानानें भिन्न आहे. याची कारणें कळण्यापूर्वी या प्रांताची रचना कशी होत गेली, हें कळणें अत्यावश्यक असल्यामुळें आपण त्याचाच विचार करूं.

**४४ प्रांत रचना.**—इस्टे इंडिया कंपनीचा जन्म केवळ पूर्वेकडील देशाशीं व्यापार करण्यासाठींच झाल्यामुळें पूर्वेकडे कांहीं काळानें आपण एक मोठें राज्य स्थापूं असें त्यावेळीं कोणासच वाटलें नाहीं; आणि यामुळेंच केवळ व्यापारप्रगतीस सोइस्कर पडेल अशी घटना प्रथम तयार करण्यांत आली होती. परंतु कंपनीस जेव्हां राजकीय स्वरूप प्राप्त झालें, त्यावेळीं ही घटना कुच कामाची ठरून स. १७७३त हल्लींच्या राज्यपद्धतीचा पाया घातला गेला. कंपनीचा कारभार पूर्वी एक प्रेसिडेंट व त्याचें सल्लागार मंडळ यांच्या ताब्यांत असून कंपनीच्या वरिष्ठ अमलदारासच या मंडळाचें सभासद होता येत असें. जस जसा नवीन मुलूख कंपनीच्या ताब्यांत येत गेला, तसतसा कंपनीस सोईस्कर वाटले त्या प्रांतात त्याचा समावेश करण्यांत आला. सन. १७७३ मध्यें रेग्युलेटिंग अक्टान्वयें कंपनीच्या जुन्या घटनेंत फेरफार करण्यांत येऊन मद्रास व मुंबई येथील प्रेसिडेंटावर फोर्टवुइल्यम येथील गव्हर्नरजनरलानें हुकमत चालवावीं असें ठरविण्यांत आलें. या पुढें ब्रिटिशांचा भाग्योदय होत गेल्यामुळें पूर्वीच्या प्रांतांचें क्षेत्रफळ वाढत जाऊन ते मोठमोठें बनले. विशेषतः बंगालप्रांत तर फारच फुगला व त्या मुळें त्याची विभागणी करण्याची जरूरी ज्यास्त भासूं लागलीं. राज्यविस्तार फार झाल्यामुळें गव्हर्नर जनरलास काम फार पडूं लागलें. तेव्हां त्याचें काम कांहीं तरी हलकें करावें अशी इच्छा त्यावेळीं प्रगट करण्यांत आली.

सन १८३१ च्या कायद्यानुसार बंगालप्रांताचें दोन प्रांत करण्याचें ठरलें. परंतु या ठरावाची अमल बजावणीं न होतां तो कागदावरच राहिला. सन १८३५ त कंपनीच्या डायरेक्टरांनीं वायव्य प्रांताकरितां एक लेफ्टनंट गव्हर्नर नेमावा

अशी सूचना बोर्ड ऑफ कंट्रोल पुढें ठेविली. बोर्डास ही सूचना पसंत पडून वायव्य प्रांतावर एक ले. गव्हर्नराची नेमणूक करण्यांत आली. या ले. गव्हर्नराच्या हातीं आग्रा व वायव्येकडील प्रांत देण्यांत आला. बंगाल प्रांताचा राहिलेला भाग ग. जनरलाच्याच ताब्यांत राहिला. अशा रितीनें गव्हर्नर जनरलास या प्रांताच्या कारभारांतून मुक्त करण्यांत आलें.

सन १८४३ मध्यें सिंधप्रांत मुंबई इलाख्यास जोडण्यांत आला. शीख युद्धान्वयें पंजाबांत नेटिव राजावर देखरेख करण्याकरितां एका रेसिडेंटाची नेमणूक करण्यांत आली. परंतु दुसऱ्या शीख युद्धाअंतीं पंजाब खालसा करण्यांत आला. गव्हर्नर जनरलानें तो आपल्या हातीं घेऊन राज्यव्यवस्था नीट राखण्याकरितां तो एका कमिशनराच्या ताब्यांत दिला. सन १८५४ मध्यें बंगालकरितां एका निराळ्या ले. गव्हरनराची नेमणूक झाली व पुढें १९१२ त राज्यारोहण समयीं ले. गव्हर्नरास गव्हर्नर करण्यांत आलें.

**४५ वऱ्हाड व मध्यप्रांतः**—सन १८५४ मध्यें नागपूरकर भोसल्याची गादी वारस नसल्यामुळें रिकामीं पडली. त्यामुळें कंपनी सरकारनें त्याचें राज्य आपल्या राज्यास जोडून राज्यव्यवस्थेकरितां त्यावर एक कमिशनर नेमला. सन १८५६ मध्यें अयोध्या प्रांत खालसा करण्यांत येऊन त्यावर एका चीफ कमिशनराची नेमणूक झाली.

सन १८७७ मध्यें अयोध्या प्रांताचा कांहीं भाग वायव्य प्रांतात घेण्यांत आला. सरहद्दीवरील नवीन मुलुख कंपनीस मिळाल्यानें वायव्य सरहद्द प्रांत नांवाचा नवा प्रांत करण्यांत आला. नांव सादृश्यावरून घोंटाळा न व्हावा एतदर्थ वायव्य प्रांताचा अयोध्या प्रांतासह संयुक्त प्रांत बनविण्यांत आला. सन १८५९ त पंजाब प्रांताची रचना करण्यांत आली. पंजाबाकडील नवा मुलुख व वायव्य प्रांतातील दिल्ली त्यावर एका ले. गव्हरनराची नेमणूक झाली. सन १८६१ त नागपूर व वायव्य प्रांतातील नर्मदा काठचा मुलुख मिळून मध्यप्रांत तयार करण्यांत आला व एका चीफ कमिशनरास त्याची व्यवस्था पहाण्याकरितां नेमण्यांत आले. सन १८६२ त ब्रह्मदेश प्रांताची रचना करण्यांत आली. त्यांस येथील

राजाकडून मिळालेला मुलुख जोडण्यांत आला. सन. १८२५ व ३५ या दोन सालांत या भागावर कमिशनरांची नेमणूक करण्यांत आली होती. परंतु ब्रह्मदेश हा नवीन प्रांत झाल्यामुळें त्यावर एका चीफ कमिशनरांस नेमण्यांत आलें. सन १८८६ मध्यें ब्रह्मीलोकाशीं दुसरें युद्ध झालें, त्यांत ब्रह्मीलोकांचा पराजय होऊन (Upper) बर्मा इंग्रजास मिळाला. तो व इतर आधींचा मुलुख मिळून १८९७ सालीं हल्लींच्या ब्रम्हदेशाची रचना झाली व त्यावर गव्हर्नर नेमण्यांत आला.

लॉर्ड वेलस्लीच्या कारकीर्दींत भाडोत्री इं. सैन्यास निझामानें वऱ्हाड प्रांत खर्चासाठीं दिला. प्रथमतः तो प्रांत इंग्रजास तोडून दिला नव्हता, पूर्वीं फक्त सैन्याच्या पोटगीचा खर्चच निजामसरकार देई. परंतु पुढें सन १८५३ मध्यें एक तह होऊन त्या तहान्वयें असें ठरलें कीं, इंग्रजांनीं स्वसैन्य पोषणार्थ वऱ्हाड प्रांत आपल्याकडे ठेवावा व सालींना खर्च वजाजातां जी रकम उरेल ती निजामास परत द्यावी. अशा रितीनें तोडून दिलेल्या या प्रांताची हैद्राबादच्या रेसिडेंटच्या नजरेखालीं व्यवस्था चाले. परंतु या स्थितीमुळें अनेक भानगडी उपस्थित होऊन राजकारभारांत घोटाळा माजला. पुढें १९०२ सालीं एक निराळीच व्यवस्था करण्यांत आली व त्यामुळें वऱ्हाड प्रांतावर निजामाचें मासुली नांव राहिलें. इंग्रजांनीं तो आपल्या हातीं घेऊन त्यांस मध्यप्रांतांत सामील केलें. याची भरपाई म्हणून निजामास इंग्रजांनीं २५ लक्षरुपये द्यावें असें ठरलें.

**४६ बंगाल व आसाम**-ब्रम्ही लोकांकडून १८२४ त आसाम प्रांत कंपनीसरकारास मिळाला. त्यावेळीं तो बंगाल इलाख्यांसच जोडण्यांत आला. परंतु पुढें सन १८७४त तो वेगळा करण्यांत येऊन एका चीफ कमिशनराची त्यावर नेमणूक करण्यांत आली. सन १९०५ मध्यें बंगालचा पूर्वेकडील कांहीं भाग, बंगाल पासून तोडण्यांत येऊन आसाम प्रांताचा त्यांत समावेश करण्यांत आला व पूर्व बंगाल व आसाम असा नवा प्रांत तयार करण्यांत येऊन त्यावर एका लेफ्टनंट गव्हर्नरास नेमण्यांत आलें. आतांपर्यंत राज्यव्यवस्थेच्या सोईसाठीं नवीन प्रांत बरेच तयार करण्यांत आलें व बंगालचा बराच भाग त्यांनीं गिळून टाकला होता. असें असतांही बंगाल मोठा

असून राज्यव्यवस्था नीट करण्याकरितां त्याची फाळणी केली पाहिजे असें कर्झन लाटसाहेबांस वाटून त्यांनीं या फाळणीचा एक मसुदा तयार केला. या मसुद्याचें आद्यप्रवर्तक साहेब मजकूरच असून त्यांनींच यांस वर सांगीतल्याप्रमाणें पूर्व बंगाल व आसाम मिळून एक नवा प्रांत तयार करून मूर्तस्वरूप दिलें. या कृत्यास वंगभंग म्हणतात. वंगभंगाविरुद्ध हिंदुलोकांनीं जोराची चळवळ करून आपला निषेध व्यक्त केला होता, परंतु त्या निषेधाकडें कोणीहि लक्ष दिलें नाहीं, व लाटसाहेबांची सूचना कागदांत न राहता तिचा पूर्णपणें अंमल झाला. सन १९१२ त आणखी फेरफार करण्यांत आलें. जुन्या आसाम प्रांताची पुनर्रचना झाली. पश्चिम बंगालांतील कांहीं भाग कमी करण्यांत येऊन त्याचा बिहार व ओरिसा हा नवा प्रांत करण्यांत आला. बंगालची आतांपर्यंत बऱ्याच वेळा विभागणी करण्यांत आली होती. व त्यामुळें खुद्द बंगालचा असा फारच थोडा भाग राहिला होता; म्हणून यावेळीं तो व पूर्वी आसामांत गेलेला पूर्व भाग मिळून पूर्व बंगाल प्रांत तयार करण्यांत आला. सन १९२२ त दिल्ली दरबारच्यावेळीं बादशहांनीं राजधानीचें कलकत्ता शहर बदलून दिल्ली करण्यांत आले आहे, व बिहार व ओरिसा या प्रांतासाठीं एक ले. गव्हनर व आसामसाठीं पूर्ववत् चीफ कमिशनर नेमल्याचें जाहीर केलें

**४७ वायव्य प्रांत**—सरहद्दीवरचा कांहीं मुलुख व पंजाबांतील कांहीं जिल्हे मिळून सन १९०१ मध्यें वायव्यसरहद्दप्रांत बनविण्यांत आला सरहद्दीवर निरनिराळ्या लहान लहान लुटारूंच्या टोळया आहेत व त्या नेहमीं सरहद्दीवर दांडगाई करतात. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं तेथें एक सैन्य ठेवलें आहे व त्या भागांत शांतता व आबादानी राखण्याचें काम त्या सैन्याचें आहे. हिंदुस्थानचें परदेश खातें मागें सांगितल्याप्रमाणें खुद्द व्हाइसराच्या ताब्यांत आहे. सरहद्दीवर अफगाणिस्थान रशिया वगैरे परदेशाशीं नेहमी व्यवहार चालू असतो, यामुळें हा प्रदेश व्हाइसराच्याच ताब्यांत आहे. सन. १८७६ सालीं खिलातच्या खानाकडून क्वेटालगतचा मुलुख विकत घेण्यांत आला व पुढें स. १८८९ त अफगाणिस्तानशीं झालेल्या तहान्वयें मिळालेल्या मुलुखांत त्याचा समावेश करण्यांत

येऊन ब्रिटिश बलुचिस्थान नांवाचा नवा प्रांत तयार करण्यांत आला. व त्यावर एका चीफ कमिशनरास नेमण्यांत आलें.

**४८ कुर्ग व इतर प्रांत**-दक्षिणेंत सन १८३४ साली कुर्ग व त्या लगतचा डोंगराळ मुलुख मिळून नवा प्रांत तयार करण्यांत आला. या प्रांताचा कारभार कमिशनर पाहतो व तो म्हैसूरचे रेसिडेंटाचे हाताखालीं आहे. अजमीर मेरवाडा एजन्सीवर राजपुतान्यांतील संस्थानांचा ब्रिटिश एजंट देखरेख ठेवतो. अंदमान व निकोबारासाठीं एक स्पेशल कमिशनर नेमण्यांत आला आहे. यमुनेच्या पश्चिम तटाकापासून तो दिल्ली लगतचा दक्षिणोत्तर मुलुख मिळून १९१२ सालीं दिल्ली जिल्हा तयार करण्यांत आला. या जिल्ह्याचे क्षेत्रफळ एकंदर ५५७ चौरस मैल असून लोकसंख्या जवळ जवळ चार लाख आहे.

**४९ निरनिराळ्या प्रांतांचा दर्जा**—वर सांगितप्रल्यामाणें हिंदुस्थानचें राज्यव्यवस्थेच्या सोईखातर पंधरा भाग पाडण्यांत आलें आहेत. हे भाग केव्हां व कसें पाडलें हें वर सांगितलेंच आहे. त्यावरून असें दिसून येईल कीं, ह्या प्रांतांची उभारणी कांहीं एका विशिष्ट तत्वावर केलीं नसून जसजसा मुलुख कंपनी सरकारास मिळत गेला. तसतशी राजव्यवस्थेच्या सोईखातर त्यांची प्रांतवार विभागणी करण्यांत आली. यापैकीं कित्येक प्रांत तर इतके लहान आहेत कीं, त्यांना प्रांत म्हणणें सुद्धां अविचाराचें होईल. आमच्या राजकर्त्यांनीं त्यांना प्रांत म्हणून ठरविलें, म्हणूनच त्यांना प्रांत म्हणणें आम्हास भाग आहे. नाहींपेक्षां यांना प्रांत असें कोणीहि म्हणणार नाहीं. आमच्या राज्यकर्त्यांस हे पक्के माहीत आहे व त्यांनीं अशा प्रांताचा दर्जाहि हीनच ठरविला आहे परंतु नुसता दर्जा हीन ठरवून भागत नाहीं. जेथें मुळांतच प्रांतरचना चुकीची आहे. तेथें प्रांताचा दर्जा हीन ठरविला काय किंवा उच्च ठरविला काय सारखाच. **एक प्रांत लहान म्हणून त्याचें मीठ अळणी, असें असतां उपयोगी नाहीं. हिंदी लोकांची तर अशी मागणी आहे कीं, सरकारनें दरेक प्रांत समान दर्जावर आणिला पाहिजे.** ही मागणी सरकारास पुरवावयाची असल्यास भाषावर प्रांत रचना केली पाहीजे. भाषावार प्रांत रचना झाल्यास आमच्या मतें

प्रत्येक प्रांताचा दर्जा समान राहील व राज्यव्यवस्थेसही सोईचेंच पडेल. परंतु अशा मागण्याकडें कोण लक्ष पुरवितो! बिचारी जनता एक सारखी ओरडतच आहे. परंतु सरकार तिच्याकडें पाठ फिरवून बसलें आहे. त्यामुळें तिच्या ओरडण्याकडें कोणाचेंच लक्ष जात नाहीं. राष्ट्रीयसभेनें १९२० सालीं भाषावार प्रांतरचना करून या बाबतींत आघाडी मारली आहे. व या प्रश्नास जोरानें चालना दिली आहे. प्रस्तुत मुद्याशीं आपणास कांहीं कर्तव्य नसल्यामुळें हा मुद्दा सोडून या प्रांताचा दर्जा कसा आहे वगैरे पाहूं.

वरसांगितलेंच आहे कीं, या पंधरा प्रांतावर गव्हर्नर जनरलची देखरेख असतें. ही देखरेख कांहीं प्रांतावर ज्यास्त, तर कांहीं वर कमी अशी असतें. असें असण्याचें कारण म्हणजे त्यांचा हिंदी साम्राज्यांतील असमान दर्जा हें होय. ज्याचा दर्जा मोठा आहे असें नऊ प्रांत असून त्यांना मेजर (प्रधान) प्राव्हिन्सेस म्हणतात. बाकीच्या सहांना मायनॉर (गौण) प्राव्हिन्सेस म्हणतात. वायव्यसरहद्द प्रांत बलुचिस्थान, कुर्ग, अजमीर, अंदमान व दिल्ली हे सहा गौण प्रांत होत. बाकीचे मुंबई, मद्रास, बंगाल, असाम, बिहार, मध्य, संयुक्त, पंजाब, व ब्रम्हदेश हे उच्च दर्जाचे प्रांत होत.

या नऊ प्रांतापैकीं मद्रास व मुंबई या दोन प्रांतांनीं आजवर बऱ्याच मानाचें पद भोगिलें आहे. ह्यांचा दर्जा पूर्वीपासून इतरांहून मोठा आहे. कंपनीसरकारच्या अवल अमदानींत बंगालप्रमाणें हे दोन प्रांत स्वतंत्र होते. परंतु पुढें सन. १७७३ सालापासून रेग्युलेटिंग ॲक्टानें ह्यांचें कांहीं बाबींत स्वातंत्र्य नाहींसें झालें, त्यांचा दर्जा मात्र तसाच कायम राहिला. परंतु पुढें पास झालेल्या निरनिराळ्या अक्टांनीं वरिष्ठसरकारच्या हातांत ज्यास्त सत्ता दिल्या कारणानें ह्यांच्या दर्जात कमी अधीक फेर झाला. परंतु असें असतांहि त्यांचा दर्जा इतरांहून मोठा राहून त्यांना एकप्रकारचें वैशिष्ट्य प्राप्त झालें.

राज्यव्यवस्थाकानूअन्वयें प्रांतिक सरकारांनीं व्हाइसरायाची आज्ञा मानली पाहिजे व आप आपल्या प्रांतातील राजकीय, सामाजिक, औद्योगिक घडामोडीचें ज्ञान त्यांनीं वेळोवेळीं त्यांस करून दिलें पाहिजें असें ठरविण्यांत आलें आहे.

म्हणजे प्रांतिक सरकारचा सर्व कारभार वरिष्ठ सरकारच्या देखरेखीखालीं चालावयाचा असतो. परंतु वरील दोन प्रांत आपल्या अधिकार विशिष्टत्वानें व पूर्वापारच्या दर्जानें इतर सरकाराहून भिन्न आहेत. इ. स. १९१२ सालीं बंगाल्यास राज्याधिरोहणापासून हें वैशिष्ट्य प्राप्त झालें आहे. या तिघा प्रांतिक सरकारांचें वैशिष्ट्य त्यांच्या अधिकारांत आहे. महसुलाव्यतिरिक्त बाबींत त्यांना स्टेटसेक्रेटरीकडे तक्रार करतां येते. बंगाल मिळून तिन्ही इलाख्याचें गव्हरनर बादशहा नेमतात. तीन सभासदांचे त्यांना एक कार्यकारी मंडळ देण्यांत आलें आहे. ह्या सभासदांची नेमणूक स्टेटसेक्रेटरीच्या सल्यानुसार बादशहाच करतात. ह्यापैकीं दोन सभासद सिव्हीलियन असलें पाहिजेत व राहिलेला एक हिंदी असावा असें ठरविण्यांत आलें आहे.

**५० प्रांतिक राज्यकारभार**--वर जे पंधरा प्रांत सांगितले आहेत त्यांचा राज्यकारभार स. १९१९ चा सुधारणा कायदा पास होण्यापूर्वी खालील रीतीनें चालत असे.

मुंबई, मद्रास व बंगाल या तिन्ही इलाख्यांचा कारभार प्रत्येकीं एक गव्हर्नर पाहतो व त्यास मदतीकरितां एक चार सभासदांचे कार्यकारी मंडळ देण्यांत आलें आहे. यांच्या कार्यांचे व अधिकाराचें क्षेत्र पार्लमेंटकडून मुक्रर करण्यांत आले असून राज्यकारभार पाहण्यासंबंधींचे नियमहि पार्लमेंटनें केलें आहेत व त्या बरहुकूम त्यांना आपल्या ताब्यांतील मुलुखाचा कारभार पाहावा लागतो. गव्हर्नरची नेमणूक भारतमंत्र्याच्या सल्यानें बादशहा पांच वर्षांकरितां करितात. गव्हर्नरच्या नोकरीची ही मुदत अगदीं अपुरी आहे. व ती वाढविण्यांत यावी अशी हिंदीं लोकांची आज बऱ्याच दिवसांची मागणी आहे. कारण कोणीहि गव्हर्नर झाला तरी त्यास आपल्या कारकीर्दीत मोठीशी घडामोड करितां येत नाहीं. याचें कारण उघडच आहे. "त्याचा सर्व कारभार पांच वर्षांचा; त्यांत आल्याबरोबर त्र्पे दोन वर्षें शिकण्यांत जातात आणि पुढें जावयाचा वेध लागतो, तेव्हां एकट्याच्या हातून विशेषसें काय होणार!" (लो. टि. के. लेख). या गव्हर्नरांस जें कार्यकारी मंडळ देण्यांत आलें आहे, त्यांत ३।४ सभासद असतात व त्यापैकीं

एक हिंदी असतो. मागें सांगितल्याप्रमाणें हिंदी मनुष्याची नेमणूक करण्याचा प्रघात लॉर्ड मोर्ले यांनींच पाडला आहे. हिंदुस्थान सरकारच्या कार्यकारी मंडळांत जशी कामाची वाटणी करण्यांत आली असून श्रमविभाग झाला आहे, त्याप्रमाणें या मंडळाच्या सभासदांतहि कामाची वाटणी करण्यांत आली आहे व व्हॅाइसरॉयप्रमाणें गव्हर्नरासहि एक जादा मत देण्याचा अधिकार आहे. या मंडळाशिवाय गव्हर्नरांना कायदे करण्याकरितां एक निराळें मंडळ देण्यांत आलें आहे. त्यांत लोकनियुक्त व सरकारी आणि बिन सरकारी सभासद असतात. या मंडळाची पुढील एका प्रकरणांत सविस्तर हकीगत आली असल्यामुळें पुनः तिची द्विरुक्ती करीत नाहीं.

गव्हर्नराहून कमी दर्जाचा अंमलदार म्हटला म्हणजे ले. गव्हर्नर होय. हे बहुधां सनदी नोकरापैकीं असतात. असें ले. गव्हर्नर्स पूर्वी पांच होते. यांची मुदतहि गव्हर्नराप्रमाणेंच पांच वर्षांची आहे. परंतु त्यांची नेमणूक मात्र व्हॉइसरॉयच्या सल्यानें स्टेट सेक्रेटरीकडून होते. या पांचापैकीं बिहार व ओरिसाच्या ले. गव्हर्नरासच कार्यकारी मंडळ देण्यांत आलें आहे. बाकीच्यांना फक्त कायदे कौन्सिलच देण्यांत आले आहे. ज्या प्रांताना कार्यकारी मंडळ देण्यांत आलें नाहीं, त्यांचा कारभार दरेक खात्याच्या सेक्रेटरीच्या सल्यानें ले. गव्हर्नर पाहतो.

याहून खालच्या दर्जाचा अमलदार म्हणजे चीफ कमिशनर होय. याची नेमणूक हिंदुस्थान सरकाराकडून होते. हेहि सनदी नोकरापैकींच असतात. त्यांना प्रत्यक्ष अशी सत्ता नसल्यामुळें कायदे कौन्सिल देण्यांत आलें नाहीं. वरिष्ठकायदे कौन्सिलच यांच्या मुलुखास लागूं पडणारे कायदे पास करिते. आसाम व मध्यप्रांतातील चीफ कमिशनरास मात्र अलीकडें कायदे कौन्सिल देण्यांत आलें आहे.

**५१ नवीन सुधारणा**--स. १९१९ च्या सुधारणा कायद्यानें प्रांतिक सरकारांच्या राज्यकारभारांत फार महत्वाच्या सुधारणा झाल्या आहेत. सर्व प्रांताना समान दर्जा द्यावा असें मि॰ मॉंटेग्यु व लॉर्ड चेम्सफर्ड यांचें मत पडून त्यांनीं मुंबई, मद्रास, बंगाल, संयुक्तप्रांत, पंजाब, बहार व ओरिसा, मध्यप्रांत व आसाम या आठ प्रांतांच्या मुख्याधिकाऱ्यांस गव्हर्नर हेंच नांव देण्यांत यावें;

व त्या सर्वांस कार्यकारी मंडळें द्यावींत, अशी सूचना केली होती. ती नव्या कायद्यांत मान्य करण्यांत आली आहे. या आठ प्रांतापैकीं मुंबई, मद्रास व बंगाल या इलाख्यांचे गव्हर्नर बादशहाच्याकडून नेमण्यांत येणार असून बाकीच्या पांचांची नेमणूक हिंदुस्थान सरकारच्या सल्यानें स्टेट सेक्रेटरी मार्फत व्हावयाची आहे.

याशिवाय दुसरी एक सुधारणा करण्यांत आली आहे व तिचें महत्व फार आहे. आस्ते आस्ते जबाबदार राज्यपद्धतिची जाणीव उत्पन्न करण्याला प्रांतिक राज्यकारभार हेंच खरें कार्यक्षेत्र आहे; या क्षेत्रांत कांहीं जबाबदारी देणें एकदम जरूर आहे आणि परिस्थितीनें योग्यता उत्पन्न होईल त्यावेळीं पूर्ण जबाबदारी द्यावी असें मि. मॉंटेग्युनीं आपलें मत दिलें व त्या मताला अनुरूप अशी एक योजना त्यांनीं सुचविली व पुढें तिचाच अंगिकार करण्यांत आला. या योजनेनें प्रत्येक प्रांतांतील राज्यकारभाराच्या खात्यांचे दोन भाग करण्यांत आले असून त्यापैकीं एकास राखीव ( Reserved ) व दुसऱ्यास सोंपीव ( Transferred ) अशी नांवें देण्यांत आली आहेत. राखीव खातीं गव्हर्नर व एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर यांच्या ताब्यांत राहणार असून सोंपीव खातीं कायदे कौन्सिलांतील सभासदांपैकीं प्रमुख अशा पुढाऱ्यांच्या हवालीं करण्यांत आली आहेत, व त्यांस प्रधान ही संज्ञा देण्यांत आली आहे. या प्रधानांची नेमणूक करण्याचा अधिकार गव्हर्नराकडे ठेवण्यांत आला आहे. अशा रीतीनें जबाबदार राज्यपद्धतीचें तत्व प्रांतिक कारभारांत सामील करण्यांत आलें आहे.

या योजनेवर पुष्कळांनीं असा आक्षेप घेतला आहे कीं, प्रधानास निवडण्याचा अधिकार गव्हर्नराकडेंच ठेवण्यांत आल्यामुळें जबाबदार राज्यपद्धतीच्या तत्वांस हरताळ फासण्यांत आला आहे. परंतु या ह्मणण्यांत कांहीं अर्थ आहे असें आह्मास वाटत नाहीं. कारण "बहुतेक स्वयंसत्ताक वसाहतीमध्यें व प्रजासत्तात्मक राज्यामध्यें व खुद्द इंग्लंडच्या पार्लमेंटातहि मंत्रिमंडळ निवडून दिलेलें असत नाहीं; नेमलेलें असते. या सर्व ठिकाणीं जबाबदार राज्यपद्धतीच अमलांत आहे. पार्लमेंटच्या किंवा लोकप्रतिनिधींच्या सभेंत ज्या पक्षाची सरशी असते त्यांतील पुढाऱ्यांसच बहुधा प्रधानकीचीं वस्त्रें दिलीं जातात. मंत्रिमंडळाची

निवडणूक अशी केव्हांच होत नाहीं. स्वायत्त अशा वसाहतींमध्यें जबाबदार पद्धति संपूर्णपणें अमलांत असूनही, वरील रीतीनें मंत्रिमंडळ नेमण्यांत येतें. वसाहतींचा गव्हर्नरच मंत्रिमंडळ किंवा मुख्य प्रधान याची नेमणूक करितो. वसाहतीच्या गव्हर्नराप्रमाणें प्रांताच्या गव्हर्नरास हा अधिकार ठेवल्याबद्दल तक्रार करणें अगदीं असमंजसपणाचें आहे. मंत्रिमंडळास काढून टाकण्याचा अधिकार हल्लींच्या योजनेंत कसा ठेविला आहे हेही पाहिलें पाहिजे. लोकपक्षांतील नेमले जाणारे प्रधान कायदे कौन्सिलांतील लोकनियुक्त सभासदांपैकीं, असले पाहिजेत, असा निर्बंध घालण्यांत आला आहे. या प्रधानाचा कारभार लोकांना नापसंत होईल तर त्याच्या खात्याचे बजेट नामंजूर करितां येईल; व अशा रीतीनें लोकांची नापसंती व्यक्त झाली असतां राज्यकारभाराचा गाडा चालणें अशक्य होईल, व गव्हर्नरास लोकांच्या इच्छेस अनुसरून नवीन मंत्र्याची नेमणूक करणें भाग पडेल. लोकप्रतिनिधींना प्रधानाच्या कारभारासंबंधीं नापसंतीदर्शक किंवा निंदाव्यजक ठराव कौन्सिलांत बहुमतानें मंजूर करून घेतां येईल व अशा प्रसंगीं सर्व सुधारलेल्या देशांतील शिष्टसंप्रदायाप्रमाणें व रूढीप्रमाणें कोणत्याहि स्वाभिमानी प्रधानास आपल्या जागेचा राजीनामा देणें भाग पडेल. ही व्यवस्था अमलांत आल्यानंतर कायदेकौन्सिलाच्या हयाती पर्यंत- प्रधानावर लोकप्रतिनिधीस वरील प्रकारानें हुकमत चालवितां येईल. तीन वर्षांची मुदत संपल्यानंतर अप्रिय झालेल्या प्रधानास लोक निवडून देणार नाहींत व लोकांनीं निवडून न दिल्यास प्रधानाच्या जागेवर त्यास राहतां येणार नाहीं.'' (वि. ज्ञा. वि. पु. ४९. अं. ८) अशा रीतीनें सोपीव खात्यांचा कारभार लोकांच्या पसंतीनेंच चालणार आहे व या वरून प्रस्तुत योजनेंत जबाबदार राज्यपद्धति दिली नाहीं हा आक्षेप वस्तुस्थितीस सोडून आहे असें कोणासहि दिसून येईल. परंतु या योजनेंतील जबाबदार राज्यपद्धतीचें क्षेत्र व विस्तार अगदीं अकुंचित आहे असें मात्र म्हटल्यावाचून राहवत नाहीं. व या करितांच १९१९ च्या अमृतसर कॉंग्रेसनें हिंदी राष्ट्राच्यावतीनें या सुधारणावर अपुरा असमाधानकारक व निराशाजनक असा शिक्का ठोकला.

# प्रकरण पांचवें

## जिल्हाधिकारी.

If the Viceroy is the ceremonial symbol of the British Crown in India, it is the Collector who is the seat of authority so far as the mass of the people is concerned. He is the great sahib whose nod is to be obeyed, who gives and withholds, who taxes and administers justice, before whom all the great people of the village–bunyas and policemen, headmen and accountant, bow. He is the mighty one to whom the most flowery language & ornate titles apply. In fact in his care are the people of India He, or those who obey him, orders the life of the people, and next to the Creator and the laws of nature, he comes in the hierarchy of arbitrary powers. Those above him are too remote from the life of the people to be anything but indefinite gleams, those below him are owtwardly and visibly his servants.

*J. Ramsay Macdonald.*

**५२ राजा व प्रजा**–येथ पावेतों राज्ययंत्राच्या महत्वाच्या अंगाउपांगांचा आपण विचार केला व ही अंगेंउपांगें कोणच्या धाग्यानें मुख्य यंत्राशीं निगडीत झाली आहेत हेंही आपण पाहिलें. या प्रकरणांत राज्ययंत्राच्या किरकोळ अंगांचा विचार करून हा भाग संपवावयाचा आमचा मानस आहे. बारिक सारिक गोष्टींचा विचार करण्याचें कारण इतकेंच कीं, जरी वरवर पहाणाराच्या डोळ्यांत मोठ-

मोठ्याच गोष्टी येतात तरी त्या मोठ्या गोष्टींची सर्व मदार त्यांच्याशीं संबंध असलेल्या किरकोळ गोष्टींवरच असते. उदाहरणार्थ एक यंत्रच घ्या. यंत्र पाहिल्यावर आपल्या नजरेंत फक्त त्यांची मोठमोठी चाकें, दांड्या वगैरे भागच भरतो. पण ज्यांच्या योगें तें यंत्र उभारलें गेलें आहे, त्या लहान स्क्रूचा आपण विचारहि करीत नाहीं. वस्तुतःपहातां हें चुकीचें आहे. कारण त्या यंत्राची उभारणी केवळ स्क्रू सारख्या लहान भागामुळेंच झालेली असते. जो न्याय साध्या यंत्रास लागू, तोंच न्याय राज्ययंत्रासहि लागू असला पाहिजे. म्हणून जरी जिल्हाधिकाऱ्यांच्या हातीं मर्यादित प्रमाणांत फारच थोडी सत्ता असली तरी त्यांच्यावरील जबाबदारी मोठी असून खेडवळ प्रजेच्या दृष्टीनें त्यांचे महत्वहि फार आहे. एकाद्या खेडवळास तुझा राजा कुठें आहे असा प्रश्न विचारल्यास तो काय बरें उत्तर देईल ? प्रश्न विचारतांच तो एकाद्या मामलेदाराचें अगर कलेक्टराचे चट्कन नांव घेईल व जिल्हाच्या मुख्य ठिकाणीं तो असतो असे सांगेल. त्यांस बादशहा, भारतमंत्री व्हाइसराय अगर कायदेमंडळें या विषयीं कांहीच ज्ञान नसतें. गव्हर्नर अथवा व्हाइसरायाचें तोंड देखील त्यानें कधीं बघितलेलें नसतें. इतकेंच नव्हें तर कित्येकांस व्हाइसराय ह्मणजे काय गौड बंगाल आहे, ही काय चीज आहे हें सुद्धां माहीत नसतें. याचें कारण उघडच आहे. कारण आमचे बडे लाटसाहेब सिमल्याच्या गिरीकंदरांतून बाहेर निघतील तेव्हां ना ! दिल्ली व सिमला या दोन ठिकाणाशिवाय तिसरें ठिकाण त्यांना माहीत नसते. एकादवेळीं ह्यांची स्वारी देशपर्यटनास अगर हवा खाण्यास कधीं निघालीं, तरी ती मोठ्या शहरांतूनच हिंडणार ! ते थोडेंच खेड्यांत येणार आहेत ! बरें, शहरांत तरी यांच्याशीं भाषणाचा योग येईल असें ह्मणावें तरी तिकडूनहि निराशाच ! कारण जेथें बड्या बड्या रावसाहेब, खानसाहेबांसारख्या हांजीखोर दुष्टाचार्यांना जोडे फाडूनहि दर्शन घडण्याची मारामार, तेथें आमच्या गरीब खेडवळांची कोण दाद घेतो. अशी स्थिति असल्यामुळें त्यांना आपल्या खऱ्या राजाविषयीं तर राहूं द्याच, परंतु त्यांच्या प्रतिनिधीविषयीं सुद्धां कल्पना न येणें हा त्यांचा ःवाक नसून राजाचा आहे, असें वाचकांस दिसून येईल. यामुळेंच त्यांना जिल्हाधिकारी खऱ्या राजा-

प्रमाणें भासतों. याचें कारण एक तर जिल्हाधिकाऱ्याचें दर्शन घडण्याचा अपूर्व लाभ (?) त्यांना घडतो व दुसरें ह्मणजे ज्या दिवशीं या राजेश्रींचें आगमन त्यांच्या नगरीस घडते, त्यावेळीं तें त्यांना चांगलेंच जाणवतें. याचा अनुभव बहुधां सर्वांना आहेच. तेव्हां याविषयीं ज्यास्त लिहिण्याची जरुरी आह्मांस दिसत नाहीं. ही स्थिति केंव्हाहि वाईटच. परंतु समाधानाची गोष्ट ही कीं, आतां ह्या अज्ञान स्थितींतून आमचे गरीब देशबंधु बाहेर निघत असून आपल्या सभोंवतालील परिस्थितीची जाणीव त्यांस हळूं हळूं होत आहे. उत्तरोतर ही स्थिति सुधारून आपल्या देशाचें जेव्हां नशीब उघडेल तो सुदिन !

५३ **प्रांतांचे पोटविभाग**—राज्यव्यवस्थेच्या सोयीसाठीं हिंदुस्थानचे निरनिराळे पंधरा भाग पाडिलें आहेत, हें मागें सांगितलें आहेच. यास प्रान्त ह्मणतात. ह्या पंधरा प्रान्तांची क्षेत्रफळें सर्व सारखींच नसून तीं कमी ज्यास्त आहेत. ह्यांत तीन प्रान्त मोठें असून त्यांस प्रान्ताऐवजीं इलाखा ही संज्ञा आहे. मद्रास खेरीजकरून सर्व मोठ्या प्रान्तांच्या तीन पासून पांचापर्यंत विभाग (डिव्हिजन्स) पाडण्यांत आले आहेत. या प्रत्येक विभागावर एक एक कमिशनर असतो. हा सिव्हिलियन पैकींच असतों, हें निराळें सांगणें नकोच. प्रत्येक डिव्हिजन मध्यें चार पांच जिल्हे असतात. या प्रत्येक जिल्ह्यावर एक सिव्हिल सर्व्हंट असतो, त्यास कलेक्टर असें ह्मणतात. जिल्हाधिकाऱ्याचा प्रान्तिक सरकारशीं जो पत्रव्यवहार चालतों तो कमिशनरामार्फत चालतो. वास्तविक पहातां या कमिशनरांची कांहींच जरूरी नाहीं व त्यांना फारसें कामहि पडत नाहीं. नोकरशाहीनें आपल्या अमदानींत ज्या कांहीं फुकटखाऊ जागा उत्पन्न केल्या आहेत त्यांत यांची गणना होते. सुभ्याच्या एकंदर कारभारावर देखरेख करण्याचें काम त्याजकडें सोपलें असतें. सुभ्याचा पत्रव्यवहार मध्येंच याच्या हातीं पडत असल्यानें उलट कामांत विघ्नें उपस्थित होऊन दिरंगाई मात्र होते. व निकाल सत्वर न लागल्यामुळें जनतेचें अपरिमित नुकसान होतें. पण इकडे कोण लक्ष देतो ! ज्या ठिकाणीं हे फुकट खाऊ कमिशनर नाहींत, तेथें 'रेव्हेन्यू बोर्ड' नांवाच्या संस्था आहेत. मद्रास प्रांतांत असें बोर्ड आहेत.

**५४ जिल्ह्याचें क्षेत्रफळ व लोकसंख्याः**—वर जे जिल्हे सांगितले त्यांचे क्षेत्रफळ सरासरी ५००० चौरस मैल असतें व त्यांतील लोकसंख्या अदमासें दहा लाख असते. यापैकीं सर्व जिल्ह्यांचे क्षेत्रफळ व लोकसंख्या सारखी नसते. कांहीं जिल्हे अगदीं लहान असून त्यांची लोकसंख्याहि त्यामानानें कमी आहे. परंतु कांहीं जिल्हे लहान असूनहि मोठ्या जिल्ह्यांच्यापेक्षां त्यांतील लोकसंख्या ज्यास्त आहे. याचें कारण म्हणजे त्या जिल्ह्यांतील औद्योगिक सुधारणा व धान्यसमृद्धि होय. ज्या जिल्ह्यांत औद्योगिक कारखानें असून व्यापार भरभराटींत असतो, त्या जिल्ह्यांची लोकसंख्या साहजीकपणेंच ज्यास्त असते. ज्या जिल्ह्यांत अशा सोयी नसतात, त्या जिल्ह्यांतील लोकसंख्या बेताबाताचीच असते. कारण पोटापाण्याकरितां त्यांतिल रहिवाशांना स्थानत्याग करावा लागतो. उदाहरणार्थ संयुक्तप्रांतात निसर्गानें बहार उडवून दिली असल्यामुळें, कांहीं जिल्ह्यांच क्षेत्रफळ अवघे २००० चौरस मैल असतांनाहि त्यांची लोकसंख्या दहा लक्ष आहे. परंतु याच्या अगदीं उलट स्थिति मारवाड व महाराष्ट्रांतील कांहीं भागांत दृष्टीस पडते.

**५५ राज्यव्यवस्थेमध्यें जिल्ह्याचें स्थानः**—ब्रिटिश हिंदुस्थानांत जिल्ह्यास घटक असें मानिले जातें. असें जिल्हें एकंदर ब्रि. हिंदुस्थानांत २६७ आहेत व त्या सर्वांवर एक एक कलेक्टर असतो. प्रत्येक जिल्ह्यांत एकाच शासन पद्धतीनुसार कारभार चालतो. जिल्हा हें लोक व्यवहारचें केंद्र असल्यामुळें त्याचें महत्वहीं मोठें आहे. प्रान्ता प्रान्तांतील लोकांचा संबंध फारच कमी येतो परंतु जिल्ह्या जिल्ह्यांचे एकसारखें व्यवहार चाललें असतात. त्यामुळें राज्यकारभाराच्या दृष्टीनें जिल्ह्याचे महत्व ज्यास्त आहे. जिल्ह्यांतील प्रजेवरून सर्व देशाची अबादानी अजमाविली जाते. जिल्हा सुखी तर देश सुखी, अशी स्थिति असल्यामुळें जिल्ह्यांतील लोकांना सरकारास खूष ठेवावें लागतें.

**५६ जिल्ह्यांतील अधिकारी वर्ग**—जिल्ह्यांतील अधिकारी वर्गांत वरिष्ठ अधिकारी म्हणजे कलेक्टर होय. हा बहुधा इंडियन सिव्हिल सर्विस मधील गोरा अंमलदार असतो. परंतु नॉन रेग्युलेशन प्रांतांत अजूनहि फौजखात्यांतील

कांहीं इसम या जागेवर आहेत. अलीकडे कांहीं ठिकाणीं प्रॉव्हिंशियल सर्विस मधील इसमांना या जागेवर नेमण्यांत आलें आहे. कलेक्टरच्या हाताखालीं असिस्टंट कलेक्टर व डेप्युटी कलेक्टर असतात व ते अनुक्रमें इंडियन सीव्हिल सर्विस व प्रॉव्हिन्शियल सर्विस परीक्षा पास झालेले असतात. यांच्याहून कनिष्ट प्रतीच्या अंमलदारास तहशीलदार अगर मामलेदार असें ह्मणतात व त्यांना जिल्ह्यांतील पोटविभागाचे (यांस तालुका अगर तहशील ह्मणतात.) मुल्की व मॅजिस्ट्रेटी काम करावें लागते. या अंमलदार लोकांचा रयतेशीं अतीशय निकट संबंध येत असल्यामुळें हे जिल्हाधिपतीचे खालोखाल महत्वाचे अंमलदार आहेत. तालुक्याचे खालची राज्यव्यवस्थेची पायरी ह्मणजे गांव किंवा खेडीं. यांत एक गांवाचा मुख्य पाटील असतो, तो गांवाचा वसुल गोळा करतो. त्यास थोडे पोलिसचे अधिकार असतात. त्याचे मदतीस कुलकर्णी (अलीकडे तलाटी) व दुसरे नोकर असतात. या विषयीं पुढील एका प्रकरणांत सविस्तर हकीगत यावयाची असल्यामुळें येथें विस्तार करीत नाहीं.

**५७. कलेक्टरास करावयाची कामें**—जिल्ह्याधिकाऱ्यांस कलेक्टर-मॅजिस्ट्रेट अशी एक संयुक्त उपाधि आहे, तीवरून त्याच्या कार्याचा बोध होतो. कलेक्टर या शब्दाचा अर्थ, गोळा करणारा असा आहे. या अर्थाप्रमाणें त्यांस जिल्ह्यांतील जमीन बाब, स्टांप, ऐपतवेरा, वगैरेचा वसूल गोळा करावा लागतो. मॅजिस्ट्रेट या उपाधीनें त्यास फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटचे सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. यामुळें त्यांस अपराध्यांस दोन वर्षांची कैद व एक हजार रुपयापर्यंत दंड करतां येतो. खालचे मॅजिस्ट्रेट व पोलीस यांचेवर त्याची देखरेख असते. 'तसेंच तुरुंग, शाळा, रस्ते, दवाखाने, जंगल, नोंधणी (रजिस्ट्रेशन) वगैरेंचे स्थितींचे संबंधानेंही त्यास साधारण देखरेख करावी लागते. स्थानिक स्वराज्य व्यवस्थेप्रमाणें चालणारे कामावर त्यास देखरेखीचा अधिकार ठेविला आहे.' व बहुधा एक किंवा त्याहून अधिक म्युनिसिपालट्यांचा व जिल्हा बोर्डाचा तो अध्यक्ष असतो. हल्लीं म्युनिसिपालट्यावरील त्याचे अधिकार बरेच कमी करण्यांत आले आहेत. ह्या जिल्ह्याधिकाऱ्यांना आपल्या जिल्ह्यांत चार

महिने फिरतीवर जावें लागतें. त्यामुळें त्यांस त्यांचे हाताखालील प्रांताची माहिती होते व हाताखालील लोकांचे कामावर देखरेख ठेवण्यास सांपडून, रयतेसहि त्यांच्या कानावर आपली गाऱ्हाणी घालण्यास संधि मिळते. परंतु अशी संधि रयतेस मिळणें ह्मणजे तो एक कपिलाषष्ठीचा योगच ह्मणावयाचा ! त्यांतून ही संधि मिळालीच तरी तिचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. कारण 'एखाद्या बाबतींत रयतेनें जिल्ह्याधिकाऱ्यांकडे दाद मागावयास जाणें ह्मणजे कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या कारभाराची कागाळी करण्याचे स्वरूप त्यास आल्यावाचून सहसा राहात नाहीं ! अर्थात् कलेक्टर साहेबांची गांठ वर्षांतून एक दिवस पडणार, तर कनिष्ठ अधिकाऱ्यांची गांठ बाकी तीनशे चौसष्ट दिवस ! तीनशें चौसष्ट दिवसांचे उट्टें एक दिवसांत काढून घेऊं ह्मणणारा रयत धीट व धाडसी तर असलाच पाहिजे; पण धैर्याबरोबर सुदैवहि पदराच्या गांठीस बांधून त्यानें नेलें पाहिजे, तरच तो त्याचा उद्योग साधणार, नाहीं तर त्याच्या धिटाईच्या प्रमाणानेंच त्याला वर्षभर हाल सोसण्याची पाळी येणार ! ( के. ले. सं. पृ. ६०९ ). वर सांगितलेल्या कामाशिवाय लोकांची सांपत्तिक, सामाजिक, राजकीय व आरोग्य संबंधानें स्थिति कशी काय आहे, ह्याबद्दलहि त्यांस दरवर्षी सरकारास माहिती करून द्यावी लागते. व काय केलें असतां जिल्ह्याची स्थिति सुधरून ज्यास्त चांगली होईल, यासंबंधीं सूचना कराव्या लागतात.

**५८ न्याय व अंमल बजावणी खात्याची फारकत**–न्याय व अंमल बजावणी खात्याची फारकत करावी, कीं करूं नये ? हा प्रश्न कांहीं आजचा नाहीं. गेल्या चाळीस वर्षांपासून हिंदी जनतेचें लक्ष या महत्वाच्या प्रश्नाकडें वेधून राहिलें आहे. न्यायदान व त्याची अंमल बजावणी करण्याचें काम एकाच्याच हातीं असल्यानें लोकांस खरा न्याय निवाडा मिळूं शकत नाहीं. कारण एकाच मनुष्याच्या हातीं पोलिसाचे, पब्लिक प्रासिक्यूटराचे व न्याय देण्याचें काम सोंपविण्यांत आलें आहे ! एकादा मनुष्य जिल्हाधिकाऱ्याचा डोळयांत खुपत असेल तर त्यास तुरुंगाची अंधार कोठडी दाखविण्यास त्या अधिकाऱ्यांस अगदीं स्वल्प जातें. कारण कायद्यानें त्याजकडे तसा अधिकारच दिला आहे. तिरसट व अरे-

रावी जिल्हाधिकारी या अधिकाराचें मन चाहील तेंव्हा अतिक्रमण करितात व आपला इष्ट हेतू सफळ करून घेतात. यामुळें जोपर्यंत न्यायमनसुब्याचें व कायद्याची अंमल बजावणी करण्याचें काम एकाच्याच हातीं राहील तोपर्यंत जनतेस खरा खुरा न्याय मिळण्याची आशा नाहीं. व तोंवर न्याय देवतेची अशीच थट्टा होत राहणार, हें उघड आहे. खरें बोलावयाचें ह्मणजे ही स्थिति अगदीं गर्हणीय आहे व तिचें जितक्या लवकर उच्चाटन होईल तितकें लवकर झालें पाहिजे. प्रजेच्या हिताच्या दृष्टीनें पाहूं जातां हेंच आढळते. यासाठीं आज एकसारखीं चाळीस वर्षे प्रजेची धरपड चालली आहे. राष्ट्रीय सभेनें, निरनिराळ्या पुढाऱ्यांनीं व इतर हितेच्छूंनीं यादृष्टीनें नाना तऱ्हेचे प्रयत्न केले; परंतु त्यांपैकीं एकाच्याहि प्रयत्नांस यश आलें नाहीं, असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. राष्ट्रीय सभेनें याविरुद्ध कांहीं दिवस सतत टाहो फोडला आहे. परंतु नोकरशाहीच्या पाषाणहृदयास त्यामुळें यत्किंचितही द्रव आला नाहीं. उलट ज्या ज्या वेळीं हा प्रश्न प्रामुख्यानें पुढें मांडण्यांत आला, त्या त्या वेळीं तिनें या गोष्टीस विरोध केला आहे. इतकेंच नव्हें, पण तिनें अशावेळीं स्पष्ट बोलून दाखविलें आहे कीं, लोकमत व लोकांच्या आकांक्षा यांना विरोध करण्यांत तिला जितका आनंद होतो तितका दुसरा कशांतहि होत नाहीं !

इ. स. १७८७ मध्यें कोर्ट ऑफ डायरेक्टरसच्या हुकुमान्वयें लॉर्ड कॉर्नवालिसच्या कारकीर्दींत एकाच मनुष्याच्या हातीं न्याय व अंमल बजावणीची सत्ता देण्यांत आली. लॉर्ड कार्नवालिसची या गोष्टीस फारशी संमति नव्हती. परंतु वरिष्ठांच्या हुकुमापुढें त्याची मात्रा कांहीं न चालल्यामुळें ही पद्धत त्यावेळीं अंमलांत आली. परंतु पुढें लवकरच ही कुचकामाची असल्याबद्दल त्याची खात्री पटून सन १७९३ सालीं हीस मूठमाती देण्यांत आली. परंतु हें गाडलेलें भूत १८२१ सालीं पुनः वर आलें व आणखी सोळावर्षांनीं म्हणजे १८३७ सालीं त्यांस पुनरपि गाडण्यांत आलें. हें भूत आतां कायमचें गाडलें गेलें, अशी त्याकाळीं कित्येकांची कल्पना झाली होती; परंतु ती वृथा ठरून १८५८ च्या बंडानंतर त्यानें जमीनींतून पुनः उसळी मारून आपलें डोकें वर काढलें. १८६० सालीं सर्व

प्रांतांतील हुशार लोकांचें एक कमिशन पोलिस संघटनेंबद्दल विचार करण्याकरितां नेमण्यांत आलें. कमिशननें एकाच्याच हातीं दोन्ही गोष्टी ठेवण्याच्या पद्धतीचा निषेध केला. परंतु विशेष जरूरीच्या प्रसंगीं कांहीं मुदतीपुरतें हे दोन्ही अधिकार कलेक्टरनें भोगावें अशी शिफारस केली. सन १८६१ सालच्या ५ व्या अॅक्टांत या शिफारशीचा समावेश करण्यांत आला होता. परंतु त्यावेळीं हें तेवढ्यावरच राहून हा प्रश्न मागें पडला. १८७२ सालीं ज्यावेळीं क्रिमिनल प्रोसीजर कोडाचा दुसरा कायदा पास झाला, त्यावेळीं वरील शिफारशीस मूर्त स्वरुप देण्याची सुसंधी प्राप्त झाली होती; परंतु त्यावेळीं गव्हर्मेंटच्या इज्जतीचा प्रश्न पुढें करण्यांत येऊन न्याय व अंमल बजावणी खात्याची फारकत करण्याचें पुनः एकदां टाळण्यांत आलें.

राष्ट्रीय सभेनें या अन्यायाविरुद्ध एकसारखी ओरड चालू ठेवल्याचे वर सांगितलें आहेच. परंतु तिच्या ओरडण्याकडे सरकारनें ढुंकून सुद्धां बघितलें नाहीं. १८९३ सालीं भारतमंत्र्यानें या फारकतीस आपली मान्यता दिली. परंतु ती अंमलांत आली असतां खर्च फार वाढेल, या सबबी खालीं तिचा अंमल करण्याचें त्यानें टाळलें. ह्या गोष्टीस भारतमंत्र्याची मान्यता मिळाल्यानंतर कांहीं दिवसांनीं कै० रमेशचंद्र दत्त यांनीं फारकत कशी करावी, या बद्दल बराच उहापोह करून कमी खर्चाची अशी एक योजना सरकार पुढें मांडली. जिल्हाधिकाऱ्यांकडें फक्त मुलकी अधिकार ठेवून त्याच्या हाताखालीं कांहीं डेप्युटी कलेक्टर नेमण्यांत यावेत; त्यांच्याकडे न्याय मनसुब्याचे काम देण्यांत यावें; व सेशन जज्जच्या हाताखालीं त्यांनीं काम करावें, असा त्या योजनेचा आशय होता. सर रिचर्ड गार्थ व मि. रेनाल्डस या दोघां सन्माननीय सरकारी अमलदारास मि. दत्त यांची योजना सर्वस्वी पसंत पडली होती. वरील दोघे गृहस्थ सरकारच्या पदरीं मुलकी व न्यायखात्यांत काम करून निष्णात झाले असल्यामुळें दत्त यांची योजना पर्यायानें सरकारास पसंत पडली, असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. १८९९ सालीं लॉर्ड हॉबहौस प्रभृति चार पांच युरोपियन अमलदारांनीं आपल्या सहीचा, न्याय व अंमल बजावणी खात्याची फारकत करण्यासंबंधाचा एक अर्ज भारतमंत्र्यास सादर केला. परंतु त्याचा त्यावेळीं कांहींच उपयोग झाला नाहीं.

परंतु १९०८ सालीं या प्रश्नास पुनः चालन मिळून सरकारनें वरील अधिकारांची फारकत करण्याचें ठरविलें. ता. २५ मार्च रोजीं वरिष्ठ कायदे मंडळांत सरकार-तर्फे मि. अॅडमसन यांनीं बंगाल प्रांतास हें धोरण लागू करण्यांत येईल असें जाहीर केलें. त्यावेळीं त्यांनीं केलेल्या भाषणांत प्रचलित पद्धतीचा तीव्र शब्दांत निषेध केला होता. पक्षपाताच्या दूषित हवेपासून न्यायासन अलिप्त नसतें, असें त्यांनीं त्यावेळीं स्पष्ट म्हटलें होतें. सरकारचें धोरण अशा रीतीनें जाहीर झाल्या-मुळें सर्वांस फारच आनंद झाला. परंतु सरकार या बाबतींत जाणून बुजून चाल-ढकल करीत आहे असें कळल्याबरोबर, या आनंदावर विरजण पडलें. पब्लिक सर्विस कमिशनच्यावेळीं हा प्रश्न पुन्हा उपस्थित झाला होता व त्यावेळीं सर्व हिंदी लोकांनीं या सुधारणेस आपला दुजोरा दिला होता. बंगाल प्रांतानें तर या बाब-तींत अघाडी मारली होती. परंतु हिंदुस्थानच्या कमनशिबानें नतद्रष्ट अंग्लो इंडि यनांनीं याविरुद्ध ओरड करून हिंदी लोकांच्या फार दिवसाच्या मागणीस खो देण्याचें श्रेय ( ? ) घेतलें. सरकारनेंही इज्जतीच्या भरीस पडून पूर्वीप्रमाणेंच याही खेपेस हिंदी लोकांच्या मागणीस ओ दिली नाहीं !

## प्रकरण सहावें.

### कायदे मंडळें.

५९ **विषयाचा उपक्षेप**—व्हॉइसरॉय व प्रांताधिपतींना मदतनीस म्हणून कायदे कौंसिलें देण्यांत आली आहेत, हें मागील प्रकरणांत सांगितलें आहेच. या प्रकरणांत या कौंसिलांची घटना कशी आहे व कोणच्या रीतीनें अधिकाऱ्यांना ही मदत करतात, हें पहावयाचें आहे. परंतु त्यापूर्वी कायदा कसा असावा या विषयीं चार शब्द लिहून मूळ विषयाकडे वळतो.

६० **कायद्याची अवश्यकता व स्वरूप**—राज्य म्हणजे काय ! व त्याची समाजास किती अवश्यकता आहे, हें कोणास नव्यानें सांगावयास पाहिजे

असें नाहीं. समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें स्वतःच्या मालमत्तेचें व जीविताचें संरक्षण करण्याकरितां ज्या अधिकाऱ्यांच्या हातांत सत्ता दिली असते, त्या अधिकाऱ्यांच्या संघास आपण राज्य किंवा सरकार असें म्हणतो. समाज सुरक्षित रहावा; त्यांतील प्रत्येक व्यक्तीच्या जन्मसिद्ध हक्कांची दुसऱ्यांकडून पायमल्ली होऊं नये; व दरेकाची मालमत्ता सुरक्षित रहावी म्हणून अशा शासनसंस्थेची ( राज्य ) फार अवश्यकता असते. समाजांतील प्रत्येक व्यक्ति चांगल्या स्वभावाचीच असली पाहिजे असें नाहीं. व्यक्ति तितक्या प्रकृति हा न्याय यामुळेंच त्रिकालाबाधित आहे. प्रत्येक व्यक्तिमात्राच्या मनावर विचारापेक्षां विकाराचा पगडा लवकर बसत असल्यामुळें प्रत्येकाची मनःप्रवृत्ति सुकर्माकडें न झुकतां कुकर्माकडेंच ज्यास्त झुकते. ज्याच्या मनावर रागलोभादी विकारांचा पगडा लवकर बसतो त्याच्या हातून वाईटकर्में होण्याचा विशेष संभव असतो. म्हणूनच अशा मनुष्यास आपण वाईट मनुष्य असें म्हणतो व त्याच्या वाईट कृत्यांस आपण गुन्हा म्हणतो. ही वाईट माणसें वर सांगितल्याप्रमाणें प्रत्येक समाजांत थोड्या बहुत प्रमाणांत असतात व त्यांची नेहमीं स्वार्थाकडे दृष्टी असते. स्वतःच्या फायद्याकरितां दुसऱ्याचें नुकसान करण्यास, ही मागें पुढें पहात नाहींत. इतकेंच नव्हे, तर कधीं कधीं स्वतःच्या फायद्याकरितां हे स्वार्थांध दुसऱ्याचे जिवावर उठण्यासहि कमी करीत नाहींत. अशा स्वार्थलंपट व नीच मनोवृत्तींच्या माणसांकडून समाजास कोणच्याहि रीतीनें उपसर्ग न व्हावा म्हणून वरील संघामार्फत एकसारखें प्रयत्न चालू असतात. समाज सुरक्षिततेसाठीं या संघामार्फत कांहीं नियम ऊर्फ कायदे करण्यांत येतात व ते मोडणारास या संघाकडून शासन होतें. आतां कायदे असल्यामुळें राज्यांत गुन्हे मुळींच घडत नाहींत असें मात्र कोणी समजूं नये. कारण गांव असतो, तेथें महारवडा हा असावयाचाच! या कारणामुळें गुन्ह्यांस जरी पूर्ण आळा बसला नसला तरी गुन्ह्यांच्या प्रमाणास बराच आळा बसला आहे. आपण जर कायद्याविरुद्ध अमुक वाईट गोष्ट केली तरं आपणास शिक्षा होईल. अशी प्रत्येकास जाणीव असल्यामुळें सहसा गुन्हा करण्यास कोणी हि उद्युक्त होत नाहीं. निवळ शिक्षेच्या या धाकामुळें किंवा कायद्याच्या जरबीमुळें होणारा हा फायदा कांहीं

थोडा थोडका नव्हे. व या करितांच सर्व देशांत कायद्याची अत्यंत जरूरी भासते.

वर सांगितलेल्या राज्यशकटाची उभारणी त्याच्या घटनेवर व त्यांतील कायदेकानूवर झालेली असते. परंतु तें कोणा एकाद्या व्यक्तीच्या मालकीचें नसून राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीचा त्यावर हक्क असतो. करितां त्याची घटना अशी असावी कीं, जीमुळें राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीचें किंवा सबंध राष्ट्राचें हीतच होईल. कोणच्या हि राज्याचें शक्तिसर्वस्व न्याय या एका अनन्यसाधारण वस्तूंत साठविलेलें असतें. न्याय व समता या जोडीवर सर्व राज्याची मदार अवलंबून असल्यामुळें, जोपर्यंत त्यांतील रहिवाशांस राज्यशकट नीतीनें हाकला जात आहे असें वाटतें, तोपर्यंत राज्यांत असंतोषास कोठेंच जागा उरत नाहीं. परंतु राज्यकारभारांत उगींच कोठें एकादें छिद्र जनतेस आढळून आल्यास असंतोषास तेवढींच वाव मिळतें व त्यामुळें राज्यावर अनर्थ कोसळतो. लोकांना छिद्र सांपडून त्यांच्या मनांत किन्तु येण्याचा अवकाश कीं, त्यामुळें त्या छिद्रावर संशयखोर-मनुष्यास मनोरें बांधण्यास संधी मिळते व पुढें संशय वाढत गेल्यानें राज्याचें मातेरें होतें. राज्यकरणाऱ्या व्यक्तीजवळ किंवा प्रजासत्ताक राज्य असल्यास एका विविक्षित विचाराच्या पक्षाजवळ सैन्य व फौजफाटा असल्यामुळें त्याच्या जोरावर राज्यकरणारी व्यक्ती वा समानविचारी पक्ष अन्यायानें, प्रसंगविशेषीं जुलमानें, राज्य करून आपलें शीर सलामत राखूं शकेल, हें खरें; परंतु त्यामुळें प्रजेंत असंतोष पसरून कांहीं दिवसांनीं या असंतोषाचें पर्यवसान बंडांत झाल्याशिवाय कधीं हि राहणार नाहीं. कारण प्रजेत असंतोष पसरला कीं, राज्याचें सदैव हित चिंतणाऱ्या व्यक्तीच्या कानापर्यंत त्या असंतोषाचा कोलाहल जाऊन पोंचतो; व हे हितचिंतक त्यामुळें विरोधी बनतात. व अखेर राज्याचा नाश होतो. एवढ्या करितां देशाचे कायदे करतानां त्या देशांतील प्रत्येक व्यक्तीच्या हितसंबंधाकडे लक्ष देणें जरूर आहे. यामुळें कोणाचे हि नुकसान होणार नाहीं. शासन विषयक वा इतर कायदे करतानां या एका गोष्टी कडेच केवळ लक्ष देऊन चालणार नाहीं. एकादा शिल्पज्ञ किंवा हुशार मिस्त्री घर बांधताना, या जमीनीस टरील इमारत पेलवेल किंवा नाहीं, या प्रश्नाकडे जसें लक्ष पुरवितो त्याप्रमाणें कायदे

करतांना देखील, ज्या लोकांकरितां कायदे करावयाचे त्या लोकांना ते आवडतील कीं नाहींत, या गोष्टीकडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे. याचें कारण असें कीं, केलेला कायदा किती हि चांगला असो, जर त्यामुळें त्यांच्या पुराणप्रियतेस, किंवा धार्मिक भावनास, अगर रूढ व्यवहारास बाध येत असेल तर त्या कायद्याविरुद्ध लोकमत तयार होण्यास उशीर लागत नाहीं. कारण जुनें तें सोनें या भावनेनें बहुतेकास घेरलें असल्यामुळें रूढीविरुद्ध जाण्यास लोक कचरतात व त्यामुळें केलेला कायदा त्यांच्या हिताचा असतांना हि, ते जाणून बूजून वऱ्या वाइटाकडें दुर्लक्ष करितात. या ह्मणण्याची सत्यता पटविण्यास सुधारकांचें एकच उदाहरण पुरेसें आहे. वाईट जनरूढीविरुद्ध सुधारक जेव्हां आचरण करितात तेव्हां त्यांच्यावर टीकेचें कोरडें कित्येकांकडून ओढलें जातात; कधीं कधीं तर त्यांच्या प्राणावर हि बेततें. यामुळें, ज्याप्रमाणें एकादा मूर्ख व भित्रा रोगी डॉक्टरच्या हातांत शस्त्र पाहून शस्त्रक्रिया केली असतां आपण व्याधिमुक्त होऊं, असें माहित असतांना देखील भीतीनें पळून जातो; त्याप्रमाणें अमुक एका कायद्यानें आपलें कांहीं वाईट न होतां, उलट झालें तर कल्याणच होईल, असें वाटत असतानांहि, लोक तो कायदा पत्करण्यास तयार होत नाहींत. याकरितां राज्यकर्त्यांनीं आपल्या आचार विचारांचें जनता अनुकरण करील असें धोरण ठेवावें. ह्मणजे त्यांस प्रजेकडून क्वचित् प्रसंगींच विरोध केला जाईल. जर कोणी लोकांच्या अनुमतीवाचून त्यांच्यावर एकादा कायदा जबरीनें लादूं पाहील तर तें अगदीं वेडेपणाचें होईल; शिवाय त्यांत कोणाचा फायदा होणार नाहीं तो निराळाच. आणि या करितांच कायदेकानू करण्याचें काम अलीकडे प्रजेच्या हातांत देण्यांत आलें असून, राज्यकरणाऱ्या व्यक्तीकडें अगर पक्षाकडें या कायद्यांचा नीट अमल होत आहे कीं नाहीं, हें पहाण्याचें काम राहिलें आहे. ज्या राज्यांत अशी स्थिति नसते व जेथें अरेरावी पद्धतीनेंच लोकांची इच्छा विरूद्ध असतांना हि कायदे पास करून त्यांची अमल बजावणी केली जाते, त्या राज्याचा विनाशकाल जवळ आला आहे, असें पक्कें समजावें. कारण लोकांच्या इच्छे विरुद्ध पास केलेल्या कायद्यांची अमलबजावणी करावयाची झाल्यास, अमलबजावणारास सोटेशाहीचें

अनुकरण करावें लागतें व त्यानें शस्त्रास हात घालतांच प्रजा सुद्धां त्यांचेच अनुकरण करते; नव्हे, तसें करणें तिला भाग पडतें. अशा त-हेनें जेथें राजांत व प्रजेंत वितुष्ट पडलें असतें तेथें राज्यास चिरस्थायिता कशी येणार ?

**६१ स. १८३३ चा चार्टर ॲक्ट**—स. १८३३ सालापूर्वी कायदे करण्यांस कौंसिल रूपी संस्था नव्हत्या. कायदे करण्याचें काम त्यावेळीं कार्यकारी मंडळाकडेच होतें. मुंबई, मद्रास व बंगाल हे प्रांत कंपनीच्या राजकीय आयुष्याच्या सुरूवातीपासूनच अस्तित्वांत असल्यामुळें त्यांना अशीं कार्यकारी मंडळें होतीं व तीं आपआपल्या हद्दी पुरते कायदे करीत असत. परंतु पुढें हिंदुस्थानांतील राज्यकारभाराची सर्व सूत्रें कंपनीच्या हातीं आल्यानंतर कायद्यांच्या विविध प्रकारामुळें राज्यकारभारांत घोंटाळा उत्पन्न होऊं लागला. ही स्थिति टाळण्याकरितां कायद्यांत एकसूत्रता व सारखेपणा असावा अशी जाणिव सर्वांस झाली. त्यामुळें स. १८३३ च्या चार्टर ॲक्टानें प्रांताधिपतींच्या कार्यकारी मंडळीचे कायदे करण्याचें अधिकार हिरावून घेतलें व कायदे करण्याची सर्व सत्ता ग. जनरलास देण्यांत आली. ग. जनरलाच्या कार्यकारी मंडळांत कायदे करण्याकरितां एक चवथा सभासद नेमण्यांत येऊन त्याच्या मदतीस कायदेपंडितांचे एक बोर्ड देण्यांत आलें. ह्या न्यायमंत्र्यानें फक्त कायदे करण्याच्या वेळींच कार्यकारी मंडळाच्या बैठकींत भाग घ्यावा असा निर्बंधहि त्याचवेळीं घालण्यांत आला.

**६२ प्रथम परिवर्तन**—पुढें १८५३ सालच्या चार्टर ॲक्टानें कायदे कौन्सिलच्या वरील घटनेंत महत्वाचे फेरफार करण्यांत आले. न्यायमंत्र्यास कौन्सिलच्या हरएक कामांत यापूर्वी भाग घेतां येत नसे. या कायद्यानें हा प्रतिबंध नाहींसा झाला. त्यास ग. जनरलच्या कौन्सिलचा एक साधारण सभासद गणण्यांत येऊन इतर सभासदांस असलेलें सर्व अधिकार मिळाले. या वेळेपर्यंत एकच ह्मणजे कार्यकारी कौंसिलच कायदे करण्याचें व राज्यकारभाराचे काम पहात असे. परंतु या वेळेपासून या कौंसिलची कायदे करण्याकरितां वाढ करण्यांत येऊन त्यांत खालील १२ सभासद असावेत असें ठरलें (१) गव्हर्नर जनरल

( २ ) मुख्य सेनापति (३-६) ग. जं. च्या कार्यकारी मंडळाचे चार सभासद ( ७ ) बंगालचे सर न्यायाधीश ( ८ ) साधारण न्यायाधीश ( ९ । १२ ) चारी प्रांताचे चार पगारी प्रतिनिधी. ( या प्रतिनिधीस सालिना ५०० पौंड तनखा मिळत असे. ) अशा रीतीनें हें नवें कायदे मंडळ वाढविण्यांत येऊन त्यांतील सर्व कारभार पडद्याआड न चालवितां उघड चालवावा व सभेचे कामकाजाचा रिपोर्ट छापून काढावा असें ठरलें.

६३ द्वितीय परिवर्तन—स. १८६१ सालच्या कौंसिल ॲक्टानें कायदे मंडळाच्या सुधारणेंत एक पाऊल पुढें टाकलें. त्यामुळें कायदे करण्याकरितां या कौंसिलची वाढ करण्यांत येऊन त्यांत ६ पासून ज्यास्तींत ज्यास्त १२ सभासद असावेत; त्यापैकीं निदान अर्धे बिन सरकारी सभासद असावेत व सभासदांची ग. जनरलनें दोन वर्षां करितां नेमणूक करावी, असें ठरविण्यांत आलें. या शिवाय ज्या प्रांतांत कौंसिलची बैठक भरत असे, त्या प्रांतांतील ले. गव्हर्नरास या कौंसिलाचा जादा सभासद या नात्यानें बैठकींत भाग घेतां येई.

स. १८५३ सालच्या चार्टर ॲक्टानें स्थापित झालेल्या कायदे कौंसिलचे काम पार्लमेंटच्या धर्तीवर चालत असे. त्यामुळें कार्यकारी मंडळाच्या कारभाराविषयीं सभासदांस प्रश्न करता येत व त्यांच्या युक्तायुक्ततेची ते चर्चा हि करीत. परंतु कार्यकारी मंडळांस हें बरोबर न वाटून कायदे कौंसिल आपल्या अधिकाराचे अतिक्रमण करीत आहे, अशी त्यानें तक्रार केली. यामुळें, या कायद्यानें कायदे कौंसिलचे हे अधिकार काढून घेण्यांत आले. हिंदुस्थानचें उत्पन्न, कर्ज, धर्म, लष्कर, आरमार व नेटीव संस्थानांशीं असलेले संबंध यांव्यतिरिक्त बाबींसंबंधानें कायदे करण्याचा अधिकार या कौंसिलास देण्यांत येऊन राणीच्या अमलाखालील हिंदुस्थानांत त्यांचा अमल चालावा असें ठरलें. परंतु अशा कायद्यांस गव्हर्नर जनरलाची संमति मिळाली पाहिजे, अशी अट त्याचवेळीं घालण्यांत आली. तसेंच आणीबाणीच्यावेळीं ग० जनरलास जाहीरनामे काढून कायदे करण्याचा अधिकार देण्यांत येऊन त्यांचा अंमल सहा महिने रहावा असें ठरलें.

मुंबई व मद्रास येथील कौंसिलांचे कायदे करण्याचे अधिकार स. १८३३ च्या

चार्टर ॲक्टानें काढून घेण्यांत आले होते. परंतु या कायद्यानें हे अधिकार त्यांना परत मिळून कायदे करण्याकरितां त्यांच्या मदतीस एक ॲडव्होकेट जनरल व चार ते आठ जादा सभासद देण्यांत आले. या शिवाय ग० जनरलास बंगाल, वायव्यप्रांत व पंजाब या प्रांतांत कायदे मंडळें स्थापण्याचा अधिकार देण्यांत आला. त्याप्रमाणें स. १८९२ सालीं बंगालमध्यें, १८८६ सालीं संयुक्त प्रांतात, १८९८ सालीं ब्रह्मदेशांत, १९०५ सालीं पूर्व बंगाल व आसाम आणि मध्यप्रांतात कायदे मंडळें स्थापण्यांत आलीं. परंतु या प्रांतिक कायदे मंडळांनीं पास केलेल्या कायद्यांस ग० जनरलची संमति मिळाल्यासच कायद्याचें स्वरूप व बंधनत्व प्राप्त होत असे.

**६४ तृतीय परिवर्तन**--स. १८९२ च्या कौन्सिल ॲक्टानें कायदे मंडळांच्या सुधारणेच्या बाबतींत आणखी एक पाऊल पुढें टाकल्यामुळें कौन्सिलांच्या घटनेंत महत्वाचे फेरफार घडून आले. हें परिवर्तन घडून येण्यास मुख्यतः हिंदी लोकांचीं राजकीय जागृतीच कारणीभूत झाली. आतां पर्यंत झालेल्या दोन परिवर्तनांत हिंदी लोकांचा विशेषसा हात नव्हता. परंतु या सुमारास हिंदी लोकांस स्वत्वाची जाणीव झाल्यामुळें. व विशेषतः इंग्रजी विद्येच्या प्रसाराबरोबर त्यांच्यांत आत्मतंत्रपणाची भावना किंवा स्वयंनिर्णयाची इच्छा उत्पन्न झाल्यामुळें त्यांना परकीयांचा अंमल दुःसह व जाचक वाटूं लागला. त्यावेळीं सरकार अरेरावी पद्धतीनेंच राज्यकारभार चालवीत असे. अर्थात् ही स्थिति त्यांना पसंत पडणें शक्य नव्हतें. यामुळें, ही स्थिति बदलून राज्यकारभारांत लोकमताचा शिरकाव करून घेण्याच्या इच्छेनें त्यांनीं चळवळ सुरूं केली. या चळवळीचा कांहीं उदारधी ब्रिटिश मुत्सद्यांच्या मनावर योग्य तो परिणाम होऊन त्यांनीं या बाबतींत हिंदी लोकांस सहानुभूतीनें मदत करण्याचें ठरविलें. यामुळें, उशिरा कां होईना, सरकार जागें झालें व आपल्या कृत्यावर वारंवार होणाऱ्या टीकेला उत्तर देण्याची, व लोकपक्षाच्या प्रतिनिधींना आपली गाऱ्हाणी सांगण्याची संधी मिळावी म्हणून पूर्वीच्या कायद्यांत त्यानें सुधारणा करण्याचें ठरविलें. ही सुधारणा वर सांगितलेल्या कौंसिल ॲक्टानें घडून आली. ‘हा कायदा अवघा आठ कलमी आहे;

परंतु त्यांतील तत्वें राजकीय प्रगतीच्या दृष्टीनें अतिशयित महत्वाची आहेत. पहिल्या कलमानें वरिष्ठ ( कायदे ) मंडळांतील जादा सभासदांची संख्या दहा तें सोळापर्यंत, व प्रांतिक मंडळांतील सभासदांची संख्या आठ तें वीसपर्यंत करण्यांत आली. दुसऱ्या कलमानें सभासदांना प्रश्न विचारण्याचा व अंदाजपत्रकावर वादविवाद करण्याचा अंशतः अधिकार मिळाला. या कायद्यांत कोठेंही निवडणुकीचें तत्व उघडपणें मान्य केलेलें दिसत नाहीं. परंतु तें अप्रत्यक्षपणें सर्वांनीं कबूल केलें व त्याप्रमाणें वहिवाटही सुरू झाली. ( स्व. मी. पृ. १५१ )

६५ **मोर्ले-मिंटो सुधारणा**--अशाप्रकारें कायदे मंडळांची वाढ होऊन त्यांच्या रचनेसंबंधानें अप्रत्यक्षपणे निवडणुकीचें तत्व अंगिकारण्यांत आलें खरें, परंतु त्या योगानें हिंदी लोकांचे बिलकुल समाधान झालें नाहीं. उलट जास्त सुधारणा करितां जनतेनें सरकारच्या पाठीमागें एकसारखें लकडे मात्र लावलें. परंतु सरकारनें त्यांस बिलकूल दाद दिली नाहीं. परंतु रुसो-जपानी युद्धाचा वणवा पेटतांच, त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीशीं तोंड देण्याकरितां सरकारनें आणखी थोड्याशा सुधारणा लोकांच्या तोंडावर टाकण्याचें ठरविलें. या वेळीं लॉर्ड मोर्ले याजकडे भारतमंत्र्याचा रुमाल होता व व्हाइसरॉयच्या पदावर लॉर्ड मिंटो होते. कायदे मंडळांची सुधारणा करण्याच्या बाबतींत दोघांचेहि एकमत असल्यामुळें स. १९०९ चा कौंसिल ॲक्ट पास होण्यास विशेषशीं अडचण पडली नाहीं. या व स. १९१२ च्या ॲक्टानें सन १८६१ व १८९२ च्या कायद्याप्रमाणें वरिष्ठ व प्रांतिक कायदे कौन्सिलांत जे जादा सभासद असावयाचे, त्यांची संख्या वाढविण्यांत येऊन प्रांतिक कायदे मंडळांतून बिन अधिकारी (Non officials) लोकांचे बहुमत ठेवण्यांत आलें. खालील कोष्टकावरून वरिष्ठ व प्रांतिक कायदे मंडळाची या ॲक्टांनुसार झालेली घटना कशी होती, हें दिसून येईल.

| कायदे मंडळ. | सभासदांचे वर्गीकरण. | | | | सरकार नियुक्त व लोक नियुक्त सभासदांची परम संख्या. (कार्यकारी मंडळाच्या सभासदासह). |
|---|---|---|---|---|---|
| | सरकारी सभासद. | | बिन सरकारी सभासद. | | |
| | कार्यकारी मंडळाचे सभासद. | सरकारी नोकर. | लोकनियुक्त. | सरकार नियुक्त. | |
| वरिष्ठ | ८ | २८ | २७ | ५ | ६८ |
| मद्रास | ४ | १६ | २१ | ७ | ४८ |
| मुंबई | ४ | १४ | २१ | ९ | ४८ |
| बंगाल | ४ | १६ | २८ | ५ | ५३ |
| संयुक्त प्रांत | ० | २० | २१ | ८ | ४९ |
| पंजाब | ० | १० | ८ | ८ | २६ |
| ब्रह्मदेश | ० | ६ | १ | १० | १७ |
| आसाम | ० | ९ | ११ | ५ | २५ |
| बिहार व ओरिसा | ३ | १५ | २१ | ५ | ४४ |
| मध्यप्रांत व वऱ्हाड. | ० | १० | ७ | ११ | २८ |

या शिवाय कौंसिलचे अधिकारहि वाढविण्यांत आले. अंदाजपत्रकावर वादविवाद झाल्यानंतर यापूर्वी मतें देता येत नसत. परंतु या अॅक्टानें हा प्रतिबंध नाहींसा होऊन सार्वजनीक बाबी संबंधानें वादविवाद करण्याचा अधिकारहि सभासदास मिळाला. या शिवाय पूर्वी प्रश्न करण्याचा हक्क होता तो तसाच कायम ठेवण्यांत येऊन प्रश्नोत्तर प्रसंगीं अगाऊ नोटिस न देतां जागच्या जागींच एकादा पुरवणी प्रश्न विचारण्याची सभासदास मोकळीक ठेवण्यांत आली. या सवलतीमुळें प्रश्न विचारण्याच्या कामीं कुशल अशा सभासदास एकाद्याच पण चाणाक्षपणाच्या उपप्रश्नानें उत्तर देणाऱ्या अधिकाऱ्याची वकिला

प्रमाणें मार्मिक उलट तपासणी करता येई. त्याप्रमाणेंच ‘ कुशल शस्त्रवैद्याप्रमाणें सफाईच्या एका हाताबरोबर उत्तराच्या पोटांतील विषयावरील शब्दमय माया पटल छाटून काढतां येत असें. परंतु ही सवलत असून नसून सारखीच होती. कारण प्रश्नाचें उत्तर दिलेंच पाहिजे, अशी जबाबदारी अधिकाऱ्यावर नव्हती. त्यांना वाटलें तर ते अशा प्रश्नाचें उत्तर देत, नाहीं पेक्षां मुख्य प्रश्नाप्रमाणेंच ठरावीक नोटिस दिल्याखेरीज उत्तर देत नाहीं, असा जबाब देऊन ते मोकळे होत!’

६६ **वर्तमानरूप**-अशा रीतीनें कायदे मंडळांची सुधारणा करण्यांत आली खरी; परंतु त्यानें लोकमताचें समाधान झालें नाहीं. हिंदी लोकांनीं या सुधारणावर अपुरा व असमाधानकारक असा शिक्का मारला. कारण त्यांना सरकारवर प्रत्यक्षपणें अधिकार गाजवावयास पाहिजे होता व त्याकरितां त्यांना कौन्सिलांची घटना पार्लमेंटच्या धर्तीवर व्हावयास पाहिजे होती. परंतु सरकारनें ‘ तुम्ही अजून नालायक आहांत, पात्रता दाखवा म्हणजे पुढें पाहूं ’ असें उत्तर देऊन वेळ मारून नेली. या सुधारणांचे आद्यप्रवर्तक जे मोर्लेसाहेब, त्यांनीं त्यावेळीं असें स्पष्ट म्हटलें होतें कीं, जर या सुधारणामुळें हिंदुस्थानांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें पार्लमेंटरी पद्धति अस्तित्वांत येत असेल, तर मला या सुधारणाशीं कांहींच कर्तव्य नाहीं. यामुळें लोकांच्या असमाधानांत भर मात्र पडून अप्रत्यक्षपणें एक फायदा हिंदी लोकांच्या पदरांत पडला. त्यांनीं ज्यास्त सुधारणासाठीं जोरानें चळवळ सुरू केली. इतक्यांत युरोपांत महायुद्धाचा वणवा पेटून साम्राज्य सरकारावर एक मोठें गंडांतर आलें. त्यांतून पार पडण्यास हिंदुस्थानानें त्यांस कल्पनातीत सहाय्य केलें व त्यांत हिंदी लोकांची कर्तृत्वशक्ति, त्यांची निष्ठा आणि शौर्य सर्व जगाच्या निदर्शनास आली. यामुळें इंग्रज लोकांचा दृष्टिकोण बदलून त्यांनीं हिंदुस्थानास स्वराज्य देण्याचें जाहीर केलें. या स्वराज्याचा पहिला हप्ता म्हणून त्यांनीं मांट-फर्ड सुधारणा आपणास दिल्या आहेत. या सुधारणांमुळें कायदे कौन्सिलांच्या व्यवस्थेंत कोणकोणते महत्वाचें फेरफार घडून आले आहेत, हें आतां आपण पाहूं.

पूर्वी ग. जनरलास कायदे करण्याच्या बाबतींत मदतनीस म्हणून जी एकच सभा असे, तिच्या ऐवजीं या नव्या कायद्यानें त्यांस दोन सभा देण्यांत आल्या

आहेत. त्यांची नांवें अनुक्रमें कौन्सिल ऑफ स्टेट ( राजमंडळ ) व लेजिस्लेटिव्ह असेंब्ली ( वरिष्ठ कायदे मंडळ ) अशी ठेवण्यांत आली आहेत. या सभांची रचना ब्रिटिश पार्लमेंटच्या धर्तीवर करण्यांत आली आहे; परंतु पार्लमेंटास जे अधिकार आहेत ते मात्र यांना नाहींत, हें लक्षांत ठेवण्या सारखें आहे.

**६७ जोड-सभेची राजपद्धति**-हिंदुस्थान सरकारास कायदे करण्याच्या बावतींत स. १९१९ च्या कायद्यानें मदतनीस म्हणून दोन सभा देण्यांत आल्यामुळें, येथें जोडसभेच्या राज्यपद्धतीस ( Bi-Cameral System of Government ) सुरवात झाली, असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. ज्या राज्यपद्धतींत लोकांच्या प्रतिनिधींची एक सभा असून आणखी दुसरीहि एक सभा असते, त्या राज्यपद्धतीला जोड-सभेची राज्यपद्धति म्हणतात. अशा तऱ्हेची राज्यपद्धति सध्यां अमेरिका, इंग्लंड, इटली, जपान वगैरे सुधारलेल्या राष्ट्रांत अस्तित्वांत आहे. ' मोठ्या देशांत अनेक गुंतागुंतीचे हितसंबंध असतात. त्या सर्वांचे प्रतिनिधि एकाच सभेंत येणें अशक्य असते. दोन सभा असण्यांत असा एक फायदा आहे कीं, प्रतिनिधि सभेंत ज्यांचे प्रतिनिधि नाहींत अशांच्या हितसंबंधाचा विचार तेथें योग्य तऱ्हेनें न झाल्यास दुसऱ्या सभेंत तो होण्याची सवड राहते.' दुसरा फायदा असा कीं, प्रसंगवशात् विकारप्राबल्यामुळें प्रतिनिधिसभेकडून जर मर्यादा भंग होऊं लागला तर त्यास दुसऱ्या सभेकडून आळा घालतां यावा. लोकसत्ता जेव्हां खवळते तेव्हां विकाराचा जोर अधिक होतो आणि त्यामुळें अडचणीच्या प्रश्नांचा विचार एकाच सभेकडून सर्व बाजूंनीं केला जात नाहीं. अशा वेळीं एकाच प्रश्नावर जर दोन सभांकडून विचार करण्यांत आला तर तो अधिक परिपूर्ण होण्याचा संभव असतो व त्यामुळें बराच फायदा पदरांत पडतो. परंतु हिंदुस्थानांत केवळ याकारणास्तवच ही दोन कौन्सिलें अस्तित्वांत आली, असें मात्र कोणी समजूं नये. असेंब्लींत लोकप्रतिनिधींचें प्रचंड बहुमत असल्यामुळें तींत पास न होणारे परंतु सरकारास इष्ट वाटणारे कायदे या ' कौन्सिल ' द्वारा पास करून घेण्याचा सरकारचा मूळ विचार होता; व तेवढ्यासाठींच मि. मॉंटेग्यूंनीं कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें सरकारपक्षाचे

बहुमत ( Official Block ) ठेवण्याचा घाट घातला होता. परंतु पार्लमेंटरी संयुक्त कमिटीस ही योजना पसंत न पडून तिनें असें ठरविलें, कीं वरिष्ठ सरकारास **कौन्सिल ऑफ स्टेट** व **लेजिस्लेटिव असेंब्ली** अशीं दोन कायदेमंडळें असावीत व दोन्ही मंडळांची मंजुरी मिळाल्याशिवाय कोणतेंही बिल पास होऊं नये.

## कौन्सिल ऑफ स्टेट.

कौन्सिल ऑफ स्टेट मध्यें या कायद्याप्रमाणें एकंदर ६० सभासद असतात. यापैकीं ३३ लोकनियुक्त असून बाकीचे २७ सरकारानें निवडलेले असतात. व त्यांतील ज्यास्तींत ज्यास्ती २० जण सरकारच्या पदरील नोकर असतात. या शिवाय वऱ्हाडतर्फें एक सभासद निवडून आल्यावर त्याची ग. जनरलकडून नेमणूक होते. लोकनियुक्त सभासदांची निवडणूक विवक्षित मतदार संघामार्फत होते. या मतदारसंघांत खालील सहा वर्गांतील लोक असतात:—

( १ ) जहागिरदार अथवा सरदारवर्गांपैकीं दरसाल २००० रुपये शेतसारा भरणारे.

( २ ) ३० हजार रुपये प्राप्तीवर कर भरणारे इसम.

( ३ ) वरिष्ठ अगर प्रांतिक कायदे कौन्सिलांचे सभासद.

( ४ ) कोणत्याहि म्युनिसिपालटीचे बिनसरकारी अध्यक्ष अगर उपाध्यक्ष, जिल्हा बोर्डाचे बिनसरकारी अध्यक्ष व उपाध्यक्ष.

( ५ ) कोणत्याहि हिंदी युनिव्हर्सिटीचे फेलो किंवा सिनेटचे सभासद.

( ६ ) शमस-उल्-उलेमा अगर महामहोपाध्याय पदवी धारण करणारे इसम.

या मतदार संघांचें क्षेत्र फार मोठें असून त्यांतील इसमांचा सामाजिक दर्जाहि मोठा आहे. कोणाहि सरकारी नोकरास या सभांच्या निवडणुकीस उभे राहतां येत नाहीं. त्याप्रमाणेंच एकाद्या लोकनियुक्त सभासदानें निवडणूक झाल्यानंतर सरकारची नोकरी पत्करल्यास त्यास आपल्या सभासद-

त्याचा राजीनामा द्यावा लागतो. ग. जनरलच्या कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांस या सभेंत भाषण करण्याची मोकळीक ठेवण्यांत आली आहे. परंतु ज्या सभेंत त्यांची सरकारतर्फे नेमणूक झाली असेल, त्यासभेंशिवाय दुसऱ्या सभेंत मत देण्याचा अधिकार त्यांना देण्यांत आला नाहीं. या सभेंतील ३३ लोकनियुक्त सभासदांपैकीं ३० सभासदांची खालील कोष्टकांत दर्शविल्याप्रमाणें प्रान्तवार वाटणी करण्यांत आली असून बाकीच्या तीन सभासदांची पंजाब, बिहार व ओरिसा आणि आसाम या प्रांताकडून आळीपाळीनें निवडणूक होते:—

| प्रांताचें नांव. | मुसलमानेतर मतदार संघा मार्फत निवडलेले. | मुलसमान. | स्पेशल. | एकूण. |
|---|---|---|---|---|
| १ मद्रास | ४ | १ | ० | ५ |
| २ मुंबई | ३ | २ | १ (युरोपियन कामर्स.) | ६ |
| ३ बंगाल | ३ | २ | १ ,, | ६ |
| ४ संयुक्त प्रान्त | ३ | २ | ० | ५ |
| ५ पंजाब | १ | ० | १ ( शीख ) | २ |
| ६ बिहार ओरिसा | २ | १ | ० | ३ |
| ७ मध्यप्रांत° | १ | ० | ० | १ |
| ८ ब्रह्मदेश | १ | ० | १ (यु. चें. कॉ). | २ |
| एकूण. | | | | ३० |

## लेजिस्लेटिव ॲसेंब्ली.

लेजिस्लेटिव ॲसेम्ब्ली ऊर्फ वरिष्ट कायदे मंडळांत एकंदर १४४ सभासद असतात. त्यापैकीं ४१ सरकारनियुक्त असून त्यापैकीं ज्यास्तींत ज्यास्त २६ सभासद सरकारच्या पदरील नोकर वर्गांपैकीं असतात. बाकीचे १०३ सभासद निरनिराळ्या प्रांतांतील विवक्षित मतदारसंघांनीं निवडलेले असतात. मतदार

होण्यास ( १ ) विशिष्ट वर्गाचा सभासद, ( २ ) मतदार संघाच्या क्षेत्रांतील रहिवाशी, ( ३ ) घराचा मालक, ( ४ ) प्राप्तीवरील कर देणारी, ( ५ )जमीनदार, ( ६ ) स्थानिक स्वराज्यसंस्थांचा सभासद, यापैकीं कोणती तरी एक लायकी असावी लागते. ह्या लोकनियुक्त सभासदा पैकीं ९८ सभासदांची खालील प्रमाणें प्रांतवार वाटणी करण्यांत आली आहे. बाकी राहिलेल्या पांच सभासदांची बंगाल व मुंबई इलाख्यांतील स्पेशलमतदार संघाकडून निवडणूक केली जाते.

| प्रांताचें नांव | मुसलमानेतर मतदार संघ. | मुसलमान | युरोपियन | जमीनदार | हिंदी व्यापारी | शीख | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ मद्रास | १० | ३ | १ | १ | १ | ० | ० | १६ |
| २ मुंबई | ७ | २ | २ | ० | १ | ० | ० | १२ |
| ३ बंगाल | ६ | ६ | ३ | १ | ० | ० | ० | १६ |
| ४ संयुक्त प्रांत | ८ | ६ | १ | १ | ० | ० | ० | १६ |
| ५ पंजाब ,, | ३ | ६ | ० | ० | ० | २ | ० | १२ |
| ६ बिहार व ओरिसा ,, | ८ | ३ | ० | १ | ० | ० | ० | १२ |
| ७ मध्य प्रांत | ३ | १ | ० | १ | ० | ० | ० | ५ |
| ८ आसाम | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ४ |
| ९ ब्रम्हदेश | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ४ |
| १० दिल्ली सा | धा | र | ण | स | भा | स | द | १ |
| एकूण. | ... | ... | ... | .. | ... | ... | ... | ९८ |

**६८ अध्यक्षाची निवडणूक:**—वरिष्ठ कायदे कौंसिलच्या सभासदांची संख्या वाढविण्याचा अधिकार सुधारणा कायद्यानें ग. जनरलास दिला आहे. ही वाढ कायद्यानें ठरविलेल्या धोरणावरहुकूम व्हावयाची असून, ती झाल्यास वरिष्ठ कायदे मंडळांच्या एकंदर सभासदापैकीं निदान $\frac{5}{6}$ सभासद लोकनियुक्त असावेत, असें

२३२२

ठरविण्यांत आलें आहे यापूर्वी ग. जनरल या कौन्सिलचा अध्यक्ष असे, परंतु या नव्या कायद्यानें ही व्यवस्था बदलण्यांत येऊन असें ठरलें आहे कीं पहिल्या चार वर्षांकरितां ग. जनरलनें या कौंसिलांतील त्यांच्या मर्जीस येईल त्या सभासदांस या कौंसिलचा अध्यक्ष नेमावें व त्यानंतर पुढें सभासदांनीच आपल्यांतून एखादा सभासद अध्यक्ष ह्मणून निवडावा. अध्यक्षाच्या गैरहजेरींत त्याचें काम पाहण्याकरितां दुसऱ्या इसमाची जरूरी लागणें साहजीक आहे तेवढ्याकरितां या मंडळास आणखी एक उपाध्यक्ष निवडण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. परंतु अशा रीतीनें निवडलेला उपाध्यक्ष ग. जनरलच्या पसंतीस उतरला पाहिजे, अशी एक अटही त्याबरोबरच घातली आहे. या अध्यक्ष उपाध्यक्षास किती पगार असावा, हें ठरविण्याचा अधिकार असेंब्लीसच देण्यांत आला आहे.

कौंसिल ऑफ स्टेटला अध्यक्ष निवडण्याचा अधिकार देण्यांत आला नसून ग. जनरलकडूनच त्याची सदैव नेमणूक व्हावयाची आहे. या सभांचे ग. जनरलास जरी अध्यक्षस्थान या पुढें स्वीकारतां येणार नाहीं, तरी यापैकीं कोणतीही सभा भरवून आपले विचार तिच्या पुढें मांडण्याचा अधिकार ग. जनरलला देण्यांत आला आहें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

**६९ वरिष्ठ कायदे सभांची मुदत व बैठका***---आपल्या पहिल्या सभेपासून प्रत्येक कौन्सिल ऑफ स्टेट पांच वर्षेपर्यंत व प्रत्येक लेजिस्लेटिव असेंब्ली तीन वर्षेपर्यंत चालेल, मात्र इतकेंच कीं, कायदे मंडळाच्या दोहोंपैकीं कोणतेंही चेंबर या मुदतीपूर्वी मोडण्यास गव्हर्नर जनरल हे मुखत्यार आहेत, आणि विशेषप्रसंगीं गव्हर्नर जनरल ह्यांस तसें करणें योग्य वाटेल तर त्यांस अशी कोणतीही मुदत वाढविण्याचा अधिकार आहे; आणि दोहोंपैकीं कोणतेंही चेंबर मोडल्यानंतर गव्हर्नर जनरल हे त्या चेंबराच्या पुढील बैठकींसाठीं मोडल्याच्या तारखेनंतर सहा महिन्यापेक्षां ज्यास्त नाहीं अशी तारीख, अथवा सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्या मंजुरीनें नऊ महिन्यांपेक्षां ज्यास्त नाहीं अशी तारीख नेमतील.

हिंदुस्थानच्या कायदे मंडळाच्या दोहोंपैकीं कोणत्याही चेंबराच्या बैठका

---

* सन १९१९ चा गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टचें कलम ६३ ड पहा.

भरण्यासाठीं गव्हर्नर जनरल ह्यांस ज्यावेळा व जागा योग्य वाटतील तशा वेळा व जागा नेमण्याचा त्यांस अधिकार आहे, तसेंच जाहिरनामा काढून अगर इतर रीतीनें वेळोवेळीं अशा बैठका बंद करण्याचा त्यास अधिकार आहे. हिंदुस्थानच्या कायदे मंडळाच्या दोहोंपैकीं कोणत्याही चेंबराची कोणतीही सभा अध्यक्षाच्या जागीं असणाऱ्या इसमास तहकुब ठेवण्याचा अखत्यार आहे. दोहोंपैकीं कोणत्याही चेंबरांतील सर्व प्रश्नांचा निकाल अध्यक्षाच्या जागीं असणाऱ्या सभासदांखेरीज हजर असलेल्या सभासदांच्या बहुमतानें लावला पाहिजे; परंतु अध्यक्षाच्या जागीं असणाऱ्या सभासदास मतें सारखीं पडलीं असतील त्या बाबतींत निर्णायक मत असेल व त्याचा त्यानें उपयोग केला पाहिजे. हिंदुस्थानच्या कायदे मंडळाच्या दोहोंपैकीं कोणत्याही चेंबराचे अधिकार, त्या चेंबरांत कोणतीही जागा रिकामी झालेली असली तथापि चालविण्याचा अखत्यार आहे.

७० **वरिष्ठ कायदे सभेचे अधिकार***—हिंदुस्थानच्या कायदे मंडळास ब्रिटिश हिंदुस्थानांतील सर्व इसमासाठीं, सर्व कोर्टासाठीं, आणि सर्व ठिकाणें व वस्तु यांसाठीं; आणि हिंदुस्थानाच्या इतर भागांतील मलिक माआझम यांच्या सर्व रयतेसाठीं व सरकारच्या सर्व नोकरांसाठीं; आणि ब्रिटिश हिंदुस्थाना बाहेरील आणि पलीकडील तसेंच ब्रिटिश हिंदुस्थानांतील मलीक माआझम यांच्या सर्व देशी हिंदी रयते साठीं; आणि मलिक माआझम यांच्या हिंदी फौजांतील अमलदार सैनिक, वैमानिक व फालोअर्स जेथवर ते आर्मी आक्ट व एअर फोर्स आक्ट यांस पात्र नसतील तेथवर, जेथें जेथें नोकरी करीत असतील तेथें तेथें त्यांच्या वर निर्बंध ठेवण्यासाठीं; आणि रॉयल इंडियन मरीन सर्व्हिसमध्यें कामावर असलेल्या किंवा त्यांत नोकरी करीत असलेल्या, त्या सर्व्हिसमधील असलेल्या सर्व इसमासाठीं; आणि ब्रिटिश हिंदुस्थानच्या कोणत्याही भागांत त्या त्या वेळीं असलेले, किंवा ज्यांच्यासाठीं हिंदुस्थानच्या कायदे मंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे अशा इसमास लागू असलेले कोणतेंही कायदे रद्द करण्यासाठीं किंवा बदलण्यांसाठीं; या सर्व बाबतींसाठीं कायदे करण्याचा अधिकार आहे.

* सदरचे कलम ६५ पहा.

**७१ हिंदुस्थानचे जमाखर्चाचें अंदाज पत्रकः—*** गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा अंदाजलेला वार्षिक खर्च व महसूल ही प्रत्येक वर्षी हिंदुस्थानच्या कायदे मंडळाच्या दोन्ही चेंबरांपुढें तक्त्याच्या रूपानें ठेविली पाहिजेत. गव्हर्नर जनरल यांच्या शिफारशीवांचून कोणत्याही कारणासाठीं कोणत्याही महसुलाचा अथवा पैक्याचा उपयोग करण्यासाठींची सूचना करतां कामा नये. खालीं सांगितलेल्या खर्चाच्या सदरा संबंधानें महसुलाचा अथवा पैक्याचा उपयोग करण्यासाठीं गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सूचना लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या मतासाठीं सादर करतां कामा नयेत, तसेंच गव्हर्नर जनरल इतर रीतीनें न फर्मावितील तर, वार्षिक पत्रकाचा विचार चालत असतांना दोहोंपैकीं कोणत्याही चेंबरांत त्यावर वादविवाद होतां कामा नये, म्हणजे—

(१) कर्जावरील व्याज व सिंकिंग फंडाचा चार्ज या संबंधानें; आणि

(२) ज्या खर्चाची रकम कोणत्याही कायद्यांत किंवा कायद्यान्वयें ठरविण्यांत आली असेल त्या खर्चासंबंधानें; आणि

(३) मलिक माआझम यांनीं किंवा यांच्या मंजुरीनें किंवा सेक्रेटरी ऑफ स्टेट इन् कौन्सिल यांनीं नेमलेल्या इसमांचा पगार पेनशनें या संबंधानें; आणि

(४) चीफ कमीशनर्स व ज्युडिशियल कमिशनर्स यांच्या पगारासंबंधानें; आणि

(५) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून खालील प्रमाणें वर्गीकरण केलल्या खर्चासंबंधानें.

( अ ) धार्मिक;

( ब ) राजकीय;

( क ) राज्यसंरक्षण.

महसुलाचा अथवा पैक्याचा कोणताही योजलेला उपयोग वरील सदरासंबंधानें आहे किंवा नाहीं याविषयीं कोणताही प्रश्न उपस्थित होईल तर, त्या

---

* कलम ६७ अ पहा.

प्रश्नावरील गव्हर्नर जनरल यांचा निर्णय अखेरचा असेल. वरील सदरांत निर्दिष्ट न केलेल्या अशा खर्चाच्या सदरासंबंधानें महसुलाच्या किंवा पैक्याच्या उपयोगासाठीं गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या सूचना ग्रांटीसाठींच्या मागणीच्या रूपानें लेजिस्लेटिव असेंब्लीच्या मतासाठीं सादर केल्या पाहिजेत. लेजिस्लेटिव असेंब्लीस कोणत्याही मागणीस मंजुरी देण्याचें नाकारण्याचा अखत्यार आहे, किंवा कोणत्याही मागणींत सांगितलेली रकम कमी करून कमी करण्याचा अखत्यार आहे. लेजिस्लेटिव असेंब्लीनें मत दिल्याप्रमाणेंच्या मागण्या गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल याजकडे सादर केल्या पाहिजेत, आणि ते, लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें नाकारलेली कोणतीही मागणी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठीं आवश्यक आहे अशी आपली खात्री असल्याबद्दल जाहीर करतील तर, लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें अशी संमति दिलेली नसली तरी किंवा त्यांत सांगितलेली रकम कमी केलेली असली तरी जणूं त्या मागणीस संमति दिली आहे असें धरून वागतील. ह्या कलमांत कोणताही मजकूर असला तथापि निकडीच्या प्रसंगीं, ब्रिटिश हिंदुस्थानच्या अथवा त्याच्या कोणत्याही भागाच्या सुरक्षिततेसाठीं अथवा शांततेसाठीं त्यांच्या मतें जो खर्च आवश्यक असेल असा खर्च करण्यास अधिकार देण्याचा गव्हर्नर जनरल यांस अधिकार आहे.

**७२ सर्टिफिकेशनचे अधिकार**— § हिंदुस्थानच्या कायदे मंडळाचें कोणतेंही चेंबर कोणताही ॲक्टाचा मसुदा आणण्यास परवानगी देणार नाहीं किंवा गव्हर्नर जनरल यांनीं शिफारस केलेल्या रूपांत पास करण्यास चुकेल तेंव्हां ब्रिटिश हिंदुस्थानाच्या अथवा त्याच्या कोणत्याही भागाच्या सुरक्षिततेसाठीं, शांततेसाठीं अथवा हितसंबंधासाठीं सदरहू मसुदा पास करणें अवश्यक आहे असा दाखला देण्याचा अधिकार गव्हर्नर जनरल यांस आहे, आणि त्यानंतर जर तो मसुदा दुसऱ्या चेंबरानें हिंद[illegible] केला असेल, तर तो मसुदा, दोन्ही चेंबरांनीं त्यास आपली संमति दिलेली नसली तथापि, गव्हर्नर जनरल यांची त्यावर सही होतांच लागलाच तो, हिंदुस्थानच्या कायदेमंडळांत प्रथमतः आणलेल्या

§ कलम ६७ ब पहा.

अथवा आणण्याचें योजिलेल्या मसुद्यांच्या रूपांत, किंवा (प्रसंगाप्रमाणें) ग. जनरल यांनीं शिफारस केलेल्या रूपांत हिंदुस्थानच्या कायदे मंडळांचा आक्ट होईल; आणि जर अशा रीतीनें सदरहू मसुदा पास करण्यांत आलेला नसेल तर तो दुसऱ्या चेंबरापुढें ठेविला पाहिजे, आणि त्या चेंबरानें गव्हर्नर जनरल यांनीं शिफारस केलेल्या रूपांत त्यांस संमति दिली तर, गव्हर्नर जनरल यांची मंजुरी मिळाल्या वर तो सदरीं सांगितल्याप्रमाणें आक्ट होईल, किंवा जर अशा रीतीनें त्यास संमति देण्यांत आलेली नसेल तर, गव्हर्नर जनरल यांनीं त्यावर सही केल्यावर तो सदरीं सांगितल्याप्रमाणें आक्ट होईल. अशा प्रत्येक आक्टांत तो गव्हर्नर जनरल यांनीं केला आहे असें दर्शविलें पाहिजे, व तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, पार्लमेंटच्या दोन्ही सभांपुढें मांडला पाहिजे, आणि मलिक माआझम यांची मंजुरी मिळेतोंपर्यंत त्याचा अमल चालणार नाहीं, आणि पार्लमेंटच्या प्रत्येक सभेपुढें ती सभा बसली असेल अशा निदान आठ दिवसांपेक्षां कमी नाहीं इतक्या मुदतीपर्यंत त्याच्या नकला ठेवण्यांत येईतों पर्यंत तो मलिक माआझम यांच्या मंजुरीसाठीं रुजू करतां कामा नये; आणि मलिक माआझम इन् कौन्सिल यांनी अशी मंजुरी मिळाल्यावर व गव्हर्नर जनरल यांनीं त्याबद्दलचा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यावर हिंदुस्थानच्या कायदेमंडळानें पास केलेल्या व योग्य रीतीनें मंजुरी मिळालेल्या आक्टाप्रमाणें त्याचा अमल व परिणाम होईल; मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, गव्हर्नर जनरल यांच्या मतें अशा प्रकारची निकडीची परिस्थिति आहे कीं जीमुळें अशी तजवीज करणें न्याय्य होईल तेव्हां, असा कोणताही आक्ट लागलाच अमलांत येईल असें फर्माविण्याचा गव्हर्नर जनरल यांस अधिकार आहे आणि त्यानंतर त्या आक्टाचा सदरीं सांगितल्या प्रमाणें अमल व परिणाम होईल पण तो मलिक माआझम इन् कौन्सिल यांजकडून नामंजूर केला जाण्यास पात्र असेल.

**७३ व्हॉइसरायची संमति**–†जेव्हां एखादा आक्टाचा मसुदा हिंदुस्थानच्या कायदे मंडळाच्या दोन्हीं चेंबराकडून पास करण्यांत आला असेल, तेव्हां गव्हर्नर

† कलम ६८ पहा.

जनरल यांस, या आक्टाच्या मसुद्यांस आपली संमति आहे असें, किंवा या आक्टाच्या मसुद्यांस आपण संमति देत नाहीं असें, किंवा मलिक माआझम यांची त्या संबंधानें मंजुरी दर्शविण्या करितां तो आक्टाचा मसुदा आपण राखून ठेविला आहे. असें जाहीर करण्याचा अधिकार आहे. हिंदुस्थानच्या कायदे मंडळाच्या दोन्हीं चेंबरांकडून पास करण्यांत आलेला आक्टाचा मसुदा, गव्हर्नर जनरल त्यासंबंधानें आपली संमति जाहिर करीत तोंपर्यंत किंवा मलिक माआझम यांची मंजूरी दर्शविण्याकरितां राखून ठेविलेल्या एकाद्या आक्टाचे मसुद्याचे बाबतींत मलिक माआझम इन् कौन्सिल हे आपली संमति दर्शवीत तोपर्यंत आणि ती संमति गव्हर्नर जनरल यांजकडून जाहिर करण्यांत येईतोंपर्यंत, आक्ट होणार नाहीं.

९४ **प्रांतिक कायदे मंडळांची रचना**—सुधारणा ॲक्टान्वयें, प्रत्येक गव्हर्नराच्या प्रांतांत एक कायदे कौन्सिल असेल व ते कार्यकारी कौन्सिलाच्या सभासदांचे व या ॲक्टानें ठरविल्याप्रमाणें नेमलेल्या अथवा निवडलेल्या सभासदांचें बनलें असेल, असें ठरलें आहे. गव्हर्नर कायदे कौन्सिलचा अध्यक्ष असणार नाहीं, परंतु कौन्सिलांत भाषण करण्याचा त्यास हक्क देण्यांत आला असून त्या कारणासाठीं त्या कौन्सिलाच्या सभासदांस हजर राहण्यास सांगण्याचा त्यास अधिकार आहे. प्रांतिक कायदे मंडळांच्या सभासदांची संख्या किती असावी, हें या ॲक्टाच्या पहिल्या परिशिष्टांतील कोष्टकांत दर्शविलें आहे. तें येणेंप्रमाणें:—

| | | | |
|---|---|---|---|
| १ मद्रास ... ... | ११८ | ५ पंजाब ... ... | ८३ |
| २ मुंबई ... ... | १११ | ६ बिहार–ओरिसा ... | ९८ |
| ३ बंगाल ... ... | १२५ | ७ मध्यप्रांत ... | ७९ |
| ४ संयुक्तप्रांत ... | ११८ | ८ आसाम ... | ५३ |

या प्रांतिक कायदे मंडळांत पूर्वीप्रमाणेंच लोकनियुक्त सभासदांचें बहुमत ठेवण्यांत आलें आहे. प्रत्येक कौन्सिलच्या सभासदांपैकीं शेंकडा ७० सभासद लोकनियुक्त असावेंत, यांहून ज्यास्त असूं नयेत असें ठरलें आहे. यावरून प्रांतिक कायदे मंडळांच्या रचनेंत किती महत्वाचें फेरफार घडून आले आहेत, हें कळून येईल.

# मुंबई प्रांतिक कायदे-मंडळ

मुंबई प्रांतिक कौन्सिलांतील १११ सभासदांपैकीं ८६ लोकनियुक्त असून २० सरकारी नोकर व बाकीचे पांच बिनसरकारी सभासद आहेत. लोकनियुक्त सभासदांची वांटणी पुढें दिल्याप्रमाणें करण्यांत आली आहे:—

## लोकनियुक्त सभासद ८६

| मतदारसंघाचें नांव. | संघाची क्षेत्रमर्यादा. | प्रतिनिधीं संख्या. | राखीव जागा. |
|---|---|---|---|
| | **मुसलमानेतर मतदारसंघ** | | |
| पूर्व खानदेश | सर्व जिल्हा | ३ | ...... |
| नाशिक जिल्हा | ,, | २ | १ |
| पुणें जिल्हा | म्युनिसिपल व कँटोंमेंट हद्द वगळून | २ | १ |
| सातारा जिल्हा | सर्व जिल्हा | ३ | ...... |
| बेळगांव जिल्हा | ,, | २ | ...... |
| विजापूर जिल्हा | ,, | १ | ...... |
| धारवाड जिल्हा | ,, | २ | ...... |
| कारवार जिल्हा | ,, | १ | ...... |
| रत्नागिरी जिल्हा | ,, | २ | १ |
| पूर्वसिंध | हैद्राबाद, थर, पारकर, नबाबशाहा जिल्हे कराची, लारखाना, सक्कर. | १ | ...... |
| पश्चिमसिंध | अप्परसिंध जिल्हे ( कराची म्युनिसिपल व कँटोंमेंटहद्द वगळून ). | १ | ...... |
| सोलापूर जिल्हा | म्युनिसिपल हद्द वगळून | ० | १ |
| कुलाबा जिल्हा | सर्व जिल्हा | १ | ...... |
| पश्चिमखानदेश | ,, | १ | ...... |
| मुंबई शहर उत्तरभाग | वार्ड बी, ई, एफ व जी | ३ | १ |
| मुंबई शहर दक्षिणभाग | वार्ड ए, सी, डी | ३ | ...... |
| कराची शहर | म्युनिसिपालिटी, कँटोंमेंट व पोर्टट्रस्टची हद्द. | १ | ...... |

| मतदारसंघाचें नांव. | संघाची क्षेत्रमर्यादा. | प्रतिनिधीं संख्या. | राखीव जागा. |
|---|---|---|---|
| अहमदाबाद शहर | म्युनिसिपालिटी, कँटोन्मेंट व कंकेरिया, साबरमती वगैरे एरिया | १ | ...... |
| सुरत शहर | म्युनिसिपालिटी हद्द | १ | ...... |
| सोलापूर शहर | ,, ,, | १ | ...... |
| पुणें शहर | शहर व सबरबन म्युनिसिपालिटी आणि पुणें व खडकी कँटोंमेंट हद्द | १ | ...... |
| अहमदाबाद जि. | म्युनिसिपल वगैरे हद्द वगळून | २ | ...... |
| भडोच जिल्हा | सर्व जिल्हा | १ | ...... |
| खेडा जिल्हा | ,, | २ | ...... |
| पंचमहाल | ,, | १ | ...... |
| सुरत जिल्हा | म्युनिसिपल हद्द वगळून | २ | ...... |
| ठाणें जिल्हा | सर्व जिल्हा | २ | १ |
| नगर जिल्हा | ,, | २ | १ |
| | **मुसलमान मतदार संघ** | | |
| मुंबई शहर | शहरची सर्व हद्द | २ | ...... |
| कराची शहर | ,, | १ | ...... |
| अहमदाबाद व सुरत | दोन शहरांची म्युनिसिपल हद्द | १ | ...... |
| उत्तरभाग | वरील दोन शहरें वगळून | २ | ...... |
| पुणें व सोलापूर | दोन शहरांची कँटोन्मेंट व म्युनिसिपल हद्द | १ | ...... |
| मध्यभाग | वरील दोन शहरें वगळून | ३ | ...... |
| दक्षिणभाग | सर्व भाग | ३ | ...... |
| हैद्राबाद जिल्हा | सर्व जिल्हा | २ | ...... |
| कराची जिल्हा | म्युनिसिपल हद्द वगळून | २ | ...... |
| लारखाना जिल्हा | सर्व जिल्हा | ३ | ...... |
| सक्कर जिल्हा | ,, | २ | ...... |
| थर व पारकर जिल्हा | ,, | २ | ...... |
| नबाबशहा जिल्हा | ,, | १ | ...... |

| मतदारसंघाचें नांव. | संघाची क्षेत्रमर्यादा. | प्रतिनिधी संख्या. | राखीव जागा. |
|---|---|---|---|
| अप्पर-सिंध फ्रांटिअर जिल्हा | ,, | १ | ...... |
| | **विशिष्ट मतदारसंघ** | | |
| मुंबई शहर | फक्त युरोपियन मतदार | १ | ...... |
| मुंबई इलाखा | ( मुंबई शहर वगळून ) फक्त युरोपियन | १ | ...... |
| डेक्कन सरदार्स व इनामदार्स | मध्यभाग व दक्षिणभाग | १ | ...... |
| गुजराथ सरदार्स व इनामदार्स | उत्तरभाग | १ | ...... |
| सिंध जहागिरदार व जमीनदार | सिंधप्रांत | १ | ...... |
| मुंबई युनिव्हर्सिटी | युनिव्हर्सिटीचे सात वर्षांवरचे पदवीधर | १ | ...... |
| मुंबई चेंबर ऑफ कॉमर्स | फक्त सभासद | २ | ...... |
| कराची चेंबर ऑफ कॉमर्स | ,, | १ | ...... |
| बॉंबे ट्रेड्स् असोसिएशन | ,, | १ | ...... |
| बॉंबे मिलओनर्स असोसिएशन | ,, | १ | ...... |
| अमदाबाद मिलओनर्स-असोसिएशन | फक्त सभासद | १ | ...... |
| इंडियन मर्चंटस चेंबर व ब्यूरो | ,, | १ | ...... |
| | | ८६ | |

**७५ प्रत्यक्ष निवडणूक**—या शिवाय कायदेमंडळांच्या बाबतींत या ॲक्टानें झालेला दुसरा महत्वाचा फेरफार म्हणजे लोकप्रतिनिधींची पूर्वीप्रमाणें अप्रत्यक्षपणें निवडणूक न होतां, यापुढें ती प्रत्यक्षपणें होत जाईल. पूर्वी कायदे

मंडळाचा सभासद व मतदार यांचा बिलकुल संबंध येत नसे. त्याची निवडणूक सभासद व मतदार यांमधील एका तिऱ्हाईत मध्यस्थांकडून होत असे. उदाहरणार्थ, वरिष्ठ कायदे कौन्सिलांतील प्रतिनिधींची निवडणूक प्रांतिक कौन्सिलांचें लोकनियुक्त सभासद करीत असत. प्रांतिक कौन्सिलांतील या सभासदांची निवडणूक म्युनसिपालट्या, जिल्हाबोर्डे इत्यादिकांकडून होई. तसेंच युनिव्हर्सिटीचे राजिस्टर्ड पदवीधर आपल्यातर्फे ज्या इसमांना सीनेटमध्यें पाठवीत, त्या इसमांकडून एक प्रतिनिधी कौन्सिलमध्यें पाठविण्यांत येई. यामुळें मतदारसंघाचें क्षेत्र अगदींच अकुंचित राहून सभासदांना बेजबाबदारपणें वागावयास सांपडे. नव्या अॅक्टानें ही पद्धति बदलण्यांत आली असून सभासद ज्यायोगें मतदारास जबाबदार राहील अशी पद्धति अस्तित्वांत आली आहे.

**७६ मतदानाचा अधिकार**—मतदारसंघांचे दोन प्रकार करण्यांत आले आहेत. एकास सर्वसाधारण(सामान्य)मतदारसंघ (General Constituency) व दुसऱ्यास विशेष मतदारसंघ ( Special Constituency ) अशी नांवें देण्यांत आली आहेत. सामान्य मतदारसंघांत मुसलमानेतर, हिंदी ख्रिश्चन, अँग्लो इंडियन व युरोपियन, शीख इ० मतदारसंघांचा समावेश होतो. दुसऱ्या प्रकारांत जमीनदार, मळेवाले, खाणीवाले, गिरण्यावाले, व्यापारी, विश्वविद्यालय इत्यादी स्पेशल मतदारसंघ मोडतात. मतदारांच्या यादींत नांव असल्याशिवाय कोणासही निवडणुकीस उभें राहतां येत नाहीं. ज्या उमेदवारास सामान्य मतदारसंघांतील, मुसलमानेतर, मुसलमान, युरोपियन वगैरे मतदारसंघांकडून निवडून यावयाचें असेल तो उमेदवार स्वतः मुसलमानेतर, मुसलमान अगर युरोपियन असला पाहिजे व तो संघाच्या क्षेत्र-सीमेत रहात असला पाहिजे. मतदाराची लायकी जमिनीवरील कर, प्राप्तीवरील कर, जमिनीची अगर घराची मालकी, इत्यादिकांवर ठरविण्यांत येते. प्रांतिक कायदे मंडळांच्या मतदारसंघांत निकृष्ट जातींचाही समावेश व्हावा म्हणून ही लायकी फारच स्वल्प ठरविण्यांत आली आहे. ह्यामुळें शहरांत वार्षिक ३६ रुपये भाडे भरणारास व खेड्यांत वार्षीक १६ रुपये शेतसारा भरणारांस मतदानाचा हक्क मिळाला आहे मुंबई इलाख्यांतील

मतदारांच्या लायकीचें नियम खालीं देत आहे, त्यावरून कोण कोणास मतदानाचा अधिकार प्राप्त झाला आहे हें कळून येईलः—

## परिशिष्ठ २ रें.

### निवडणूक करणारांच्या लायक्या.

१ या परिशिष्टाच्या कारणासाठीं—

(अ) " युरोपियन " या शब्दाचा अर्थ, जो बापाकडून युरोपियन वंशांतला असून ब्रिटिश रयत असेल आणि जो ब्रिटिश हिंदुस्थानांतील रहिवाशी असेल आणि जो संयुक्त राज्यांत किंवा ब्रिटिशांच्या ताब्यांतील कोणत्याही मुलुखांत अगर हिंदुस्थानांतील कोणत्याही संस्थानांत जन्मलेला असेल किंवा ज्याची त्यांत कायमची वस्ती असेल अथवा ज्याचा बाप अशा रीतीनें जन्मेलला असेल किंवा ज्याच्या बापाची तेथें अशी कायमची वस्ती असेल अगर सदरहू इसमाच्या जन्माच्या तारखेपर्यंत अशी कायमची वस्ती होती, असा प्रत्येक इसम समजावा;

(ब) " धारण करणार " या शब्दांचा अर्थ जमिनीचा कायदेशीर रीतीनें कबजा असलेला इसम असा समजावा, मग असा कबजा प्रत्यक्ष असो किंवा नसो.

(क) " निवडणूक करणारांची यादी प्रसिद्ध करणें " या शब्दांचा अर्थ, त्या त्या वेळीं तयार होत असलेली निवडणूक करणारांची यादी या कानूंअन्वयें पहिल्यानें प्रसिद्ध करणें असा समजावा;

(ड) " कूल किंवा भाडोत्री " या शब्दांचा अर्थ, पटयानें घेणारा असा समजावा, मग तो एखाद्या लेखाअन्वयें धारण करीत असो किंवा तोंडी कबुलायती अन्वयें धारण करीत असो आणि त्या शब्दांचा कुळाच्या किंवा भाडोत्र्याच्या हक्कांचा कबजे गहाण घेण्याचा समावेश होतो.

### सामान्य मतदारसंघ

२ जो मनुष्य युरोपियन नसेल आणि ज्याचें राहण्याचें ठिकाण निवडणूक

करणारांची यादी प्रसिद्ध झाल्याच्या तारखेच्या लगत पूर्वीच्या एप्रिलच्या पहिल्या तारखेस मतदारसंघक्षेत्राच्या आंत किंवा मुंबई शहराच्या मतदारसंघाच्या बाबतींत, सदरहू शहराच्या हद्दींच्या आंत किंवा साष्टी तालुक्याच्या हद्दींच्या आंत, किंवा दुसऱ्या कोणत्याही शहरच्या मतदारसंघाच्या बाबतींत, त्यांच्या हद्दीपासून दोन मैलाच्या आंत असेल, आणि जो—

(अ) सदरीं सांगितलेल्या एप्रिलच्या पहिल्या तारखेस, अशा मतदार संघांत—

(१) ज्याचें वार्षिक भाडें मुंबई शहरच्या मतदारसंघाच्या बाबतींत रु. १२० हून कमी आणि कराची शहरच्या मतदारसंघाच्या बाबतींत रु. ६० हून कमी नव्हतें, किंवा

(२) दुसऱ्या कोणत्याही शहरच्या मतदारसंघांत, घरांच्या किंवा इमारतींच्या वार्षिक भाड्यावर कोणताही कर बसविण्यांत आला असेंल तेंव्हां ज्याचें भाडें रु. ३६ हून कमी नव्हतें, किंवा जर अशा रीतीनें कोणताही कर बसविलेला नसेंल तर, ज्याची एकूण किंमत रु. १५०० हून कमी नसेल;

अशा घराच्या किंवा इमारतीच्या अगर स्वतंत्र भोगवट्यांत असलेल्या घराच्या किंवा इमारतीच्या भागांचा भोगवटा मालक किंवा भाडोत्री ह्मणून राहण्यासाठीं किंवा कोणताही व्यापार, उद्योग किंवा धंदा यांसाठीं करीत असेंल; किंवा

(ब) ज्याच्यावर, निवडणूक करणारांची यादी प्रसिद्ध करण्यांत येईल त्या सालाच्या पूर्वीच्या नगदी सालांत प्राप्तीवरील कर आकरण्यांत आला असेंल; किंवा

(क) जो मलिक माआझम यांच्या कायमच्या सैन्यांतील रिटायर झालेला, पेन्शन घेतलेला किंवा त्यांतून फांटा मिळालेला अमलदार, बिन सनदी अमलदार किंवा शिपाई असेल; किंवा

(ड) निवडणूक करणारांची यादी प्रसिद्ध होण्याच्या तारखेच्या लगत पूर्वीच्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस, जी जमिनीसंबंधाची लायकी सर्वांत जबळच्या खेडेगांवच्या मतदारसंघात धारण करण्यांत आली असती तर

अशा मतदारसंघासाठीं निवडणूक करणारा ह्मणून होण्यास तो लायक झाला असतां अशी लायकी मतदारसंघांत धारण करीत असेल,

असा इसम बिन मुसलमान किंवा मुसलमान शहरच्या मतदारसंघाकरितां निवडणूक करणारा ह्मणूक लायक असेल.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं—

(१) जो मनुष्य मुसलमान नाहीं असा कोणताही मनुष्य मुसलमान मतदारसंघाकरितां निवडणूक करणारा म्हणून लायक असणार नाहीं, आणि

(२) बिन मुसलमान मतदारसंघाकरितां निवडणूक करणारा म्हणून कोणताही मुसलमान लायक असणार नाहीं.

३ जो मनुष्य युरोपियन नसेल आणि ज्याचें निवडणूक करणारांची यादी प्रसिद्ध करण्याच्या तारखेच्या लगत पूर्वीच्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस एखाद्या मतदारसंघक्षेत्राच्या किंवा त्याच जातीच्या त्यास लागून असलेल्या मतदारसंघक्षेत्राच्या आंत राहण्याचें ठिकाण असेल आणि ज्यानें--

(अ)(१) सिंधमधील कोणत्याही मतदारसंघाच्या बाबतींत ज्या जमिनीवर मतदारांची यादी प्रसिद्ध होण्याच्या लगत पूर्वीच्या पांच महसुली वर्षांतील कोणत्याही एका वर्षी अपर सिंध फ्रांटिअर जिल्ह्यांत १६ रुपयांहून कमी नाहीं इतका जमीन महसुलाचा आकार आणि इतर ठिकाणीं ३२ रुपयांहून कमी नाहीं इतका जमीनमहसुलाचा आकार देण्यांत आला असेल, अथवा जर ती जमीन दुमाला नसती तर देण्यांत आला असता अशी दुमाला किंवा बिनदुमाला जमीन सदरीं सांगितलेल्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस अशा मतदारसंघांत स्वतःच्या हक्कानें धारण केली असेल किंवा कायमचें कूळ ह्मणून अथवा सरकारकडून पट्ट्यानें घेणारा म्हणून तिचा भोगवटा केला असेल, किंवा

(२) दुसऱ्या कोणत्याही मतदारसंघाच्या बाबतींत, पंचमहाल किंवा

रत्नागिरी जिल्ह्यांत १६ रुपयांहून कमी नाहीं इतक्या जमीन महसुलाची आकारणी केलेली किंवा आकारणी बसवितां येण्या जोग्या किंमतीची अशा मतदारसंघांत दुमाला अथवा बिनदुमाला जमीन सदरीं सांगितलेल्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस स्वतःच्या हक्कानें धारण केली असेल किंवा ज्यानें कूळ या नात्यानें तिचा भोगवटा केला असेल; किंवा

(ब) सदरीं सांगितलेल्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस, पंचमहाल अथवा रत्नागिरी किंवा अपर सिंध फ्रान्टिअर जिल्ह्यांत १६ रुपयांहून कमी नाहीं इतका आणि इतर ठिकाणीं ३२ रुपयांहून कमी नाहीं इतका, खालीलप्रमाणें तबदील करून दिलेल्या व मतदारसंघांत असलेल्या जमिनीसंबंधानें घ्यावयाचा खंड किंवा जमीनमहसूल घेण्याविषयींचा सरकारचा हक्क ज्याला तबदील करून देण्यांत आला असेल किंवा जो मतदारसंघांतील खोती गांवांतील खोत असेल अथवा हिस्सेदार असेल किंवा मतदारसंघांतील भागदारी अथवा नर्वादारी गांवांतील हिस्सेदार असून पंचमहाल अथवा रत्नागिरी अथवा अपर सिंध फ्रान्टिअर जिल्ह्यांत १६ रुपयांहून कमी नाहीं इतका जमीन महसूल आणि इतर ठिकाणीं ३२ रुपयांहून कमी नाहीं इतका जमीन महसूल देण्यास जबाबदार असेल; किंवा

(क) ज्याच्यावर निवडणूक करणारांची यादी ज्या सालीं प्रसिद्ध करण्यांत येईल त्या सालाच्या पूर्वींच्या नगदी सालांत प्राप्तीवरील कर आकारण्यांत आला असेल; किंवा

(ड) तो मलिक माआझम यांच्या कायमच्या सैन्यांतील रिटायर झालेला व पेनशन घेतलेला किंवा त्यांतून फांटा मिळालेला अमलदार, बिनसनदी अमलदार अगर शिपाई असेल; किंवा

(इ) मतदार संघांतील कोणत्याही म्युनिसिपल डिस्ट्रिक्टांत, क्यांटोन्मेंटांत अथवा जाहीर केलेल्या प्रदेशांत निवडणूक करणारांची यादी प्रसिद्ध झाल्याचा तारखेच्या लगत पूर्वींच्या एप्रिलच्या १ ल्या तारखेस

(१) ज्याचें वार्षिक भाडें सिंधमधील मतदार संघांच्या बाबतींत, ३६ रुपयांहून कमी नव्हतें; किंवा

(२) दुसऱ्या कोणत्याही मतदारसंघांच्या बाबतींत, जर अशा म्युनिसिपल डिस्ट्रिक्टांत, क्यान्टोन्मेंटांत अथवा जाहीरकेलेल्या प्रदेशांत घरांच्या किंवा इमारतीच्या वार्षिक भाड्यावर एकादा कर बसविण्यांत आला असेल तेंव्हां ज्याचें वार्षिक भाडें पंचमहाल किंवा रत्नागिरी जिल्ह्यांत २४ रुपयांहून कमी नव्हतें आणि इतर ठिकाणीं, ३६ रुपयांहून कमी नव्हतें किंवा जर अशा रीतीनें कोणताही कर बसविलेला नसेल तर ज्याची एकूण किंमत, पंचमहाल आणि रत्नागिरी जिल्ह्यांत १००० रुपयांहून कमी नव्हती आणि इतर ठिकाणीं १५०० रुपयांहून कमी नव्हती,

अशा घराचा किंवा इमारतीच्या अगर स्वतंत्र भोगवट्यांत असलेल्या घराच्या किंवा इमारतीच्या भागाचा भोगवटा, मालक किंवा भाडोत्री म्हणून राहण्यासाठीं किंवा कोणताही व्यापार, उद्योग किंवा धंदा यासाठीं करीत असेल;

असा इसम बिनमुसलमान किंवा मुसलमान खेडेगांवचे मतदार संघाकरितां निवडणूक करणारा म्हणून लायक असेल.

मात्र इतकेंच कीं,

(१) मुसलमान नसणारा कोणताही इसम मुसलमान मतदारसंघाकरितां निवडणूक करणारा म्हणून लायक असणार नाहीं, आणि

(२) बिनमुसलमान मतदारसंघाकरितां निवडणूक करणारा म्हणून कोणताही मुसलमान लायक असणार नाहीं.

## युरोपियन मतदारसंघ.

४ (१) जो मनुष्य युरोपियन असेल आणि ही बाबत खेरीज करून मुंबई शहर मतदारसंघाच्या निवडणूक करणारासाठीं त्यांत पूर्वी ठरलेली लायकी ज्यांस असेल असा मनुष्य मुंबई शहर (युरोपियन) मतदारसंघाकरितां निवडणूक करणारा म्हणून लायक असेल.

(२) जो मनुष्य युरोपियन असेल आणि ही बाबत खेरीज करून ज्यास शहराच्या किंवा खेडेगांवच्या मतदारसंघांत त्याची राहण्याची जागा असेल त्याप्रमाणें मुंबई शहरचा मतदारसंघ खेरीज करून शहराच्या किंवा खेडेगांवच्या मतदारसंघाच्या निवडणूक करणारासाठीं ह्यांत पूर्वी ठरविलेली लायकी असेल असा मनुष्य इलाखा (युरोपियन) मतदारसंघाकरितां निवडणूक करणारा ह्मणून लायक असेल.

## विशेष मतदारसंघ.

५ (१) ज्या मनुष्याचें नांव तारीख २३ माहे जुलै सन १८६७ चा मुंबई सरकारचा पोलिटिकल डिपार्टमेंटांतील ठराव नं. २३६३ या अन्वयेंच्या त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या यादींत नोंदिलेलें असेल किंवा ज्याला मतदाराची यादी प्रसिद्ध करण्याच्या तारखेच्या लगत पूर्वीच्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस खालील मतदारसंघांत असलेल्या एका सबंध गांवासंबंधानें खंड अथवा जमीन महसूल घेण्या विषयींचा सरकारचा हक्क एकट्यासच तबदील करून देण्यांत आला असेल असा मनुष्य दक्षिणेंतील सरदार व इनामदार यांच्या मतदारसंघाकरितां निवडणूक करणारा म्हणून लायक असेल.

(२) ज्या मनुष्याचें नांव तारीख २१ माहे सप्टेंबर सन १९०९ चा मुंबई सरकारचा पोलिटिकल डिपार्टमेंटांतील ठराव नं. ६२६५ या अन्वयेंच्या त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या यादींत नोंदिलेलें असेल किंवा ज्याला मतदारांची यादी प्रसिद्ध करण्याच्या तारखेच्या लगत पूर्वीच्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस खालील मतदारसंघांत असलेल्या एकाद्या सबंध गांवासंबंधानें खंड अथवा जमीन महसूल घेण्याविषयींचा सरकारचा हक्क एकट्यासच तबदील करून देण्यांत आला असेल, अथवा जो असा गांव

तालुकदारी सत्ताप्रकारान्वयें एकटाच धारण करीत असेल असा मनुष्य गुजराथेंतील सरदार व इनामदार यांच्या मतदारसंघाकरितां निवडणूक करणारा म्हणून लायक असेल.

(३) जो मनुष्य सिंधमध्यें पहिल्या अथवा दुसऱ्या वर्गाचा जहागिरदार असेल, किंवा ज्यानें मतदारांची यादी प्रसिद्ध करण्यापूर्वीच्या तीन महसुली वर्षांपैकीं प्रत्येक वर्षी सिंधमधील कोणत्याही जिल्ह्यांत असलेल्या जमीनीवर १००० रुपयांहून कमी नाहीं इतका जमीन महसूल दिलेला असेल असा इसम जहागिरदार व जमीनदार (सिंधमधील) यांच्या मतदारसंघाकरितां निवडणूक करणारा म्हणून लायक असेल.

६. ज्या मनुष्याचें मतदारांची यादी प्रसिद्ध करण्याच्या तारखेच्या लगत पूर्वीच्या एप्रिलच्या १ ल्या तारखेस (एडनवगळून) मुंबई इलाख्यांत राहण्याचें ठिकाण असेल आणि जो युनिव्हर्सिटीच्या सेनेटचा सभासद किंवा तिचा ऑनररी फेलो अथवा ज्यास ग्राज्युएट होऊन सातवर्षे झाली असतील असा युनिव्हार्सिटीचा ग्राज्युएट असेल, असा मनुष्य मुंबई युनिव्हर्सिटी मतदारसंघासाठीं निवडणूक करणारा म्हणून लायक असेल.

७. व्यापार व उद्योगधंद्याच्या मतदारसंघाकरितां निवडणूक करणारा म्हणून, ज्या मनुष्याचें नांव, मतदारसंघ करणाऱ्या संस्थेच्या त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या, सभासदांच्या यादींत नोंदिलेले असेल, किंवा सभासदांच्या अशा यादींत दाखल केलेल्या कोणत्याही पेढीच्या किंवा कंपनीच्या अगर संस्थापित मंडळीच्यावतीनें व नांवानें सभासदपणाचे हक्क व अधिकार चालविण्याचा ज्याला हक्क असेल असा इसम लायक असेल.

## किरकोळ.

८. जेव्हां अविभक्त कुटुंबातील मनुष्यें सामायिक कोणतीही मिळकत धारण करीत असतील किंवा तिचा भोगवटा करीत असतील किंवा पैसा देत असतील किंवा घेत असतील तेव्हां ह्या परिशिष्टाअन्वयें जरूर असलेली लायकी आहे

किंवा नाहीं हें ठरविण्यांसाठीं तें कुटुंब एक व्यक्ती म्हणून समजलें पाहिजे; आणि जर ती लायकी असेल, तर त्या कुटुंबाचा म्यानेजर फक्त अशा मिळकतीच्या किंवा पैशाच्या संबंधानें निवडणूक करणारा म्हणून लायक असेल.

९. ट्रस्ट या नात्यानें दुसऱ्याकरितां कोणतीहि मिळकत धारण करणारा किंवा तिचा भोगवटा करणारा अगर पैसा देणारा अथवा घेणारा कोणताही मनुष्य अशा मिळकतीच्या किंवा पैशाच्या संबंधानें कोणत्याही मतदार-संघासाठीं निवडणूक करणारा म्हणून लायक असणार नाहीं.

१०. कोणत्याही घरांत अथवा इमारतींत किंवा त्यावर अगर तिजवर असलेलीं कोणतींही यंत्रें, सामान किंवा सरंजाम यांच्या किंमतींचा, अशा घराच्या किंवा इमारतीच्या भाड्याचा अगर एकूण किंमतीचा अंदाज करितानां समावेश करतां कामा नये.

११. जो मनुष्य कोणताही हुद्दा नोकरी किंवा नेमणूक यामुळें कोणत्याही लष्करी किंवा पोलीस लैनींतील घरांखेरीज करून दुसऱ्या कोणत्याही राहात्या घराचा भोगवटा करीत असेल तो मनुष्य, अशा हुद्याच्या, नोकरीच्या किंवा नेमणुकीच्यामुळें ज्या इसमाच्या तो नोकरींत असेल तो इसम जर सदरहू राहत्या घरांत राहत नसेल तर त्या राहात्या घराचा भाडोत्री म्हणून भोगवटा करीत आहे असें समजावें.

१२. एकाद्या गांवांतील आकार बसविलेल्या जामिनीवरील आकारणीचा सरासरी दर किंवा जर त्या खेड्यांत अशी जमीन नसेल तर अशी जमीन असणाऱ्या सर्वांत नजीकच्या गांवांतील आकार बसविलेल्या जामिनीवरील आकारणीचा सरासरी दर, अशा गांवांतील आकार न बसविलेल्या जमीनीची आकार बसवितां येण्याजोगी किंमत ठरविण्यासाठीं दर म्हणून घेतला पाहिजे.

१३. कोणतीही आकारणी, खंड किंवा जमीन महसूल अदा करणें, भाडें, एकूण किंमत किंवा प्राप्ती वरील कर देणें, यासंबंधानें नोंदावयाच्या कोणत्याही हक्काचा निर्णय करण्याच्या कारणासाठीं, अशा आकारणीची, पैशाची किंवा किंमतीची रकम दाखविणारी कोणत्याही मुलकी कागदपत्रांतील किंवा कोणत्याही

म्युनिसिपल डिस्ट्रिक्टाच्या अथवा क्यांटोन्मेंटाच्या अथवा जाहीर केलेल्या स्थळाच्या रेकार्डांतील किंवा मुंबई शहराच्या म्युनिसिपल कार्पोरेशनच्या रेकार्डांतील नोंद अशा आकारणीच्या, पैशाच्या किंवा किंमतीच्या रकमेबद्दल निर्णायक पुरावा असेल.

हें मुंबई इलाख्याचें नियम झाले. इतर प्रांतांत कमी अधिक प्रमाणांत ह्याच आशयाचे नियम आहेत. मतदारांची लायकी वर सांगितल्याप्रमाणें कमी ठेवल्यामुळें मतदारांच्या संख्येंत वाढ झाली असून, त्याबरोबर साहाजिकपणेंच मतदार-संघांचें क्षेत्रहि विस्तृत झालें आहे. निरनिराळ्या प्रांतांत किती मतदार आहेत हें खालील कोष्टकावरून कळून येईल:--

| प्रांताचें नांव | मतदारांची संख्या | प्रांताचें नांव | मतदारांची संख्या |
|---|---|---|---|
| १ मद्रास | १२,५८,१५६ | ५ पंजाब | ५,०५,३६१ |
| २ मुंबई | ५,४८,४१९ | ६ बिहार | ३,२७,५६४ |
| ३ बंगाल | १०,२१,४१८ | ७ मध्यप्रांत | १,४४,७३७ |
| ४ संयुक्तप्रांत | १३,४७,२७८ | ८ आसाम | २,०३,१९१ |
| | | एकूण | ५३,५६,१२४ |

हिंदुस्थानच्या एकंदर वस्तीच्या मानानें पाहतां ही संख्या कांहींच नाहीं, असें दिसून येईल. हिंदुस्थानांत **अनिश्चित कालांतरानें** जबाबदार राज्यपद्धति प्रस्थापित करावयाची, हा ब्रिटिश सरकारचा अंतिम हेतू असल्यामुळें त्याची पूर्तता करण्यासाठीं मतदारसंघाचें क्षेत्र यांहून विस्तृत हवें होतें. कारण जबाबदार राज्य-पद्धतीची इमारत विस्तृत मतदार संघाच्या पायावरच उभारण्यांत आली पाहिजे. ब्रिटिश हिंदुस्थानांतील २४ कोटी लोकां पैकीं २२ कोटी लोक खेड्यांत राहतात. व यापैकीं शेंकडा ७१ जण शेतकीवरच उपजीविका करतात. त्यांना स्वतःच्या शेतवाडीच्या पलीकडें अगर बाहेर काय चाललें आहे, याची मुळींच जाणीव नसतें. कारण बाहेरच्या उठाठेवी करावयास त्यांना गृहकामामुळें बिलकूल वेळ मिळत नाहीं. वेळ मिळलाच, तर शिक्षणाच्या अभावीं त्या वेळाचा इतर कामांत कसा

सदुपयोग करावा हें त्यांस कळत नाहीं! अशी स्थिति असल्यामुळें या लोकांकडे सर्वांनीं विशेष लक्ष दिलें पाहिजे व त्यांच्या ज्या गरजा आहेत त्या पुरविण्याची तजवीज केली पाहिजे. इतरांची गोष्ट जरी बाजूस ठेवली, तरी सरकारचें यांच्याकडे विशेष लक्ष असावयास पाहिजे, कारण सरकारास जें कराच्या रूपानें उत्पन्न मिळतें, त्यांतील बराचसा भाग या लोकांनींच दिलेला असतो. यामुळें यांच्या सुखसोईची विशेष जवाबदारी सरकारच्या अंगावरच येऊन पडते. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, सरकार या बाबतींत द्यावें तितकें लक्ष देत नाहीं. सरकारी लहान सहान सर्व अधिकारी यांना पदोपदीं चांगलेंच नाडवतात व या गरिबांना हें हाल मुकाट्यानें सहन करावें लागतात. ही स्थिति केंव्हांही गर्हणीयच ठरेल! अधिकारी वर्गाचें लक्ष या वर्गाकडे वेधण्यास मुख्य मार्ग म्हणजे या लोकांचें आर्जव करण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला पाहिजे. अशी स्थिति येणें हिंदुस्थानास संपूर्ण स्वराज्य मिळेतोंपर्यंत जरी शक्य नसलें, तरी तत्पूर्वी थोड्या बहुत अंशानें तिची सुरवात व्हावयास कांहींच हरकत नाहीं.

**७७ जातवार प्रतिनिधींचें तत्व**—जातवार प्रतिनिधींचे तत्वाचा अंगिकार करण्यांत यावा, अशी कांही पुढाऱ्यांकडून सुधारणा ॲक्ट पास होण्यापूर्वी मागणी करण्यांत आली होती. जातवार प्रतिनिधींच्या उंटाचें पिल्लू १९०९ सालीं हिंदुस्थानांत घुसून सभासदांच्या संबंधीं मुसलमानांस विशेष मताधिकार देण्यांत आला होता. यामुळें इतर पोट जातींनीं आपल्या हक्कांची इतर बहुसंख्यांक जातींकडून पायमल्ली होऊं नये म्हणून आपणास मुसलमानाप्रमाणेंच स्पेशल मताधिकार असावा, अशी मागणी केली होती. परंतु या मागणीस सर्व राष्ट्राचा पाठिंबा नव्हता. 'जातीच्या योगानें मनुष्याची दृष्टी आकुंचित होते. राष्ट्रीयत्वाच्या उच्चभावनेचा या योगानें विकास होत नाहीं व उदात्त महत्वाकांक्षा समाजाच्या दृष्टीपुढें राहात नाहीं, असा ऐतिहासिक अनुभव आहे. व्यक्तीच्या उन्नतीच्या दृष्टीनें जातिविषयक अभिमानापासून उपयोग होतो हें खरें आहे, व अल्प संख्यांक जातींनीं आपल्या घटकावयाची सुधारणा करण्याकरितां जातीच्या अभिमानाचें प्रस्थ माजविणें एका दृष्टीनें योग्य होईल. परंतु जातीची मर्यादा देशाच्या मर्या-

देपेक्षां लहान आहे, जातीचा अभिमान देशाभिमानापेक्षां गौण आहे; व जातीच्या उन्नतीची कल्पना एक राष्ट्रीयत्वाच्या भावनेंमध्यें अंतर्भूत होते, याच कारणाकरितां जातीची उन्नति करणाकरितां झटणाऱ्या गृहस्थांनीं देशोन्नतीचें ध्येय केव्हांही दृष्टीवेगळें करून चालणार नाहीं. जातीची उन्नति करण्याकरितां सजातीयांनीं अवश्य प्रयत्न करावा, परंतु हा प्रयत्न देशोन्नतीच्या आड येऊं लागल्यास त्याचा निषेध करणें अत्यंत जरूर आहे.' ( वि. ज्ञा. वि. पु ४९ ) असें सर्वांचें (अर्थात् कांहीं वगळून ) म्हणणें होतें, व याचाच अनुवाद मि. मांटेग्यूनीं व साऊथबरो कमेटीनें करून ह्या मागणीस आपली नापसंती दर्शविली. इतकेंच नव्हें, पण मुसलमान लोकांना लॉर्ड मोर्ले यांनीं जो जातवार प्रतिनिधि निवडण्याचा हक्क दिला होता, तोहि आपणांस संमत नाहीं असें त्यांनीं आपल्या रिपोर्टांत स्पष्ट म्हटलें आहे. परंतु मुसलमानांस एकदां दिलेला हा अधिकार कांहीं कारणांमुळें काढूं नये, असें त्यांचें मत पडून, आहे हीच स्थिति कायम करण्यांत यावी अशी त्यांनीं शिफारस केली व ती अखेर मान्यहि करण्यांत आली. मुससमानांखेरीज फक्त शीख लोकांना जातवार प्रतिनिधि देण्याबद्दल मांटेग्यूनीं शिफारस केली होती. परंतु संयुक्त कमेटीनें याविरुद्ध जाऊन फक्त मुसलमानाकरितांच कांहीं जागा राखून ठेवाव्या असें मत दिलें. परंतु अखेर पंजाबांत शीख, मद्रासेंत ब्राह्मणेतर, व मुंबईत मराठे यांस स्वतंत्र जागा मिळाल्या. मुंबईत अशा राखीव जागा ७ आहेत.

**७८ स्त्रियांना मताधिकार**--स्त्रियांना मताधिकार द्यावा कीं देऊं नये, या प्रश्नावरहि वरील प्रश्नाप्रमाणेंच तुंबळ रण माजलें होतें. पुरुषांना मताधिकार असण्याला जी पात्रता ठरविलेली असेल तितकी पात्रता ज्या स्त्रियांना असेल त्यांना मताधिकार देण्यांत यावा, अशी स्त्रियांकडून जोराची मागणी करण्यांत आली होती. हिंदी स्त्रियांच्या ठिकाणीं स्वतःच्या नागरिक या नात्यानें असलेल्या कर्तव्यांची जाणीव उत्पन्न होण्या करितां, त्याच प्रमाणें, राष्ट्राचें अर्धांग ज्या स्त्रिया त्यांची उन्नति होऊन राष्ट्रीयत्वाचा पूर्ण विकास होण्यासाठीं स्त्रियांना मताधिकार देणें आवश्यक आहे, असें स्त्रियांचें म्हणणें होतें. १९१७

सालांपासून स्त्रियांनीं मताधिकाराकरितां जोराची चळवळ सुरूं केली होती. त्याखालीं कलकत्त्यास भरलेल्या राष्ट्रीय सभेमध्यें श्री. सौ. सरोजिनी नायडू यांनीं स्त्रियांना मताधिकार देण्यासंबंधाचा ठराव आणल्या पासून या प्रश्नास फार जोराची चालना मिळाली. राष्ट्रीय सभेंत या प्रश्नावर उगाच रणें माजतील या भीतीनें कित्येक मंडळींच्या आग्रहास्तव त्यांनीं तो ठराव मागें घेतला. परंतु यामुळें त्यांचा उत्साह कमी न होतां, **कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें** या न्यायानें तो उलट द्विगुणीत झाला. व याचें प्रत्यंतर १९१८ च्या मे महिन्यांत विजापुर येथें भरलेल्या मुंबईच्या प्रांतिक परिषदेमध्यें आलें. सौ. सरोजिनी नायडूंनीं त्या परिषदे पुढें मागीलच ठराव पुनः मांडला व त्यावेळीं सर्वांनीं तो उत्साह पूर्वक मान्य केला. त्यानंतर मुंबई येथील राष्ट्रीय सभेच्या खास अधिवेशन प्रसंगीं या बाईनींच तो ठराव पुनः आणला. या ठरावावर पुष्कळ कडाक्याचा वादविवाद होऊन अखेर तो बहुमतानें पास झाला. परंतु या प्रश्नावर राष्ट्रांत किती तीव्र मतभेद आहेत, हें या प्रसंगीं चांगलेंच दिसून आलें व तें पुढेंहि तसेंच कायम राहिले. यामुळें संयुक्त कमेटीनें हा प्रश्न प्रान्तिक कौन्सिलांच्या मर्जीवर सोपविला. त्याचा फायदा घेऊन मुंबई व मद्रास येथील कौन्सिलांनीं स्त्रियांना मतदार संघांत सामील करून घेतलें आहे. बंगाल प्रांतानें इतकी उदारबुद्धी दाखविली नाहीं. इतर प्रांतातूनहि या सवलतीचा फायदा अद्यापि देण्यांत आलेला नाहीं. परंतु आनंदाची गोष्ट ही कीं, लखनौ येथें नुकत्याच भरलेल्या संयुक्त प्रांताच्या कौन्सिलांत पं. गुर्टु यांनीं ठराव आणून मतदार संघाच्या सभासदत्वाच्या बाबतींत संयुक्त प्रांतात स्त्रियावर घालण्यांत आलेला निर्बंध काढून टाकण्याविषयींचा आपला ठराव एक-मतानें पास करून घेतला. उशिरानें कां होईना, इतर प्रांतहि असेंच औदार्य दाखवितील काय ?

**७९ प्रांतिक कायदे मंडळांची मुदत व बैठका**—आपल्या पहिल्या सभेपासून प्रत्येक कौन्सिल तीन वर्षेपर्यंत चालेल. ही मुदत कमी करण्याचा अगर ज्यास्तींत ज्यास्त १ वर्षपर्यंत वाढविण्याचा अधिकार गव्हर्नरांस आहे. कौन्सिल मोडल्यानंतर सहा महिन्याच्या आंत किंवा सेक्रेटरी ऑफ स्टेटची मंजुरी मिळा-

त्यास नऊ महिन्याच्या आंत नवीन निवडणूक झालीच पाहिजे. कौन्सिलच्या बैठका भरण्यासाठीं ज्यावेळा व जागा गव्हर्नरास योग्य वाटतील तशा वेळा व जागा नेमण्याचा त्यास अधिकार आहे. कौन्सिलची कोणतीहि सभा अध्यक्षाच्या जागीं असणाऱ्या इसमास तहकूब ठेवण्याचा अखत्यार आहे. कौन्सिलांतील सर्व प्रश्नांचा निकाल अध्यक्षाच्या जागीं असणाऱ्या सभासदाखेरीज हजर असलेल्या सभासदांच्या बहुमतानें लावला पाहिजे; परंतु अध्यक्षाच्या जागीं असणाऱ्या सभासदास मतें सारखीं पडलीं असतील तर त्या बाबतींत निर्णायक मत असेल व त्याचा त्यानें उपयोग केला पाहिजे. या कौन्सिलांचे अधिकार कौन्सिलांतील कोणतीही जागा रिकामी झालेली असली तरी चालविण्याचा अखत्यार आहे.

**८० प्रांतिक कौन्सिलांचा अध्यक्ष**--सुधारलेलीं कौन्सिलें अस्तित्वांत येण्यापूर्वी प्रांतिक कौन्सिलांच्या अध्यक्षपणाचा मान गव्हर्नरास देण्यांत आला होता. मि. मांटेग्यूनीं आहे तीच व्यवस्था पुढें चालू ठेवावी अशी शिफारस केली होती. म्हणजे पूर्वीप्रमाणेंच गव्हर्नरासच त्यांना अध्यक्षस्थान द्यावयाचें होतें. तसेंच गव्हर्नराच्या गैरहजेरींत कांहीं काळपर्यंत उपाध्यक्ष नेमण्याचा अधिकार त्यांस असावा व हा उपाध्यक्षही सरकारी नोकर असावा असेंही त्यांनीं सुचविलें होतें. परंतु पार्लमेंटरी कमेटीस ही सूचना जबाबदार राज्यपद्धतीच्या तत्वाशीं विसदृश वाटून तिनें असें ठरविलें कीं, पहिल्या चार वर्षांकरितां गव्हर्नरनें त्याच्या मर्जीस येईल त्या सभासदास या कौन्सिलचा अध्यक्ष नेमावें व त्यानंतर सभासदांनींच आपल्यांतून एकादा सभासद अध्यक्ष म्हणून निवडावा. वरिष्ठ कायदे मंडळाप्रमाणेंच या कौन्सिललाहि आपल्या सभासदांतून उपाध्यक्ष निवडण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. मात्र तो गव्हर्नराच्या पसंतीस उतरला पाहिजे. या अध्यक्ष उपाध्यक्षास किती पगार असावा, हें ठरविण्याचा अधिकार कौन्सिलास देण्यांत आला आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

**८१ प्रांतिक कायदे कौन्सिलांचे अधिकार**—कोणत्याही प्रांताच्या कायदे मंडळास त्या त्या वेळीं तो प्रांत ज्या मुलुखाचा बनलेला असेल अशा मुलुखाच्या शांततेसाठीं व सुराज्यव्यवस्थेसाठीं कायदे करण्याचा आणि कांहीं

अपवाद खेरीजकरून ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही अधिकाऱ्यानें केलेला कोणताही कायदा त्या प्रांतासंबंधानें रद्द करण्याचा किंवा त्यांत फेरफार करण्याचा अधिकार आहे. परंतु खालील बाबतींचा विचार करावयाचा झाल्यास हिंदुस्थान सरकारची अगाऊ परवानगी घ्यावी लागते:-( १ ) आपल्या अधिकारांत नसलेला कर कमिजास्त करणें ( २ ) राष्ट्रीय कर्ज, आयात निर्गतीवरील जकाती व हिंदुस्थानसरकारनें आपल्या जमाखर्चाकरितां बसविलेला कर (३) आरमार, लष्कर व विमान या खात्यांची शिस्त व व्यवस्था ( ४ ) परराष्ट्र संबंध ( ५ ) वरिष्ठ सरकारकडे राखून ठेविलेली खातीं ( ६ ) प्रांतिक सरकारकडे सोंपविलेल्या खात्यापैकीं ज्या खात्यासंबंधीं कायदे करण्याचा हक्क वरिष्ठ सरकारकडे राखून ठेविला आहे अशी खातीं ( ७ ) एकाद्या स्पेशल कायद्यानें ग. जनरल-इन्-कौन्सिल यांनाच जो अधिकार राखून ठेवला असेल असें एकादें प्रकरण ( ८ ) पूर्वी पास झालेल्या किंवा यापुढें पास होणाऱ्या ज्या कायद्यांत हा कायदा प्रांतिक सरकारला वरिष्ठांच्या परवानगीशिवाय बदलतां येणार नाहीं अशी अट नमूद केली असेल असे कायदे. ( प्रत्यपवाद )-एकाद्या कायद्याला प्रांतिक सरकारनें अगाऊ मंजुरी घ्यावी अशी अट असतां प्रांतिक कौन्सिलनें अगाऊ मंजुरीवांचून तसला कायदा पास केला व त्यास ग. जनरलनें मागाहून मंजुरी दिली तर तो कायदा बेकायशीर ठरत नाहीं. ( ९ ) पार्लमेंटनें पास केलेल्या एकाद्या ॲक्टाला बाध येईल असा कायदा.

प्रांतिक सरकारचें बजेट मंजूर अगर नामंजूर करणें कौन्सिलच्या हातीं आहे. हिंदुस्थान सरकारास प्रांतिक सरकारांनीं द्यावयाची खंडणी, कर्जावरील व्याज व सिंकिंग फंड चार्ज, भारत मंत्री यांनीं नेमिलेल्या इसमांचे पगार व पेनशनें, प्रांतांतील वरिष्ठ कोर्टाच्या जज्जांचे व ॲडव्होकेटचा पगार, यांस कौन्सिलची मंजुरी लागत नाहीं. कौन्सिलनें नामंजूर केलेली कोणतीही रकम, तिचा राखीव खात्यांशीं संबंध असल्यास अगर आपली जबाबदारी पार पाडण्यास तिची फार आवश्यकता आहे या कारणांवर गव्हर्नरास खर्च करतां येते.

**८२ गव्हर्नरास दिलेला सुलतानी अधिकार**-सुधारणा कायद्यानें

प्रांतिक कायदे मंडळांत लोकनियुक्त सभासदांचें प्रचंड बहुमत ठेवल्यामुळें येथील नोकरशाहीचें धाबें दणाणून गेलें असल्यास नवल नाहीं! मोर्ले–मिंटो सुधारणांमुळें जरी सर्वस्वी लोकनियुक्त सभासदांचें संख्याधिक्य असलेली कौन्सिलें आस्तित्वांत आली होतीं, तरी सरकारास पाहिजे तो कायदा लोकप्रतिनिधींच्या इच्छेविरुद्ध या कौन्सिलाकरवीं पास करून घेतां येत असे. परंतु नवीन सुधारणा कायद्यानें प्रस्थापित झालेल्या कौन्सिलांत लोकप्रतिनिधींचें प्रचंड बहुमत झाल्यामुळें सरकारास इष्ट ते कायदे पूर्वीप्रमाणेंच या कौन्सिलाकरवीं पास करून घेण्याची आशा राहिली नाहीं. म्हणून सरकारनें याकरितां एक निराळीच शकल लढवून आपले मनोरथ पूर्ण करण्या करितां गव्हर्नरच्या हातांत बरीच अनियंत्रित सत्ता दिली आहे. सरकारच्या दृष्टीनें इष्ट असलेल्या कायद्याच्या मसुद्यास कौन्सिलनें आपली संमति देण्याचें जर नाकारलें अगर गव्हर्नरनें शिफारस केलेल्या स्वरूपांत जर तो पास केला नाहीं, तर आपली जबाबदारी पार पाडण्यास तो मसुदा पास होणें अवश्य आहे असा दाखला देण्याचा सुलतानी अधिकार गव्हर्नरास देण्यांत आला आहे. अशा रीतीनें गव्हर्नराची संमति मिळतांच, कौन्सिलनें त्या मसुद्यास आपली संमति दिली नसली तथापि कायद्याचें स्वरूप येते. अशा प्रत्येक ॲक्टांत तो गव्हर्नरनें केला आहे असें दर्शविलें पाहिजे, व गव्हर्नरनें त्याची एक खरी नकल ग. जनरलकडे लागलीच पाठविली पाहिजे, व त्यांनीं तो आक्ट मलिक माआझम यांच्या मंजुरीसाठीं राखून ठेविला पाहिजे, असें कांहीं निर्बंधहि त्याबरोबरच घालण्यांत आले आहेत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. मलिक माआझम इन् कौन्सिल यांजकडून त्या आक्टास मंजुरी मिळाल्यानंतर व ती ग. जनरल यांनीं जाहीर केल्यानंतर, स्थानिक कायदे मंडळानें पास केलेल्या आणि योग्य रीतीनें मंजुरी मिळालेल्या आक्टाप्रमाणेंच त्या आक्टाचा अमल व परिणाम होतो. परंतु जेव्हां ग. जनरलास एकाद्या बिकटप्रसंगीं एकाद्या आक्टास मंजुरी देणें वाजवी आहे असें वाटेल तेव्हां तो आक्ट राखून न ठेवितां त्यांस लागलीच आपली मंजुरी देण्याचा ग. ज. ला अधिकार देण्यांत आला आहे. ग. ज. ची अशा रीतीनें मंजुरी मिळतांच त्या आक्टाचा वर सांगितल्या प्रमाणे अमल व परिणाम होतो. परंतु तो मलिक माआझम इन् कौन्सिल यांस नामंजूर करतां येतो.

**८३ गव्हर्नरची संमति**--अशा रीतीनें स्वतःस इष्ट वाटेल तो कायदा जसा सरकारास लोकप्रतिनिधींच्या इच्छेविरुद्ध पास करून घेतां येतो तसाच लोकप्रतिनिधींनी पास केलेला पण स्वतःस इष्ट वाटत नसलेला कायदाही सरकारास हाणून पाडतां येतो. सुधारणा कायद्यानें गव्हर्नराच्या हातांत असें एक शस्त्र देऊन ठेविलें आहे कीं, त्याच्या प्रभावापुढें लोकप्रतिनिधींची बिलकुल डाळ शिजत नाहीं. ह्या म्हणण्याची सत्यता खालील नियमांवरून कळून येईल.

(१) जेंव्हा प्रांतिक कायदे कौन्सिलानें एकाद्या आक्टाचा मसुदा पास केला असेल, तेंव्हां प्रांतिक सरकारास आपण त्या आक्टाच्या मसुद्यांस मंजुरी देत नाहीं असें जाहिर करण्याचा अधिकार आहे. प्रांतिक सरकारनें अशा कोणत्याही ॲक्टाच्या मसुद्यांस मंजुरी देण्याचें नाकारलें तर त्या मसुद्यास कायद्याचें स्वरूप येत नाहीं. परंतु जर प्रांताधिपतीनें अशा मसुद्यास आपली संमति दिली, तर त्या आक्टाची एक खरी नकल ग. जनरल याजकडे ताबडतोब पाठविली जाते व त्यांची त्या आक्टास मंजुरी मिळून ती सरकारी रीत्या प्रसिद्ध करण्यांत येई-तोपर्यंत त्यास कायदेशीरपणा येत नाहीं. ग. जनरलनें अशा कोणत्याही ॲक्टास संमति देण्याचें नाकारलें, तर त्यांस असें करण्याची कारणें प्रांतिक सरकारास कळवावी लागतात.

(२) कायदे कौन्सिलनें पास केलेल्या बिलास प्रांतिक सरकारास कांहीं फेरबदल करावयाचा असल्यास, त्या बिलाविषयीं पसंती अगर नापसंती कांहींच न सांगतां आपल्या स्वतःच्या सूचनासह तें बिल फेरविचारा करितां कौन्सिल कडें, अगर ग. जनरलच्या संमति करितां पाठविण्याचा आधिकार गव्हर्नरास आहे गव्हरनर-जनरलकडें पाठविलेल्या बिलांत दुरुस्ती व्हावी अशी त्यांची सूचना असल्यास सहा महिन्याच्या आंत तें दुरुस्ती करितां कौन्सिलकडे परत पाठविण्यांत येतें. अशा रीतीनें दुरुस्ती करितां आलेल्या बिलांत ती दुरुस्ती होऊन किंवा दुरुस्ती नापसंत होऊन तें बिल पास झाल्यास फिरून ते गव्हर्नरकडे मंजूरी करतां येतें.

ग. जनरलच्या संमतीकरितां पाठविलेल्या बिलाला ग. जनरलची संमति मिळाल्यास प्रांतिक सरकारची वेगळी संमति मिळण्याचें कारण उरत नाहीं. सहा

माहिन्याच्या आंत ग. जनरलची संमति न मिळेल तर तें बिल रद्द होतें. ग. जनरलच्या संमतीकरितां पाठविलेल्या बिलांत जर त्यास कांहीं दुरुस्ती सुचवावयाची असेल वर त्याच्याकडून तें बिल मंजुर किंवा नामंजुर असें कांहींच न म्हणतां ६ महिन्याच्या आंत तें आपल्या सूचनासह परत कौन्सिलकडें पाठविलें जातें; कौन्सिलची बैठक त्यावेळीं चालू नसल्यास आपण तें बील दुरुस्तीकरितां पाठविणार आहों असें गॅझेटांत तो प्रसिद्ध करतो. आपल्याकडे संमतिकरितां आलेल्या एकाद्या बिलास राजेसाहेबांची संमति मिळणें अवश्य आहे, असें ग. ज. ला वाटल्यास तें बिल राजेसाहेबांकडे रवाना केलें आहे असें, तो जाहीर करतो. व मग राजेसाहेबांची त्यांस संमति आहे असें स्टेट सेक्रेटरी कडून लिहून आल्यावर व ग. ज. कडून ती संमति जाहीर झाल्यानंतर तें बिल अमलांत येतें.

८४ **कायदे कौन्सिलांतील कामकाज**—नवीन कायदे कौन्सिलांच्या रचनेसंबंधानें, त्यांत निवडून व नेमून आलेल्या सभासदांसंबंधानें आणि त्यांच्या अधिकारासंबंधानें आतापर्यंत वर विवेचन केलेंच आहे. आतां येथील कामाच्या निरानिराळ्या तीन अंगासंबंधानें विचार करून हें बरेंच लांबलेलें प्रकरण संपवावयाचा आमचा विचार आहे. ही तीन अंगें म्हणजे (१) कायदेकानू करणें (२) प्रश्न विचारणें व (३) जमाखर्चाचें अंदाजपत्रक मंजूर करणें, हीं होत.

कोणाही सभासदास कोणत्याही विषयासंबंधानें कायद्याचें बिल कौन्सिलपुढें मांडता येतें. परंतु आपण अमुक अमुक बिल मांडणार आहोंत, असें कौन्सिलच्या बैठकींपूर्वी निदान एक महिना अगाऊ यानें कळविलें पाहिजे बिल आणण्याची परवानगी मिळतांच त्या बिलाचा मसुदा, त्याची कारणें व हेतू यासह सरकारी गॅझेटात प्रसिद्ध होतो. हें बिलाचें पहिलें वाचन झालें. विशेष महत्वाच्या विषयासंबंधीं जर तें बिल असेल तर कधीं कधीं पहिल्या वाचनासच त्य वर चर्चा होतें. यामुळेंच स. १९११ सालीं ना. गोखले यांच्या सक्तीच्या शिक्षणाच्या बिलावर पहिल्या वाचनप्रसंगींच वादविवाद झाला होता. बिलाच्या पहिल्या वाचनास सुरवात होते, त्यावेळीं त्याच्या युक्तायुक्ततेवर चर्चा होतें व तें पास झाल्यास एका सिलेक्ट कमेटीकडें सोंपलें जातें. सिलेक्ट कमेटी बिलाचा कलमवार विचार करून कौन्सिलास आपला रिपोर्ट सादर

करते; नंतर या रिपोर्टावर कलमवार चर्चा होते व बिलांत त्याप्रमाणें फेरफार करण्यांत आल्यावर मतें घेण्यांत येऊन बिल तिसऱ्यांदा पसार होतें.

यानंतर प्रश्न विचारण्याची बाब घेऊं. महत्वाच्या मानानें पहातां प्रश्न विचारण्याचा हक्क अगदीं कमी दर्जाचा आहे. लोकांचें लक्ष वेधून राहिलेल्या प्रश्नावर किंवा इतर सार्वजनीक बाबतींत सरकारचें मत काय आहे, तसेंच एकाद्या गुंतागुंतीच्या सार्वजनीक बाबतींतील खरें खोटें काय आहे, हें आपणास प्रश्न विचारण्यानें कळतें. कौन्सिलच्या बैठकींच्या सुरवातीस कोणाही सभासदास सार्वजनीक बाबी संबंधीं प्रश्न विचारतां येतो. अधिकाऱ्यांकडून प्रश्नाचें उत्तर मिळाल्यावर त्या बाबतींत त्यास कांहीं शंका राहिल्यास उपप्रश्न विचारून तिचें त्यांस निरसन करतां येतें.

तिसरी बाब म्हणजे जमाखर्चाच्या अंदाजपत्रकाची; व हीच बाब सर्वांत महत्वाची आहे. दरवर्षीं व्हाइसरॉय ठरवितील त्या दिवशीं फडणिसांकडून आगामी वर्षाचें जमाखर्चाचें अंदाजपत्रक कौन्सिलपुढें मांडण्यात येतें. या पत्रकांत मागील वर्षाचा सर्व हिशोब व पुढील वर्षाकरितां जमाखर्चाचे अंदाजलेले आंकडे, यांचा समावेश करण्यांत आलेला असतो. बजेटाच्या छापील प्रति सभासदांस वाटण्यांत आल्यावर फडणीस सर्व बजेट सभासदांना समजाऊन देतो. जनतेवर नवीन कर, जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याकरता लादणें त्या सालीं जर आवश्यक असलें तर ते कोणच्या प्रमाणांत लादावें, वगैरेची सर्व हकीगत तो सभासदांना सांगतो. बजेट ज्या दिवशीं कौन्सिलास सादर करण्यांत येतें, त्यादिवशीं त्यावर मुळींच चर्चा होत नाहीं. कारण तें वाचून त्यावर मनन करण्यांस सभासदांना वेळ मिळावा लागतो. या नंतर थोडया दिवसांनीं बजेटवर चर्चा सुरू होते. प्रथम फक्त बजेटवर कांहीं ठराविक दिवस प्राथमिक चर्चा होते चर्चा पुरी झाल्यानंतर सभासदांच्या शंका कुशंकाचें फडणीस निरसन करतो. यानंतर कार्यकारी मंडळाचा प्रत्येक सभासद आपल्या ताब्यांतील खात्यांचा हिशोब सभासदांना समजावून देतो. व खर्चाकरितां जरूर ती रकम मागून घेतो. दोन दिवसांत अशा मागण्या संपल्या पाहिजेत. व एकंदर

बजेटावरील वादविवाद पंधरा दिवसाच्या आंत संपला पाहिजे. वादविवादाच्या शेवटच्या दिवशीं बाकी राहिलेल्या सर्व मागण्यांवर एकदम मतें घेण्यांत येतात अशा रीतीनें बजेटाचें काम पुरें होतें. बजेटांत मंजुर केलेल्या रकमाप्रमाणेंच खर्च होत आहे कीं नाहीं, हें पहाण्याकरितां कौन्सिलच्या सभासदांतून एक बारा सभासदांची कमेटी नेमण्यांत येते, तींत ९ लोकनियुक्त सभासद असतात.

याशिवाय एखादा महत्वाचा प्रश्न उद्भवल्यास सरकारचें लक्ष त्याच्याकडे वेधण्याकरितां कौन्सिलांत चाललेलें काम तहकूब ठेवण्याविषयीं कोणाही सभासदांस सूचना आणतां येते. यासूचनेस निदान तीस सभासदांनीं पाठिंबा दिल्यास त्या वेळीं चाललेलें काम तहकूब राखण्यांत येतें व मग महत्वाच्या प्रश्नावर चर्चा सुरू होतें.

हें वरिष्ठ कायदे मंडळांतील कामकाजाविषयीं झालें. प्रांतिक कायदे-मंडळांतील कामकाजही अशाच रीतीनें चालते. त्यांत थोडा बहुत फरक आहे, परंतु तो लक्षांत घेण्यासारखा नाहीं.

---

# प्रकरण ७ वें.

## न्यायपद्धति.

८५ **पूर्वेतिहास**—मागील प्रकरणांत कायद्याबद्दल व ते करण्याचा रीतिबद्दल सविस्तर सांगितलें आहे. या प्रकरणांत त्या कायद्यांची अंमलबजावणी कोणच्या रीतीनें केली जाते, हें सांगावयाचें आहे. ईस्ट इंडिया कंपनीचा पाय येथें रुतण्यास नेटिव राजांची कृपाच कारणीभूत झाली व मुंबई बेटांतील वखारीशिवाय तिच्या बाकीच्या सर्व वखारी नेटिव राजांच्या मुलुखांत होत्या; या एका गोष्टीवरून जर कोणी असें अनुमान बांधील, कीं एतद्देशीय राजांनीं केलेले कायदे कंपनीस संमत होते व तदनुरोधानेंच ती वागत होती, तर तें चुकीचें ठरेल. एकाद्या देशांत एकादा तिऱ्हाईत आल्यास व त्यानें तेथें वस्ती केल्यास, त्यास

त्या देशांतील कायदे बंधनकारक होतात; त्यांचें त्यास उल्लंघन करतां येत नाहीं, असें आपण व्यवहारांत पाहतो. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, कंपनी सर्वस्वी परक्या देशांतील असतांनाहि, तिनें येथील कायद्यास कधींहि मान तुकविली नाहीं व आमच्या लोकांनीं या गोष्टीची कधीं विचारपूस देखील केली नाहीं, हें त्याहून आश्चर्य ! इंग्लंडच्या राजांकडून कंपनीस व्यापार करण्याकरितां वेळों वेळीं ज्या सनदा मिळत गेल्या त्यांत त्यांनीं कंपनीस इंग्लिश चाली रीतीला पोषक असें कायदे करण्याचा अधिकार दिला होता यामुळें आरंभापासून कंपनीनें इंग्लिश कायद्याअन्वयेंच आपल्या हद्दीतील खटल्यांचे निकाल केले. वॉरन हेस्टिंगच्या कारकीर्दींत नंदकुमारांस जी फाशीची कडक शिक्षा देण्यांत आली, ती ह्यामुळेंच. इंग्रजांनीं आपल्याबरोबर इकडे आपला कायदा आणला असें ह्मणतात, ते याववरून. इ. स. १६६१ त दुसऱ्या चार्लस् राजाकडून कंपनीस तिच्या व्यापारी ठाण्यांत राहणाऱ्या लोकांचे दिवाणी व फौजदारी मुकदमे इंग्रजी कायद्या प्रमाणें चालविण्याचा अधिकार मिळाला. पुढें स. १७२६ सालीं मुंबई, मद्रास व कलकत्ता या तीन शहरांत मेयरचीं कोर्टें इंग्लंडच्या राजाच्या संमतीनें स्थापण्यांत आलीं. या कोर्टांत एक मेयर व इंग्लंडचे नागरिक असलेले असें नऊ ऑल्डरमेन असावेत व त्यांनीं इंग्रजी कायद्याप्रमाणें न्यायमनसुब्याचें काम करावें, असें ठरविण्यांत आलें.

प्लासीच्या लढाईनंतर झालेल्या तहाअन्वयें कंपनीस बराच मुलूख मिळाला. त्याकाळीं व नंतर कंपनीच्या अमदानींत सर्वत्र अंदाधुंदी माजली असल्यामुळें न्यायदेवतेची उघड उघड थट्टाच होत असे. सर्वांगसुंदर न्यायपद्धति तेंव्हा अस्तित्वांत नव्हती. कंपनीस शहाअलम बादशहाकडून जरी तेंव्हां दिवाणी सनद मिळाली होती, तरी दिवाणी व फौजदारी मुकदम्यांचा निवाडा करण्याचा अधिकार नव्हता. परंतु वॉरन हेस्टिंगच्या कारकीर्दींत कंपनीनें न्याय देण्याचें काम आपल्या हातीं घेऊन आजवर चालत आलेलें आपलें धोरण बदललें. रेग्युलेटिंग ॲक्टाअन्वयें दिवाणी व फौजदारी अदालती व एक सुप्रीम कोर्ट स्थापण्यांत आलें. रेग्युलेटिंग ॲक्टांतील दोषामुळें सुप्रीम कोर्ट व ग. जनरलरच्या कौंसिलांत कसे तंटे लागत, हें येथें सांगण्याची जरूरी नाहीं. पुढें १७८१ सालीं हे दोष काढून टाकण्यांत आले व त्यामुळें सुप्रीम कोर्टाचे अधिकार नियमित झाले.

प्रथमतः आपल्या स्वतःच्या देशाचे कायदे हिंदुस्थानास लागू करावें असा इंग्रजांचा विचार होता. परंतु ह्या विचारास त्यांना मूर्त स्वरूप कांहीं कारणामुळें देतां आलें नाहीं. स १७८१ सालाच्या कायद्यानें कलकत्यांतील सुप्रीम कोर्टास सर्व तऱ्हेचे खटले एतद्देशीय कायद्याच्या आधारें चालविण्याचा अधिकार मिळाला. पुढें पाश्चिमात्य शिक्षणाचा व रीतीभातींचा इकडे जसजसा ज्यास्त फैलाव होत गेला तसतसा या धोरणांत वेळों वेळीं बदल करण्यांत आला. व आज तर येथील कायद्यांस सर्वस्त्री विदेशी स्वरूप आलें आहे.

इ. स. १७७१ सालापर्यंत मद्रास व मुंबईत मेयर कोर्टेंच अस्तित्वांत होती परंतु या सालीं त्यांना रेकार्ड कोर्टस्चें स्वरूप देण्यांत आले. पुढें स. १८०० सालीं मद्रास येथें व स. १८२३ सालीं मुंबईत बंगाल्यांतील सुप्रीम कोर्टाप्रमाणें नवीं कोर्टें स्थापण्यांत आलीं. लॉर्ड कॉर्नवॉलिस, वेलस्ली व बेंटिंक यांच्या कारकीर्दीत न्याय पद्धतींत झालेल्या सुधारणांचें तपसीलवार वर्णन करण्याची येथें जरूरी नाहीं. पुढें या कोर्टांचें रूपांतर १८६१ सालीं हायकोर्टांत झालें.

**८६ हायकोर्टें**—हिंदुस्तानांतील प्रचलित न्यायपद्धतीचा पाया स. १८६१ च्या इंडियन हायकोर्टस् ॲक्ट पास झाल्यावर घातला गेला. या ॲक्टानें मुंबई, मद्रास आणि कलकत्ता व यानंतर कांहीं वर्षांनीं अलाहाबाद येथें हाय-कोर्टांची स्थापना करण्यांत येऊन पूर्वीची सदर व सुप्रीम कोर्टें बंद करण्यांत आलीं; आणि या दोन्ही कोर्टांना पूर्वी जे अधिकार होते ते सर्व या हायकोर्टांना देण्यांत आले. स. १९१५ सालीं पाटणा येथें एक नवें हायकोर्ट स्थापण्यांत आल्यामुळें हायकोर्टांच्या संख्येंत एकाची भर पडली. हायकोर्टांतील सर न्याया-धिशांच्या नेमणुका खुद्द बादशहांकडून केल्या जातात व मर्जीस वाटेल तेव्हां त्यांना या न्यायाधिशांना कमी करतां येते. इंग्लंडांत असा प्रकार नाहीं तेथें न्यायाधिशाची एकदां नेमणूक झाली कीं, ती जवळ जवळ कायमचीच होते. त्यांस कमी करण्याचा अधिकार कायद्यानें कोणासच दिला नाहीं. न्यायाधिशाच्या हातून न्यायदानाचें कार्य जोपर्यंत निःपक्षपातानें सुरळीत व विनबोभाट होत आहे तोपर्यंत त्याच्याविरुद्ध चकार शब्द बोलण्याचा कोणासहि अधिकार नसतो. परंतु

त्यांत कांहीं खामी आढळल्यास मात्र त्यास पदभ्रष्ट व्हावें लागतें. हिंदुस्थानांत या पद्धतीचें अवलंबन केल्यास न्यायदानाचें काम ज्यास्त निःपक्षपातपणानें होईल असें कांहींचें ह्मणणें आहे व तें बरोबर आहे पक्षपाताच्या दूषित हवेपासून न्यायासन अलिप्त राहण्याकरितां न्यायाधिशास पूर्ण स्वतंत्र अधिकाराची जरूरी आहे. त्याच्यावर सत्ताधिकाऱ्यांचें बिलकूल वजन पडतां उपयोगी नाहीं. हल्लींच्या पद्धतींत अशी स्थिति आढळत नाहीं. न्यायाधिशास वाटेल त्या वेळीं कमी करण्याची सत्ता बादशहांच्या हातीं असल्यामुळें, एकादा निःपक्षपाती न्यायाधीश अधिकाऱ्यांच्या मार्गांत आड येऊं लागला तर त्यांस पदभ्रष्ट करण्याकरितां अधिकाऱ्यांकडून नाना तऱ्हा करण्यांत येतात व इज्जतीच्या भरीस पडून सरकारकडून त्यांस काढण्यांत येतें. ही स्थिति अर्थात्च चांगली नाहीं! तेंव्हां या बाबतींत सुधारणा होणें इष्ट आहे. हायकोर्टांतील न्यायाधिशांपैकीं ⅓ जण सनदी नोकरांपैकीं असावेत व दुसरे नामांकित बॅरिस्टर्स असावेत असें ठरविण्यांत आलें आहे, तसेंच हायकोर्टाच्या सर न्यायाधिशाच्या जागीं असलेला इसम बॅरिस्टर असावा असाही एक नियम आहे. परंतु ज्याची या जागेवर हंगामी ( Acting ) नेमणूक झाली आहे त्यास हा नियम लागू नाहीं.

**८७ हायकोर्टांचे अधिकार**—हायकोर्टाचे अधिकार फार मोठे आहेत. आपआपल्या इलाख्यांतील खालच्या कोर्टांवर या ( सनदी ) हायकोर्टांना देखरेख करावी लागते. तेथें सर्वप्रकारचें दिवाणी व फौजदारी खटलें आरंभापासून तों थेट अपिलापर्यंत चालतात. परंतु इलाख्याच्या मुख्य शहराच्या हद्दींतलाच खटला त्यांना आरंभापासून चालवितां येतो. तसेंच दिवाणी व फौजदारी कामांतील जिल्हा कोर्टांच्या निकालाविरुद्ध अपिलें झाल्यास ती त्यांना चालवावी लागतात. कांहीं विशेष खटले खेरीज करून याच वरिष्ठ कोर्टांचा निकाल अखेर कायम करून त्याची अंमलबजावणी होते. वर सांगितलेले विशेष खटले ह्मटलें ह्मणजे, ज्यामध्यें हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध, त्याच्याहीपेक्षां वरिष्ठ असणाऱ्या प्रिव्ही कौन्सील नामक इंग्लंडांतील न्यायसभेपुढें अपील करण्याचा अधिकार दिलेला आहे तें होत. एरव्हीं, कायद्याच्या बाबतींत दुय्यमप्रतीचें अपील एक-

ण्याचा ज्या कोर्टाचा अधिकार आहे अशा खालच्या दर्जाच्या कोर्टावर देखरेख करण्याचा, व प्रांतांतील सर्व स्मॉलकॉज कोर्टांची पहाणी करण्याचा त्यांस अधिकार आहे. त्याशिवाय त्यांना कोणच्याही दुय्यम कोर्टांतून एकादा खटला त्याहून उच्च कोर्टाकडे वर्ग करतां येतो. व प्रांतिक सरकारच्या मंजुरीनें न्यायकचेऱ्यांतील कामकाजासंबंधीं नियम करण्याचा व शेरीफ, अटॉर्नी (वकील) व कारकून यांना मोबल्यादाखल फी किती द्यावयाची हें ठरविण्याचा अधिकार आहे.

गवर्नर जनरल, मद्रास, मुंबई व बंगालचे गवर्नर व त्यांच्या कार्यकारी मंडळाचे सभासद यांनीं सरकारी कामगार या नात्यानें केलेल्या दुष्कृत्याबद्दल त्यांच्या वर खटला झाल्यास तो मूळपासून हायकोर्टास चालवितां येत नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. वॉरन हेस्टिंगच्या अमदानींत सुप्रीम कोर्टांत जे प्रकार घडले त्यांची पुनः पुनरावृत्ति होऊं नये म्हणून हा निर्बंध घालण्यांत आला आहे.

**८८ हायकोर्टाची रचना**—स. १८६१ सालच्या इंडियन हायकोर्ट ॲक्टाअन्वयें प्रत्येक हायकोर्टांत एक सर न्यायाधीश ( Chief Justice ) व पंधरा न्यायाधीश असावेत असें ठरलें होतें. या न्यायाधिशांच्या जागीं लायक इसमांस नेमण्याचा अधिकार राजेसाहेबाकडे देण्यांत आला. परंतु त्यानंतर हायकोर्टांचें काम इतकें वाढलें कीं, न्यायाधिशांची ही संख्या अगदींच अपुरी भासूं लागली. याकरितां स. १९११ सालीं इंडियन हायकोर्ट ॲक्ट नामक नवा कायदा पास करण्यांत येऊन त्याअन्वयें सर न्यायाधिशासह हायकोर्टांत एकंदर २० न्यायाधिश असावेत असें ठरलें व हिंदुस्थानांत इतर ठिकाणीं हायकोर्टांची स्थापना करण्यासाठीं व्यवस्था करण्यांत आली.

**८९ चीफकोर्ट व कमिशनर कोर्टस्**—वर सांगितलेल्या पांच हायकोर्टांशिवाय पंजाबांत लाहोर येथें एक व ब्रह्मदेशांत रंगून येथें एक अशीं दुसरीं दोन चीफ कोर्टें स्थापण्यांत आलीं आहेत. या चीफ कोर्टांवर ग. जनरलची साधारणतः देखरेख चालते, असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. कारण यांची स्थापना खुद्द ग. जनरल-इन-कौन्सिल कडून करण्यांत आली असून त्यांची सत्ता कमी ज्यास्त करण्याचा अधिकारहि त्यांस आहे. या चीफ कोर्टांच्या न्यायाधिशांची

वरिष्ठ कोर्टांच्या न्यायाधिशापेक्षां योग्यता कमी असून त्यांना पगारहि कमी मिळतो. परंतु याखेरीज सनदी हायकोर्टास जे इतर अधिकार असतात ते सर्व यांनाहि असतात. बाकीच्या इतर प्रांतांत अशीं कोर्टें नाहींत. न्यायबाबींतील वरिष्ठ सत्ता तेथे ज्युडीशियल कामिशनरास देण्यांत आली आहे.

९० **दिवाणी दुय्यम कोर्टें**—हायकोर्टाच्या ताब्यांतील कोर्टें ह्मटली ह्मणजे डिस्ट्रिक्ट जज्जाचे, मदतनीस ( अॅडिशनल ) किंवा असिस्टंट जज्जाचें, सबॉर्डिनेट जज्जाचे व मुनसफचे, ही चार होत. कांहीं प्रांतात वरील कोर्टास निराळीं नांवें आहेत. तीं ह्मणजे कमिशनर, डेप्युटी कमिशनर, वगैरे हीं नांवें निराळी असली तरी त्यांचे अधिकार व कार्यपद्धति जवळ जवळ एक आहे. प्रत्येक जिल्ह्यांत एक जज्ज असतो व तो आपल्या जिल्ह्यांतील सर्व दिवाणी कोर्टां-वर देखरेख करतो. डिस्ट्रिक्ट जज्जाच्या हाताखालीं सबॉर्डिनेट जज्ज असतात व त्यांच्या हाताखालीं मुनसफ काम करतात. एक हजार ते पांच हजार रुपयांच्या फिर्यादीपर्यंत मुनसफचा अधिकार चालतो. जिल्हा जज्ज आणि सबॉर्डिनेट जज्ज यांचा अधिकार सर्व फिर्यादींत चालतो. मुनसफ आणि सब जज्ज यांच्या जागीं बहुधा कायद्याचें चांगलें ज्ञान असलेल्या देशीं लोकांस नेमण्यांत येतें. डिस्ट्रिक्ट जज्ज हा मात्र ज्यास कायद्याचें पद्धतशीर ज्ञान किंवा तादृश अनुभव नाहीं असा एकादा सीव्हिल सर्विसमधील मनुष्य असतो. मुनसफानें निकाल दिलेल्या सर्व दाव्याविरुद्ध, आणि सबजज्जानें ऐकलेल्या दाव्याविरुद्ध अपिलें घेण्याचा त्यांस अधिकार आहे, परंतु जिल्हा जज्जच्या समोर ज्या दाव्याची किंमत १० हजार रुपयांहून ज्यास्त आहे असे दावे चालत नाहींत.

९१ **फौजदारी न्यायपद्धति**—येथवर मुलकी न्यायपद्धतीचा विचार झाला. आतां फौजदारी न्यायपद्धतीचा विचार करूं. या खात्यांतील प्रमाणभूत ग्रंथ म्हणजे अर्थात् इंडियन पिनल कोड हा होय. ' हें कोड सुप्रसिद्ध लॉर्ड मेकॉले साहेब यांनीं केलेलें असून, त्यांत दिलेल्या गुन्ह्यांच्या सूक्ष्म, संक्षिप्त व व्यापक व्याख्यामध्यें आणि त्यांस ठरविलेल्या शिक्षांच्या भयंकर प्रमाणांत या पुरुषाचें अलौकिक बुद्धिवैभव चांगलें प्रत्ययास येतें. ' दिवाणी मुकादम्यांसाठीं जसें

सीव्हिल प्रोसिजर कोड रचण्यांत आले आहे तसें फौजदारी कामासाठीं क्रिमिनल प्रोसीजर कोड तयार करण्यांत आलें आहे. प्रत्येक जिल्ह्यांत अगर त्यांच्या समुदायांत एक सेशन कोर्ट असते. वर सांगितलेल्या डिस्ट्रिक्ट जज्जाचीच यावर हुकमत चालते. परंतु याकामांत त्यांस मदत करण्यास दुयम सेशन जज्ज देण्यांत आले आहेत. यांच्या खालीं तीन वर्गाचे (प्रतीचे)–प्रथम, द्वितीय व तृतीय–मॅजिस्ट्रेट असतात. इलाख्याच्या अगर प्रांताच्या मुख्य शहरीं प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट व जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट असतात. त्यांना मदतनीस म्हणून सबॉर्डिनेट मॅजिस्ट्रेट देण्यांत आले आहेत. हायकोर्टास कायद्यांत सांगितलेली कोणचीहि शिक्षा आरोपीस देण्याचा अधिकार आहे. त्याप्रमाणेंच सेशन जज्जासही हायकोर्टाच्या संमतीनें वाटेल ती शिक्षा गुन्हेगारांस देतां येते. हायकोर्टांतील काम ९ जणांच्या ज्यूरी मार्फत चालते व सेशन कोर्टांतील काम असेसर अगर ज्यूरी यांच्या सल्यानें चालतें हायकोर्टांतील ज्यूरर लोकांचा निकाल बंधनकारक असा होतो. त्यांत हायकोर्ट सहसा फेरफार करीत नाहीं. कारण व्यवहारज्ञ लोकांच्या अभिप्रायांत ढवळाढवळ करण्यापेक्षां एकादा गुन्हेगार सुटला तरी हरकत नाहीं, असें न्यायाचे जें सर्वमान्य तत्व आहे, तें हायकोर्टांतील न्यायाधिशांस संमत आहे. सेशन कोर्टांतील ज्यूरीचा अभिप्राय मात्र न्यायाधिशास बंधन कारक होऊं शकत नाहीं, हें लक्षांत ठेवावें. सेशन कोर्टांत चाललेल्या खटल्याची चौकशी पुरी झाल्यावर जज्जानें ज्यूरीस खटला समजाऊन देऊन त्यांचा अभिप्राय विचारावा व आरोपी दोषी किंवा निर्दोषी एवढाच काय तो ज्यूरीनें अभिप्राय सांगावा असा कायदा आहे. जज्जास हा अभिप्राय पसंत पडला तर बरें, नाहींतर तो आपलें मत देऊन तो खटला हायकोर्टाकडे पाठवितो. अशा रीतीनें हायकोर्टाकडे जे खटले जातात, त्यांत हायकोर्ट ज्यूरीचा अभिप्राय सहसा फिरवीत नाहीं.

**९२ मॅजिस्ट्रेटचे अधिकार**–प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट व पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट यांना आरोपीस २ वर्षांची कैद व एक हजार रुपये दंड करण्याचा अधिकार आहे. एकादा खटला जर त्यांच्या अधिकाराबाहेरचा असेल तर तो खटला हाय-

कोर्टाकडे चवकशीसाठीं पाठवितात. दुसऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटांस ६ महीने कैद व २०० रुपयापर्यंत दंड करण्याचा अधिकार आहे. तिसऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटास आरोपीस १ महिना कैद व ५०० रुपयांपर्यंत दंड करतां येतो. या शिवाय लहान लहान खटले चालविण्याकरितां जे ऑनररी मॅजिस्ट्रेट नेमण्यांत येतात. त्यांना व पोलिस पाटलालाहि त्यांच्या योग्यतेप्रमाणें थोडे बहुत अधिकार देण्यांत आले आहेत.

**९३ अपीलपद्धति**—हिंदुस्थानांतील प्रचालित दुयम कोर्टाच्या निकालाविरुद्ध वरिष्ट कोर्टाकडे अपील करण्याची सर्वास मोकळीक ठेविली आहे. दुसऱ्या व तिसऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटनें दिलेल्या निकालविरुद्ध पक्षकारानें अपील गुदरल्यास त्याची डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटसमोर सुनावणी होते. सेशन कोर्टांत पाहिल्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटच्या निकालविरुद्ध करण्यांत आलेलें अपील चालते. सेशन मध्यें चाललेल्या खटल्यांत आपआपल्या प्रांतांतील हायकोर्टाकडें अपील करण्याचा हक्क पक्षकारास आहे. फाशीची शिक्षा झालेल्या इसमांस प्रांताधिपतीकडे अगर ग. जनरलकडे अपीलद्वारा माफीची याचना करतां येते. विशेष महत्वाच्या खटल्यांची अपीलें प्रीव्ही कौन्सिलापुढें सुनावणीस निघतात. एकादा खटला दुसरीकडे वर्ग करण्याचा व दिलेली शिक्षा पुनर्विचारांतीं कमी करण्याचा अधिकार हायकोर्टास आहे. यासाठीं कोणी अर्जानें मागणी केल्यासच हायकोर्ट आपला हा अधिकार गाजवितें, एरव्हीं नाहीं.

**९४ युरोपियनांचा मिरासी हक्क**-राजा असो वा रंक असो, कोणीही मनुष्य कायद्याच्या बंधनापासून मुक्त नाहीं; सर्व माणसें कायद्याच्या दृष्टीनें सारखींच असून, त्यांच्या त्यांच्या कृत्याप्रमाणें कायदा हा समतेनें व निःपक्षपातानें त्यांस शासन करितो, अशी सर्व साधारण समजूत आहे. परंतु हिंदुस्थानांत मात्र याच्या अगदीं उलट स्थिति आहे. इंग्रज सरकार न्याय व समता या दोन शद्बांचा नेहमीं घोष करीत असते व आपण **सर्वाभूतीं समान** म्हणून नेहमीं प्रौढी मिरवीत असते. परंतु ही प्रौढीं किती पोकळ आहे हें हिंदी कायदेबुकांतील विषमतेवरून सहज कळून येणार आहे. इंग्रजांच्या कायद्यानें युरोपियन

ब्रिटिश नागरिकांना ठिकठिकाणीं विशेष सवलती दिल्या आहेत. तशा हिंदी लोकांस नाहींत. या सवलती ह्मटल्या ह्मणजे ( १ ) तिसरा वर्ग व दुसरा वर्ग या मॅजिस्ट्रेटांस युरोपियन ब्रिटिश आरोपींचा खटला चालविण्यास अधिकार नाहीं. पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट जर जस्टिस् ऑफ दी पीस असून स्वतः युरोपियन ब्रिटिश असला तर त्याला अधिकार आहे. प्रेसिडेन्सी व डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांना मात्र काम चालविण्याचा अधिकार आहे. (२) डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट सेशन कोर्ट व हायकोर्ट यापुढील कोणत्याही खटल्यांत युरोपियन ब्रिटिश नागरिकांस जींत समानवर्णीय ज्यूरर्सचें बहुमत असेल अशी ज्यूरी हक्कानें मागतां येते. पण तेंच कोणाही हिंदुस्थानवासी एतद्देशीयांस आपली चौकशी ज्यूरी मार्फत व्हावी असें हक्कानें मागण्याचा अधिकार नाहीं. ईस्ट इंडिया कंपनीच्या अमदानींत जो गोऱ्यांत व काळ्यांत भेद करण्यांत येत असे त्याचेंच हें अवशिष्ट चिन्ह आहे. स. १८७२ सालीं जेव्हां क्रिमिनल प्रोसीजर कोड तयार करण्यांत आला त्यावेळीं या वर्ण भेदाला कायमचें व हिंदी जनतेला उपमर्दकारक असें स्वरूप देण्यांत आलें. १८३३ सालापर्यंत इलाख्याच्या मुख्य शहराच्या बाहेर राहण्याची युरोपियनांना परवानगी नव्हती. आणि ज्या इलाख्याच्या मुख्य शहरीं ते रहात तेथील कोर्टांत हा काळा, व गोरा असा भेद नव्हता. १८३३ च्या चार्टरनें युरोपियनांस स्वैर संचार करण्याची परवानगी मिळाली, तथापि त्यांची चौकशी मात्र प्रेसिडेन्सी कोर्टाखेरीज इतरत्र होत नसे. त्यावेळीं त्यांची संख्या फारच अल्प असल्यामुळें ही विषमता डोळ्यांत येण्यासारखी नव्हती. १८७२ सालीं ही विषमता स्थलभेदाच्या रुळावरून वेणभेदाच्या रुळावर आणण्यांत आली; आणि **गोऱ्याचा न्याय काळ्यानें करणें** हें अब्रह्मण्यं समजलें जाऊं लागलें! हा भेद काढून टाकण्याविषयीं पूर्वी एक छोटासा प्रयत्न झाला. परंतु अँग्लो इंडियनांच्या कारवाईमुळें तो अपेशी ठरला. स. १८३३ सालीं उदारमतवादी लॉर्ड रिपन साहेबांच्या कारकीर्दीत इलबर्ट साहेबांनीं वर्णभेदाचा निरास करण्यासाठीं एक बील तयार केलें होतें. परंतु याची बातमी कळतांच त्यावेळच्या गोरकायांनीं इतका धुमाकुळ माजविला कीं त्यापुढें हल्लींची चळवळ फिकीच पडेल!

व्हॉइसरॉय लॉर्ड रिपन यांची विलायतेस रवानगी करण्यापर्यंत पाळी आली होती, परंतु तें साधलें नाहीं. ह्मणून गौरकायी इसमांनीं या उदारधीचा पुतळा जाळून भस्मसात केला ! ! !

या प्रचंड चळवळीचा सरकारच्या मनावर परिणाम होऊन कांहीं थातुर मातुर करून तडजोड करण्यांत आली. या तडजोडींत डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व सेशन जज्ज हे हिंदी असले तरी त्यांना युरोपियन ब्रिटिश आरोपीचा न्याय करण्याचा अधिकार मिळाला; पण त्याबरोबर गोऱ्यांचे बहुमत असलेली ज्युरी त्यांच्यावर लादण्यांत आली. आणि इतकेंही करून डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटानें कमाल शिक्षा ६ महिन्याची व सेशन जज्जानें जास्तींत जास्त एक वर्षाची शिक्षा द्यावी अशी मर्यादा घालण्यांत आली ! हिंदी लोकांस युरोपियनांचा वर्णद्वेषाचा प्रत्यक्ष अनुभव आला. त्यांनीं या प्रकाराविरुद्ध जोराची चळवळ केली. परंतु तिचा कांहींच उपयोग झाला नाहीं. १९२१ सालीं सुधारलेल्या कौन्सिलांत रा. समर्थ यांनीं हा वर्णभेद मूलक भेदभाव हिंदी जनतेस उपमर्दकारक आहे, सबब असला भेद कायदेबुकांतून काढून टाकावा असा ठराव मांडला व तो पास होऊन त्याची बजावणी करण्याकरितां डॉ. सप्रू यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमेटी नेमण्यांत आली. तींत ७ युरोपियन व ८ हिंदी सभासद होते. या कमेटीनें वर्णभेदमूलक सर्व कलमांचा विचार करून एक रिपोर्ट तयार केला व तो जनतेच्या माहितीसाठीं सरकारानें नुक्ताच प्रसिद्ध केला आहे. कौन्सिलांत या रिपोर्टावर चर्चा होऊन एक वर्णभेदनाशक बील तयार करण्यांत येईल व बहुतेक तें पास होईल असें वाटतें.

---

**वाङ्मय,** इतिहास. चरित्र, समाजशास्त्र, राजनीति, काव्य इत्यादि उच्च वाङ्मय सेवेस वाहिलेल्या **लोकशिक्षण ग्रंथावलीचे** वर्गणीदार होण्यांस आजच लिहा. पत्ताः—रावपुरा, **बडोदें.**

# प्रकरण ८ वें.

## पोलीस व तुरुंग.

९५ **पोलिसांच्या मार्गांतील अडचणीः**--पोलीस व तुरुंग या खात्यांवर सरकार दरसाल बराच पैसा खर्च करितें. तरीही दिवसें दिवस ही रकम वाढतच आहे. कारण हिंदुस्थानच्या आकारमानाप्रमाणें त्याची वस्तीहि फारच मोठी आहे. व त्यामुळें एवढ्या अवाढव्य देशांत शांतता प्रस्थापित करून कायद्याची अंमलबजावणी करणें हें फारच बिकट काम आहे. त्यांत दुसरी महत्वाची अडचण ह्मणजे वस्तीची झालेली पांगापांग. त्यामुळें खर्चही त्याच प्रमाणांत वाढला आहे. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं लार्ड हेस्टिंगच्या कारकीर्दीत पिंढारी लोकांनीं बंड करून हिंदुस्थानांत मोठीं हुल्लड उठविली होती. त्यांमुळें कोणासही मनस्स्वाथ्य नव्हतें, मग पैसा आडका वगैरेचे नांवच नको! हें पेंढारी कोण होते, त्यांचा धंदा काय होता व ते कशाप्रकारें जुलुम करून रयते कडून पैसा उकळींत, हें महशूरच आहे. त्या लुटारू लोकांचा बंदोबस्त करून देशांत शांतता प्रस्थापित करणें सरकारचें कर्तव्य कर्म होतें; हें बंड मोडण्यास त्यावेळीं कंपनी जवळ फारशी फौजहि नव्हती. जी होती तिचा उपयोग त्या त्या मुलुखांत होताच. तेव्हां कंपनीस या शिवाय दहा-लाख स्वतंत्र फौज उभी करावी लागली असल्यास नवल नाहीं! त्यावेळीं ह्या पेंढाऱ्यांचा कसा बसा बंदोबस्त करण्यांत आला परंतु त्यांच्या मागून ठग लोकांच्या टोळ्या त्यांच्याहूनही क्रूरकर्मे करूं लागल्या. हे लोक वाटसरूंना गळे दाबून हाल हाल करून ठार मारीत; त्यांच्या जवळच असेल नसेल तो पैसाआडका लांबवून पोबारा करीत; तीस तीस, चाळीस चाळीस लोकांच्या टोळ्या करून हें फिरत; त्यामुळें त्यांना भीति कशाशीच नव्हती. वाटसरू जर एकटा दुकटा असला तर त्याची दशा विचारूंच नये! परंतु वाटसरूंचा जमाव असल्यास त्यावरही हे लोक युक्ती प्रयुक्तीनें छापे घालून त्यांच्या जवळील द्रव्य लांबवीत असत. लॉर्ड वुइल्यम बेंटिंक व सर वुइल्यम स्लीमन यांसारख्या हुशार व धींट लोकांनीं या लोकांचा मोठ्या

चिकाटीनें बंदोबस्त केला. तरी अद्याप हे नसले तरी अशाच प्रकारचें दुसरें भुरटे चोर जनतेस त्रास देतच आहेत. ह्यांचा पूर्णपणें बंदोबस्त होणें हिंदुस्थानासारख्या अवाढव्य देशांत कठीणच दिसतें. या चोराचिलटांचा बंदोबस्त करून देशांत शांतता व सुरक्षित स्थापण्याचें पोलीस खात्याचें काम आहे.

९६ पोलीस खात्याची व्यवस्थाः—कंपनीच्या अमदानींत पोलीस खात्यास संघटित स्वरूप दिलें गेलें नव्हतें. यासाठीं सन १८६० त एक चौकशी कमिशन नेमण्यांत आले. या कमिशननें केलेल्या सुधारणांचा विचार केला जाऊन त्याप्रमाणें १८६१ त एक बिल पास करण्यांत आलें. ह्या बिलानें ज्या सुधारणा करण्यांत आल्या, त्यांच्या पूर्वी पोलीस खात्यांत फारच अव्यवस्था होती. खर्चही फार होत होता. प्रत्येक प्रांतांत निरनिराळया तऱ्हेची घटना होती. त्यांस संघटित स्वरूप असें नव्हते. ह्या सर्व अडचणी यावेळीं पास झालेल्या कायद्यांनीं नाहींशा झाल्या. आजच्या व त्यावेळच्या पोलीस खात्याच्या व्यवस्थेंत जमीन आस्मानाचें अंतर आहे. असो, पुढें सन १९०२ सालीं पुनः एक कमिशन नेमण्यांत आलें. ह्या कमिशननें बऱ्याच महत्वाच्या सुधारणा घडवून आणल्या. परंतु पोलीस खात्याच्या खर्चांतही त्याबरोबरच वाढ झाली. प्रत्येक प्रांताचे स्वतंत्र पोलीस खातें आहे. मुंबई इलाख्यांत तर जिल्हानिहाय वेगवेगळें पोलीस आहेत. दर प्रांतानिहाय एक इनस्पेक्टर जनरल असून त्याच्या हाताखालीं बरेंच दुय्यम कामगार असतात. हे कामगार प्रांतातील मुख्य मुख्य ठिकाणीं काम करतात. जिल्हागणीक एक पोलीस डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट असतो. त्याच्या हाताखालीं दोन दुय्यम असतात. त्यांस अनुक्रमें असिस्टंट व डेप्युटी सुपरिंटेंडेन्ट ह्मणतात. पोलिस खात्यांतील ह्या वरिष्ठ जागा इंपीरियल सर्विस मधील लोकांनींच भरून काढलेल्या असतात. नेटिव्ह लोकांना डेप्युटी सुपरिंटेंडंट पर्यंतच्या हुद्यावर नेमतात. इंग्लंडमध्यें एक परिक्षा होते व तींत पास झालेल्या उमेदवारास वरील इंपीरियल पोलीस फोर्समध्यें नेमतात. मुंबई इलाख्यांत नाशीक येथें या खात्याचें शिक्षण देण्याकरितां शाळा काढण्यांत आली असून तींत तरुण उमेदवारास भाषा, कवाईत व कायद्याचें शिक्षण दिलें जातें. मुंबई

मद्रास, कलकत्ता व रंगून सारख्या इलाखानिहायशहरीं या लोकांचा एक स्वतंत्र संघ स्पेशल कमिशनरच्या हाताखालीं आहे. हा कमिशनर बहुधा इंडियन सिव्हील सर्विस मधील सिव्हीलियनच असतो. रेलवे पोलीसांचा रेलवेची मालमत्ता संभाळण्यासाठीं स्पेशल अमलदाराच्या हाताखालीं एक निराळाच संघ असतो. या शिवाय रिझर्व्ह म्हणून एक स्वतंत्र पथक आहे, तें निराळेंच ! या पथकाचा उपयोग आणीबाणीच्या वेळीं करावयाचा असतो. कोठें गडबड झाल्यास त्या ठिकाणीं जादा पोलीस बसवितात ते यांतीलच होय. नवशिक्या रंगरूटांना सर्व कवाईत शिकविण्यांत येते. त्यांना ड्रेसही मोफतच मिळतो. अशा रीतीनें आणीबाणीच्या प्रसंगासाठीं जय्यत तयारी ठेवण्याची तरतूद करण्यांत आली आहे. या शिवाय क्रिमिनल इन्व्हेस्टिगेशन डिपार्टमेंट, (ज्यास संक्षिप्त रितीनें आपण सी. आय. डी. खातें म्हणतो) त्या नांवाचें पोलीसखात्याचें एक पोट खातें आहे. या खात्यास पूर्वी ठगी (डेकॉयटी) खातें म्हणत. या खात्याचें काम म्हटलें म्हणजें देशांतील निरनिराळया संस्थांवर वहिमी व चळवळया लोकांवर सक्त नजर ठेवून गुन्हे उघडकीस आणण्याचें आहे. ह्या खात्याचें अलीकडील पराक्रम महशूरच आहेत, त्यावरून ह्याची उपयुक्तता कशी आहे हें वाचकांनीच ठरवावें. अशी खातीं अनेक दृष्टीनें महत्वाची असतात एवढेंच आम्हीं म्हणतों.

**९८ मराठ्यांच्या वेळची स्थिति**-पूर्वी हिंदुस्थानांत खेड्यापाड्यांत तेथील निरनिराळ्या ज्ञातींतील दंगे, मारामाऱ्या, गुन्हे वगैरेसाठीं लोकांनाच जबाबदार धरण्यांत येई. मराठ्यांच्या अमदानींत खेडेगांवीं ही पोलिसांची कामें कशी होत असत, याचें मांनस्टुअर्ट एलिफिंस्टननें फारच मार्मिक वर्णन दिलें आहे. तो म्हणतो ' आपल्या गांवांत बंदोबस्त राखण्याचें काम पाटलाचें असें व सर्व गांवाच्या सुरक्षिततेची जबाबदारी त्याच्यावरच असे. आणीबाणीच्या वेळीं सर्व गांवकरी त्यांस मदत करीत. बंदोबस्त राखण्याच्या कामीं त्यांस चौकीदार या हुद्याचा दुय्यम अधिकारी मदत करी. हें काम एकाच घराण्याकडे सोपलेलें असे. याचें काम म्हणजे रात्रौ गांवभर गस्त घालून टेहळणी करणें व गांवांत नवखा कोण आला, कोण गेला, तसेंच संशयी लोकांवर नजर ठेऊन त्यांच्या हलचालीची

पाटलास वर्दी देण्याचें असे. गांवांतील सर्वांचे स्वभाव—म्हणजे कोण कसा आहे, कोण कसा आहे हें त्यास माहीत असे. गांवात जर एकादी चोरी झाली अगर दरवडा पडला तर चोर हुडकून काढण्याचें काम त्यास करावें लागे. ही व्यवस्था जरी अगदींच निर्दोषी नसली तरी त्यावेळच्या मानानें फारच उत्तम आहे. याचें कारण एक दिसतें ते म्हणजे सर्व सत्ता एकाच्याच हातीं केंद्रीभूत झाली होती व शिवाय गुन्हा सांपडल्यावर चौकशी होऊन लगेच अपराध्यास कडक शासन होई.

'**मराठे व इंग्रज**' या नांवाच्या आपल्या पुस्तकांत श्री. केळकर यांनी मराठ्यांच्या वेळच्या स्थितीचें पुढील प्रमाणें वर्णन केलें आहे. "मराठेशाहींत गांवगन्ना लोकसंरक्षणाचें, तपासाचें व इन्साफाचें पुष्कळसें काम गांवचे लोक आपलें आपण करीत. विशेष प्रसंगीं सरकारांतून रखवालीचा बंदोबस्त होई. एकादे क्षेत्रीं मोठीं यात्रा भरावयाची असल्यास जरूरत्या पोलिस असाम्या तात्पुरत्या नेमल्या जात. घाटांतून चोराचिलटांचा उपद्रव होई, यामुळें तात्पुरत्या किंवा कायमच्या चौक्या बंदोबस्ताकरतां कमाविसदारामार्फत ठेवल्या जात. गुन्हेगार पकडण्याकरितां बक्षिसें लावीत. प्रसंगविशेषीं ज्या गांवास पोलिसची मदत दिली त्या गांवच्या लोकांकडून त्याचा खर्च वसूल केला जाई. ही करपट्टी ब्राम्हणांस माफ नसे. दरोडेखोरांचें लक्ष सावकार लोकांच्या घरींच चोऱ्या करण्यांवर आहे असें दिसून आल्यास त्यांचा खर्च फक्त श्रीमंत लोकांकडून घेतला जाई; गरीबांस त्याची माफी होई. पोलिसास हत्यारें सर्वांस दिलीं जात व कमाविसादाराच्या हाताखालीं शिबंदी व घोडेस्वार हे लष्करी पोलिसचें काम करीत. मोठमोठ्या शहरीं कोतवाल नेमलेले असत. इतर ठिकाणीं कमाविसदार हेच कोतवाल असून त्यांजकडे फौजदारी इनसाफाचे अधिकार थोडेबहुत असत.

"पोलिसव्यवस्थेप्रमाणें तुरुंगाची व्यवस्थाहि चांगली असे गुन्हेगारांच्या पायांत बिड्या ठोकीत; पण प्रतिष्ठित कैद्यास मोकळें ठेवीत. कैद्याच्या स्थितीप्रमाणें त्यास पोटास धान्य किंवा शिधा दिला जाई. कैदी मोकळा ठेवल्यास त्यानें कड्यावरून उडी मारून जाऊं नये व ब्राह्मण असल्यास त्यानें आततायीपणाही करूं नये अशी व्यवस्था करण्यांत येत असे. भोजनसमयीं बिड्या काढण्याची सवलत

राजकीय कैद्यांना देण्यांत येई. स्त्रियांनाहि तुरुंगवासाची शिक्षा देण्यांत येत असे. तुरुंगांतील खोडे फटके वगैरे शिक्षांचा उल्लेख रोजनिशांतून सांपडत नाहीं. नजर कैदेंत ठेवण्याच्या कैद्यांना त्यांच्या घरीं ठेवून त्यांजवर चौकी पाहरे बसविले जात. एकंदरीनें अपराधयाशीं वागण्याची सरकारची रीति सौम्यपणाची असून फक्त राजकीय गुन्ह्याखेरीज इतर गुन्ह्याकरितां शिक्षा दिल्या जात त्या फार कडक नसत. देहांतशिक्षा फार क्वचित देत. राजकीय गुन्हेगारास हत्तीच्या पायीं देऊन किंवा डोक्यांत मेखसु मारून ठार करीत. खाजगी व्यक्तींच्या सूड वगैरे बुद्धीनें झालेल्या गुन्ह्याकडे फार करडी नजर नसे; पण हत्यारें घेऊन दरवडे वगैरे घालणारांचे हातपायहि तोडले जात. बाप गुन्हेगार असून पळून गेल्यास सक्तीचा उपाय म्हणून त्याच्या मुलास बापाचा पत्ता लागेपर्यंत कैदेंत ठेवीत. अशा प्रकारची मोबदला शिक्षा शिवाजीकरितां शहाजीनेंहि विजापूरदरबारीं सोसली होती हें प्रसिद्धच आहे. फौजदारी कायद्याचा अंमल व तुरुंग या बाबतींत न्यायमूर्ती रानडे यांनीं पुढील उद्गार काढले आहेत. ‘ नाना फडणविसाची कारकीर्द खेरीज करून इतरवेळीं कायद्याची अमलबजावणी निर्दयपणानें किंवा सूड उगविण्याकरितां होत नसून फारच सदय व सौम्यपणाची असे. इतकी कीं, मागें कधीं तशी झाली नाहीं व पुढेंहि होईल असें दिसत नाहीं. शिक्षा देत त्या अपराधास योग्य अशा देत; ज्यास्त कडक केंव्हाही नसत.”

**९८ प्रचलित पद्धति**--ज्या त्या प्रांतांतील रीतिरिवाजास व धार्मिक परंपरेस साजेलसें धोरण ब्रिटिश सरकारांकडून ठेविलें जातें. एलफिन्स्टन साहेबांनीं पूर्वीचीच पद्धत कायम ठेवून फक्त तींत इष्ट त्या सुधारणा घडवून आणल्या. सन १८६१ तील कमिशननेंही पूर्वीच्या खेडेगांवांतील पद्धतीसच उचलून धरिलें व ती तशीच कायम राहावी अशी शिफारस केली. मद्रासेकडे खेड्यांतील पाटलावरच गांवांत सुव्यवस्था राखण्याचें काम आहे. मुंबईकडे कांहीं ठिकाणीं स्वतंत्रच अधिकारी आहेत. त्यांस पोलीस पाटील म्हणतात. ह्या पाटलास कांहीं फौजदारी हक्क देण्यांत आलें आहेत. सिंधमध्यें जमीनदार लोक सरकारास शांतता व सुव्यवस्था राखण्याचें कामीं मदत करितात. त्याशिवाय चौकिदार असतोच. गुन्ह्याची

वर्दी देणें हें त्याचें मुख्य काम आहे. स्थानभिन्नत्वानें त्याच्या कामांतही एकप्रकारें भिन्नत्व आलें आहे. त्यास करावयाची सर्वसाधारण कामें म्हणजे गुन्हेगारांस पकडणें; पोलिसांना लागल्यास त्यांच्याकामीं मदत करणें; सर्वशहरभर टेहळणी करून, संशयी इसमावर नजर ठेवून गांवातील घडामोडींचे ज्ञान अधिकाऱ्यांस करून देणें; हीं होत. त्याबद्दल सरकारकडून त्यांस कांहीं ठिकाणीं वेतन, तर कांहीं ठिकाणीं जमीनी वहिवाटीस मिळतात. अशा ठिकाणीं त्यास शेतसारा द्यावा लागत नाहीं.

**९९ जनसहायाची अवश्यकता**—पोलीससंघ देशांत कितीही उत्तम असले तरी देशांत शांतता व सुबत्ता राखणें हें लोकांच्या सहायाशिवाय अगदींच अशक्य आहे. जनतेच्या सहायाभावीं ते असून नसून सारखेंच आहेत. म्हणून जनतेनें पोलिसास शांतता राखण्याचें कामीं अवश्य ती मदत केली पाहिजे. उलट पोलिसांनींहि जनतेचे याबद्दल कृतज्ञ असलें पाहिजें. अधिकार मदानें धुंद होऊन जनतेवरच जर ते तोंडसुख किंवा हस्तसुख घेऊं लागल, तर हल्लीं सारखें वाद उपस्थित होऊन तींत पोलिसांना हार खावी लागेल. पोलिसांनीं स्वतःचा बोज स्वतःच राखून ठेवण्याची अवश्यकता फार आहे. असें झाल्यासच त्यांना जनतेकडून त्यांच्या अपेक्षेप्रमाणें सहाय्य मिळेल. पूर्वी गांवास शांतता राखण्याची सर्व जबाबदारी रयतेवर होती. कोणाही मनुष्यास स्वतः गुन्हा करण्याची अगर दुसऱ्यास गुन्हा करतानां मदत करण्याची मनाई होती. इतकेंच नव्हे, तर गांवात अपराध घडल्यास त्याची जबाबदारी प्रत्येकावर असे व अपराध्यास पकडण्याचें कामीं त्यांस अधिकाऱ्यास सहाय्य करावें लागे. ही पद्धत कुचकामाची जरी असली तरी रयतेनें पोलिसांना मदत करणें हें सर्व दृष्टीनेंच अत्यावश्यक आहे.

**१०० शासन पद्धति**—गुन्हेगारांना योग्य शासन करणें व तुरुंगांची नीट व्यवस्था ठेवणें हें फार कठीण काम आहे. पूर्वी फौजदारी कायदे फारच कडक असत व हल्लीं ज्यास आपण किरकोळ गुन्हें ह्मणतो असे गुन्हे करणारांना त्यावेळीं देहांतशासन मिळे. त्यावेळीं चोरास व खुनी मनुष्यांस सारखीच शिक्षा मिळे. त्यामुळें चोरही ज्याचें द्रव्य लुबाडीत त्यास चोरीचा मागमूस नलागावा एतदर्थ ठार मारीत. अर्थात् अशी वस्तुस्थिती असल्यामुळें गुन्हेगारांची

गारांची संख्या फार वाढे. मुसलमानी अमलांत भिंतींत चिणणें, हत्तीच्यापायीं देणें, हालहाल करणें अशा तऱ्हेच्या क्रूर शिक्षा अपराध्यास मिळत. इंग्रजांच्या अंमलाच्या सुरवातीस अशाच शिक्षा दिल्या जात. परंतु अलीकडे या स्थितींत बराच फरक घडून आला असून होतां होईतों मरणाची शिक्षा भयंकर गुन्हेगाराशिवाय कोणासच दिली जात नाहीं. साध्या किरकोळ गुन्ह्यास कोणच्या शिक्षा द्यावयाच्या हें इंडियन पिनलकोडानें ठरविण्यांत आलें असून, त्यांतील नियमास अनुसरूनच शिक्षा देण्यांत येतात. भयंकर गुन्ह्याची चौकशी स्पेशल ट्रिब्यूनल भरवून करण्यांत येतें. गुन्हा भयंकर कोणता व कसा ठरवावयाचा ह्याबद्दलही नियम आहेतच. पूर्वी शिक्षा देतांना नुकसान किती झालें हें पाहून त्या प्रमाणावर शिक्षा ठोठावण्यांत येत. परंतु हल्लीं गुन्हा करण्यास काय कारणें घडलीं, या गोष्टीवरच जास्त भर देण्यांत येतो. जाणून बुजून एकाद्या गरिबाचा खून केल्यास त्यास शिक्षा ज्यास्त मिळते व स्वतःचा बचाव करितांना एखाद्या अरेरावाचा खून झाल्यास त्यांस गौणत्व देण्यांत येते व शिक्षाही कमीच मिळते.

**१०१ पूर्वीचे व हल्लींचे तुरुंग**–पूर्वी बहुतेक सर्व देशांत तुरुंगांची व्यवस्था अगदीं टाकाऊ व किळसवाणी होती. बिनहवेशीर, आरोग्याच्या दृष्टीनें अपाय-कारक अशा जागेंत कैद्यांना मेंढराप्रमाणें कोंडण्यांत येई. निगरगट्ट बनलेले व भोळसट कच्चेबच्चे आरोपी एकाच कैदखान्यांत ठेवीत, त्यामुळें तो कच्चा-बच्चा त्या मुर्दाडांच्या संगतीनें निर्ढावे. कैद्याच्या वर्तनांत सुधारा व्हावा, म्हणजे त्यानें अतःपर अपराध करूं नयें, म्हणून शिक्षा द्यावयाची व लोकांना गुन्हे केलें असतां शिक्षा मिळते याची जाणीव करून द्यावयाची, असे दोन हेतू शिक्षा देतांना न्यायाधीशापुढें असतात व यास्तवच शिक्षा दिली जाते. परंतु पूर्वी सर्व प्रकारचे कैदी एकेंच ठिकाणीं राहात, त्यामुळें बनलेल्यांच्या व सुधारणेच्या पलीकडें गेलेल्या कैद्यांच्या संगतीचा लाभ शिकाऊ गुन्हेगारांना होई व "संगति संग दोषेण" या न्यायानें तेही त्यांच्याच कोटींत जात. अशा रीतीनें त्यावेळीं शिक्षा देण्याचा प्रधान उद्देश साध्य होत नसे. व तो मनुष्य सुधरत नसे. त्या-वेळचे तुरुंग व कोर्ट म्हणजे नानाविध रोगांची माहेरघरें व चोऱ्या, दरोडे, खून

मारामाऱ्या कशा कराव्या हें शिकण्याच्या शाळा होत्या. अशा स्थितींत कैदेंत गेलेला मनुष्य जिवंत सुटण्याची आशाच नसे. एक तर तेथील घाणेरड्या कोंदट हवेचा त्याच्या शरीरावर परिणाम होत असे व त्यामुळें बहुतेक तो तेथेंच अर्ध-मेला होई. अशा स्थितींत तो वाचलाच तर न्यायाधीश त्यास कडक शिक्षा देई व ती शिक्षा भोगतानांच त्याचा आत्मा त्याच्या कुडीस सोडून चालता होई. त्यावेळच्या भीषण परिस्थितीची कल्पना " ती वाचतानां अंगावर शहारे येऊन अंगास कंप सुटतो " या एकाच वाक्यानें येणार असल्यामुळें तिचें यांहून हिडीस चित्र काढूं इच्छित नाहीं.

अठराव्या शतकाच्या शेवट शेवट लोकांस ह्या स्थितीच्या भीषणतेची जाणीव होऊं लागली. इंग्लडांत जॉन हावर्ड यानें तेथील सर्व तुरुंगांची पहाणी करून तुरुंगांतील भीषण प्रकारांचें हिडीस स्वरूप लोकापुढें मांडलें. यामुळें जनतेंत जागृती उत्पन्न होऊन सरकारनेंही या व्यवस्थेंत कांहीं फेरफार केलें. हल्लींच्या व त्यावेळच्या तुरुंगांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. इतकें कीं, पूर्वींच्यापुढें हल्लींचे तुरुंग सम्राटांचें प्रासादच भासतील ! हल्लीं तुरुंग म्हणजें तुरुंगच आहेत ! त्यांत केवळ गुन्हेगारांना शिक्षाच देण्यांत येत नसून नीतीचें शिक्षणही देण्यांत येतें. त्यांच्या मनावर उपदेशाचे धडे बिंबिवण्यांत येतात व त्यांचें मन सन्मार्गाकडे लावण्यासाठीं योग्य ते प्रयत्न करण्यांत येतात. शिवाय त्यांना सुटका झाल्यावर पोटासाठीं कांहीं तरी उद्योग करतां यावा एतदर्थ एकादा उपयुक्त धंदाही शिकविला जातो. स्ट्रेची साहेबांच्यामुळें इकडील तुरुंगही बरेच सुधारलें आहेत. हिंदुस्थानांतील सर्वच तुरुंग जरी चांगलें नसले तरी कांहीं ठिकाणचें तुरुंग तर इंग्लंडच्या वरचढीचें आहेत. त्यांत इतकी उत्कृष्ट व्यवस्था राखण्यांत येते कीं गुन्हेगारास तो घराप्रमाणेंच भासतो.

**१०२ तुरुंग-व्यवस्था**—तुरुंग तीन प्रकारचें आहेत: ( १ ) सेंट्रल ( २ ) जिल्हा ( डिस्ट्रिक्ट ) ( ३ ) सब्सीडिअरी ( कोठडी ). पहिल्या प्रकारच्या तुरूंगांत एक वर्ष किंवा त्यांहून ज्यास्त शिक्षा झालेल्या गुन्हेगारांस ठेवतात. ज्यास १५ दिवसांची किंवा त्यांहून ज्यास्त दिवस शिक्षा झाली आहे, त्यास

जिल्ह्यांतील तुरुंगांत ठेवतात व ज्यावरील खटला पूर्ण झाला नाहीं अशा गुन्हेगारांस कोठडींत ह्मणजे तिसऱ्या प्रकारच्या तुरुंगांत ठेवतात. प्रत्येक प्रांतांत एक इन्सपेक्टर जनरल असतो व तो आपल्या प्रांतांतील सर्व तुरुंगांची पहाणी करतो. हा ऑफिसर बहुधा इं. मेडिकल सर्विस मधील एकादा सिव्हीलियन असतो. जेल सुप्रिंटेन्डंटही त्याच सर्विस मधील असतात.

प्रत्येक तुरुंगांत निरनिराळ्या दर्जाचे चार कामगार असतात. (१) सुप्रिंटेन्डंट; याचें काम तुरुंगांतील व्यवस्था नीट ठेवणें, म्याजिस्ट्रेटच्या हुकूमाप्रमाणें शिक्षा देणें वगैरें असतें. तुरुंगाचा मुख्य ऑफीसर हाच असतो. (२) डॉक्टर. तुरुंगांत स्वच्छता ठेवून ज्या रीतीनें आरोग्यास बाधा पोंचणार नाहीं अशी व्यवस्था ठेवणें ह्याचें काम आहे. (३) दुय्यम प्रतीचा डॉक्टर (४) जेलर. बहुधां जेल सुप्रिंटेंडंट मेडीकल सर्विस मधील असतो त्यामुळें १–२ ही कामें एकच जण ह्मणजें सुपरिंटेंडन्टच करितो. जिल्ह्यांतील तुरुंग सिव्हील सर्जनच्या हाताखालीं असतात. ह्याशिवाय वार्डर म्हणून एक लहान हुद्याची जागा आहे. त्या जागेवर कैद्यांतीलच एकादा हुशारसा माणूस पाहून नेमतात. असें करण्यांत त्यानें सुधरावें हाच उद्देश असतो.

सन १८९४ सालच्या ॲक्टाअन्वयें प्रत्येक कैद्यास निरनिराळ्या कोठडींत ठेवावें असें ठरलें. परंतु पैशाभावीं आजवर तरीं असें घडून आलें नाहीं. परंतु त्या बाबतींत शक्य ती खटपट चालू असून मद्रासेनें तर अघाडीच मारली आहे. स्त्रियांना निरनिराळ्या स्वतंत्र कोठड्यांत ठेवण्यांत येतें. १८ वर्षांच्या आंतील मुलांना म्हाताऱ्या किंवा तरुण कैद्यांपासून अलग राखण्यांत येतें. याशिवाय कैद्यामध्यें दिवाणी व फौजदारी, मुलें व तरुणगडी, व राजकीय असे भेद पाडण्यांत आलें आहेत. कैद्यांना आपआपसांत मारामारी करतां येऊं नयें म्हणून कडक उपाय योजिलें जातात. रोज प्रत्येकास अदमासें नऊ ९ तास काम करावें लागतें. प्रत्येकास पूर्वीपेक्षां चांगलें ठराविक अन्न मिळतें. पूर्वीं तुरुंगांत कैद्यांच्या मृत्युचें प्रमाण फार मोठें होतें पण अलीकडे नवीन सुधारणामुळें

हें प्रमाण बरेंच रोडावलें आहे. एखाद्या कैद्यानें चांगली वर्तणूक दाखवून वरिष्ठाची मर्जी संपादन केल्यास त्याची शिक्षा भोगण्याची मुदत कमी होते.

**१०३ सन्मार्गप्रवर्तक गृहें (रिफमेंटरी)**–वाईट संगतीनें बिघडलेली जी साधारण जाणतीं मुलें गुन्हे करतात, त्यांना ताळ्यावर आणून सन्मार्गास लावण्याच्या कामीं प्रचलित तुरुंगांचा फारसा उपयोग होत नाहीं. कारण या तुरुंगांत अट्टल दरवडेखोरापासून तहत किरकोळ चोरापर्यंतचे सर्व गुन्हेगार एकाच ठिकाणीं राहात असल्यामुळें त्यांच्यांत ह्या मुलांना ठेविल्यास सन्मार्गाकडे त्यांची प्रवृत्ति होण्याऐवजीं ती ज्यास्तच बिघडतात, ह्मणून ह्या मुलांना ताळयावर आणण्याकरितां नवीन सुधारलेल्या पद्धतीच्या एखाद्या स्वतंत्र तुरुंगाची आवश्यकता भासूं लागल्यामुळें इंग्लंडांतील बोर्स्टल या नांवाच्या तुरुंगाच्या धर्तीवर येथें तुरुंग बांधण्यांत आले. बोर्स्टलच्या तुरुंगांत गुन्हेगार लहान मुलांना सन्मार्गास वळविण्याविषयीं हरएक तऱ्हेचा प्रयत्न करण्यांत येत असतो. तुरुंग म्हणजे शिक्षा आहे ही गोष्ट विसरूं न देतां तेथील मुलांच्या शारीरिक व मानसिक शक्तीची वाढ होण्याविषयीं शक्य ती खटपट तेथें करण्यांत येते. त्याचप्रमाणें त्यांच्या मनावर नीतितत्वें ठसऊन त्यांच्या अंगीं व्यवस्थितपणा आणण्याविषयीं प्रयत्न करण्यांत येतो. गुन्हे करण्याच्या प्रवृत्तीपासून लहान मुलांची मनें वळविण्यास बोर्स्टल तुरुंगांत पुढें दिलेलें उपाय अमलांत आणतात. तेथें अशा कैद्यांना मोठ्या व निढावलेल्या कैद्यांपासून वेगळें ठेवण्याविषयीं सोय केलेली असते. त्यांना तेथें कवाईत शिकवितात व आणखीही शारीरिक व्यायाम करवून घेऊन त्यांची शरीर प्रकृति चांगली राहील अशाविषयीं काळजी घेण्यांत येते, प्राथमिक शिक्षण देण्याचीहि तेथें व्यवस्था केलेली असते. नीतितत्वें त्यांच्या मनावर बिंबावी, ह्मणून निरनिराळ्या विषयांवर व्याख्यानें देण्यांत येतात. प्रत्येक कैद्यांवर पूर्णपणें लक्ष देणें ही या योजनेंतील महत्वाची गोष्ट आहे. त्यांच्यांत शिस्त व उद्योगप्रियता वाढावी ह्मणून प्रयत्न करण्यांत येत असतात. त्यांची सुधारणा लवकर होत जावी, ह्मणून त्यांच्यांत निरनिराळे वर्ग केले असून कांहीं प्रगति दाखविल्या शिवाय खालच्या वर्गांतून वरच्या वर्गांत त्यांना घालीत नाहींत. तुरुंगांतून बाहेर पडल्यावर त्यांना

चोऱ्यामाऱ्या करण्याची बुद्धि न होतां कांहीं तरी उद्योग धंदा करून आपलें आयुष्य प्रामाणिकपणानें घालवितां यावें व आपलें कल्याण केल्याबद्दल अधिकारी वर्गास दुवा देण्यासारखी त्यांची स्थिति व्हावी अशा प्रकारचें शिक्षण अगदीं वरच्या वर्गांत देण्याची व्यवस्था केलेली आहे.

या पद्धतींत कांहीं थोडा फेरफार करून त्या नमुन्यावर सरकारनें येथें तुरुंग काढले. मुंबई इलाख्यांत पुण्याजवळ येरवड्यास अशा तऱ्हेचा तुरुंग आहे. ही एक प्रकारची शाळाच आहे असें म्हटल्यास चालेल. कारण येथें लिहिण्या वाचण्याचीच कला शिकवली जात नसून एकादा उपयुक्त धंदाही शिकविला जातो. मात्र या शाळेंत इतर शाळा पेक्षां शिस्त फारच कडक रीतीनें संभाळली जाते. लोहारकाम, सुतारकाम, चित्रकला, पॉलिश, बुकबाइंडिग इ. कला मुलांना शिकविण्यांत येतात. या कलांचा, त्यांना पुढें मागें उपयोग करतां यावा ह्या दृष्टीनेंच शिक्षण दिलें जातें, हें सांगावयास नकोच. एकंदरीत व्रात्य मुलाला सन्मार्गावर आणून त्यास पोटापाण्याची विद्या शिकविण्याचें हें एक उत्तम साधन आहे.

१०४ **काळेपाणी**--काळ्यापाण्याची शिक्षा झालेल्या गुन्हेगारांना अंदमान बेटांतील पोर्ट ब्लेअरच्या तुरूंगांत पाठविण्यांत येते. जन्मठेप अगर ठराविक मुदतीची ( किमानपक्षीं ६ वर्षांची ) शिक्षा एकाद्यास झाल्यास ती त्यास तेथें भोगावीं लागते. १८३८ सालीं जी तुरुंग कमेटी बसली होती तिनें जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा द्यावी अशी शिफारस केलीं होती पण पुढें सन १८७४ मध्यें ह्या शिक्षेची मुदत ठरविण्यांत आलीं. सन १८९१ च्या कमिशनच्या शिफारशी प्रमाणें काळे पाण्याची शिक्षा देण्याचें बंद झालें होतें. परंतु कांहीं काळानें तो हुकूम फिरविण्यांत आला.

काळेपाण्याची शिक्षा झालेल्या कैद्याच्या शिक्षा भोगण्याच्या मुदतीचे पांच वर्ग करण्यांत येतात, व ठराविक मुदत संपल्यानंतर त्यास एका वर्गांतून दुसऱ्या वर्गांत घालण्यांत येते. जसजशी त्याची वरच्या वर्गांत बढती होते तसतशी त्यास शिक्षाही सौम्यच मिळत जाते. चांगल्या वर्तणुकीनें वरिष्ठ खूष झाल्यास साधारण कैद्यास वीस वर्षांनीं व एकाद्या दरवडेखोरास पंचवीस वर्षांनीं सोडण्यांत येतें.

येथील तुरुंगाची सर्व व्यवस्था एका सुपरिंटेंडंटच्या हाताखालीं असतें व त्याच्या हाताखालीं कांहीं दुय्यम ऑफिसर असतात, ते त्यास मदत करितात. या तुरुंगांतील अपराध्यांत बायका फारशा नसतात. बहुतेक भर पुरुषाचाच असतो. सन १९१४ सालीं येथें ११९२७ पुरुष व ९७८ बायका होत्या. चांगल्या वर्तुणुकीचा एकादा कैदी पहिल्या वर्गांत गेल्यास त्यास तेथें जमीन देण्यांत येते व एकाद्या स्त्री गुन्हेगाराशीं लग्न करण्याची परवानगी देण्यांत येते.

---

# प्रकरण नववें.

## जमा-खर्च.

Political liberty without economic liberty is living on the mountain-tops, where the atmosphere is fortifying and appetizing and the spiritual out-look glorious, but where the pangs of hunger and the pains of exposure and unemployment make the heavenly prospect more maddening.—*Dr. Rutherford.*

In each country, the first step towards re-establishing a gold standard would be the balancing of the annual expenditure of the state without the creation of fresh credit unrepresented by new assets. The balancing of the budget is the first consideration. —*Peace Conference.*

१०५ **विषयव्याप्ति**--हिंदुस्थानांत कर, खंडणी, जमीनमहसूल वगैरेच्या रुपानें सरकार रयतेकडून जो पैसा गोळा करितें, त्या पैशाचा विनियोग राज्यव्यवस्थेच्या कामीं कोणत्या रीतीनें केला जातो, हें या प्रकरणीं पहावयाचें.

आहे. परंतु हा विषय अर्थशास्त्रांत मोडत असल्यामुळें व पुढील विवेचनांत अर्थशास्त्रांतील कांहीं पारिभाषिक शब्द येणार असल्यामुळें, मूळ विषयांस प्रारंभ करण्यापूर्वी त्यांचा खुलासा करणें इष्ट आहे.

**१०६ करांची अवश्यकता**–रयतेच्या जीविताचें व मालमत्तेचें संरक्षण करणें हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे, व हें करण्यांस सरकास पुष्कळ तजविजी कराव्या लागतात. देशाचें परचक्रापासून संरक्षण करण्यासाठीं व देशांत शांतता राखून आंतील दंगेधोपें यांचा बंदोबस्त करण्यासाठीं सरकारास नेहमीं खडें सैन्य ठेवावें लागतें. रयतेच्या जीविताचें व मालमत्तेचें चोराचिलटांपासून संरक्षण करण्यासाठीं व वैयक्तिक स्वातंत्र्यावर कोणी घाला घालूं नये ह्मणून पोलिसांची पथकें ठेवावी लागतात. निरनिराळया अपराध्यांना योग्य शासन देण्यासाठीं न्यायाची कोर्टें स्थापावी लागतात. हीं व यासारखीं प्रजेच्या हिताची दुसरी अनेक कामें करण्याची सरकारावर जबाबदारी आहे. आतां ही नैतिक जबाबदारी नीट रीतीनें पाडण्यास सरकाला पुष्कळ खर्च करावा लागतो हें उघड आहे. हा खर्च निभण्या करितां लोकांवर कर बसविणें अवश्य आहे.

**१०७ करासंबंधीचें चार नियम**—हे कर कोणाजवळून किती प्रमाणांत घ्यावे हा मोठा विचारार्ह प्रश्न आहे. देशांत श्रीमंत, गरीब, अशक्त सशक्त असें अनेक प्रकारचे लोक असतात व त्या सर्वांचेच सरकारांकडून रक्षण केलें जातें. हें रक्षण करण्याबद्दल सरकारास जो खर्च करावा लागतो त्याचें थोडें बहुत ओझें प्रत्येकानें सोसलें पाहिजे. परंतु सर्वांना सरकारचें संरक्षणाची सारखीच जरूरी असते असें नाहीं. अगर या संरक्षणाचा मोबदला देण्यास सर्वच शक्तिमान आहेत असेंही नाहीं. ह्मणून सर्वांपासून सारख्याच प्रमाणांत हा खर्च वसूल करतां कामा नये. असें न झाल्यास अनवस्था प्रसंग उद्भवून बंडाळी माजण्याचा संभव आहे. सर्वांवर सारख्या प्रमाणांत कर लादणें अनिष्ट असल्यामुळें साहजीकपणें असा प्रश्न उद्भवतो कीं, कोणत्या प्रमाणांत हा खर्च वसूल करावा व कर बसविणें ते काय धोरणानें बसवावें? या प्रश्नाचें उत्तर प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ **ॲडम् स्मिथ** यानें राष्ट्रीय संपत्ति नामक आपल्या पुस्तकांत दिलें

आहे. या पुस्तकांत त्यानें करांविषयीं चार नियम दिले असून सरकारनें हे पाळले असतां कर देणारावर ओझें थोडें पडून सरकारास पुष्कळ वसूल मिळतो असें त्याचें ह्मणणें आहे. हे नियम म्हणजे :--

१ प्रत्येक देशांतील प्रजाजनांनीं आपल्या सरकारच्या योगक्षेमाकरितां होता होईल तों आपआपल्या ऐपतीप्रमाणें कर दिला पाहिजे. अर्थात् सरकाच्या सुरक्षित छत्राखालीं आपल्याला ज्या उत्पन्नाचा उपभोग घेण्यास सांपडतो त्या उत्पन्नाच्या मानानें प्रत्येकानें कर दिला पाहिजे.

२ कर भरण्याची वेळ, तो देण्याची रीती व कराची रक्कम या सर्व गोष्टी कर भरणारांस व दुसऱ्या प्रत्येक माणसांस स्पष्टपणें व मुक्करपणें माहित असल्या पाहिजेत.

३ कर भरण्यास सोईचें होईल अशावेळीं व अशा रीतीनें कराची वसुली करावी.

४ प्रत्येक कराची अशी योजना असावी कीं, सरकारच्या पदरांत जो नक्की ऐवज पडतो त्याहून अधिक ऐवज रयतेंकडून घेण्यांत येऊं नये.

या चार नियमांपैकीं शेवटलें तीन नियम स्पष्ट आहेत. परंतु पहिला नियम प्रत्येक करास लागूं पडत नाहीं, असें विचारांअंतीं आपणांस दिसून येईल. उदाहरणार्थ आपण मिठाचाच कर घेऊं. एका कुटुंबांत चार माणसें आहेत व दुसऱ्यांत सहा माणसें आहेत. अशी कल्पना करा कीं, या दोन्ही कुटुंबांचें उत्पन्न सारखेंच आहे. आतां मिठावर जर कर बसविला तर ज्यास्त कुटुंबवाल्यावर तो अधिक पडेल कारण त्याचे कुटुंबांत मिठचा खप ज्यास्त होतो. ज्याचें कुटुंबांत कमी माणसें आहेत त्यांस मिठाचा खप कमी लागेल. परंतु दोघांचें उत्पन्न सारखेंच असतांनाहि त्यास दुसऱ्यांपेक्षां कमी कर द्यावा लागेल, सबब हा कर उत्पन्नाचे मानानें सारखाच बसला असें ह्मणतां येणार नाहीं. तसेंच ज्या प्रमाणानें सरकारापासून संरक्षण मिळतें, त्या मानानें कर असावेत असें ह्मटलें तर अशीच अनवस्था उत्पन्न होतें, कारण प्रत्येकास कोणच्या प्रमाणांत संरक्षण मिळते हें काढणें कठीण आहे.

जो कर असेल तो निश्चित असून कांहीं नियमानें ठरलेला असावा असें दुसऱ्या नियमांत सांगितलें आहे. याचें महत्व फार आहे. अमुक कर द्यावयाचा हें कर भरणारांस ठाऊक असल्यास कर वसुल करणाऱ्या अंमलदारास त्याच्यावर जुलुम जबरदस्ती करण्यांस सांपडणार नाहीं. तसेंच अमुक प्रकारानें ह्मणजे पैशाच्या रूपानें, अगर धान्याच्या रूपानें कर भरावा हेंही निश्चित असलें पाहिजे. नाहीं तर, लोकांस फार त्रास व नुकसान होण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणें अमुक वेळीं कर भरावयाचा हेंही कर भरणारांस ठाऊक असणें जरूरीचें आहे. कारण त्यापूर्वी सावध होऊन त्यास पैसा भरण्याची तरतूद लावता येते.

सोइस्कर वेळीं रयतेला कर देतां यावा या करितां तिसऱ्या नियमाची योजना आहे. रयतेची गैरसोय करून भलत्याच वेळीं कर वसूल केल्यानें सरकारास नफा न होतां उलट नुकसानच होतें. जमिनीवर सारा घेणें तो धान्य पिकल्यावर न घेतां जर तो लागवडीच्या वेळींच घेतला तर शेतकऱ्यांस फार त्रास पडेल तसेंच पदार्थांवर जे कर सरकारनें बसविले असतात. ते वस्तुतः खरेदी करणारावर पडतात. परंतु ते त्यांस प्रत्यक्षपणें द्यावे लागत नाहींत. गिऱ्हाइकांवर जर ते प्रत्यक्षपणें लादले तर वसुलाच्या कामीं फार घोटाळा होईल ह्मणून कराचा बोजा शेवटीं जरी पदार्थ वापरणारावर पडणार असला तरी तो गिऱ्हकांपासुन वसुल न करितां तो पदार्थ विकणारांपासून वसूल करणें ज्यास्त फायदेशीर व सोइस्कर आहे.

लोकांच्या खिशांतून जाणारी रकम व सरकारच्या पदरांत पडणारी रकम यांमध्यें विशेष अंतर असू नये, असें चवथा नियम सागतों. कराची वसुली शक्य तितक्या काटकसरीनें करावी असा या नियमाचा अर्थ आहे. कांहीं देशांत कर वसुलीच्या कामीं फार फाजिल खर्च केला जातो. त्यामुळें सरकारच्या पदरांत करांपैकीं फारच अल्प अंश पडतो. यामुळें लोक विनाकारण गांजले जातात व सरकारास फायदा होत नाहीं. असें होणें राष्ट्रहित दृष्ट्या अनिष्ट नव्हे काय ?

**१०८ करांचें वर्गीकरण**–आतांपर्यंत करांची अवश्यकता व ते वसूल

करतांना लक्षांत ठेवण्याच्या गोष्टी याविषयीं थोडक्यांत माहिती सांगितली. आतां कर किती प्रकारचे आहेत हें सांगून मूळ बिषयांकडें वळतो.

करांचे प्रकार किती, हा मोटा वादग्रस्त प्रश्न आहे. निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांनीं निरनिराळ्या तत्वांवर करांचें वर्गीकरण केलें आहे. ॲडॅम स्मिथ करांचे चार प्रकार कल्पितो, परंतु इतर दोनच वर्ग काल्पितात. ॲडॅम स्मिथचें वर्गीकरण व्यावहारिक दृष्टीनें बरोबर नसल्यामुळें तें येथें बिचारांत घेण्याचें कांहीं कारण नाहीं. इतरांनीं करांचे दोन प्रकार मानले आहेत, हें वर सांगितलें आहेच. हे वर्ग ह्मटलें ह्मणजे प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर हे होत. ' ज्या करामध्यें कर देणारा व ज्यावर कराचा बोजा पडतो तो, अगर कर सहन करणारा या व्यक्ति एकच असतात तो प्रत्यक्ष कर होय. ज्या करामध्यें कर देणारा व कर सहन करणारा या व्यक्ति निरनिराळ्या असतात, तो प्रत्यक्ष कर होय. ' जमीनीवरील कर, प्राप्तीवरील कर, घरपट्टी. पाणीपट्टी, विशिष्ट धंद्यावरील कर, हे सर्व प्रत्यक्ष कराच्या सदरांत मोडतात. उलट आयात व निर्यात जकाती आणि अन्तर्गत जकाती या अप्रत्यक्ष कराच्या वर्गांत मोडतात. कारण ह्या जकाती प्रथम कारखानदार व घाऊक व्यापारी देतात खरें; परंतु अखेर हा माल खरेदी करणारावरच त्यांचा बोंजा पडतो. ह्मणून यांस अप्रत्यक्ष कर ह्मणतात.

**१०९ उधळपट्टीचा कारभारः**—स. १९१९ च्या सुधारणा कायद्यानें हिंदुस्थानच्या आर्थिक व्यवस्थेंत कोणकोणते फेरफार झाले आहेत हें कळण्यास ती पूर्वी कशी होती व तिला हें स्वरूप येण्यास काय कारणें घडलीं, हें कळणें इष्ट आहे. म्हणून कंपनी सरकारच्या अवल अमदानीपासून आतांपर्यंतच्या आर्थिक व्यवस्थेचें परीक्षण करणें भाग आहे. १७९२ ते १८५८ पर्यंतच्या एकंदर ६६ वर्षांतील आर्थिक स्थितीचें निरीक्षण केल्यास हिंदुस्थानचा पैसा कंपनीकडून कसा बेजबाबदारपणें खर्च करण्यांत येत होता, हें चांगलेंच दिसून येतें. १७९२ ते १८५८ पर्यंतच्या काळांतील जमाखर्चाचे जे आंकडे सरकारी रीत्या प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून असें दिसतें कीं, हिंदुस्थानचें उत्पन्न वाढत असतांनाहीं, जमाखर्चाची पद्धति चोख नसल्यामुळें, एक

सारखी तूट येत होती, व ही तूट भरून काढण्यास दुसरें उपाय न यो-जतां कंपनी सरकारकडून एक सारखें कर्ज काढण्यांत येत होतें. त्यावेळच्या जमेच्या सदरांखालीं पाहतां असें आढळतें कीं, जमीनमहसुल, मीठ व अफू या व्यतिरिक्त इतर कर त्यावेळीं नव्हते व त्यामुळें या उत्पन्नावरच कंपनीस आपला निर्वाह करावा लागत होता. उलट खर्चाच्या सदरांखालीं पाहतां मुलुख-गिरीच्या पायीं कंपनीचा खर्च एकसारखा वाढत असल्याचेंच दिसून येतें. लॉर्ड वेलस्ली, हेस्टिंग वगैरे ग. जनरलांनीं कंपनीच्या मुलुखांत एकसारखी भर टाकण्याचा सपाटा उडविला होता खरा, परंतु त्या मुलुखाचा फक्त बंदोबस्त कर-ण्याकडेंच त्यांचें लक्ष होतें. राज्ययंत्राचा गाडा सुरळीतपणें चालावा ह्मणून त्यांच्या पैकीं एकानेंही प्रयत्न केला नाहीं. यामुळें खर्च वाढून कंपनीचा पाय दिवसेंदिवस कर्जामध्यें खोल खोल जाऊं लागला. त्यांत १८५७ सालचें बंड उद्भवल्यामुळें त्याच्या उपशमनार्थ कंपनीस फार खर्च करावा लागला. यावेळीं कंपनीनें सर्व हिंदुस्थान पादाक्रांत केला असल्यामुळें. येथें शांतता राखणें तिचें कर्तव्यकर्म होतें व यासाठीं तिला अर्थात्च वाजवीपेक्षां ज्यास्त फौजफाटा बाळगणें भाग होतें व त्यामानानें तिचा खर्चही वाढणार होता. यासाठीं कंपनीनें अगाऊ तज-विजी करून ठेविल्या नसल्यामुळें तिला पैशाचे संबंधानें पंचाईत पडली. आजवर वेळोवेळीं ज्रसें कर्ज काढून तिनें जमाखर्चाची तोंडमिळवणी केली तशी या पुढेंही तिला करतां आली असती, परंतु सुराज्याच्या दृष्टीनें तें करणें इष्ट नव्हतें. यामुळें उत्पन्न वाढण्यासाठीं दुसरें उपाय योजणें जरूर होते. ह्मणून आयात व निर्गत मालावर २० पासून १० टक्यापर्यंत जकाती बसविण्यांत आल्या. कंपनीचा अंमल चालू असतांना जमाखर्चाची पद्धति व्यवस्थेशीर अशी नव्हती. तींत सर्वत्र अव्यवस्था माजली होती. ही स्थिति सुधारण्याकरितां व वाढ-लेला खर्च कमी करण्याकरितां मि जेम्स विल्सन या नांवाच्या इसमास हिंदु-स्थान सरकारचे फडणीस ह्मणून इकडे पाठविण्यांत आलें. विल्सन साहेबांनीं येथील आर्थिक व्यवस्थेंत सुधारणा करण्यास सुरवात करण्यास व त्यांस मृत्यूनें गांठण्यास एकच गांठ पडली व यामुळें त्यांनीं करूं घातलेल्या सुधारणा जेथल्या

तेथेंच राहिल्या. नाहीं ह्मणावयास त्यांच्या कारकीर्दींत कस्टमची जकात कमी करण्यांत आली, व विलायतच्या नमुन्यावर प्राप्तीवर कर बसाविण्यांत आला, आणि स्टांपाचे कायद्यांत महत्वाचे फरक करण्यांत येऊन पावत्यास व हुंड्यास तिकिटें लावण्याचें ठरलें. त्यांनीं सुरू केलेल्या या पद्धति यांच्या पश्चात् आज कशा चांगले स्थितींत आल्या आहेत, हें आपण पहातच आहोंत.

**११० मेयोनें केलेल्या सुधारणा**--स. १८३३ पूर्वी मुंबई, मद्रास व कलकत्ता या तिन्ही प्रांतांच्या जमाखर्चाचा हिशोब निरानिराळा ठेविला जाई. परंतु यासालीं प्रांतिक सरकारचे पगारवाढीचे, ज्यास्त नोकर ठेवण्याचे, पेनशन ग्रॅच्युअटी देण्याचे हक्क काढून घेण्यांत येऊन ते ग. जनरलास देण्यांत आले. याकाळापावेतों जमाखर्चाची शिस्तवार अशी पद्धति नव्हती व त्यामुळें जमाखर्चांत फारच घोटाळे माजले होते. खर्च फार वाढल्यानें खाजिन्यांत तूट येऊन खर्चाची टंचाई झाली होती. अशा स्थितींत ५७ सालचें बंड उद्भवल्यानें ही स्थिति फारच बिकट झाली. ह्या विकट स्थितींतून राज्यनौका सुरक्षितपणें वर काढण्यासाठीं विलसन साहेबांची फडणीस म्हणून इकडे रवानगी झाली. या साहेबांनी केलेल्या सुधारणांत सर्व देशांतील खर्चावर हिंदुस्थानसरकारास फार सख्त देखरेखीचा अधिकार दिला होता. कोणताही खर्च करणें झाल्यास हिंदुस्थान सरकारची मंजुरी लागे व हुकुमाप्रमाणें कर वसूल करणें व ते मंजुरी देतील त्याप्रमाणें व देतील तेवढी रकम खर्च करणें, एवढेंच कायतें अधिकार प्रांतिक सरकारास राहिले. याप्रमाणें हिंदुस्थानसरकाच्या हातीं सर्व सत्ता एकवटल्यामुळें प्रांतिक सरकारांना ती जाचक होऊं लागली. व यामुळें पुढें राज्यकारभारावर अनिष्ट असे परिणाम झाले.

या व्यवस्थेंतील मुख्य दोष ह्मटला ह्मणजे प्रांतिक सरकारावर खर्चाची कांहींच जबाबदारी नव्हती व त्यामुळें ते अगदीं बेफिकीरींत असत. वरिष्ठ सरकारासाठीं आपल्या प्रांतांतील वसुल गोळा करावयाचा व तो ठराविक मुदतींत वरिष्ट सरकारच्या तिजोरींत भरावयाचा हेंच काय तें त्यांना काम होते. हें काम सुरळीतपणें पार पडावें व आपले अमलांखालील राज्यव्यवस्था चांगले तऱ्हेनें चालावी ह्मणून ते वरिष्ठ सरकाराकडून काढवेल तितका जास्त पैसा काढीत.

व तो वाटेल तसा उधळीत. याकाळीं काटकसरीचें तर त्यांना वावडें होतें. आपल्या प्रांतास खर्च किती लागेल, इतर प्रांतांच्या गरजा काय आहेत व त्यांची नीट सोय होण्यासारखी आहे कीं नाहीं, याबद्दल ते कधींही विचार करीत नसत. हिंदुस्थान सरकार नेहमीं जमा व खर्चाचा तोंड मिळवणी कशी करतां येईल या विवंचनेंत असे. त्यांस प्रांतिक सरकारच्या गरजांची माहिती नसल्यामुळें पैशाची वाटणी नीट होत नसे. व त्यामुळें हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार यांच्यांत वारंवार गैरसमज उत्पन्न होई ही स्थिति सुधारण्यास एकच मार्ग होता व तो म्हणजे प्रांतिक सरकारास आर्थिक स्वातंत्र्य देणें. ही गोष्ट त्यावेळीं सर्वांना पटली खरी, परंतु तिची अमलबजावणी त्यावेळीं न होतां लॉर्ड मेयोच्या कारकीर्दींत झाली.

लॉर्ड मेयो ग. जनरलच्या पदांवर आरूढ झाल्यावर, प्रांतिक सरकारास थोडें बहुत आर्थिक स्वातंत्र्य दिल्याशिवाय वरिष्ठ सरकार व प्रांतिक सरकार यांच्यांत जमाखर्चाच्या बाबतींत गैरसमजानें जे लढे लागतात ते मिटणार नाहींत, असें त्यांस दिसून आलें. त्यामुळें सन १८७० सालीं प्रांतिक सरकारांवर जमा व खर्चाची जबाबदारी टाकण्याचे पद्धतीचा पाया त्यानें घातला. प्रांतिक सरकारास पूर्ण आर्थिक स्वातंत्र्य देण्याची त्याची तयारी नव्हती. आपली सोय कशी होईल यागोष्टीकडेंच त्याचें लक्ष होतें. या व्यवस्थेमुळें तुरुंग, नोंदणी, पोलीस, शिक्षण, वैद्यक, छपाई, रस्ते किरकोळ व इमारत, या खात्यांचा कारभार त्यांचा खर्च भागविण्यासाठीं ठरीव रकम देऊन, प्रांतिक करकारांच्या हवालीं करण्यांत आला व ही रकम खर्च करण्यासंबंधानें प्रांतिक सरकारांस पूर्ण स्वतंत्रता देण्यांत आली. याशिवाय जादा खर्च भागण्याकरितां प्रांतिक सरकारांस हिंदुस्थानसरकारनें दरसाल देणगीदाखल एक ठराविक रकम द्यावी असें ठरून, लढाई दुष्काळ व अफूचें उत्पन्नांत उतार अशाप्रकारचे आकस्मिक प्रसंग उद्भवल्याशिवाय पांच वर्षेपर्यंत देणगीच्या रकमेंत फेरफार करूं नये असें ठरलें. ही व्यवस्था केवळ प्रयोगादाखल सुरू केली असल्यामुळें आरंभीं प्रांतिक सरकारांस फारच थोडे अधिकार देण्यांत आले होते व हिंदुस्थान सरकारचा ताबा अजिबात नाहींसा होऊं नये म्हणून त्यांवर ठिकाठिकाणीं निर्बंध घालण्यांत आले होते. तरी एकंदर ही व्यवस्था योग्य दिशेनेंच होती, असें

म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. या व्यवस्थेपासून झाला तर थोडा बहुत फायदाच होईल, नुकसान होणार नाहीं अशी सर्वांची अटकळ होती व ती कांहीं अंशांनीं खरीहि ठरली.

**१११ लिटनशाहींतील सुधारणा**—या बाबतींत ज्यास्त सुधारणा करण्याकरितां लॉर्ड लिटननें आणखी एक पाऊल पुढें टाकलें. लॉर्ड मेयोच्या कारकीर्दींत निघालेल्या ठरावांत जे हेतू व उद्देश दाखविले होते ते यावेळच्या सरकारांस जरी पसंत नव्हते तरी मेयोची कराराची पद्धति त्यांस पसंत होती व म्हणून त्यांनीं तीच पुढें चालू ठेवली. " फक्त पूर्वी ज्या शर्ती होत्या त्या वाढवून जरा अधिक कडक केल्या, व हिंदुस्थानसरकारच्या परवानगी खेरीज कोणताही कर बसवूं नये, खातें काढूं नये, अगर २५० रुपयांवा पूर्वीचा अधिकारी कामावरून दूर करूं नये अशा नव्या अटी घातल्या. " लिटन साहेबांच्या नव्या व्यवस्थेमुळें, मेयोनें प्रांतिक सरकारासाठी नऊ खर्चांची खातीं दिलीं होती ती कायम ठेऊन आणखी ज्यास्ती जमेची व खर्चाची खातीं प्रांतिक सरकाराकडें देण्यांत आलीं. ' इनामदाराकडून वगैरे जो वसुल येतो तो काळीपैकीं वसूल, अबकारी, स्टांप, कस्टम, मरीन व किरकोळ हीं जमेचीं खातीं आणि पूर्वी सांगितलेल्या नऊ खात्यांखेरीज मुलकी, अबकारी, कस्टम, मीठ, स्टांप, दिवाणी किरकोळ खातीं, न्याय मरीन, धर्म खातें, वैद्यकखातें, स्टेशनरी पेन्शन आणि किरकोळ या सर्व खर्चांच्या बाबी स्थानिक सरकारच्या ताब्यांत देण्यांत आल्या.

ह्या सुधारणामुळें हिंदुस्थान सरकारच्या डोक्यावरील खर्चाचा बोजा कमी होऊन प्रांतिक सरकारावरील खर्चाची जबाबदारी वाढली. काटकसरीनें कारभार करून आपलें उत्पन्न वाढविण्याची महत्वाकांक्षा प्रांतिक सरकारांत बळावेल असा जो अजमास होता तो चुकीचा ठरला. कारण प्रांतिक सरकारास आपलें उत्पन्न वाढत्या खर्चामुळें अपुरें पडून जमा व खर्चाची तोंड मिळवणी करतां करतां ते अगदी टेकीस आलें.

**११२ लॉर्ड रिपन-सुधारणा व नंतर**—तिसऱ्या पंचवार्षिक करारास १८८२ सालीं सुरवात झाली. यावेळीं लॉर्ड रिपन हे व्हाइसराय असून मि. बेरिंग

हे त्यांचे फडणीस होते. यांनीं आपल्या नेहमींच्या उदार वर्तनक्रमास अनुसरून करारनाम्याच्या पद्धतींत पुष्कळ सुधारणा केली. हिंदुस्थानसरकार प्रांतिक सरकारांस दरसाल जी ठरावीक रकम देत असे ती देण्याचे बंद करुन, तिच्याऐवजीं कांहीं मुलकी (civil)खात्यांचें सर्व उत्पन्न प्रांतिक सरकारास त्यांनीं बहाल केलें. तसेंच जंगल, नोंदणी, अबकारी, स्टँप वगैरे बाबींचें उत्पन्नापैकीं निमा भाग प्रांतिक सरकारास मिळूं लागला, व या उत्पन्नांतून न भागतां जी खर्चाची तूट उरेल ती भरुन काढण्यासाठीं जमीन महसुलाच्या उत्पन्नांत वांटा देण्यांत आला. विशेष भयंकर दुष्काळाशिवाय दुसऱ्या कोणत्याही कारणास्तव हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारास मदत करूं नये, व विशेष संकट येऊन हिंदुस्थान सरकारची सर्व शिल्लक खर्च झाल्याशिवाय व प्राप्तीचे इतर मार्ग संपल्यावांचून हिंदुस्तान सरकारनें प्रांतिक सरकारची शिल्लक स्वाहा करूं नये, असा एक नवीन ठराव करण्यांत आला. या ठरावामुळें प्रांतिक सरकारास हायसें वाटून आपल्या कारभारांत सुधारणा करण्यास व नवीन योजना हातीं घेण्यास संधी मिळाली.

या सुधारणेंतील व्यंगें लवकरच सरकारच्या निदर्शनास आल्यामुळें यापुढील वीस वर्षांत ती नाहींशी करण्यास सरकारानें मनापासून प्रयत्न केले. १८८४ सालापर्यंत प्रांतिक सरकारांजवळ खर्चवेच वजा जातां बरीच शिल्लक उरत असे व ते तिचा विनियोग चांगल्या प्रकारें करीत असत. परंतु पुढें अफगाणशीं झालेल्या लढायां पायीं हिंदुस्तान सरकार टेकीस आल्यामुळें प्रांतिक सरकारांजवळून ६७०,००० पौंड हिंदुस्तानसरकारनें उपटले, व त्यांनीं उधळपट्टी करुं नये म्हणून अशी अट घातली कीं, प्रांतिक सरकारांनीं आपल्या शिलकेंतील कांहीं रकम आपल्याजवळ ठेव म्हणून ठेवावी व ती ठराविक रकमेच्या खालीं कधींच जाऊं नये. पुढें १८८७ सालीं नवीन करार करते वेळीं वाढता लष्करी खर्च व हुंडणावळींत आलेली तूट भागविण्याकरितां प्रांतिक सरकारांच्या सर्व शिलकेची जप्ती करून हिंदुस्थान सरकारनें ५५ लाख रूपये मिळविलें व पुढें १८९१ सालींही या जप्तीच्या खेळांत प्रांतिक सरकारास ४७ लाख रूपयांस आंचवावें लागलें. अशा रीतीनें पै पै करून साठविलेली माया हिंदुस्थान सरकारनें मध्येंच

उपटल्यामुळें प्रांतिक सरकारांची मनें अगदीं खट्टू झाली. त्यावेळीं याबावतींत प्रांतिक सरकारची मनःप्रवृत्ति कशी होती, हें खालीं दिलेल्या बंगालच्या ले. गव्हर्नरच्या भाषणांतील उताऱ्यावरून चांगलेंच कळून येईल. तो म्हणतो " I must say I deprecate the way in which these quinquennial revisions have too frequently carried out... The normal history of a provincial contract is this—two yeas of screwing and saving and postponement of works, two years of thrown resumed energy on a normal scale, and one year of dissipation of balances in the fear that if not spent they will be annexed by the Supreme Government directly or indirectly, at the time of the revision " ( करारनामें वारंवार करण्याच्या पद्धतीचा धिःकार केल्यांवाचून मला राहवत नाहीं. या करारनाम्याचा इतिहास असा कीं, पहिली दोन वर्षें दांत कोरून पोट भरावें; पुढच्या दोन वर्षांत सर्व कारभार सुरळीत चालू करून कांहीं माया जमवावी तों पांचव्या वर्षीं करारनाम्याच्या फेरतपासणीच्या वेळीं हिंदुस्थानसरकारच्या जप्तीच्या भीतीनें असेल नसेल त्याची उधळपट्टी करावी. )

१८८७ सालीं नवा करार करतेवेळीं हिंदुस्थानसरकारची सांपत्तिक स्थिति अगदीं असमाधानकारक होती. हुंडणावळीच्या दरांत उतार झाल्यामुळें व लष्करांत तिस हजार इसमांची नवी भरती झाल्यामुळें हिंदुस्थानसरकार खर्चाच्या पायीं अगदीं टेकीस आलें होतें. त्या वाढलेल्या खर्चांत काटकसर करण्याकरितां हिंदुस्थानसरकारनें एक फायनॅन्शिअल कमेटी नेमली. या कमेटीनें करारपद्धतींत कांहीं सुधारणा करण्याची शिफारस केली होती. परंतु हिंदुस्थानसरकारास कमेटीची योजना पसंत पडली नाहीं. पुढें १८९७ सालच्या करारनाम्यांत प्रांतिक सरकारच्या ताब्यांतील खात्यांच्या खर्चाचा अंदाज करून त्यांच्या उत्पन्नापैकीं कांहीं भाग प्रांतिकसरकारास खर्चासाठीं देण्याचें ठरलें. यामुळें

त्यांना स्थानिक पट्टी (provincial rates) न्यायकोर्टें, तुरुंग, पोलिस, शिक्षण वैद्यक, किरकोळ बांधकाम, कांहीं राष्ट्रीय रेल्वे, पाटबंधारें, लेखन साहित्य, यांचें सर्व उत्पन्न; दस्तऐवज, नोंदणी, जंगल व सरकार देणें यांचा निम्मा हिस्सा व अबकारी व जमीन महसुलाचा ¼ भाग, इतकें उत्पन्न मिळूं लागलें. या खात्यांपैकी सर्व खात्यांचा खर्च त्यांनींच करावा असें ठरलें. १९०१ सालीं प्रांतांनीं जमविलेल्या ४६० कोटी उत्पन्नापैकीं २५०·१२ कोटी रकम त्यांचे पदरांत पडली.

**११३ नवीन सुधारणापूर्वी:**—आजपर्यंत तीस वर्षांत जे करारनामे करण्यांत आले ते करतांना हिंदुस्थानसरकारच्या गरजा व सोईकडे (Administrative convenience) पाहण्याचीच प्रवृत्ति दिसून येत असे. करारनाम्याची फेर तपासणी व प्रांतिक सरकारची शिल्लकजप्ती या प्रकारांवरून हिंदुस्थानसरकार किती अरेरावी तऱ्हेनें वागत होतें हें कळून येणार आहे. वरिष्ठ सरकारच्या या अरेरावीपणाचा प्रांतिक सरकारांस अगदीं वींट आला होता. त्यांत हिंदुस्थानसरकारचा खर्च हुंडणावळ व लष्करच्या पायीं भडकूं लागल्यामुळें, प्रांतिक सरकारच्या शिलका भराभर जप्त होऊं लागल्या. यामुळें प्रांतिक सरकारांनीं उधळपट्टी करावयास सुरवात केली. परंतु हिंदुस्थानसरकारनें हा डाव ओळखून प्रांतिक खर्च गैरवाजवी ठरवून तेवढी रकम स्वतः गट्ट करण्यास सुरवात केली. यामुळें प्रांतिक सरकारांची कुचंबणा होऊन त्यांना कांहींच नव्या सुधारणा करतां येईनात. ह्या कारणामुळें दोघांत भांडणें लागूं लागलीं. हीं भांडणें विकोपास जाऊं नयेत ह्मणून १९०४ सालीं प्रयत्न करण्यांत आले. या वेळीं प्रांतिक उत्पन्न कमी करूं नये व पंचवार्षिक करारनाम्याची पद्धति अजिबाद मोडून टांकावी असें ठरलें. १९११ सालीं ही व्यवस्था कायम करण्यांत आली. प्रांतिक सरकारांनीं आपल्या खर्चांत काटकसर करावी; जी शिल्लक राहील ती नवीन सुधारणा करण्यांत खर्च करावी; हिंदुस्थानसरकारनें कोणत्याही सबबीवर ती गिळंकृत करूं नये व उलट हिंदुस्थासरकारनेंच आपल्या शिलकेंतून प्रत्येक प्रांतास वांटा द्यावा; असें या वेळीं ठरविण्यांत आलें. एकंदर उत्पन्नाच्या बाबींचें वरिष्ठ (Imperial), प्रांतिक व समाईक असे तीन वर्ग करण्यांत येऊन अफू, मीठ,

जकाती, टांकसाळ, रेलवे, पोस्ट व तारखातें आणि संस्थानिकांची खंडणी या सर्व बाबांचें उत्पन्न हिंदुस्थानसरकारास मिळूं लागलें. यामुळें सर्व बाबींचा व त्यांच्या जोडीस होम चार्जेस आणि कर्जावरील व्याज यांचा खर्च हिंदुस्थासरकारच्या अंगावर पडूं लागला. अबकारी, जमीनमहसूल, दस्तऐवज नोंदणी यांच्या उत्पन्नांत प्रांतिक सरकारास हिस्सा देण्यांत येऊन बाकीच्या सर्व खात्यांचें उत्पन्न त्यांनाच मिळूं लागलें. या व्यवस्थेप्रमाणें प्रांतिक सरकारांना थोडें बहुत स्वातंत्र्य मिळून आपल्या कारभारांत सुधारणा करण्यास त्यांना अवसर मिळूं लागला. गेल्या महायुद्धापूर्वी हिंदुस्थानसरकाराजवळ पुष्कळ शिल्लक उरली होती. वरील अटीप्रमाणें प्रांतिक सरकारांस हिस्सेरशीन ती वांटण्यांत आल्यामुळें शिक्षण व आरोग्य या सारख्या लोकोपयोगी कृत्यांवर ती खर्चण्यांत आली

खालील कोष्टकांवरून नवीन सुधारणा होण्यापूर्वी एकंदर उत्पन्नाची वरिष्ठ व प्रांतिक सरकारांत कशी विभागणी करण्यांत येई, हें कळून येईल:—

| उत्पन्नाचें खातें. | प्रांतिक सरकारचा हिस्सा (आंकडे पौंडांत आहेत.) | हिंदुस्थान सरकारचें उत्पन्न. (आंकडे पौंडांत आहेत.) |
|---|---|---|
| जमीनमहसूल. ... | ११,६५९,१०० | १०,५९४,००० |
| अफू. ... ... | ... | ३,०५६,२०० |
| मीठ. ... ... | ... | ३,९१४,४०० |
| स्टॅम्प. ... ... | २,९८४,७०० | ३,११२,४०० |
| अबकारी. ... ... | ८,७७०,६०० | ३,३६२,७०० |
| प्राप्तीवरील कर. ... | २,३१३,८०० | ११,२०७,७०० |
| स्थानिक पट्टी. ... | ३४,५०० | १०० |
| जकात. ... ... | ... | १३,३५२,४०० |
| जंगल. ... ... | ३,१६७,१०० | १८५,७०० |
| नोंधणी. ... ... | ५६०,७०० | ७,५०० |
| संस्थानिकांची खंडणी. | ... | ६१३,३० |
| व्याज. ... ... | ३३८,४०० | ३,३९९,००० |

| उत्पन्नाचें खातें. | प्रांतिक सरकारचा हिस्सा. (आंकडे पौंडांत आहेत) | हिंदुस्थान सरकारचें उत्पन्न. (आंकडे पौंडांत आहेत.) |
|---|---|---|
| पोस्ट व तार खातीं. ... | ... | ५,७१६,८०० |
| टांकसाळ. ... ... | ... | १,३०३,२०० |
| न्यायकोर्टें. ... ... | ४१५,३०० | २१,३०० |
| तुरुंग ... ... | ३२९,१०० | ८४,५०० |
| पोलिस. ... ... | १२२,४०० | ६,२०० |
| बंदरें. ... ... | १२५,५०० | ... |
| शिक्षण. ... ... | ३१६,९०० | ७,६०० |
| वैद्यकी खातें. ... | १०३,४०० | १,४०० |
| आरोग्य खातें. ... | २२,००० | ११,१०० |
| घतकी खातें. ... | १४५,६०० | १९,५०० |
| शास्त्रीय. ... ... | २१७,९०० | ८,१०० |
| निवृत्तवेतन फंड ... | ८५,७०० | १३८,२०० |
| लेखन साहित्य. ... | ६०,५०० | ४४,००० |
| हुडणावळ. ... ... | ... | १,०६६,७०० |
| किरकोळ ... ... | २०२,८०० | ९०९,५०० |
| स्टेट रेलवे.... ... | १३,००० | २१,२२०,६०० |
| सबासिडाइज्ड रेलवे. ... | ... | १७१,००० |
| पाटबंधारें. ... | २,९०९,५०० | २,५८९,१०० |
| सार्वजनिक बांधकामें. ... | २५९,९०० | ५३,००० |
| लष्करी उत्पन्न. ... | ... | १,५८७,३८० |
| एकूण | ३६,९६५,४०० | ८६,२२५,४०० |

**११४ नव्या राजवटींतील फेरफार**—मांटफर्ड सुधारणांपूर्वी हिंदुस्थान सरकारास प्रत्येक बाबतींत अरेरावीपणानें वागावयास सांपडे. हा अरेरावीपणा इतर गोष्टींपेक्षां आर्थिक बाबतींतच प्रांतिक सरकारांना फार जाचक होई. हिंदुस्थानचें सर्व उत्पन्न आपलेंच असून आपण देऊं तितकींच भाकरी

खाऊन प्रांतिक सरकारांनीं संतुष्ट असलें पाहिजे, अशी हिंदुस्थानसरकारची समजूत होती. व तीप्रमाणेंच वर्तन होतें. पोटास खावयास भरपूर अन्न मिळत नसल्यामुळें बुभुक्षित झालेलीं प्रांतिक सरकारें नेहमीं ज्यास्त भाकरीसाठीं हपापलेलीं असत व ती मिळण्यांकरितां सदां त्यांची धडपड चालू असे. या धडपडीमुळें त्यांच्यांत व हिंदुस्थानसरकारांत नेहमीं खटके उडत. सुराज्याच्या दृष्टीनें दोघांमध्यें कायमचें वितुष्ट पडणें इष्ट नसल्यामुळें प्रांतिक सरकारांस हिंदुस्थान सरकारेच्या उत्पन्नांत वाटा देण्यांत आला. परंतु ज्या आशेनें हा वांटा देण्यांत आला होता ती आशा सफळ झाली नाहीं. यापद्धतीमुळें जमेचीं जीं खातीं समाईक (Divided) करण्यांत आलीं होतीं त्या खात्यांत हिंदुस्थान सरकारचें हितसंबंध गुंतलें असल्यामुळें प्रांतिक सरकारांवर दिल्लीश्वराची फार करडी नजर असे. त्यांत प्रांतिकसरकारास आपलें बजेट दिल्लीश्वराकडें पसंतीकरितां पाठवावें लागे व त्यांत फेरफार करण्याचा वरिष्ठ सरकारास अधिकार असल्यामुळें प्रांतिक सरकारांची खर्चाच्या बाबतींत कुचंबणा होई व यामुळें त्यांना नव्या योजना हातीं घेतां येत नसत. तसेंच नवीन कर बसविण्याचा व कर्ज काढण्याचा त्यांना अधिकार नव्हता. शिवाय त्यांनीं पास केलेल्या बिलास वरिष्ठ सरकार व भारतमंत्र्याची संमति मिळणें अवश्य असल्यामुळें प्रांतिक सरकारांस, मागें सांगितल्याप्रमाणें, प्रत्येक क्षुल्लक बाबींचा निकाल करून घेण्यास सिमला येथील हिमालयस्थ देवाधिदेवांस आळवावें लागे परंतु नव्या राजवटींत जबाबदार राज्यपद्धतीचा पाया प्रांतिक सरकारांत घालण्याचें ठरल्यामुळें प्रांतिक सरकारांचें परावलंबविमोचन करून त्यांना स्वमर्जीनुसार आपल्या जमा खर्चाची व्यवस्था करण्याचा अधिकार देणें अपरिहार्य होतें. या शिवाय प्रांतिक सरकारास जाचक होणाऱ्या समाईकपद्धतीचेंही उच्चाटण करणें जरूर होतें. या करितां मांटेग्यूंनीं आपल्या रिपोर्टांत शिफारस केली कीं, "If provincial autonomy is to mean anything real clearly the provinces must not be dependent on the Indian Government for the means of provincial development....Our idea is that an estimate should

first be made of the scale of expenditure required for the upkeep and development of the services which clearly appertain to the Indian sphere; that resources with which to meet this expenditure should be secured to the Indian Government: and that all other revenues should then be handed over to the provincial Governments, which will thenceforth be held wholly responsible for the development of all provincial services."
( प्रांतिक सरकारांस खरें स्वातंत्र्य द्यावयाचें म्हणजे स्थानिक सुधारणां करितां हिंदुस्थानसरकारच्या तोंडाकडे पाहण्याचा त्यांच्यावर प्रसंग येऊं देतां कामा नये. × × × आमच्या मतें प्रथम हिंदुस्थानसरकारच्या खर्चाचा अंदाज करून तो भागविण्यापुरतीं खातीं राखून ठेवावींत व राहिलेल्या खात्यांचें सर्व उत्पन्न प्रांतिक सरकारांच्या हवालीं करण्यांत यावें. स्थानिक सुधारणा व गरजा यांबद्दलची सर्व जबाबदारी त्यांच्यावरच टाकण्यांत यावी. ) या हेतूच्या पूर्ततेकरितां १९१९ च्या कायद्यानें स. १९१२ च्या कायम पद्धतींत पुढीलप्रमाणें फेरफार करण्यांत आला.

जमीनमहसूल, पाटबंधारें, अबकारी, प्राप्तीवरील कर, स्टांप वगैरे खात्यांचा कारभार आजपर्यंत दुहातीं होता. परंतु आतां यांतलीं पहिलीं तीन खातीं प्रांतिक सरकारकडे व प्राप्तीवरील कर वरिष्ठ सरकारकडे अशी वांटणी करण्यांत आली आहे. स्टांपांच्या उत्पन्नांतून दिवाणी स्टांपांचें उत्पन्न प्रांतिक सरकाराकडे आणि सर्वसामान्य स्टांपांचें उत्पन्न वरिष्ठ सरकारकडे लावून देण्यांत आलें आहे या योजनेंमुळें दुष्काळाचा खर्च प्रांतिक सरकारावरच पडणार असून जरूरीच्या वेळीं हिंदुस्थानसरकारनें प्रांतिक सरकारांस कर्ज द्यावें, असें ठरलें. उत्पन्नाची अशी वांटणी केल्यामुळें हिंदुस्थानसरकारास आपल्या खर्चांत तूट येईल व प्रांतिक सरकारांजवळ बरीच रकम बचत राहील. याकरितां प्रत्येक प्रांतानें आपल्या शिलकेंतन शेंकडा ८७ टक्के रक्कम खंडणी म्हणून वरिष्ठसरकारांस द्यावी आणि प्रांतिक

सरकारच्या बजेटांत हा वरिष्ठ सरकारच्या खंडणीचा बोजा प्रथम विचारात घेण्यांत यावा असें ठरविण्यांत आलें आहे.

प्रत्येक प्रांतिक सरकारांकडून खंडणी म्हणून दरसाल किती रकम घ्यावी व नवीन पद्धतीस अनुसरून प्रांतिक व वरिष्ठ सरकार यांच्या दरम्यान जमा-खर्चाच्या खात्यांची वांटणी कशी करावी हें ठरविण्यासाठीं लॉर्ड मेस्टन यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमेटी नेमण्यांत आली होती. तिनें प्रांतिक सरकारांनीं प्रारंभीं आपल्या शिलकेंतून हिंदुस्थान सरकारास सालोसाल किती टक्के रकम द्यावयाची हें ठरवून सातवर्षांनीं कायमची व्यवस्था ठरवावी अशी शिफारस केली. प्रांतिक सरकारांनीं सालोसाल हिंदुस्थान सरकारास किती टक्के रकम द्यावयाची त्याचा तपशील:--

| प्रांत. | वर्ष १ लें. | वर्ष ३ रें. | वर्ष ५ वें. | वर्ष ७ वें. |
|---|---|---|---|---|
| मद्रास. ... ... | ३५॥ | २९॥ | २३ | १७ |
| मुंबई. ... ... | ५॥ | ८ | १०॥ | १३ |
| बंगाल. ... ... | ६॥ | १०॥ | १५ | १९ |
| बहार व ओरीसा. ... | शून्य | ३ | ७ | १० |
| संयुक्त प्रांत ... | २४॥ | २२॥ | २० | १८ |
| मध्यप्रांत ... | २ | ३ | ४ | ५ |
| पंजाब ... | १८ | १५ | १२ | ९ |
| आसाम. ... | १॥ | २ | २ | २॥ |
| ब्रह्मदेश. | ६॥ | ६॥ | ६॥ | ६॥ |

ही टक्केवारी अगदीं अन्यायानें करण्यांत आलीं आहे, अशा तऱ्हेची तक्रार प्रांतिक सरकारांनीं वरिष्ठ सरकारकडे केली होती. परंतु झालें आहे तें बरोबर आहे असें म्हणून वरिष्ठ सरकारनें ती धुडकावून लावली! मेस्टनयोजनेमुळें मद्रासेवर खंडणीचा बोजा फार पडला असून मुंबईकरांची '**इनकम टॅक्सची कामधेनु**' वरिष्ठ सरकारनें हिरावून घेतली आहे. हिंदुस्थान सरकारास प्रारंभीं

कांहीं वर्षें ही तूट येईल, व त्यानंतर प्रांतिक सरकारांकडून बिलकूल मदत न घेतां वरिष्ठ सरकार आपला खर्च भागवूं शकेल असें १९२० सालीं बजेटाच्या-वेळीं मि. हेले यांनीं आश्वासन दिलें होतें. परंतु लॉर्ड मेस्टन यांनीं ही तूट कायमचीच येईल असें ठरवून प्रांतिक सरकारांकडून दरसाल सुमारें दहा कोटी रुपये वरिष्ठ सरकारास मिळालेंच पाहिजेत असा अभिप्राय दिला व लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशीं प्रांतिक सरकारावर खंडणीचा बोजा कायमचा लादण्याचें श्रेय घेतलें! मेस्टन योजनेप्रमाणें हिंदुस्थान सरकारास दरसाल फुकटाफुकटी १० कोट रुपये मिळणार असल्यामुळें हिंदुस्थान सरकारास उधळपट्टी करण्यास मुभा मिळाली असून प्रांतिक सरकारांचीं, त्यांतल्या त्यांत सोंपीव खात्यांची, खर्चाच्या बाबतींत फारच कुचंबणा होणार आहे. ही फार शोचनीय गोष्ट होय.

वरिष्ठ सरकारच्या खंडणीचें एवढें तंत्र संभाळून प्रांतिक सरकारास स्वतः-च्या जमाखर्चाची स्वमर्जीनुरूप विल्हेवाट लावण्याची मुभा देण्यांत आली. या शिवाय प्रांतिक सरकारास कर्ज काढण्याची व नवे कर बसविण्याची परवानगी देण्यांत आली असून त्यांनीं त्याचा विनियोग पाटबंधारे वाढविणें, दुष्काळनिवार-णार्थ बांधकामें काढणें, दळणवळणाचें मार्ग तयार करणें, वगैरें लोकोपयोगी-कामांतच करावा असा एक निर्बंध घालण्यांत आला आहे.

हिंदुस्थान सरकारास जोपर्यंत आपला अरेरावीपणा गाजवून प्रांतिक कार-भारांत वेळीं अवेळीं ढवळाढवळ करण्याचा अधिकार आहे तोपर्यंत वरील सुधारणांचा कांहींच उपयोग होणार नाहीं, हें जाणून असें ठरविण्यांत आलें कीं, पूर्वीं प्रमाणें किरकोळ क्षुल्लक बाबतींत वरिष्ठ सरकारनें ढवळाढवळ करूं नये. परंतु जोपर्यंत प्रांतिक सरकारचीं सर्व खातीं दिवाणाकडें सोंपविलीं नाहींत तो-पर्यंत प्रांतिक सरकारचा अधिकार कांहीं खात्यांपुरता तरी अरेरावीच राह-णार. आणि जोपर्यंत तो तसा आहे तोपर्यंत वरिष्ठ सरकारचा देखरेखीचा अंकुश त्यांच्या मानेवर राहणार हें उघड आहे. प्रांतिक सरकारावर वरिष्ठ सर-कारचा असाच दाब ठेवणें म्हणजे प्रांतिक स्वायत्ततेच्या मर्मावरच घांव घाल-ण्यासारखें नव्हे काय ?

**११५ हिंदुस्थान सरकारचें जमाखर्चाचें अंदाजपत्रक**--वरील सुधारणा अंमलांत येऊन आज दोन वर्षें झालीं आहेत. खालील कोष्टकांवरून हिंदुस्थान सरकारचे बजेटाचें स्वरूप नव्या राजवटींत कसें आहे हें कळून येईल:-

| जमा बाब. | उत्पन्न रुपये. | खर्च बाब. | खर्च रुपये. |
|---|---|---|---|
| जकात. | ४५,४१,८४,००० | वसुलाचाखर्च. | ५,५३,३२,००० |
| प्राप्तीवरील कर. | २२,११,३९,००० | रेल्वेच्या कर्जावरील व्याज व इ. | २५,९८,७३,००० |
| मीठ. | ६,८६,०३,००० | | |
| अफू. | ३,०९,३०,००० | पाटबंधारे | ११,१९,००० |
| इतर करांचें उत्पन्न | २,३५,८५,००० | पोष्ट व तारखातें | ९७,३२,००० |
| रेल्वे नक्त उत्पन्न, | ३१,१०,९४,००० | डेट सर्विसेस | १५,२०,०९,००० |
| पाटबंधारे: ( „ ) | ७,२२,००० | मुलकी कारभार | ९,५४,०६,००० |
| पोस्ट व तारा: | १,७५,२८,००० | चलन टांकसाळ हुंडणावळ | १०,८१,७२,००० |
| व्याज बाब | ८४,३१,००० | | |
| मुलकी खातीं | ८६,४९,००० | इमारती रस्ते इ. | १,६१,४९,०-० |
| चलन, टांकसाळ इ. | ३,२२,३१,००० | लष्करी खर्च | ६७,७२,१४,००० |
| सार्वजनीक कामें | १०,९५,००० | किरकोळ. | ४,०५,९१,००० |
| किरकोळ | ६६,११,००० | वरिष्ठ व प्रांतिक सरकार यामधाल करारान्वयें खर्च | ६३,२९,००० |
| लष्करी मिळकत | ५,५४,१४,००० | | |
| प्रांतिक खंडण्या | ९,२०,६५,००० | | |
| एकूण | १.३३,२२,७८,००० | एकूण | १,४२,३९,०६,००० |
| तूट. | ९,१६,२८,००० | | |
| एकूण जमा. | १,४२,३९,०६,००० | एकूण खर्च. | १,४२,३९,०६,००० |

वरील बजेटांतून प्रांतिक खात्यांचें उच्चाटन झाल्याचें दिसून येईल. १९२२—२३ सालांत अदमासें १३३.२२ कोट रुपये उत्पन्न व १४२.३९ कोट रुपये खर्च होईल असा अंदाज त्यावेळचे फडणीस मि. हेले यांनीं केला होता. या अंदाजांत

८-१३ कोट रूपायांची तूट येत होती, ती भरून काढण्याकरितां वीस कोट रूपये अधिक उत्पन्न होईल या अंदाजानें कर वाढविण्यांत आले. परंतु जमा व खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरितां करवाढीचें उपाय योजूनहि बजेटांत तूट यावयाची ती आलीच ! हिंदुस्थान सरकारचें सध्यांचे फडणीस मि. बेसिल ब्लॅकेट यांनीं १ मार्च १९२३ रोजीं वरिष्ट कायदे मंडळास १९२२-२३ सालचा जो जमाखर्च सादर केला आहे त्यावरून असें दिसतें कीं, यंदा उत्पनांत ८·३४ कोट रूपये अंदाजापेक्षां कमी आले व त्यामुळें एकंदर तुटीचा आकडा १७·५० कोटी रुपयांवर गेला आहे. ही तूट येण्याची कारणें स्पष्टच आहेत. कारण हिंदुस्थान सरकारनें गेल्या दोन वर्षांपासून अर्थशास्त्राच्या नियमांपासून फटकून वागायास सुरवात केली आहे. करांची अंतिम सीमा ओलांडल्यास करवाढीनें उत्पन्नांत तूट येते असा अर्थ शास्त्राचा नियम आहे. रेल्वे, पोष्ट व तार यांचे दर वाढवून हिंदुस्थान सरकारनें या नियमांस साफ धाब्यावर बसविलें आहे. यामुळें ३.१२ कोट रुपये इन्कम टॅक्स खात्यांत; ६·८६ कोट रुपये रेल्वे खात्यांत, व .९४ लक्ष रूपये पोस्ट व तार खात्यांत तूट आली. खर्चामध्यें थोडीशी काटकसर झाल्यानें व अफू मीठ वगैरे खात्यांत अंदाजापेक्षां ज्यास्त उत्पन्न आल्यानें एकंदर तुटीचा आकडा १७ कोटी ५० लक्षांवर गेला नाहीं हें भाग्यच समजावयाचें !

११६ माठ.—आतां हिंदुस्थानच्या निरनिराळ्या जमाखर्चाच्या बाबींचें विवेचन केलें पाहिजे. हिंदुस्थान सरकारचा मुख्य कर म्हणजे जमीनसारा होय. तेव्हां प्रथम जमीनसाऱ्याचाच विचारकरणें भाग आहे. परंतु हा बराच वादग्रस्त प्रश्न असल्यामुळें त्याचा एका स्वतंत्र प्रकरणांत विचार केलेला बरा !

हिंदुस्थान सरकारास मिठावरील करांपासून दरसाल किती उत्पन्न होतें, हें मागील कोष्टकांवरून वाचकांस कळून आलें असेलच. हा कर कोणीं कधीं बसविला, हें इतिहासाभावीं सांगणें कठीण आहे. कंपनी सरकारचें राज्य सुरूं होण्यापूर्वींच तो अस्तित्वांत होता, असें इंग्रज सरकारचें ह्मणणें आहे. तें कसेंही असो, एवढें मात्र खरें कीं, कंपनीच्या अवल अमदानींत हा कर अस्तित्वांत होता. कंपनीच्या नोकरांतील लांचलुचपतीच्या किळसवाण्या प्रका-

रास आळा घालण्याकरितां लॉर्ड क्लाइव्हनें यांपासून होणारें उत्पन्न त्यांच्याकरितां राखून ठेविल्याचा इतिहासांत उल्लेख सांपडतो. कंपनीच्या नोकरांना त्यावेळीं फारच अल्प वेतन मिळत असे. तीन हजार कोसांवरून उदरंभरणार्थ ते इकडे येत असत. परंतु त्यामानानें त्यांना मिळणारें वेतन अगदींच अल्प होतें. त्यांत हिंदुस्थान परका देश पडला ! स्वकीय आप्त नाहीं, गोत नाहीं; अशा स्थितींत त्यांचा संसाराचा गाडा सुरळीत चालावा कसा ? रोजच्या दोन वेळां साधण्याकरितां त्यांना अर्थातच कांहीं तजवीज लावणें अगत्य होतें व ह्मणून त्यांनीं लांचलुचपतीचा, त्यांच्या दृष्टीनें योग्य ठरलेला, मार्ग पत्करून भाबड्या हिंदी जनतेस फसविलें असल्यास बिघडलें कोठें ? राज्यकारभारांत तुह्मास असें अनीतीचें खेळ नको असल्यास त्यांना ज्यास्त वेतन देणें जरूर आहे, परंतु ते देण्यास तुम्ही तयार नाहीं ! तेव्हां अशा स्थितींत या निंद्य प्रकारास आळा घालण्याकरितां मिठाचें उत्पन्न मी राखून ठेवीत आहे, अशी क्लाइव्ह साहेबांची विचारसरणी असल्याचें प्रसिद्धच आहे. १७९३ सालीं लॉर्ड कॉर्नवालिसच्या कारकीर्दीत हें उत्पन्न सरकारजमा झालें * बंगाल्यांत मीठ तयार करण्याचा मक्ता कंपनीच्या

---

* श्री. रमेशचंद्र दत्त यांनीं 'राणीच्या अमलाखालील हिंदुस्थान' नामक आपल्या पुस्तकांत या विषयावर बरीच उपयुक्त माहिती दिली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें १७९३ सालीं मिठावरील कराचें उत्पन्न ८ लक्ष पौंड होतें, तें सन १८४४ त १३ लक्ष पौंडापर्यंत वाढत गेलें. या ५२ वर्षांत २० कोटी मण मिठाची पैदास झाली व त्यापासून ६ कोट पौंड उत्पन्न झालें. हौस ऑफ कॉमन्सची (प्रजाकीय सभा) देशी व विदेशी मिठास सारखें लेखावें अशी आज्ञा असतां, कंपनीनें देशी मिठावरील कर बसवून परदेशी मीठवाल्यांस बराच नफा करून दिला लॉर्ड डलहौसीनें हा अन्याय दूर करण्याकरितां एक जोरदार खलिता लिहिला होता. परंतु मिठावरील कर अजिबात काढून टाकावा अशी इंग्रजी व्यापाऱ्यांची इच्छा होती व तीस त्यावेळच्या हिंदी जनतेचें पाठबळ होतें. त्यामुळें या मागणीस जोर आला, त्यांचें असें म्हणणें होतें कीं, गरीब जनतेस या करांमुळें मिठास मुकावें लागून जमिनींतील कांहीं आपायकारक द्रव्यांचा मिठासारखा उपयोग करावा लागतो. (शहा.)

...कडेंच होता. त्यावेळीं ८२॥ शेराच्या मणावर बंगाल्यांत ५ रुपये. मुंबईत १ रुपाया, मद्रासेंत २ रुपये प्रमाणें कर होता. नेटिव्ह संस्थानांतून कंपनीचें मुलुखांत जें मीठ येई, त्यांवर मणीं ४ रुपये प्रमाणें कर घेतला जाई. शिवाय परदेशांतून आलेल्या मिठावर दरमणीं ५।६ रुपये कर होता. यावरून वेगळाले प्रांतांत या कराचे दर वेगळाले होतें, असें दिसून येईल. या दर-भिन्नत्वामुळें मिठावर कर घेण्यास फार त्रास पडे कर देण्याचें कोणी टाळूं नये, व ज्या प्रांतांत कराचा दर अल्प आहे अशा प्रांतातून ज्या प्रांतात तो ज्यास्त आहे अशा प्रांतात मीठ जाऊं नये म्हणून सरकारास फार कडक उपाय योजावें लागत. ‡ व त्यासाठीं मोठा बंदोबस्त ठेवावा लागे. मिठाचा दर एक सारखा केल्याशिवाय व नेटिव संस्थानांतील मिठाचे कारखानें सरकारचें हातीं आल्याशिवाय या बाबतींत सुधारणा होणें शक्य नव्हतें. ही स्थिति सुधारण्याकरितां १८७० सालीं लॉर्ड मेयोनें व १८७४ सालीं लॉर्ड लिटननें राजपुतान्यांतील सर्व मिठागारें आपल्या ताब्यांत घेतली. १८८२ सालीं लॉर्ड रिपननें सर्व संस्थानिकाबरोबर करार करून, सर्व मिठागारें इंग्रज सरकारचें ताब्यांत घेतली § व सर्व हिंदुस्थानांत कराचा दर एकसारखा केला. या नंतर या कराच्या दरांत वेळोवेळीं फेरफार करण्यांत आल्याचें प्रसिद्धच आहे. १८८९ सालीं कराचें प्रमाण पूर्वी जें २ रुपये होतें तें २॥ करण्यांत आलें. परंतु पुढें १९०३ सालीं हें प्रमाण पुनः पूर्ववत करण्यांत येऊन १९०७ सालीं ते १॥ रुपयांनीं कमी करण्यांत आलें. या वेळेपासून दहा वर्षेपर्यंत हा कर दरमणीं १

---

‡ 'The line was guarded by an army of nearly 13,000 men and consisted along a large part of it a course of a huge cactus hedge supplemented by stone walls and ditches ' [ Imperial Gazetter vol IV. ]

§ यामुळें संस्थानिकांचें पुष्कळ नुकसान झालें आहे, असें अनुभवातां म्हणायास कांहीं हरकत नाहीं. श्री. गायकवाड सरकारच्या राज्यांत द्वारकेस मिठाची पुष्कळ पैदास होते. परंतु तें तेथून बाहेर नेण्याची परवानगी नसल्यामुळें त्यांचें बरेंच नुकसान होतें !

रुपया होता. परंतु महायुद्धानें वाढलेला खर्च भागविण्या करितां १९१६ त तो ४ आण्यांनीं वाढविण्यांत आला. १९२२ सालीं तो दुप्पट करण्याचा सरकारनें प्रयत्न करून पाहिला. परंतु वरिष्ट कायदे मंडळाच्या सभासदानीं त्यास कसून विरोध केल्यामुळें सरकारनें माघार घेतली. त्या नंतर सरकार हा कर वाढविण्याच्या पुनः फंदास पडणार नाहीं अशी पुष्कळांची अटकळ होती, परंतु दुर्दैवानें ती खरी ठरली नाहीं. कारण यंदा सरकारनें ४ कोटींची तूट भरून काढण्याकरितां मिठावरील कर दुप्पट करण्याचा प्रयत्न करून पाहिला, परंतु गतवर्षीप्रमाणेंच वरिष्ट कायदेमंडळानें करवाढीचें बिल दोनदां नापास केलें. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, व्हाइसराय साहेबांनीं आपलें जादा अधिकार वापरून या करवाढीच्या बिलास आपली संमति दिली !

**११७. मिठावरील कर व लोकमतः**--हा कर गोरगरिबांना अत्यंत त्रासदायक होतो हें माहीत असतांनाहि सरकारनें अन्यायानें तो बसविला आहे. त्याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं, या कराचें उत्पन्न खात्रीचें आहे. गरिब जनतेकडून कराच्या रूपानें कोठेंहि पैसा मिळणें शक्य नसतें. म्हणून मिठासारख्या नित्योपयोगी वस्तूंवर कर बसविल्यास राष्ट्राच्या खर्चाचा हिस्सा तिच्याकडून अप्रत्यक्षपणें वसूल होतो व म्हणून मिठावरिल कर न्याय्य आहे असें सरकाराचें म्हणणें आहे. सरकारी चष्म्यांतून पहाणारांस कदाचित् हा कर न्याय्य वाटेल पण अर्थशास्त्राच्या कोणत्याही कसोटीस तो उतरत नाहीं, असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. जीविताच्या अवश्यकावर कर बसवूं नये असें अर्थशास्त्रज्ञांचें मत आहे. "कारण अवश्यकांत ही वस्तू गरिबांना व श्रीमंतांना सारखीच जरूर असल्यामुळें हा कर गरीबश्रीमंतांवर सारखाच पडतो, म्हणजे तो समतेच्या तत्वाविरुद्ध जातो हें उघड आहे. शिवाय या करामुळें हिंदुस्थानांत शास्त्रीय दृष्टीनें आरोग्याला जितकें मीठ खाणें अवश्य आहे तितकें मीठ घेण्याइतकें सामर्थ्य गरीब लोकांत नसल्यामुळें हा कर प्रजेच्या आरोग्याच्या दृष्टीनें अहितकारक आहे." म्हणूनच एका प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञानें **'ब्रिटिश राजनीतिवरील काळाकुट्ट डाग'** असें या करास संबोधिलें आहे.

**११८ प्राप्तीवरील करः**-प्राप्तीवरील करासारखें प्रत्यक्ष कर इंग्रज सरकारनेंच प्रथम बसविले असें नाहीं. पूर्वी देशी राजांच्या कारकीर्दीतही मोहतर्फा * व सायरबाब यासारखे कर असत बंडामुळें कर्ज फार झालें व खर्च फार वाढला, तेव्हां जमाखर्चाची तोंड मिळवणी करण्याकरितां हिंदुस्थान सरकारचें पहिलें फडणीस मि. वुइल्सन यांनीं प्राप्तीवर कर बसविण्याचें ठरविलें. हा कर नवा नसून जुनाच आहे व तो अन्यायाचा नाहीं, हें दाखविण्याकरितां त्यांनीं हिंदुधर्मशास्त्रांतील आधार घेतलें होते, ‡ मनुस्मृती मध्यें सातव्या अध्यायांत करांविषयीं खालील माहिती सांपडते. **मनु ह्मणतोः**--

क्रयविक्रयमध्वानं भक्तं च सपरिव्ययम् ।
योगक्षेमं च संप्रेक्ष्य वणिजो दापयत्करान् ॥
पंचाशद्भाग आदेयो राज्ञा पशु हिरण्ययोः ।
धान्यानामष्टमो भागः षष्ठो द्वादश एव वा ॥
आददीतीथं षड्भागं द्रुमांसमधुसर्पिषाम् ।
गंधौषधिरसानां च पुष्पमूलफलस्य च ॥

---

* दुकानदार व कारागीर यांच्यावरील कर,

‡ The revenue consists of a share of grain and of all other agricultural produce; a very small annual imposition on the petty traders and shopkeepers and a forced service of a day in each month by handycraftsmen. The merchants are to be taxed on a consideration of the prime cost of their commodities, the expenses of travelling and their net profits. The following are the rates of taxation ; on cattle, gems, gold and silver added each year to the capital stock one fiftieth which in time of war or invasion may be increased to one twentieth. On grain one twelth, one eighth one sixth according to the soil and labour necessary to cultivate it ........ On the clear anunal increase of trees, fresh meat, honey, perfumes and several productions and manufactures, one sixth.—SIXTY YEARS OF INDIAN FINANCE. pp.212.

पत्रशाकतृणानां च चर्मणां वैदलस्य च ।
मृन्मयानां च भाण्डानां सर्वस्याश्ममयस्य च ॥
कारुकान् शिल्पिनश्चैव शूद्रांश्चात्मोपजीविनः ।
एकैकं कारयेत्कर्म मासि मासि महीपतिः ॥
यथा फलेन युज्येत राजा कर्ता च कर्मणाम् ।
तथाऽवेक्ष्य नृपो राष्ट्रे कल्पयेत्सततं करान् ॥
यथाल्पाल्पमदन्त्याद्यं वार्योकोवत्सषट्पदाः ।
तथाल्पाल्पो ग्रहीतव्यो राष्ट्राद्राज्ञाऽब्दिकःकरः ॥

या श्लोकांवरून कर कोणांवर कोणत्या प्रमाणांत बसवावें हें कळून येईल, या श्लोकाधारें मि. विल्सन यांनीं प्राप्तीवरील कराचें मंडण करून स. १८६० सालीं वार्षिक २०० रुपायांवरील उत्पन्नावर पांचवर्षांपुरतां कर बसविला. जमीनदार लोक सान्याच्या रूपानें कर देत असल्यामुळें त्यांच्यावर हा कर लादण्यांत आला नाहीं. या नंतर दरांत वेळोवेळीं फेरफार करण्यांत आला. परंतु पुढें दुष्काळ पडून तिजोरींत ठणठणाट झाल्यामुळें १८७८ सालीं धंदे व व्यापार यांपासून होणारे प्राप्तीवर पुनः कर बसविण्यांत आला, व पुढें १८८६ सालीं शेतकी शिवाय सर्व प्रकारचें प्राप्तीवर तो बसविला. या वेळे-पासून हा कर जमेची नेहमींची बाब असें समजतात व त्यामुळें ज्या ज्या वेळीं हिंदी तिजोरीस खिंडार पडे त्या त्या वेळीं तो वाढविण्यांत येई. १९१६ सालीं व १९२२ सालीं जमेंत भयंकर तूट आल्यामुळें ह्या कराचा दर वाढविण्यांत आला होता. हल्लीं २ हजार रुपयांवरील उत्पन्नावर रुपायास ५ पै, ५ हजार रुपयांवरील उत्पन्नावर ६ पै, १० हजारांवरील उत्पन्नावर १ आणा, ३० हजारांवरील उत्पन्नावर १। आणा व ४० हजार उत्पन्नावर १॥ आणा प्रमाणें हा कर घेण्यांत येतो.

**११९ जकात**—जकात दोन प्रकारची असते, पहिलीं आयात मालावरील, व दुसरी निर्यात मालावरील. हिंदुस्थानसरकारास जकातीपासून जें उत्पन्न मिळतें तें बहुधां पहिल्या प्रकारांपासूनच मिळतें. बंडापूर्वी आयात मालावर शेंकडा ५ टक्के जकात आकारण्यांत येई. परंतु १८५९ सालीं निरनिराळया जकाती होत्या

त्या काढून टाकण्यांत आल्या व तंबाकू, दारु यांसारख्या ऐषआरामाच्या व चैनीच्या पदार्थांवर शेंकडा २० प्रमाणें व इतर पदार्थांवर शेंकडा १० प्रमाणें जकात बसविण्यांत आली. १८६४ सालीं सर्व साधारण सगळ्याच आयात जकाती शेंकडा १० च्या शेंकडा ७॥ करण्यांत आल्या. पुढें १८६७ सालीं कांहीं पदार्थांवरील जकाती काढून टाकण्यांत येऊन कांहीं कालानंतर जकातींचें धोरण ठरविण्याकरितां एक कमेटी नेमण्यांत आली. कमेटीच्या शिफारशीप्रमाणें सरकारनें जकातीचा दर एकदम उतरवून पांच टक्के केला. त्या सालचे कायद्याप्रमाणें सुता वर ३॥ टक्के व लोखंड व रेल्वेचें सामान यांवर शेंकडा एक प्रमाणें दस्तुरी घेण्याचें ठरलें. १८७५ सालांपासून पुढील २५ वर्षेपर्यंत हिंदुस्थानच्या आर्थिक धोरणाची एकसारखी ओढाताण होत होती. या काळांत मुक्तद्वारवादी ( Free Traders ) व संरक्षण वादी ( Protectionist ) यांच्यामधील भांडणास चांगलाच रंग भरत आला होता. यापैकीं मुक्तव्दारवाद्यांचें ह्मणणें असें कीं ज्या देशांत जो माल उत्तम होईल तो बाहेर पाठवून बाहेरून जो पाहिजे असेल तो माल आणण्याची पूर्ण स्वतंत्रता असावी. आयात जकातीसारखीं कृत्रिम बंधनें त्यावर असूं नयेत.परदेशांतून आपले देशांत जो माल येतो तो येऊं देऊं नये,त्या मालावर जबर जकाती बसवून, अथवा तो न येण्याविषयीं कडक कायदे करून तो आपले देशांत येण्याचें बिलकूल अथवा अंशतः बंद करून टाकावें. बाहेरून माल येण्याचे बंद झालें म्हणजे अर्थात् तो आपले देशांत तयार होईल व त्यामुळें आपल्या देशांतील व्यापारांस उत्तेजन मिळून तो भरभराटीस येईल. परदेशाचा माल आपले देशांत येऊं दिल्यानें, सगळ्या देशाचें अपरिमित नुकसान होतें. सबब अनेक उपयांनीं तो येण्याचें बंद करून आपलेंच देशांत तो उत्पन्न करावा असें संरक्षणवादी लोकांचें म्हणणें होतें. यांत अखेर खुला व्यापार असावा असें ह्मणणाऱ्यांचा विजय होऊन त्यांनीं हिंदुस्थानच्या फायद्यांकडे दुर्लक्ष करून हिंदुस्थानास खुल्या व्यापाराचें तत्व हिंदी लोकांच्या इच्छे विरुद्ध लागू केलें. इंग्लंडांत मुक्तव्दारवाद्यांचा जय होणें अपरिहार्यच होतें. कारण जे जे धंदे निघण्यासारखे होते ते बहुतेक धंदे तेथें सुरू होऊन देश भरभराटीस आल्यामुळें

अप्रतिबंधक व्यापारांखेरीज इंग्लंडला तरणोपायच नव्हता. आतां इंग्लंड गबर झाल्यामुळें ' **परोपदेशे पांडित्यं** ' या न्यायानें गरिब बिचाऱ्या हिंदू-लोकांस उपदेश करण्यांस त्यास कांहीं हरकत उरली नाहीं. आणि त्यांत आपण जेते आहोत, आपण वांकवूं तसें हिंदुस्थाननें वांकलें पाहिजे अशी त्यावेळीं इंग्लंडची समजूत असल्यामुळें, इंग्लंडनें जबरीनें मुक्तद्वारापद्धतीचें खोगीर हिंदु-स्थानांवर चढविलें यावेळेपासून हिंदुस्थानची ' **कायदेशीर लूट** ' व्हावयास सुरवात झाली ! निष्प्रतिबंधवाद्यांचा इंग्लंडांत जय झाल्यामुळें हिंदुस्थानावरहि त्यांची संक्रांत बसली. याच सुमारास हिंदुस्थानांत बऱ्याच गिरण्या उघडण्याचा संभव दिसून आल्यावरून लँकेशायरच्या कारखानदारांनीं आयात जकातीविरुद्ध एकच गिल्ला केला. याचा योग्य तो परिणाम अधिकारी वर्गावर होऊन डयूक ऑफ अरगाइल यांनीं आयातमालावरील जकात कमी करावी अशी हिंदुस्थान-सरकारास शिफारस केली. परंतु त्यावेळचे व्हॉइसरॉय लॉर्ड नॉर्थब्रुक यांस ही सूचना न पटल्यामुळें ती अमलांत आणण्याचें त्यांनीं साफ नाकारलें. यामुळें त्यांना व्हाइसरॉयच्या पदांवर पाणी सोडावें लागलें. त्यांच्या नंतर लॉर्ड लिटनसाहेब अधिकारारूढ झालें व त्यांनीं आपले जादा अधिकार वापरून चुटकीसरशीं ३० नंबरापर्यंतच्या सर्व सुती कापडांवरील आयात जकात रद्द करून हिंदुस्थानचें २० लाखांचें उत्पन्न बुडविलें. हिंदुस्थानास आयात जकाती-पासून जें उत्पन्न होतें त्यांतील ५० टक्के कापडांवरील जकातीमुळें होतें. परंतु वरसांगितल्याप्रमाणें कापडावरील जकात रद्द केल्यामुळें इतर किरकोळ जकाती ठेवण्यांत कांहींच अर्थ नव्हता. म्हणून १८८२ सालीं लॉर्ड रिपन यांनीं बाकी राहीलेल्या पेट्रोल शिवायच्या सर्व जकाती उठवून हिंदुस्थानास खुल्या व्यापाराचें तत्व पूर्णपणें लागूं केलें. यामुळें परदेशी व्यापाऱ्यांस आपला माल येथील व्यापा-ऱ्यांशीं चढाओढीनें खपविण्याची चांगलीच संधी मिळून येथील व्यापार बाल्या-वस्थेंत असल्यामुळें तो ऊर्जितावस्थेस येऊं शकला नाहीं. हें खुल्या व्यापाराचें धोरण हिंदुस्थान सरकारच्या खजिन्यांस १८९० सालीं १६८ लाखांचें मोठें खिंडार पडेतोंपर्यंत म्हणजे तहत बारा वर्षेपर्यंत चालू होतें. यासालीं ही

तूट भरून काढण्याकरितां कापडाशिवाय इतर मालावर शेंकडा ५ टक्के जकात पुनः वसूल करण्यांत येऊं लागली. यामुळें १२० लाखांची तूट भरून येऊन ५० लाखांची तूट राहिली. इंग्लिश व्यापाऱ्यांच्या आग्रहास्तव कापडांवर जकात लादण्याची हिंदुस्थानसरकारने टाळाटाळ केल्यामुळें ही तूट आली व ती त्याच वर्षाच्या अखेरीस एक कोटी पर्यंत वाढली. अशा स्थितींत कापडांवर जकात बसविण्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. ह्मणून कापडावर पूर्वी प्रमाणें शेंकडा ५ टक्के जकात बसवून त्याबरोबरच हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांना संरक्षणाचा फायदा मिळू नये ह्मणून देशी कापडावरहि तितकीच नवी जकात बसविण्यांत आली तरीही इंग्रजी व्यापाऱ्यांचें समाधान झालें नाहीं. त्यांना जकातीचा दर यांहून कमी हवा होता, म्हणून त्यांची समजूत करण्याकरितां १८९६ सालीं दोहोंवरील जकातीचा दर ३॥ टक्के करण्यांत आला. या नवीन व्यवस्थेमुळें इंग्लंडच्या व्यापाऱ्यांचा फायदा होऊन हिंदुस्थानच्या डोक्यावरील कराचा बोजा वाढला. त्यामुळें ज्या इंग्रज व्यापाऱ्यांचें हिंदुस्थानांतील गिरण्यांत हितसंबंध गुंतले होते त्यांनीं यास कसून विरोध केला. " या व्यापाऱ्यांपैकीं एक मि. फ्रेंफेअर यांनीं व्हाइसरायास असा प्रश्न विचारला कीं, लँकेशायरवाले असंतुष्ट होतात ह्मणून सरकारनें येथील धंदे बुडवावें काय ? हिंदुस्थानास एवढाहि स्वतंत्रपणें जगण्याचा हक्क असूं नये"? (स्व. कै. ) लोकमतास धाब्यावर बसवून हिंदुस्थानसरकारनें हें धोरण १९१६ सालापर्यंत मोठ्या दृढ निश्चयानें चालू ठेविलें. परंतु या वर्षी महायुद्धामुळें हिंदुस्थान सरकारचा खर्च बेसुमार वाढल्यामुळें टॅरिफ अॅक्टामध्यें महत्वाची सुधारणा होऊन कापसावरील आयात जकातीचा दर शेंकडा ७॥ टक्के करण्यांत आला. नवीन सुधारणा अंमलांत येतांच १९२१ सालीं इतर आयात जकातीबरोबर कापडावरील जकातही शेंकडा ११॥ टक्के करण्यांत आली. परंतु देशी मालावरील दरांत वाढ न केल्यामुळें लँकेशायरवाल्यांना फार राग आला व ते एक डेप्युटेशन घेऊन माजी भारतमंत्री मि. मॉंटेग्यू यांच्याकडे फणफणत गेले. परंतु मांटेग्यूंनीं संयुक्त कमेटीच्या अभिप्राया

कडे* बोट दाखवून त्यांची बोळवण केली. १९२२ सालीं हिंदुस्थानसरकारच्या जकात विषयक धोरणाचा **सर्व हितसंबंधास अनुलक्षून** विचार करण्या-करितां तसेंच सवलतीच्या जकातीच्या तत्वाच्या युक्ततेचा विचार करून शिफा-रस करण्याकरितां सर इब्राहिम रहिमतुल्ला यांच्या अध्यक्षते खालीं एक कमि-शन नेमलें होतें. त्याचा रिपोर्ट नुक्ताच प्रसिद्ध झाला आहे. या कमिशनच्या सूचनेस अनुसरून हिंदुस्थानसरकारनें संरक्षक जकातीचें तत्व अंगिकारावें व हिंदी उद्योग धंद्यास उत्तेजन द्यावें असा ठराव जमनादास द्वारकादास यांनीं यंदा वरिष्ठ कायदेमंडळापुढें आणला होता. परंतु उद्योग मंत्री मि. इन्स यांनीं ठरा-वास संरक्षणाचें तत्व अंमलांत आणण्याकरितां तूर्त एक वर्षाच्या मुदतीनें एक टॅरिफ बोर्ड नेमावें व या बोर्डानें संरक्षक जकातीचें प्रमाण सारासार विचा-रपूर्वक ठरवावें, अशा आशयाची उपसूचना आणली व ती अखेर पास झाली. सरकारी लहरीच्या कांटेरी कुंपणाच्या आंत संरक्षक जकातीचें रोपटें लावण्यास परवानगी मिळाल्यामुळें खुल्या व्यापाराचा जुना मनु संपून संरक्षक पद्धतीचा नवा मनु सुरू झाला आहे, असें म्हणण्यास आतां हरकत नाहीं.

१२० अफू आतां अफूविषयीं. अफू हा एक प्रकारचा मादक व विषारी पदार्थ असल्यामुळें त्याची लागवड करणें, विक्री करणें,व तो देशाबाहेर पाठविणें, हीं सर्व कामें करण्याचा मक्ता सरकारनें आपल्या कडेंच ठेवला आहे. अफूची लागवड माळव्यांतील संस्थानांत व संयुक्त प्रांत व बिहार प्रांतांत होते. पंजाबांतहि स्थानिक उपयोगाकरितां थोड्या प्रमाणांत अफूची लागवड केली जाते. माळ-व्यांतील अफूची लागवड संस्थानिकांचे देखरेखीखालीं होते व ती इंग्रजी मुलुखांत

---

* "आपल्या उद्योगधंद्याची भरभराट कशाप्रकारें होईल व प्रजेच्या गरजा कोणत्या रीतीनें भागवितां येतील, हें ठरविण्याचा हक्क इंग्लंड, आस्ट्रेलिया, न्यूझीलंड, कानडा व दक्षिण आफ्रिका या देशांप्रमाणें हिंदुस्थानासही असला पाहिजे. म्हणून या बाबतींत हिंदुस्थान सरकार आपल्या कायदे मंडळाच्या संम-तीनें जें आर्थिक धोरण ठरवील त्यांत भारतमंत्र्यानें विनाकारण ढवळाढवळ करूं नये."

आणतेवेळीं तिच्यावर जबर कर आकारण्यांत येतो. ब्रिटिश मुलुखांत जी अफू तयार होते ती वापरण्यालायक तयार करण्याचा गाझीपूर येथें एक कारखाना आहे-ती सारख्या आकाराच्या व वजनाच्या पेट्यांत भरून कलकत्ता मुक्कामीं लिलावानें विकली जाते. हिंदुस्थानच्या उपयोगाकरितां यांतील कांहीं अफू राखून ठेवण्यांत येते व ती फक्त डॉक्टर व मक्तेदार यांसच विकण्यांत येते.

आजमितीस अफूपासून जें उत्पन्न सरकारच्या पदरांत पडतें तें तीन मार्गांनीं येतें. ( १ ) हिंदुस्थानांत विकल्या जाणाऱ्या अफूवरील कराचें उत्पन्न ( २ ) परदेशांत जाणाऱ्या अफूवरील करांपासून होणारें उत्पन्न (३) माळवा अफूवरील कराचें उत्पन्न. यांपैकीं दुसऱ्या मार्गानेंच ज्यास्त पैसा तिजोरींत येऊन पडतो. आजवर जी अफू बाहेर जाई ती बहुतेक चीन देशांत जात असे. कारण चिनी लोकांत हें व्यसन फारच बोकाळलें आहे. यामुळें तेथें हिचा खप होई. ती तेथून तिकडे पाठवितेवेळीं सरकारांकडून तीवर निर्यात कर आकारण्यांत येतो. अप्रत्यक्षपणें हा कर चिनी लोकांसच द्यावा लागतो. परंतु अलीकडे चिनी लोकांना हें व्यसन स्वतःचीं नैतिक अधोगति करणारें आहे असें पटलें असून, त्यांनीं या व्यसनाचें तावडींतून सुटण्याकरितां एकसारखी धडपड चालविली आहे. याकामीं त्यांस हिंदी लोकांची पूर्ण सहानुभूति आहे असें पाहून हिंदुस्थानसरकारनें १९०७ सालीं चीनसरकारशीं एक करारनामा करून दहा वर्षांत अफूचा व्यापार कमी करण्याचें कबूल केलें. उलट चीन सरकारनेंही कायदा करून अफूच्या खपाचें नियंत्रण केलें. १९१७ सालापर्यंत हिंदुस्थानांतून चीनांत अफू जात होती. परंतु या करारांमुळें पुढें ती जाण्याचें बंद झालें. यामुळें हिंदुस्थानचें आर्थिक दृष्ट्या किती नुकसान झालें आहे, हें खालील आंकड्यावरून कळेल.

| साल. | उत्पन्न रुपये. | साल. | उत्पन्न रुपये. |
|---|---|---|---|
| १८८०-८१ | १,०४,१८,०८१ | १९१२-१३ | ५१,२५,५९२ |
| १८९०-९१ | ८०,१२,३८० | १९२५-१६ | १९,१३,५१४ |
| १९००-०१ | ५१,०२,२४२ | १९१९-२० | ३०,५६,२०० |
| १९१०-११ | ७५,२१,९६२ | १९१७-१८ | ३०,७८,९०३ |

१२१ अबकारी—या सदराखालीं देशी व विदेशी दारु व इतर निशेची मादक द्रव्यें मोडतात. यांच्या खपास आळा घालण्याकरितां म्हणून सरकारनें यांवर जबर कर बसविला आहे. इंग्रजांच्या अमदानीत मद्यपानाची संवय लोकांत फारच बळावली असल्यामुळें या बाबीपासून सरकारास फार मोठें उत्पन्न होतेंत म्हणूनच ही जमेची बाब हातची घालविण्यास सरकार तयार नाहीं. इंग्रजी अमलापूर्वी येथें अबकारी खातें फक्त नांवाचें होतें. दारूपासून सरकारास तादृश उत्पन्न मिळत नसे. पेशवाईत या खात्याची प्रवृत्ति दारुची निपज कमी करण्याकडे होती. हल्लीं मात्र निराळी प्रवृत्ति दिसून येतें. सरकार जरी या खात्याची योजना मद्यपान प्रतिबंधार्थच झाली असें सांगते, तरी त्यांवर जनतेचा विश्वास बसणें शक्य नाहीं. कारण इंग्रजी अमलांपूर्वी ज्या खात्याचें उत्पन्न दहा हजार रुपये सुद्धां नव्हतें, त्याच खात्याची जमाबंदी हल्लीं बारा कोटीवर झाली असून ती दिवसें-दिवस वाढत आहे. हे खालील आंकड्यांवरून कळून येईल:—

| वर्ष | निवळ उत्पन्न (आंकडे पौंडांत आहेत.) | वर्ष | निवळ उत्पन्न (आंकडे पौंडांत आहेत) |
|---|---|---|---|
| १८६१–६२ | १,७८६,१७५ | १९११–१२ | ७,१९०,५०० |
| १८८१–८२ | ३,३४०,३३८ | १९१६–१७ | ८,७३७,२६७ |
| १९०१–०२ | ३,९१०,५२६ | १९२०–२१ | १२,९४८,००० |

या आकड्यांवरून मद्यपानाचें व्यसन दिवसेंदिवस इकडे किती बोकाळत आहे, हें कळून येईल. हें वाढतें उत्पन्न मद्यपानप्रसाराचें द्योतक नसून आमच्या शहाणपणाचें द्योतक आहे असें सरकारचे म्हणणें आहे. अबकारी खात्यांत शक्य तितकी काटकसर करून खर्च कमी करण्यांत आला आहे. त्यामुळें अवांतर उधळपट्टीस जागा राहिली नसून परवान्याच्या फींत वाढ झाली असल्यामुळें व व्यापारधंद्याच्या भरभराटीमुळें ह्या उत्पन्नांत वाढ होते असा कोटिक्रमहि कोणी करतात. परंतु त्यावर कितपत विश्वास ठेवावा हा प्रश्नच आहे! मद्यपानास कायद्यानें प्रतिबंध करून या उत्पन्नांवर अजिबाद पाणी सोडावें अशी जनतेची इच्छा आहे. कारण लोकांना व्यसनांच्या गर्तेंत लोटून होणाऱ्या उत्पन्नानें आपली उन्नति

व्हावी असी तिची इच्छा नाहीं. याकरितां तिनें आज बरींच वर्षें खटपट चालविली असून सरकारनें पुढें मागें केंव्हा तरी, आपण या उत्पन्नांवर पाणी सोडूं असें अभिवचन दिलें आहे. नवीन सुधारणाअन्वयें ह्या खात्याचा सोपीव खात्यांत समावेश करण्यांत आला असल्यामुळें तें लोकप्रतिनिधींच्या ताब्यांत आलें आहे. परंतु राखीव खात्याचें खर्चास आळा बसल्यावांचून याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. तरी आज नाहीं उद्यां या खात्यांत इष्ट त्या सुधारणा झाल्यावाचून कधींही राहणार नाहींत.

१२२ **जंगलें**—इमारतीचें लांकूड व जंगलांत उत्पन्न होणारे इतर पदार्थ यांच्या विक्रीपासून सरकारास अडीच ते तीन कोटी रुपये उत्पन्न मिळतें. ही बाब येथें अगदीं नवी आहे असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. पूर्वी हल्लींच्या फॉरेस्ट खात्यासारखीं खातीं बिलकुल नव्हतीं व त्यामुळें या खात्यांपासून रयतेस सध्यां जें हाल सोसावे लागतात तेही सोसावें लागत नसत. राज्यांतील जंगलावर तेंव्हां जरी राजाची मालकी होती तरी त्यांतील वस्तू वाटेल त्यास नेण्याची परवानगी असे. हल्लीं यःकश्चित् झाडाचीं पानें तोडण्यास जशी सरकारची परवानगी लागते तशी त्यावेळीं लागत नसे. हल्लीं जंगलाचा उपयोग व महत्व ओळखून सरकारनें तीं आपल्या ताब्यांत घेतलीं असून त्यांची निगा राखण्याकडे त्यांची प्रवृत्ति दिसून येते. परंतु पूर्वी जंगलें राखून न ठेवितां त्यांचा शेती व इतर कामासाठीं उपयोग करण्यांत येत असे. कंपनी सरकारास ही स्थिती परिणामीं अहितकर वाटल्यामुळें कोर्ट ऑफ डायरेक्टरांनीं १८४२ सालीं जंगलें राखून ठेवावींत अशी शिफारस केली. सागवानाचें एक झाड तोडलें, कीं, त्याच्या जागीं पांच नवीन झाडें लावावीं अशा आशयाचा एक ठराव कोर्ट ऑफ डायरेक्टरांनीं केल्याचें प्रसिद्ध आहे. परंतु काय असेल तें असो, हा ठराव एक तपापर्यंत कागदावरच राहिला. पुढें १८५५ सालीं लॉर्ड डलहौसीनें जंगलांचें महत्व ओळखून जंगल खात्याचा पाया घातला. त्यानें जंगलें राखून ठेवावीत अशा आशयाचे प्रांतिक सरकारांस हुकूम सोडले. परंतु पुढें १८५७ सालीं बंडाचा वणवा पेटल्यामुळें जंगल खात्यांत इष्ट ती कोणतीही सुधारणा झाली नाहीं. परंतु १८६० सालीं मात्र

या खात्याकडें सरकारनें लक्ष पुरवून ही एक फायद्याची बाब कशी होईल, या-दृष्टीनें प्रयत्न करण्यास सुरवात केली. जंगलांची हद्दबंदी करणें (Demarcation) मोजणी करून नकाशे तयार करणें, जंगल खात्याच्या कामगारांसाठीं घरें व इन्सपेक्शन बंगले बांधणें, मालाच्या निकासासाठीं सडका व रस्ते तयार करणें, नवीन लागवडीसाठीं जागजागीं रोप्यांचे बाग ( Forest Nerseries ) तयार करणें,नवीन कामाचे बेत (Working Plans) करणें,वगैरे कामांस या-वेळेंपासून सुरवात झाली. हीं कामें करण्याकरितां अरण्यशास्त्र (Sylviculture) शिकलेले लोक आरंभीं न मिळाल्यामुळे जर्मनी व फ्रान्स मधून तच्छास्त्रभिज्ञ लोकांना आणवून त्यांच्याकडून हीं कामें करून घेण्यांत आलीं. १८८० सालीं डेहराडून येथें हा विषय शिकविण्याकरितां एक शाळा काढण्यांत आल्यामुळें हें शास्त्र शिकलेले लोक मिळण्याची अडचण दूर होऊन उमेदवारांना शिक्षण घेण्या-साठीं विलायतेस पाठविण्याचा खर्चहि वांचला. थोड्यावर्षांपूर्वीं जंगल खात्याच्या कांहीं प्रमुख चालकांच्या मतास अनुसरून डेहराडून येथें एक मोठी शाळा ( Forest Research Institute ) सरकारनें स्थापन केली असून त्यांत वनस्पति, प्राणी, रसायन व अर्थशास्त्रविषयक प्रयोगांचें काम तज्ज्ञ लोक आज दहावर्षांपासून करीत आहेत. हे व अशाच तऱ्हेचें दुसरें प्रयत्न आजतागाईत अव्याहतपणें चालू असून यापुढेंही ते चालतील असा अंदाज आहे. या प्रयत्नांना अजून जरी म्हणण्यासारखें दृश्य फळ आलें नसलें, तरी त्यांपासून हिंदुस्थानचें झालें तर कल्याणच होईल, तोटा होणार नाहीं, असें आमचें मत आहे परंतु ही एक फायद्याची बाब होण्याकरितां सरकारच्या हल्लींच्या आर्थिक धोरणांत आमूलाग्र फरक घडून आले पाहिजेत, हेंही येथें सांगणें जरूर आहे. कारण हल्लींच्या धोर-णामुळें येथील नैसर्गिक संपत्तीचा लाभ लोकांस कांहींच करून घेतां येत नाहीं!

हिंदुस्थानच्या क्षेत्रफळाचा चौथा हिस्सा फॉरेस्ट खात्यानें व्यापलेला आहे. या प्रदेशाचे 'राखून ठेवलेलीं', ' संरक्षण केलेलीं ' व गांवकीची जंगलें असे तीन वर्ग केले आहेत. यांतील पहिले दोन वर्ग उत्पादक असून हिंदुस्थान सरकारास त्यांच्यापासून बरेंच उत्पन्न मिळतें. तिसरा वर्ग जवळ जवळ अनुत्पादक आहे

म्हटलें तरी चालेल. या उत्पन्नाच्या बाबी म्हटल्या म्हणजे ( १ ) रासायनिक द्रव्यें लांकडांत मुरवून टिकाऊ केलेलीं लांकडें ( २ ) ओव्याचा अर्क ( ३ ) टरपेंटाईन व राळ ( ४ ) रबर ( ५ ) गोंद अथवा डिंक ( ६ ) कागदाचा मसाला* ( ७ ) आगकाड्याच्या पेट्यास लागणारे लांकुड, वगैरें होत. याशिवाय इतर अनेक बाबींपासून उत्पन्न होणारें असून त्यांचा येथें नुसता निर्देश करूं म्हटलें तर एक स्वतंत्र ग्रंथच होईल यामुळें त्यांतील प्रमुख बाबींचा नुसता उल्लेख करूनच येथें भागवावें लागत आहे. गेल्या तीस वर्षांत जंगलांचें उत्पन्न किती वाढलें हें खालील पंच वार्षिक आंकड्यांवरून कळून येईल:—

(आंकडें लाखांचें आहेत.)

| वर्ष. | उत्पन्न रुपये. | वर्ष. | उत्पन्न रुपये. |
|---|---|---|---|
| १८९४-९५ ते १८९८-९९ | ४४·७ | १९०९-१० ते १९१३-१४ | १२२·३ |
| १८९९-१९०० ते १९०३-०४ | ८३·९ | १९१४-१५ ते १९१८-१९ | १६०·२ |
| १९०४-०५ ते १९०८-०९ | ११६·० | | |

सन १९१९–२० सालांत निवळ उत्पन्न २,१९,५२,५४० रुपये झालें, तेंच पुढील वर्षी एकंदर उत्पन्न ५,४१,४३,४९२ रुपये येऊन त्यांतील १,५१,७३, ८०७ रुपये खर्च झाला. म्हणजे निव्वळ नफा ३,६४,१९,९०७ रुपये राहिला.

**१२३. जमेच्या इतर किरकोळ बाबी**—आतांपर्यंत उत्पन्नाच्या मुख्य बाबींपैकीं मीठ, जकात, प्राप्तीवरील कर, अफू, अबकारी व जंगलें

---

* १९०४ मध्यें सर्व हिंदुस्थानांत मिळून एकंदर आठ कागदाच्या गिरण्या होत्या व त्यांतून २०,१०० टन कागद दरसाल तयार होई. १९२० सालीं एकंदर नऊ गिरण्या होत्या व त्यांतून त्यावर्षी २९,४०० टन कागद तयार झाला. यापैकीं टिटघार येथील गिरणी फार मोठी असून तीतून १७,९४३ टन कागद दरसाल तयार होतो. हल्लीं येथें ११ गिरण्या चालू असून त्यांचे एकंदर भांडवल ४९॥ लाख रुपयांचें आहे. रासायनिक द्रव्यांच्या अभावीं या गिरण्या हिंदुस्थानास मुबलक कागद पुरवूं शकत नाहींत, ही दुर्दैवाची गोष्ट होय !

यांचा विचार केला. यापुढें जमेच्या इतर किरकोळ बाबींचा ( स्टॅम्प, नोंदणी, पोस्ट व तारखातें, संस्थानिकांची खंडणी वगैरे ) विचार करणें जरूर आहे.

**स्टॅम्प**—न्यायखात्यांत कोर्ट फीच्या रूपानें न्यायावर जो जबरदस्त कर बसविला आहे, त्यांपासून सरकारास दरसाल बरेंच उत्पन्न मिळतें इतकें कीं, त्याच्यावरच दिवाणी आणि फौजदारी न्यायखात्यांचा सर्व खर्च भागतो! दिवाणी कोर्टांत वापरण्यांत येणाऱ्या तिकिटांचे दर १८७० सालच्या कायद्यानें व व्यापारी खतास जे कागद वापरतात त्यांचे दर १८७९ च्या कायद्यानें ठरविण्यांत आले आहेत. हे दर परवांपर्यंत कायम होतें, परंतु त्यांत नुकतीच वाढ झाली आहे. कोणी या बाबीस न्यायखात्याच्या लाभाचा मोबदला असें म्हणतात, परंतु आमच्या मतें हा एक अप्रत्यक्ष अन्यायाचा जबर कर होय. या जबर करांविषयीं बंगालचे सुप्रसिद्ध माजी सर न्यायाधीश रिचर्ड गार्थ यांनीं सणसणीत टीका केली आहे. रयतेच्या जीवजिंदगीच्या सुरक्षिततेची जबाबदारी सरकारवर असल्यामुळें फौजदारी न्यायाखात्याचा खर्च रयतेवर न पडतां सरकारी तिजोरीतूनच झाला पाहिजे. परंतु दिवाणी पक्षकारांवर दुप्पट कर लादून ह्या खात्याचा खर्च सरकार चालवितें व म्हणून ह्या देशांत मिळणारा न्याय फार महाग मिळतो, असें त्यांचें म्हणणें आहे व तें बरोबर आहे. या बाबतींत १९१६ नवेंबरच्या अंकांत टाइम्सनें एका प्रसिद्ध न्यायाधिशाचें मत उधृत केलें होतें. येथील न्याय किती महाग आहे हें सप्रमाण दाखवून या न्यायाधिशानें लोकांस न्यायमंदिरें उध्वस्त करण्याचा पोक्त सल्ला दिला होता!

**नोंदणी**—ही जमेची किरकोळ बाब आहे. निरनिराळ्या प्रकारचीं जीं खतें सरकारांत नोंदली जातात, त्यांच्या नोंदणावळीपासून सरकारास जें उत्पन्न मिळतें, तें या सदराखालीं येतें.

**पोस्ट व तारखातें**—हें खातें जरी अगदीं अलीकडील असलें, तरी मराठी राज्यांत याचा मागमूस नव्हता असें नाहीं. त्यावेळीं हल्लींप्रमाणें आगगाड्या व तारायंत्रें नव्हतीं. " एवढ्या राज्याचा कारभार किंवा खासगी लोकांचा व्यवहार टपालाची कांहीं व्यवस्था असल्याशिवाय होणें शक्य नव्हतें; व

तशी व्यवस्था होतीहि त्या काळीं बातमीची साधनें हल्लींसारखी सुधारलेली नव्हती तरी बातमी समजून घेण्याची जरूरी किंवा हौस कमी होती असें नाहीं; एवढेंच नव्हें तर, सरकारी डांकेशिवाय खासगी डांकहि चालू असे." ही खासगी डांक ज्या त्या ठिकाणच्या सरकारी कचेरीच्या टपालावरोबर पाठविण्याची थोडी बहुत सोय असे, व त्याकरितां ठराविक आकार घेण्यांत येई. (मराठे व इंग्रज) परंतु हल्लीं जसे टपालाचे स्वतंत्र व व्यवस्थेशीर खातें आहे तसें त्यावेळीं नव्हतें. हल्लींच्या नवीन व्यवस्थेमुळें टपालाचे काम अगदीं स्वल्प झालें आहे या खात्याचा बहुतेक खर्च पोस्टाची तिकिटें व इतर बाबींपासून जें उत्पन्न होतें त्यांतून होतो. हल्लीं अल्प वस्तीच्या खेडें गांवातूनही पोस्ट ऑफिसें निघालीं आहेत. १८९८ सालीं पोस्ट ऑफिसांची संख्या ११,७४२, होती व ४६०,८९९,३४४ पोस्ट-कार्डें धाडण्यांत आली. १९२१ सालीं पोस्ट ऑफिसांची संख्या ७७५४ नें वाढली व पोस्टकार्डादिकांच्या संख्येंत तर किती तरी वाढ झाली आहे.

**खंडणी**—मांडलीक राजांपासून ब्रिटिश सरकारांस जी दरसाल रक्कम मिळते ती या सदरांखालीं येतें.

**१२४ हिंदुस्थानचें राष्ट्रीय कर्ज**:-कंपनीचा कारभार इतर बाबतींत जसा सदोष होता तसा पैशाच्या बाबतींतहि होता: तिचा पैशाचा व्यवहार नेहमीं ओढघस्तीचा असे. काटकसरीचें तिला वावडें असल्यामुळें जमा व खर्चाची तोंड मिळवणी करण्याकरितां नेहमीं कर्ज काढावें लागे. १७९२ सालीं कंपनीला १०॥ कोटी रुपयांचें कर्ज होतें. तें १७९९ च्या सुमारास १५ कोटी झालें. लॉर्ड वेलस्लीच्या कारकीर्दींत निरनिराळ्या लढायांमुळें ह्यांत १६ कोटींची वाढ झाली. पुढें लॉर्ड ऑकलंडच्या कारकीर्दींत झालेल्या अफगाण युद्धामुळें हा कर्जाचा आकडा ६४॥ कोटींपर्यंत वाढत गेला. लॉर्ड एडिंबरो व डलहौसी यांच्या कारकीर्दींत यांत २६ कोटी रुपये कर्जाची नवी भर पडून राणीसरकारनें हिंदुस्थानचा कारभार आपल्या हातीं घेतल्यावेळीं त्यांत २७ कोटींची पुनः वाढ झाली. यावेळीं कंपनीचें सर्व कर्जरोखे व कर्ज हिंदुस्थानच्या राष्ट्रीय कर्जास जोडण्यांत आल्यामुळें कर्जाचा आंकडा ११७

कोटींवर गेला. आतापर्यंत बहुतेक कर्ज रुपयांच्या रूपांत होतें व तें प्राय: हिंदुस्थानांतच उभारलेलें असे. यामुळें व्याजाच्या रूपानें इंग्लंडांत जाणारी रक्कम थोडी होती. परंतु कंपनीचें कर्जरोखे सगळे इंग्लंडांत असल्यामुळें नव्यापद्धतीनें खुद्द इंग्लंडांत जाणाऱ्या व्याजाची रकम १॥ कोटीपर्यंत वाढली. यापुढें थोडीशी काटकसर करण्यांत आली. परंतु पुढें सरकारनें रेल्वेची ग्यारंटी पद्धत सोडून कर्ज काढावयास सुरवात केल्यामुळे कर्जाची रकम कमी होण्याऐवजी एकसारखी वाढतच गेली. त्यांत सरकारनें हें कर्ज विलायतेंतच काढण्याचा सपाटा लावल्यानें व्याजाच्या पायीं हिंदुस्थान टेकीस आलें. १९१४ सालीं हिंदुस्थानास एकंदर ४११ कोटी रुपयाचें कर्ज होतें. या कर्जांतील बराच भाग उत्पादक असल्यामुळें ह्या कर्जाची सरकारानें विशेषशी क्षिति बाळगली नाहीं. अनुत्पादक कर्जापैकीं सरकारनें बराच भाग फेडून टाकला व पुढें जर महायुद्ध उपस्थित झालें नसते तर सरकारनें बहुतेक सर्व कर्ज फेडून टाकलें असते. परंतु युरोपांत महायुद्धाचा वणवा ऐनवेळीं पेटल्यामुळें त्याचा परिणाम हिंदुस्थानच्या तिजोरीवर होऊन हिंदुस्थानचें कर्जही वाढत गेलें.इतकें कीं, १९१८ सालीं हिंदुस्थानच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा ५५८ कोट रुपये झाला या पुढें महायुद्ध संपलें.परंतु हिंदुस्थानास लागलेलें '**पांढऱ्या हत्तीचें**' ग्रहण सुटलें नाहीं. त्यामुळें या कर्जांत एकसारखी वाढच होत जाऊन १९२२ आगस्टच्या सुमारास कर्जाचा आंकडा ५७४ कोटीवर जाऊन बसला.

खालील कोष्टकांवरून हिंदुस्थानच्या राष्ट्रीय कर्जांत वेळोवेळीं कसा चढउतार होत गेला हें कळून येईल:-*

---

* या संबंधीचें आंकडे निरनिराळ्या पुस्तकांत निरनिराळे दिले आहेत. त्यामुळें वाचकांचा बराच घोंटाळा होण्याचा संभव आहे. आम्ही दिलेले आकडे टाइम्सच्या इंडियन इयर बुक वरून दिले आहेत. सरकारी रिपोर्टांशीं ताडून पाहतां ते जमत नाहींत, त्यामुळें त्यांच्या खरेपणा विषयीं खुद्द आम्हांसही शंका येत आहे.

(आंकडे कोटी रुपयांचे आहेत.)

| वर्ष. | अनुत्पादक कर्ज | उत्पादक कर्ज. | | | एकंदर कर्ज. |
|---|---|---|---|---|---|
| | | रेलवे. | पाटबंधारे. | कुल. | |
| ३१ मार्च रोजीं. | | | | | |
| १८९३ | ९७.० | १३६.५ | २८.९ | १६५.४ | २६२.९ |
| १८९८ | १०५.५ | १५९.० | ३२.५ | १९१.५ | २९६.५ |
| १९०३ | ८८.७ | १९२.१ | ३७.२ | २२९.३ | ३१८.० |
| १९१३ | ३७.५ | ३१७.७ | ५६.४ | ३७४.१ | ४११.६ |
| १९१६ | ३.० | ३५१.६ | ६३.६ | ४१५.२ | ४१८.२ |
| १९१९ | १२९.९ | ३६५.५ | ६६.७ | ४३२.२ | ५६२.१ |
| १९२० | ११९.७ | ३७८.६ | ६७.५ | ४४६.१ | ५६५.८ |
| १९२१ | १३.७ | ३७७.४ | ६८.८ | ४४६.२ | ४७७.९ |

**१२१. पार्लमेंटचें नियंत्रण**-हिंदुस्थान हें राष्ट्र जरी इंग्लंडनें जिंकलें आहे असें मानण्यांत येतें तरी या देशाला सार्वभौमसत्तेबद्दल प्रत्यक्ष अशी खंडणी हिंदुस्थानास द्यावी लागत नाहीं. हिंदुस्थानांतलें सर्व उत्पन्न हिंदुस्थानामध्येंच व हिंदुस्थानच्याच कामाकरितां खर्च व्हावें असा पार्लमेंटचा स्पष्ट कायदा आहे. हिंदुस्थानचा राज्यकारभार जरी व्हाइसरॉय पाहतो तरी ब्रिटिशप्रधान मंडळांतील एक सभासद असलेल्या स्टेट सेक्रेटरीला तो जबाबदार असतो. म्हणजे हिंदुस्थानची राज्यसूत्रें विलायतेमध्यें बसून भारमंत्री हलवीत असतो स. १८५८ च्या कायद्यानें हिंदुस्थानच्या बजेटास त्याची मंजूरी मिळवावी लागते व त्यांच्या मंजुरी-शिवाय कोणतीही लहान मोठी रकम खर्च करतां येत नाहीं. परंतु सोयींखातर हिंदुस्थानसरकारास आजपर्यंत बऱ्याच सवलती देण्यांत येत असत. १९१९ च्या कायद्यानें हिंदुस्थान सरकारास आर्थिक बाबतींत कांहीं बाबती शिवाय (पृ. १०३

महा ) बरेंचसें स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे. या वगळलेल्या बाबी वरिष्ठ कौन्सिलच्या अधिकारा बाहेर असल्यामुळें पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें नाहीं.

पार्लमेंट स्वतः हिंदुस्थानच्या जमाखर्चांवर हुकमत चालवीत नाहीं. त्याची सर्व जबाबदारी भारतमंत्री व हिंदुस्थानसरकार या दुकलीवर टाकण्यांत आली आहे. मागे सांगितल्या प्रमाणें ( पृ. ५७ ) दरवर्षी हिंदुस्थानचें बजेट पार्लमेंटास औपचारिक रीत्या सादर करण्यांत येते व कांहीं चर्चा झाल्याशिवाय त्यावर कायदेशिरपणाचा शिक्का मारण्यात येतो. पार्लमेंटाला फक्त नांवानें जबाबदार असणाऱ्या भारतमंत्र्याचा पगार व त्याच्या ऑफिसचा इतर खर्च हिंदी तिजोरींतूनच भागविण्यांत येई. परंतु नवीन सुधारणामुळें हा खर्च इंग्लंडच्या तिजोरींवर पडला आहे. ह्या सुधारणेमुळें हिंदुस्थानचा बराच फायदा होणार आहे. स्वतःच्या खिशास यापुढें चट्टा बसणार असल्यामुळें पार्लमेंट पूर्वी प्रमाणें बेफिकीर न राहतां जागृत राहील. तसेंच भारतमंत्र्याच्या पगारास मंजुरी देण्याच्या वेळीं पार्लमेंटांत दरवर्षी त्याच्या धोरणावर कडक टीका होण्याचा संभव असल्यामुळें, भारतमंत्र्यास आजवर जसें बेजबाबदार रीतीनें वागतां आलें, तसें वागतां यावयाचें नाहीं.

---

# प्रकरण दहावें.

## जमीनमहसूल.

The uncertainty of the land-tax paralyses agriculture, prevents saving, and keeps the tiller of the soil in a state of poverty and indebtedness.

—*Romesh Chandra Dutt.*

**१२६ जमीनमहसुलाचा प्राक्कालीन संक्षिप्त इतिहास**—हिंदुस्थानच्या आजच्या परिस्थितींत जमीनमहसुलाचें उत्पन्न किती दांडगें आहे, हें मागील प्रकरणांवरून वाचकांस कळून आलें असेलच उत्पन्नापैकीं कांहीं

ठराविक भाग कर ह्मणून राजास देण्याची वहिवाट फार पुरातन काळापासून चालत आलेला आहे. मनुस्मृतीमध्यें जमीनींत जें धान्य पिकेल त्याचा, ( जमीनींच्या मगदुराप्रमाणें व प्रसंगास अनुसरून ) $\frac{1}{12}$, $\frac{1}{8}$, किंवा $\frac{1}{6}$ कर म्हणून घ्यावा असे सांगितले आहे. धान्य अतिशय पिकले असल्यास राजानें बारावा हिस्सा घ्यावा; पीक मध्यम आलेले असल्यास लाभांतून आठवा हिस्सा घ्यावा; आणि पीक उत्कृष्ट आलेले असल्यास निवळ उत्पन्नांतून सहावा हिस्सा घ्यावा, असें धर्मशास्त्रकारांचें मत आहे. पूर्वी हा कर धान्याच्या रूपांत वसूल होत असें. ही पद्धति प्रजा व राजा या दोघांसहि फायदेशीर होत असें कारण जें पिकेल त्यांतील सहावा हिस्सा सरकारांत जावयाचा असल्यामुळें अवर्षणकाळीं हल्लीं सारखा शेतकऱ्यास त्रास भोगावा लागत नसें उलट, मेघराजानें कृपा करून उत्तम पीक आल्यास सरकारासहि चांगला फायदा होई. ही पद्धत मोंगलापर्यंत अशीच अव्याहतपणें चालत आली असावी. मोंगलांच्या अमदानींत हींत बदल झाल्याचें इतिहासांवरून दिसून येतें. अकबर व त्याचा हिंदू मंत्रि राजा तोडरमल या दोघांनीं एक नवीन तऱ्हेची पद्धति आपल्या कारकीर्दीत अमलांत आणली व ती आजपर्यंत तशीच थोड्या बहुत फेरफारानें चालत आली आहे. तोडरमल्लानें देशांतील सर्व जमीनींची पाहणी व मापणी करून त्यांच्या दर्जावरून सरकार देण्याचें प्रमाण ठरवून टाकलें. यावेळेंपासून हा कर ऐन जिनसी न घेतां नाण्यांत घेण्यांत येऊं लागला. मागील १९ वर्षांच्या पिकाची सरासरा किंमत ठरविण्यांत येऊन सरकारास देण्याची रकम कायम करण्यांत आली व ह्या रकमेची दहा वर्षांनीं फेर तपासणी करावी असें त्यावेळीं ठरविण्यांत आलें मोंगलाचें बस्तान ज्या ठिकाणीं कायम वसलें होतें तेथें ही पद्धत सुरूं व्हावयास कांहींच अडचण पडली नाहीं. परंतु ज्या ठिकाणीं त्याचें आसन डळमळीत होतें तेथें, रयतेकडून उत्पन्नाचा अंश दरसाल पाहणी होऊन ठरलेले दराप्रमाणें घेण्यांत येई. हा अंश कोणच्या रूपांत द्यावयाचा हा प्रश्न रयतेच्या मर्जीवर सोंपविण्यांत आला होता. हीच पद्धति पुढें शिवाजीनें दादोजी कोंडदेव यांच्या सल्यानें आपल्या जहागिरीच्या मुलुखांत सुरूं केली. मोंगल लोक उत्पन्नाचा $\frac{1}{3}$

वा अंश कर म्हणून घेत असत. परंतु हा दर प्रजेस जाचक होतो असें पाहून मराठ्यांनीं ४ था हिस्सा घेण्यास सुरवात केली. मोंगल साम्राज्याची भरभराट असतांना जमाबंदीची व्यवस्था उत्तम होती; परंतु त्यांच्या राज्यास उतरतीं कळा लागून सर्वत्र बेबंदशाही माजल्यानें सरकारास वसूल नीट गोळा करतां येईना यामुळें पुढें इजाऱ्याची वाईट चाल सुरू झाली. प्रांताचे किंवा सुभ्याचे विभाग पाडून त्यांचा सारा ठरविण्यांत येई व तो वसूल करण्याचें काम त्या भागांत राहणाऱ्या सावकारास अगर घरंदाज अशा एकाद्या प्रतिष्ठित गृहस्थास मक्त्यानें देण्यांत येई. आपल्या मुलुखांस हिंदु राजांकडून उपसर्ग पोचूं नये म्हणून कधीं कधीं हिंदू राजांना हे मक्ते देण्यांत येत असत. या मक्तेदारांना पूर्वी जमीनदार किंवा तालुकदार या नावानें संबोधीत असत. वरील हकीगतीवरून जमीनदार हे जमिनीचे मालक नसून केवळ सारा वसूल करणारे अंमलदार होत, हें वाचकांस कळून आले असेलच. परंतु पुढें मोंगलांची मध्यवर्ति सत्ता कमकुवत झाल्यामुळें व कोणी प्रबल शास्ता न उरल्यामुळें हे मक्तेदार जमीनीवर आपली मालकी सांगू लागले. पुढे यांनीं मक्ते देण्यास सुरवात केल्यामुळें रयतेवर कराचा मोठा बोजा पडूं लागला. कारण ठराविक रकमेची भरपाई करून स्वतःची खळगी तुडुंब भरण्याकरितां या पोटमक्तेदारांनीं रयतेस गांजण्यास सुरवात केली.

१२७ **मराठ्यांच्या अमदानींतील स्थिति**—दादोजी कोंडदेवाच्या सल्ल्यानें शिवाजीनें तोडरमल्लाची जमीनधारेपद्धति आपल्या जहागिरीच्या मुलुखांत सुरू केल्याचें वर सांगितलें आहेच. १६६४ सालीं त्यास राज्याभिषेक झाल्यानंतर जीं दोन वर्षें फुरसतीचीं मिळालीं तीं कांहीं न करून फुकट न दवडतां त्यानें आपल्या राज्याची व्यवस्था लावण्यांत खर्च केलीं. त्या राज्यव्यवस्थेचें काय स्वरूप होतें, हें आपणास येथें पहावयाचें नसून त्यानें वसुलाची व्यवस्था कशी लाविली होती हें पहावयाचें आहे. हल्लीं उपलब्ध झालेल्या माहितीवरून शिवाजीनें राज्यांतील वसूल करण्याची व्यवस्था उत्तम लाविली होती, असें म्हणावयास हरकत नाहीं. जमिनीची मापणी करून सरकारसाऱ्याबद्दल शेतकऱ्यांपासून कबुलायत लिहून घ्यावयाची व मग जमीन त्याच्या हवाली करावयाची असा त्यानें

प्रघात पाडला. हा सारा ऐनजिनसी असो वा नक्त असो, जमिनीच्या उत्पन्नाच्या $\frac{3}{2}$ पेक्षां तो केव्हांही ज्यास्त असूं नये, असा ठराव करून तो हप्त्याहप्त्यानें वसूल करावा असा त्यानें नियम केला. यामुळें तो भरण्यास रयतेस सुलभ पडूं लागलें. तसेंच अवर्षणकाळीं लोकांस साऱ्याची सूट अथवा अन्यमार्गें मदत देण्याची व्यवस्थाही त्यानें केली होती.

राज्याची अंतर्व्यवस्था करण्यास पेशव्यांस कधींच फुरसत मिळाली नाहीं. पहिल्या तिन्ही पेशव्यांचा सर्व वेळ परप्रांत काबीज करण्यांतच गेला. थोरला माधवराव अल्पवयांतच कालवश झाल्यानें तो या बाबतींत कांहींही करूं शकला नाहीं. पुढें तर खुद्द पेशव्यांच्या घराण्यांतच दुही माजल्यामुळें तिजपासून दौलत वांचविण्यांतच नानादी इतर मुत्सद्यांचा काल गेला. असें जरी होतें तरी, राज्यव्यवस्थेचें काम बिनबोभाट सुरळीतपणें चाललें होतें. वर्षाऋतूंत पेशव्यांस जी फुरसद मिळे. तिचा राज्यव्यवस्थेच्या कामीं ते उपयोग करीत असत व त्यामुळें सर्व कारभार सुरळीत चालला होता. राज्यकारभाराच्या महत्वाच्या अंगापैकीं जमाबंदीची व्यवस्था त्यांनीं कशी लाविली होती, हें खालील उताऱ्यांवरून कळून येईल.

" जमाबंदीच्या व्यवस्थेसाठीं पेशव्यांच्या प्रत्यक्ष अंमलाखालील प्रांताचे बारा सुभे केले होते. पुष्कळ गांवें मिळून एक तर्फ होई. त्यावर शेखदार म्हणून अंमलदार असे. पुष्कळ तर्फ मिळून महाल. त्यावरील अधिकाऱ्यास मामलेदार म्हणत. पुष्कळ महाल मिळून सुभा होई व त्याच्यावर सुभेदार असे. वसुलाचे काम मामलेदारावरच फार पडे. तो महालांतील देशमुख, देशपांडे, पाटील, कुळकर्णी यांच्या मदतीनें तें काम करी. पूर्वी मलिकंबरानें जमिनीच्या प्रती लावून धान्याचे नियम बसविले होते. त्याच्या प्रतबंदीस तनखा म्हणत. सदाशिवरावभाऊनें नवीन मोजणी करून जमिनीच्या प्रती लाविल्या व धान्याचे नवीन नियम केले. भाऊची प्रतबंदी फक्त पुण्याच्या सुभ्यात सुरूं झाली होती. तिला " कमाल " म्हणत. जमिनीपासून येणाऱ्या वसुलास " ऐनजमा " म्हणत व बाकीचा वसूल " शिवाय जमा " या सदराखालीं येई. ज्याठिकाणीं ऐनजि-

नसी वसूल घेण्याची वहिवाट होती त्याठिकाणी शेतकऱ्याचा वियाणें, मजुरी इत्यादी सदरावर झालेला खर्च घालवून राहिलेल्या धान्यापैकीं द्वितीयांश किंवा तृतीयांश शेतकऱ्यास राखीत व बाकीचे सरकारी वसूल म्हणून घेत. दक्षिण कोंकणांत भात जमिनीवर दर बिध्यास दहा मण हा कमालीचा वसूल म्हणून आकारण्यांत येई. जमीन सुपीक नसल्यास अगर शेतकऱ्यास इतर अडचणी जेथें असत तेथे हा वसुलाचा आकार पुष्कळ कमी असे. वसुलाबद्दल जेथें द्रव्य घेण्याची वहिवाट होती तेथें दरखंडी उत्पन्नामागे १५, २०, अगर ३० रुपये असा हलका वसुलाचा दर होता. नाशिक जिल्ह्यांत जिराईत चांगल्या काळभोर जमिनीवर दर बिघ्यास २ रुपये कर असून बागाईत जमिनीवर दरबिघ्यास ५ किंवा ६ रुपये होते.

"कुलीन घराण्यांतील चांगली सचोटीची माणसें पाहून त्यांस मामलती देण्यांत येत. नेमणूक व्हावयाच्या वेळी एक सनद देत. तींत प्रजेशीं व सरकारशीं इमानानें वागण्याबद्दल ताकीद असे. मागील वर्षांच्या हिशेबावरून महालाच्या जमाखर्चाचें अंदाजपत्रक मामलेदारास प्रथम देण्यांत येई, व वर्षाच्या शेवटीं जमाखर्चाची तपासणी होई. त्यामुळें अन्याय होण्याची फारशी भीति नसे. दरवर्षास मामलेदार बदलावयास असा सामान्य नियम असे.

"नळ, पाणी अडविण्यास बांद, सार्वजनिक रस्ते, प्रवासी लोकांसाठीं विहिरी, इत्यादि लोकोपयोगी कामें करण्यासही सरकार नेहमीं तयार असे. कधीं कधीं लोकांनीं निम्मा खर्च व सरकारनें निम्मा खर्च करावयाचा या रीतीनें, तर कधीं कधीं सर्वच खर्च आपण स्वतः करून असलीं कामें सरकार पार पाडीत असे. एकाद्या गांवची खरावी होऊन जमीन पडित झाल्यास कांहीं वर्षेंपर्यंत वसुलाचा अगदीं हलका दर ठेवून व इतर सवलती देऊन जमीन लागवडीस आणण्यास उत्तेजन मिळे. जमिनीचा सारा वसूल करण्यांतही रयतेस सोईस्कर असेच नियम होते. लोकांची फार अडचण दिसली तर सूट देण्यांत येई. शेतकीची साधनें जवळ नसल्यामुळें शेतकऱ्यांचें काम नडतें असें दिसून आल्यास सरकारांतून थोड्या व्याजानें किंवा बिनव्याजानें पैसा देण्यांत येई. 'मग

सवडीसवडीनें त्याची फेड करून घेण्यांत येई. कुठाकडे बाकी थकली तर ती वसूल करण्याकरितां त्याचें घरदार विकून सरकारनें त्यास भिकेस लाविलें असें कधींच झालें नाहीं." *

**१२८ धारेबंदीच्या विविध तऱ्हा**—पूर्व रूढीस अनुसरून इंग्रज सरकारही जमिनीच्या उत्पन्नापैकीं बराच मोठा अंश घेतें. इंग्रजी अमलाच्या सुरवातीस येथें विविध तऱ्हेची जमीन धारेपद्धति रूढ होती. इंग्रज सरकारनें निरनिराळें प्रांत जेव्हां हस्तगत केले, तेव्हां त्या प्रांतात रूढ असलेली पद्धतीच कायम ठेवण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. त्यामुळें हल्लीं जमीनव्यवस्थेच्या विविध तऱ्हा दिसून येतात. त्यामुळें ही बाब अतीशय गुंतागुंतीची झणून दुर्ज्ञेय झाली आहे. हल्लीं धारेबंदीच्या तीन तऱ्हा अस्तित्वांत आहेत. त्या झणजे जमीनदारी, रयतवारी व तालुकदारी होत. बंगाल, बिहार, संयुक्तप्रांत, मध्यप्रांतापैकीं बनारस जिल्हा व मद्रास इलाख्यांतील कांहीं भाग यांत जमीनदारी, मद्रास व मुंबईत रयतवारी व संयुक्तप्रांत, मध्यप्रांत व पंजाबांत तालुकदारी पद्धति चालू आहे. रयतवारींत रयतेबरोबर, तालुकदारींत तालुकदाराबरोबर, व जमीनदारींत जमीनदाराबरोबर ठराव होतात. या तिन्ही पद्धतींतील मुख्य तत्व झटलें झणजे सरकार जमीनीचें मूळ मालक आहे व ती रयतेस भाड्यानें देण्यांत आली आहे. रयत जोपर्यंत सरकार सारा नियमितपणानें देत आहे तोपर्यंत, ती जमीन विकणें किंवा खंडानें देणें वगैरे गोष्टी त्यांस मालकाप्रमाणें करतां याव्या व तो मेल्यावर जमीन त्याचे वारसाकडेहि चालावी. हें तत्व अगदीं चुकीचें असून या बाबतींत इंग्रज सरकारनें अज्ञानानें अन्याय केला असल्याचें खालील विवेचनावरून कळून येईल.

**१२९. भूस्वामित्वाचा लढा**—वरील तत्व चुकीचें असें झटलें, तें कां, हें येथें सांगणें अवश्य आहे. चुकीचें झणण्याचें कारण असें कीं, जमीनीवर सरकार जें आपलें स्वामित्व सांगतें तें अन्यायाचें आहे. हिंदुस्थानच्या प्राक्कालीन इतिहासाची वरवर पानें चाळणारांस असें दिसून येईल कीं, पूर्वी जमिनीवर राजा-

* मुलांचा महाराष्ट्र. पृष्ठ ४११.

ची मालकी नसे. कोणी आपल्या खर्चानें व श्रमानें जंगल वगैरे साफ करून जमीन लागवडीस आणील, त्याच्या मालकीची ती जमीन समजली जाई. राजाचा फक्त, जमिनीच्या उत्पन्नांतून सहावा हिस्सा घेण्याचा हक्क असे. या अंशास अर्थातूच सारा न ह्मणतां संरक्षणाचा कर असें ह्मणत. परंतु हल्लीं बहुतेक भागांत जमिनीवर राजाचें स्वामित्व आहे असें मानलें जातें, व राजास जमिनीबद्दल प्रजेकडून जें कांहीं मिळतें तें संरक्षण–करा दाखल नसून आपली जमीन उपभोगण्यास तो लोकांस देतो, त्याबद्दल कांहीं भाडें अथवा मोबदल्यादाखल आहे असें इंग्रज सरकार समजतें. इंग्रज लोकांना स्वदेशांत एक विवक्षित जमीनदारवर्ग पहाण्याची संवय झाल्यामुळें येथेंही अशा प्रकारचें जमीनीचे मालक असले पाहिजेत, या समजुतीनें बंगाल्यांतील मक्तेदारांनाच जमीनदार समजून कॉर्नवालिसनें त्यांच्याशीं करार करून कायमधारे पद्धति प्रचारांत आणली. परंतु पुढें ती चूक नजरेस आल्यामुळें अधिकारी लोकांच्या मनानें उलट खावून सर्वभूमीचें स्वामित्व राजाकडे ह्मणजे कंपनी सरकारकडे आहे, जमिनीवर रयतेची मालकी मुळींच नाहीं, असें प्रतिपादण्यास त्यांनीं सुरवात केली. पुढें तर ह्या सिद्धांतास अनुसरून सरकारनें मुंबई व मद्रास प्रांतांत रयतवारी पद्धति चालू करून ह्या अन्यायावर कळस चढविला! एकदां सरकारचें स्वामित्व कबूल केलें कीं, शेतकऱ्यांपासून हवा तेवढा सारा घेण्यास किंवा तो न दिल्यास जमिनीचा लिलांव करण्यास सरकारास पूर्ण मोकळीक मिळालीच. हल्लींची तीस वर्षांनीं पहाणी करून सारा वाढविण्याची जी पद्धति, तिच्या बुडाशीं हेंच तत्व असून सरकारदस्त तारखेच्या तारखेस न भरल्यास जमिनीचा लिलांव करण्याचा अधिकार त्यास ओघानेंच प्राप्त झाला आहे.

खरा भू–स्वामित्वाधिकारी कोण, हा वादग्रस्त प्रश्न असल्याचें यांवरून वाचकांस दिसून येईल. प्रथम वॉरनहेस्टिंग व त्याचा कौन्सिलर फॅन्सिस ह्यांच्यामध्यें हा वाद सुरू झाला. हेस्टिंगच्या कारकीर्दीवरूनच त्याची या बाबतींत काय मतें होतीं, हें वांचकांना कळण्यासारखें आहे पुढें मिलनें बर्नियर सारख्या प्रवाशांच्या त्रुटित माहितीवर हवाला देऊन सरकारपक्षाचें मंडण करण्यास सुरवात

केली. तेव्हांपासून ह्या वादास चांगलेंच तोंड लागलें असून भूस्वामित्वाच्या प्रश्नावर आजपर्यंत रणें माजली आहेत. प्रो. विल्सननें मिलच्या कोटिक्रमाचें उत्तम खंडन केलें आहे. तसेंच हंटर मेन प्रभृति इंग्रजी इतिहासकारांची मतेंही एलफिंस्टन, बेडन पावेल प्रभृतींनीं चांगलींच खोडून काढली आहेत. भूस्वामीत्वाची कल्पना इंग्रज सरकारनें मुसलमानी बादशाहापासून घेतली आहे. पूर्वींचे राजे आपणास जमिनीचे मालक समजत असत. त्यांच्या जागीं ब्रिटिश सरकार आल्यामुळें अर्थात् पूर्वींच्या राजांचे सर्व हक्क त्यास प्राप्त झाले आहेत. व म्हणूनच हिंदुस्थानची सर्व जमीन सरकारची आहे असा त्यांच्या कोटिक्रमाचा सारांश आहे. परंतु एडवर्ड टॉमस नांवाच्या ग्रंथकारानें मुसलमान राजे आपणास जमीनीचे मालक मुळींच समजत नसत, असें सप्रमाण सिद्ध केलें असून बेडन पॉवेलचें मतही त्याचप्रमाणें आहे. त्याच्या मतें हिंदुस्थानांत खाजगी मालकीची कल्पना फार जुन्या काळांपासून चालत आलेली आहे. म्हणजे, जमीनमहसूल हा सारा नसून इतर करांप्रमाणेंच आकारलेला जमीनीच्या उत्पन्नांवरील कर आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, जरी मोठमोठ्या सरकारी कामगारांनीं व खुद्द सरकारनें जमीन महसूल हा करच आहे असें कबूल केलें होतें तरी, १८७९ च्या लँड रेव्हेन्यू कोडानें तमाम रयतेला occupant म्हणजे धारेकरी ठरवून सरकारचें भूमिस्वामित्व कायदेशीर केलें आहे!

**१३० अधिकारीवर्ग**.–स. १८७१ सालीं हिंदुस्थान सरकारनें जमाबंदी व शेतकी खात्याची स्थापना करून या खात्याचें सर्व कामकाज पहाण्यासाठीं एका मंत्र्याची नेमणूक केली. हा मंत्री वरिष्ठ कार्यकारी मंडळाचा सभासद असतो. नवीन सुधारणापूर्वीं हीं खातीं समाईक असल्यामुळें हिंदुस्थान सरकारची यांवर फार करडी नजर असे. परंतु सुधारणेच्या नव्या मनूंत जमीनमहसुलाचें उत्पन्न सर्वस्वी प्रांतिक सरकारच्या हवालीं करण्यांत आलें असून या खात्यांची व्यवस्था स्वमर्जीनुरूप लावण्याचा अधिकार मिळाला आहे. असें असतांही वरिष्ठ कार्यकारी मंडळांतून या मंत्र्याचें उच्चाटण झालें नाहीं, हे आश्चर्य होय! जमाबंदीची व्यवस्था निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळी असल्यामुळें होत एक पत्ता

केली. तेव्हांपासून ह्या वादास चांगलेंच तोंड लागलें असून भूस्वामित्वाच्या प्रश्नावर आजपर्यंत रणें माजली आहेत. प्रो. विल्सननें मिलच्या कोटिक्रमाचें उत्तम खंडन केलें आहे. तसेंच हंटर मेन प्रभृति इंग्रजी इतिहासकारांची मतेंही एलफिंस्टन, बेडन पावेल प्रभृतींनीं चांगलींच खोडून काढली आहेत. भूस्वामीत्वाची कल्पना इंग्रज सरकारनें मुसलमानी बादशाहापासून घेतली आहे. पूर्वींचे राजे आपणास जमिनीचे मालक समजत असत. त्यांच्या जागीं ब्रिटिश सरकार आल्यामुळें अर्थात् पूर्वींच्या राजांचे सर्व हक्क त्यास प्राप्त झाले आहेत. व म्हणूनच हिंदुस्थानची सर्व जमीन सरकारची आहे असा त्यांच्या कोटिक्रमाचा सारांश आहे. परंतु एडवर्ड टॉमस नांवाच्या ग्रंथकारानें मुसलमान राजे आपणास जमीनीचे मालक मुळींच समजत नसत, असें सप्रमाण सिद्ध केलें असून बेडन पॉवेलचें मतही त्याच्याच प्रमाणें आहे. त्याच्या मतें हिंदुस्थानांत खाजगी मालकीची कल्पना फार जुन्या काळांपासून चालत आलेली आहे. म्हणजे, जमीनमहसूल हा सारा नसून इतर करांप्रमाणेंच आकारलेला जमीनीच्या उत्पन्नावरील कर आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, जरी मोठमोठ्या सरकारी कामगारांनीं व खुद्द सरकारनें जमीन महसूल हा करच आहे असें कबूल केलें होतें तरी,१८७९ च्या लँड रेव्हेन्यू कोडानें तमाम रयतेला occupant म्हणजे धारेकरी ठरवून सरकारचें भूमिस्वामित्व कायदेशीर केलें आहे!

**१३० अधिकारीवर्ग**-स. १८७१ सालीं हिंदुस्थान सरकारनें जमाबंदी व शेतकी खात्याची स्थापना करून या खात्याचें सर्व कामकाज पहाण्यासाठीं एका मंत्र्याची नेमणूक केली. हा मंत्री वरिष्ठ कार्यकारी मंडळाचा सभासद असतो. नवीन सुधारणापूर्वी हीं खातीं समाईक असल्यामुळें हिंदुस्थान सरकारची यांवर फार करडी नजर असे. परंतु सुधारणेच्या नव्या मनूंत जमीनमहसुलाचें उत्पन्न सर्वस्वी प्रांतिक सरकारच्या हवालीं करण्यांत आलें असून या खात्यांची व्यवस्था स्वमर्जीनुरूप लावण्याचा अधिकार मिळाला आहे. असें असतांही वरिष्ठ कार्यकारी मंडळांतून या मंत्र्याचें उच्चाटण झालें नाहीं, हे आश्चर्य होय! जमाबंदीची व्यवस्था निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळी असल्यामुळें हीत एक पत्ता

अशी कोठेंच आढळत नाहीं. मद्रास इलाख्यांत विभागाधिकारी (Divisional Commissioner) नसल्यामुळें पृष्ट ८१ वर सांगितल्याप्रमाणें जमीन महसुलाच्या व्यवस्थेचें काम पहाण्यास रेव्हेन्यू बोर्डस् आहेत. या बोर्डांत चार सभासद असतात. यांकी दोन सभासद या खात्याशीं संबंध येणाऱ्या सर्व कामकाजांचा निकाल लावतात. तिसरा जमाबंदी (Settlements) व हक्कनोंदणी (Registration of Land records) वगैरे कामें पहातो. व चवथा मीठ, अबकारी यासारख्या उत्पन्नांच्या बाबींवर लक्ष ठेवतो. ज्या इतर प्रांतात हे विभागाधिकारी आहेत तेथें ह्या बोर्डांत दोनच सभासद असतात. मध्य प्रांत व ब्रह्मदेशांत या बोर्डाचीं सर्व कामें सचीव (Financial Commissioner) या नांवाचा अधिकारी पहातो. पंजाबांत असें दोन सचीव आहेत. मुंबई इलाख्यांत वर सांगितलेले विभागाधिकारी असल्यामुळें यांहून निराळीच व्यवस्था अस्तित्वांत आहे. मुल्की खात्याच्या व्यवस्थेकरितां जिल्ह्यास घटक समजण्यांत येतें. रेग्युलेशन प्रांतात जिल्हाधिकाऱ्यास कलेक्टर व नॉन रेग्युलेशन प्रांतात डेप्युटी कमिशनर असें म्हणतात. या खात्यांतील सर्व तक्रारींबाबद व भानगडींचा तोच निकाल करतो. त्याच्या हाताखालीं असिस्टंट व नायब कलेक्टर असतात. यांच्याहून कनिष्ट प्रतीच्या अंमलदारास तहशीलदार अगर मामलेदार म्हणतात व त्यांना जिल्ह्यांतील पोटविभाग जे तालुके अथवा तहशील त्यांचे काम पहावें लागतें. सिंध विभागांत मामलेदारास मुखत्यार असें म्हणतात. यांच्या कचेरीत हिशेब तपासनीस व ऑडिटर्स लोकांचा भरणा फार असतो. त्यांचीं कामें म्हणजे खेड्यांतील कामकाजांवर देखरेख ठेवणें. त्यांचे हिशेब तपासणें वगैरे होत. खेडेगांवांत वसुलाच्या हिशोबाचें जबाबदारीचे व जोखमीचें काम कुलकर्णी, तलाटी किंवा पटवारी या नांवाचे कारकून करतात. गांवचे हिशेब ठेवणें, नकाशे तयार करणें, हक्कांची नोंद ठेवणें, लागवडीखालीं असलेल्या अगर पडीत जमीनीची मापणी करणें, गांवची सरहद्द कायम राखणें व दरसाल जमाबंदीची चोपडी तयार करणें, हीं व इतर तदनुषंगिक कामें कुलकर्ण्यासच करावी लागतात. व त्यामुळें त्याच्यावर फार मोठी जबाबदारी असते.

१३१ जमीनदारी—सन १७६५ सालीं बंगाल, बिहार व ओरिसा या तीन प्रांताची दिवाणी कंपनीस शहाअलम बादशहांकडून मिळाल्यामुळें तिला या तीनही प्रांतांचा राज्याधिकार प्राप्त झाला. त्यावेळीं जमिनीशीं संबंध असणारे दोनवर्ग—एक जमीन कसणारी कुळें व दुसरा म्हणजे कुळांकडून वसूल घेणारे जमीनदार–तिच्या दृष्टोत्पत्तीस आले. चार पांच वर्षे कंपनीनें सारा वसूल करण्याची पूर्वीचीच पद्धति कायम ठेविली. कारण तिच्या नोकरांना या प्रांतांची कांहींच माहिती नव्हती. परंतु पुढें अनुभवानें पूर्वीच्या पद्धतींत अन्याय जुलुमास विशेष वाव मिळतो असें दिसून आल्यामुळें १७६९ सालीं कंपनीनें अधिकारांवरील पूर्वीची माणसें कमी करून युरोपियन सुपरवाइझर्सकडे तें काम सोंपविलें. परंतु असें करूनहि कांहीं फायदा झाला नाहीं, उलट कंपनीच्या नोकरांना प्रांतांची कांहींच माहिती नसल्यामुळें त्यांच्या हातून शेंकडों चुका झाल्या. त्यांत १७७० सालीं कडक दुष्काळ पडून भयंकर जनसंहार झाला असतांनाहि सारा चापून वसूल करण्यांत आला. त्यामुळें कंपनीच्या अमलाविरुद्ध ओरड झाली. या सर्व प्रकारांवरून कोर्ट ऑफ डायरेक्टरांना जमिनीचा सारा वसूल होईल तर तो जमीनदारामार्फतच होईल, असें आढळून आलें; ही अव्यवस्था मोडून टाकण्याचें काम लॉर्ड कार्नवालिस यांजकडें सोंपण्यांत आलें त्यानें मागील सालची साऱ्याची पत्रकें पाहून दहावर्षांपुरता कायमचा सारा ठरवून टाकला. पुढें १७९३ सालीं कोर्ट ऑफ डायरेक्टरांनीं मागील अनुभवांवरून साऱ्याचा दर कायमचा ठरवून टाकण्याचें ठरविलें. परंतु मि. शोअर ( पुढें लॉर्ड टेनमाऊथ ) यांनीं ठराव कायमचा करूं नये असें डायरेक्टरांस कळविलें. परंतु त्यांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नास लॉर्ड कार्नवालिसनें रोख ठोक उत्तरें दिल्यामुळें डायरेक्टरांनीं एक लांब लचक खलिता लिहून जमीनदारांकडून घ्यावयाचें साऱ्याचा दर कायमचा ठरवून टाकला. १७९५ सालीं वायव्य प्रांतांतील बनारस जिल्ह्यांस हा ठराव लागूं करण्यांत आला.

अशा रीतीनें साऱ्याचा दर कायमचा ठरला खरा. परंतु जमीनदार व त्यांचीं कुळें यांतील परस्पर संबंध त्यावेळेस लेखानिबद्ध न झाल्यामुळें जमीन-

दारांचा फायदा होऊन कुळांचा मात्र तोटा झाला. जमीनदारांचे अधिकार कायद्यानें स्पष्ट ठरल्यामुळें त्यांची शाबिती करण्यास त्यांना कांहींच त्रास पडत नसे. पण अशी स्थिति कुळांची नव्हती. स्वतःचा अधिकार शाबित करावयाचा झाल्यास त्यांना कायमच्या वहिवाटीकडे बोट दाखवावें लागे; परंतु तसें करणें त्यांच्या पथ्यावर पडत नसे. यामुळें त्यांच्यांत असंतोष पसरून आपल्या संरक्षणाकरितां त्यांनीं सरकारकडे अर्ज केला. कायमचा ठराव करतेवेळीं कोर्ट ऑफ डायरेक्टर्सना असा कांहीं तरी प्रकार होईल असें पक्कें ठाऊक होतें; व ह्मणून त्यांनीं आपल्या ठरावांत असें कलम घातलें होतें कीं, " आह्मी जमीनदारांना आपआपल्या जमीनीचें मालक ह्मणून कायम करतो. इतकेंच कीं, त्यांनीं हल्लीं ठरविलेला सारा सालोसाल दिला पाहिजे; आह्माला सारा ज्यास्त मिळावा ह्मणून रयतेच्या हल्लींच्या स्थितींत, किंवा तो जो धारा जमीनदारांना देत असेल त्यांत हात घालण्याची मुळींच इच्छा नाहीं; तरी पण, रयतेच्या जमिनी जाऊं नयेत, ह्मणून राज्यकर्ते या नात्यानें आह्मास जो अधिकार प्राप्त झाला आहे तो आमचा आह्मी राखून ठेवीत आहों, व प्रसंगीं तो चालवूं असें स्पष्टपणें सर्वांस जाहीर करितो. सर्व प्रजेचें हित झालें ह्मणजे आमचें होणारच. या व्यतिरिक्त आमचें विशिष्ट हित साधून घेण्यांत या अधिकाराचा आम्ही उपयोग करणार नसल्यामुळें जमीदारांना त्याविषयीं कुरकुर करण्यास जागाच नाहीं." या कलमाधारें १८८५ साली कुळांच्या संरक्षणाकरितां ( टेनन्सी ॲक्ट ) एक कायदा करण्यांत आला. या कायद्यास जमीनदारांतर्फे हिंदू पेट्रियटचे कर्ते बाबू क्रिस्तोदास पाल यांनीं एक लेखमाला लिहून विरोध केला होता. या विरोधी मंडळींत बरींच मोठमोठी मंडळीं सामील होती. परंतु कुळांची बाजू इंडियन मिरर' कनिंगहॅम वगैरेंनीं उत्तम रीतीनें मांडल्यामुळें हा कायदा पास होण्यास अडचण पडली नाहीं. या कायद्याअन्वयें जमीनदारांचें हक्क बऱ्याच अंशानें कमी झालें असून झालें असून त्यामानानें रयतेस बराच फायदा झाला आहे. तो कसा, हे विस्तारभयास्तव येथें सांगता येत नाहीं.

**१३२ रयतवारी**—वरील विवेचनावरून जमीनदारी पद्धतीचें यथार्थ स्वरूप व इतिहास वाचकांच्या ध्यानांत आला असेलच. तेथें जमीनदार लोक हे

जमिनीचे मालक ठरले असून शेतसाऱ्याबद्दल त्यांना जबाबदार धरलें जातें. ते स्वतः जमिनी वहात नाहींत, तर कुळास वहातीस देतात व त्याबद्दल कुळांकडून उत्पन्नाचा पांचवा हिस्सा त्यांस मिळतो, व सरकारदेणें एकंदर उत्पन्नाच्या शेंकडा ५-६ टक्के भरतें.

रयतवारी पद्धतींत शेतसाऱ्याबद्दल शेतकऱ्यांसच जबाबदार धरलें जातें. सरकारदेण्याचा दर तीस वर्षांपुरतां कायम करण्यांत येतो व या मुदतीनंतर त्यांत कमीज्यास्त वाढ होतें. साऱ्याचें प्रमाण जमिनीच्या प्रतीवरून व मगदुरांवरून ठरविण्यांत येतें. हें प्रमाण पूर्वी $\frac{१}{२}$ होतें. परंतु सध्यां तें $\frac{१}{३}$ किंवा $\frac{१}{५}$ वर आलें आहे. हा दर कायमचा नसल्यामुळें रयतेचें बरेंच नुकसान होतें असें हिंदी पुढाऱ्यांचें म्हणणें आहे.

१३३ कायमधारेबंदी--एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत सरकारचें जमीनमहसूलविषयक धोरण एक टीकेचा विषयच होऊन बसलें होतें. राष्ट्रीय सभेंत, जाहिर सभांच्या व्यासपीठावरून ह्याच विषयाचा खल होत असे. केवळ लोकजागृतीचा तो काळ असल्यामुळें लोकशिक्षणाच्या पलीकडे या खलाची मजल जाऊं शकली नाहीं. एकेवेळीं मात्र या वादाचें वरिष्ठ कौन्सिलापर्यंत लोंढ जाऊन पोंचलें होतें. अशा स्थितींत जमीन महसुलाचा विचार करितांना ही बाब अजिबाद गाळून टाकून चालावयाचें नाहीं. स्थलसंकोचास्तव या प्रश्नाचा समग्र इतिहास देणें शक्य नाहीं, तरी वाचकांच्या माहितीखातर अनुकूल व प्रतिकूल टीकाकारांची मतें खालीं देत आहे. त्यावरून कायमधारेबंदीच्या इष्टानिष्टतेविषयीं वाचकांनीं आपलीं मतें बनवावींत.

" शेतकीच्या उत्पन्नांतून फार मोठा भाग स्वतःसाठीं घेऊन सरकार त्याचा व्यय बहुतेक अनुत्पादक कामांकडेंच ( निदान हिंदुस्थानच्या संबंधानें तरी ) करितें हे ह्या ( दारिद्र्याच्या ) कारणांपैकीं एक मुख्य कारण आहे. ... ... या कारणांमुळेंच धारेबंदीच्या विषयांस राष्ट्रीय सभेनें आपल्या कार्यक्रमांत अग्रस्थान दिलें आहे "---प्रॉ. जान ॲडॅम्स.

" रयतवारी पद्धतीचा इतिहास पाहिल्यास असें दिसून येईल कीं, जमीनदारी पद्धतींत कितीही दोष असले तरी ती परवडेल, पण ही रयतवारीची पद्धत नको. " —ना. एस. सुब्रम्हण्य अय्यर.

" सरकारचें हित आणि लोकांचें हित सारख्याच प्रमाणानें बळकट होईल व वाढेल असा अगदीं खातरीपूर्वक मार्ग म्हटला म्हणजे एक आहे. तो मार्ग म्हणजे मला वाटते पहिला आणि पहिल्या प्रतीचा आहे. जमिनीचा धारा कायम करणें आणि प्रस्तुतची व्यवस्था बदलून कायमची व्यवस्था करणें, हाच तो मार्ग होय. " —१८६२ दुष्काळ कमिशनचे अध्यक्ष.

" या सर्व गोष्टींचा काळजीपूर्वक विचार केल्यावर राणीसरकारचें असें मत झालें आहे कीं, ह्या मार्गामुळें ज्यांचा जमिनीशींच निकट संबंध आहे, त्यासच केवळ नव्हे, तर सामान्यतः सर्व लोकांस रास्तपणें फायदा होण्यासारखा आहे. आणि **तो फायदा इतका मोठा आहे कीं, तो साधण्यासाठीं जमिनीच्या महसुलांत कांहीं थोडें नुकसान झालें तरी त्याकामीं हिम्मत करणें न्यायाचें होईल**, आणि ज्या ज्या प्रदेशांत अटी पूर्ण झाल्या आहेत किंवा होतील, त्या त्या प्रदेशांत कायम धारेबंदी सुरू करणें हेंच तत्व खऱ्या राजनीति तत्वास अनुसरून आहे. त्याच्या योगानें हिंदुस्थानांतील सांपत्तिक स्थिति सुधारण्यास जोर येईल आणि देशांतील ( हिंदुस्थानांतील ) **राणीसरकारच्या सर्व ज्ञातींच्या प्रजावर्गामध्यें सुख आणि शांति हीं शिखरास जाऊन पोहोंचतील.** "—भारतमंत्री सर चार्लस् वुड

" बंगालमध्यें शिक्षणाकडे ८३ लक्ष रुपये खर्च होतात. पैकीं सरकार फक्त २१ लक्ष खर्च करितें, आणि बाकीचे पैसे लोक खाजगी रीतीनें भरतात. आणि ते तसे खर्चण्यास कायम धारेबंदीमुळें समर्थ असतात. " —सेन.

" त्याचा परिणाम आपल्या हिशेबाबाहेर जाईल; शेतकरी लोकांस स्वावलंबन, साहस, उद्योग हीं साधण्यास उत्तेजन येईल; आणि ज्या ठिकाणीं धारा नेमस्त आहे त्या ठिकाणीं द्रव्य संपादन आणि भांडवलाचा सदुपयोग होईल. हा मार्ग हितप्रद आहे असें जाणून लोक त्याचा स्वीकार करतील. एकपक्षीं सरकारला

सारा वाढवितां येण्याविषयींचे भावी हक्क बुडल्यामुळें पुढें नुकसान होण्याचा संभव आहे. परंतु दुसऱ्या पक्षीं महसुलाच्या इतर बाबतींत हळुं हळुं वाढ होत जाईल आणि तें नुकसान भरून येईल इतकेंच नव्हें, तर तें उत्तम प्रकारें भरून येईल." —सर रिचर्ड टेंपल.

" नवाधारा नक्की होईपर्यंत मालमत्तेची किंमत उतरली, बाजारांतील पत कमी झाली, जमीनदार आणि कुळें यांत भेद पडत जाऊन चिरडखोर प्रकार घडून येऊं लागले, सरकारच्या हेतू विषयीं संशय उत्पन्न झाला, आणि लहान सहान अनेक अधिकारी खेड्यापाड्यांभर पसरले." —सर आकलंड कालव्हिन.

" दुष्काळांची तीव्रता कमी करण्यास रामबाण उपाय एकच आहे, तो म्हणजे सर्व प्रांतांत कायमधारेबंदी करणें. असें केल्यास शेतकऱ्यास व जमिनदारांस शेतांत विहिरी खणून, देशी परदेशी खतें वापरून पिकाची उत्तम पैदास करण्यास प्रोत्साहन मिळेल व दुष्काळांत उपयोगी पडावा म्हणून धनसंचय व धान्यपुरवठा करतां येईल." —श्री. रमेशचंद्र दत्त.

वरील अवतरणांवरून लोकमताचा वारा कोणच्या दिशेनें त्यावेळीं वहात होता हें कळून येईल. या सर्वांचा योग्य तो परिणाम सरकारावर होऊन लॉर्ड कर्झननें १९०२ सालीं चौकशी करून सरकारी धोरण जाहिर केलें. त्यांत त्यांनीं कायमधारेबंदीपासून फायदा होईल असें सरकारास वाटत नाहीं, असें स्पष्ट म्हणून जनतेच्या मागण्यांस वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत.

१९०५ सालीं अवर्षणामुळें पीक ४ आण्यांहून कमी आल्यास सान्यांत सूट द्यावी असें सरकारनें ठरवीलें आहे.

2322

REFBK-0002322